महालक्ष्मी मंदिर कोल्हापुर -एक सांस्कृतिक अध्ययन

पीएच्.डी (कला) पदवीसाठी

प्राचीन भारतीय संस्कृती या विषयात

मुंबई विद्यापीठाला सादर केलेला प्रबंध

सादरकर्ती

सौ. ऋता अरूण ठाकुर

मार्गदर्शक 8282

डॉ . अरविंद प्रभाकर जामखेडकर

के.जे. सोमय्या सेंटर फॉर बुद्धीस्ट स्टडीज

के.जे. सोमय्या मॅनेजमेंट बिल्डिंग, तिसरा मजला

विद्यानगरी, विद्याविहार (पूर्व)

मुंबई - ४०० ०७७

फेब्रुवारी

२०१३

विद्यापीठास प्रबंध सादर करताना द्यावयाचे निवेदन

(मुंबई विद्यापीठ अधिनियम ओ.७७०)

मुंबई विद्यापीठाचे अधिनियम ओ. ७७० याला अनुसरून मी नमूद करू इच्छिते की **महालक्ष्मी मंदिर, कोल्हापुर - एक सांस्कृतिक अध्ययन** या प्रबंधातील संशोधन मी,डॉ.अरविंद प्रभाकर जामखेडकर (मानद प्राध्यापक, के.जे.सोमय्या सेंटर फॉर बुद्धिस्ट स्टडीज,विद्याविहार)यांच्या मार्गदर्शनाखाली केले आहे. हे प्रबंधलेखन स्वतंत्र स्वरूपाचे असून ते यापूर्वी मुंबई किंवा इतर कोणत्याही विद्यापीठाच्या अन्य पदवीसाठी सादर केलेले नाही. तसेच प्रबंधलेखनासाठी जेव्हा जेव्हा अन्य लेखकांच्या लेखनाचा संदर्भ म्हणून उपयोग करण्यात आला आहे, तेव्हा तेव्हा त्या लेखकांचा व त्यांच्या ग्रंथांचा योग्य निर्देश केलेला आहे.

सौ.ऋता अरूण ठाकुर

संशोधिका

डॉ. अरविंद प्र.जामखेडकर

मार्गदर्शक

प्रमाणपत्र

मी येथे नमूद करु इच्छितो की,सौ.ऋता अरुण ठाकुर हिने **'महालक्ष्मी मंदिर कोल्हापुर,एक सांस्कृतिक अध्ययन'** हा प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली सादर केला आहे.हे प्रबंध लेखन स्वतंत्र स्वरुपाचे असून ते यापूर्वी मुंबई किंवा इतर कोणत्याही विद्यापीठाच्या अन्य पदवीसाठी सादर केलेले नाही.

(डॉ.अ.प्र.जामखेडकर)

मार्गदर्शक

ऋणनिर्देश

होऊ कशी उतराई....... ऋणनिर्देशाचे हे पान लिहीत असताना सर्वात आधी आठवण होते ती कै.ती.बाबांची!!! इ.स.१९७९ मध्ये हाच विषय घेऊन महालक्ष्मी मंदिराचा अभ्यास करावयास कोल्हापुरास गेले असता तिथेच ती.बाबांचा देहावसान झाले.त्यांच्या हयातीत त्यांची इच्छा पूर्ण करू शकले नाही. ती टोचणी मनास लागून राहिली.आज ३० वर्षांनतर पुन: संशोधन क्षेत्रात प्रवेश केला.

संशोधन करण्याचे ठरविल्यावर हा प्रस्ताव घेऊन डॉ.अ.प्र.जामखेडकर सरांकडे गेले. पुरातत्व विषय घेऊन अभ्यास करतांना नागपूर विद्यापीठात ते माझे प्राध्यापक होते. गेली ३० वर्षे शिक्षण क्षेत्रापासून दूर राहूनदेखील सरांनी माझ्यावर विश्वास ठेवून मला मार्गदर्शन करण्यास होकार दिला. मागील चार वर्षांत त्यांनी अभ्यासात सतत केलेले मार्गदर्शन ,अडचणीत असता दिलेले मनोधैर्य ,हे आयुष्यात न विसरता येणारे क्षण आहेत. त्यांच्या कुशल मार्गदर्शनाने लिहिलेला हा प्रबंध माझ्या आयुष्याची जमापुंजी आहे. त्यांची मी अत्यंत ऋणी आहे. या प्रबंधाचे काम करताना वेळोवेळी गो.बं. देगलूरकर सरांकडे जावून त्यांच्याबरोबर चर्चा केली. थ्यांनी केलेल्या मदतीबद्दल मीत्यांची फार आभारी आहे.

हे संशोधन सुरु केल्यानंतर या शिक्षणासाठी मुंबई विद्यापीठाने मला दोन वर्षांची शिष्यवृत्ती दिली. माझी या शिष्यवृत्तीसाठी निवड केल्याबद्दल मी मुंबई विद्यापीठाची आभारी आहे.

मी आमच्या डायरेक्टर डॉ.(श्रीमती) शंकरनारायण (के.जे.सोमय्या सेंटर फॉर बुद्धिस्ट स्टडीज)व तेथे काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांचे त्यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल आभारी आहे.

कोल्हापुरच्या मंदिराचा विषय असल्यामुळे वेळोवेळी कोल्हापुरात जावे लागे. कोल्हापुरचे श्री.उमाकांत राणिंगा यांची भेट कोल्हापुरात झाली. आपल्याजवळ असलेला मंदिराच्या फोटोंचा व ग्रंथांचा खजिना त्यांनी मला दिला. त्यांनी दिलेले फोटो फार महत्वाचे व मला स्वत:ला न मिळू शकणारे आहेत. प्रबंधाच्या शेवटी घातलेले बरेच फोटो त्यांनी दिले आहेत. ओळख नसताना इतका विश्वास ठेवून त्यांनी मला मदत केली. त्याबद्दल मी त्यांची अत्यंत आभारी आहे. त्याठिकाणी राहण्याची सोय करण्यातही त्यांनी मदत केली. कोल्हापुरातील

श्री.करवीरकर यांनी आपल्याजवळील माहिती पुरविली. श्री.योगेश प्रभुदेसाई यांनी सहकार्य केले. या सर्वांची मी ऋणी आहे.

महालक्ष्मी संबंधीच्या कागदपत्रांचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पुराभिलेखागार विभागाने दिलेल्या परवानगीमुळे मी कोल्हापुरातील पुराभिलेखागार कार्यालयात जाऊन कागदपत्रे बघू शकले त्यांची मी फार आभारी आहे. कोल्हापुरातील पश्चिम महाराष्ट्र देवस्थान कमेटीने मला वेळोवेळी मंदिरातील फोटो काढण्यास परवानगी दिली त्यांचीही मी आभारी आहे.त्यांच्या परवानगीने काढलेले फोटो प्रबंधाच्या शेवटी घातले आहेत.

माझ्याजवळील असलेल्या फोटोंना चांगल्या स्वरूपात आणण्याचे काम माझे भाऊ डॉ.श्रीकांत दाभाडे यांनी केले. अभ्यासाची सुरवात केल्यावर वेळोवेळी माझ्या विषयाची माहिती असणारे लेख त्यांनी मला पाठवले. दररोज अभ्यासाची विचारपूस करीत वडिलांची उणीव भासू दिली नाही . अशा दादांचे तर मी फक्त आशीर्वादच घ्यावेत.

प्रबंधाच्या अभ्यासासाठी लागणारे साहित्य गोळा करण्यास प्राच्यविद्या संस्था ,ठाणे ,दादर मराठी ग्रंथ संग्रहालय,दादर,छत्रपती शिवाजी वस्तु संग्रहालय, एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई ,डेक्कन कॉलेज,पुणे या सर्व ग्रंथालयात जावे लागले. या सर्व ग्रंथालयांनी केलेल्या मदतीबद्दल मी त्यांची आभारी आहे.

३० वर्षांचा कालावधी उलटून गेल्यावर पुन: शैक्षणिक क्षेत्रात प्रवेश करण्यात बराच त्रास झाला. पण घरातील सासू सासरे यांनी माझ्या करीत असलेल्या अभ्यासाला वेळोवेळी प्रोत्साहन दिले व कौतुक केले, त्यांनी दिलेल्या मानसिक मनोधैर्य यामुळे मी हा प्रबंध करू शकले. यात सर्वात मोठा वाटा माझे पति यांचा आहे. त्यांनी घराची जबाबदारी स्वत: संभाळून माझ्या अभ्यासासाठी लागेल ती मदत करून मला सतत सहकार्य केले. त्यांच्या पाठबळाशिवाय आज हा प्रबंध पूर्ण करूच शकले नसते.माझ्या या प्रबंधासाठी कळत नकळत मला सहकार्य केलेल्या सर्वांचे मी आभार मानते.

छायाचित्रांची यादी

१) महालक्ष्मी मंदिर नकाशा

२) अ) महालक्ष्मी मंदिर, ब) महाद्वार (पश्चिम दरवाजा)

क) घाटी दरवाजा (उत्तरेकडील दरवाजा)

३) अ) गणेशमंडप दक्षिण द्वार

ब) गणेशमंडप दक्षिणेकडील कक्षासन

क) गणेशमंडप

ड) गणेशमंडप कक्षासन

४) गणेश मंडपातून महालक्ष्मी (सभा मंडपातून बाहेर पडण्यास असलेल्या पायऱ्यांचअंश)

५) अ) सभामंडपातील स्तंभ

ब) सभामंडप व वरील मजला

क) सभामंडपातील सभापद्म छत

६) अ) सभामंडपातून अंतराळाचा दरवाजा

ब) अंतराळातील दक्षिणेकडील खोली

क) गाभाऱ्याचे प्रवेशद्वार

७) अ) गाभाऱ्यातील खोली

ब) महालक्ष्मी मूर्तीवरील छत

क) प्रदक्षिणापथातून गाभाऱ्यात पाणी आणणारे मुख

ड) प्रदक्षिणापथातून पाणी गाभाऱ्यात पोहोचविणारे लहान कुंड

इ) प्रदक्षिणापथाचे छत

८) अ) सालंकृत महालक्ष्मी

ब) वज्रलेपानंतरची महालक्ष्मी

क) वज्रलेप निघाल्यानंतरची महालक्ष्मी

ड) मस्तकावरील सलिंग योनि

९) अ)महालक्ष्मी मंदिर अंतराळाचे बाह्यांग (दक्षिणेकडील)

ब) महालक्ष्मी मंदिरउत्तरेकडील अंतराळाचे बाह्यांग (भितीच्या आत वरच्या मजल्यावर

जाताना दिसते)

१०) वरच्या मजल्यावरील मातुलिंगास जाताना पायऱ्यांशेजारी दिसणारा महालक्ष्मी मंदिराच्या बाह्यांगाचा भाग

११) अ) नंदिमंडप छत, ब) नंदिमंडप

क) नंदिमंडप व सभामंडपाच्यामधील स्तंभ

१२) अ) मातुलिंगातून नंदिमंडप

ब) सभामंडपाचे वरच्या मजल्यावर आलेले स्तंभशीर्ष

क) मातुलिंग गाभारा

१३) अ) महालक्ष्मी मंदिर उत्तरेकडून

ब) महालक्ष्मी मंदिर पूर्वेकडून

१४) अ) महालक्ष्मी मंदिर दक्षिणेकडून

ब) महालक्ष्मी मंदिर (महासरस्वती पश्चिम द्वार) (ब्रिटिश लायब्ररीतून मंदिराचा जुना फोटो)

१५) अ) देवकोष्ठ ते छाद्य

ब) महालक्ष्मी मंदिर अधिष्ठान ते देवकोष्ठ

१६) अ) महालक्ष्मीमंदिराच्या दक्षिण भद्रावरील गौरीशंकराचा मूळ गाभारा व प्रवेशद्वार

ब) महालक्ष्मीमंदिराच्या दक्षिण भद्रावरील गौरीशंकर गाभारा

१७) अ) चतुर्भुज शिवप्रतिमा (महालक्ष्मी मंदिर)

ब) काली (महालक्ष्मी मंदिर)

क) नूपुरपादिका (महालक्ष्मी मंदिर)

ड) दर्पणा (महालक्ष्मी मंदिर)

१८) अ) महालक्ष्मी सभामंडपाचा वायव्य कोपरा व बाह्यांगावरील देवकोष्ठे

ब) महालक्ष्मी सभामंडपाचा नैऋत्य कोपरा वबाह्यांगावरील वेसर देवकोष्ठे

क) दक्षिण बाह्यांगावरील सुरसुंदरी शुकसारिका

१९) अ) महाकाली मंदिर पश्चिम दरवाजा (महालक्ष्मी मंदिरास जोड पश्चिमेकडून)

ब) महाकाली मंदिर पूर्व दरवाजा (महालक्ष्मी मंदिराचा जोड पूर्वेकडून)

२०) अ) महाकाली गाभाऱ्याची चौकट व शेजारील स्तंभ

ब) महाकाली गाभारा दर्शनी भाग

क) महाकाली प्रदक्षिणा मार्ग

ड) महाकाली मंडप पूर्वेकडील चार स्तंभ

२१) अ) सांप्रत मंदिरातील महाकाली प्रतिमा

ब) महाकाली मंदिरातील सालंकृत महाकाली प्रतिमा

क) ललाटबिंबावरील महाकाली

२२) अ) महाकाली मंदिर वायव्येचे बाह्यांग

ब) महाकाली मंदिर थर

२३) अ) मुग्धा (महाकाली मंदिर)

ब) पत्रलेखिका (महाकाली मंदिर)

क) भैरवी

ड) भैरव

२४) अ) स्त्री प्रतिमा (अधिष्ठानावर लेख दामोजय) (महालक्ष्मी मंदिर)

ब) स्त्री प्रतिमा (अधिष्ठानावर लेख रामोज) (महालक्ष्मी मंदिर)

क) देवकोष्ठावरील लेख (लेक्क कोड्डु ?)

२५) अ) सांप्रतची महासरस्वती मूर्ति

ब) सालंकृत महासरस्वती

क) महासरस्वती मंदिर (पश्चिमेकडील भाग)

२६) अ) श्रीयंत्र

ब) नवग्रहमंडप स्तंभावरील लेख

क) शेषशायी मंदिर मंडपातील छत

२७) लक्ष्मी मंदिर, दोड्डगड्डवळ्ळी, कर्नाटक (नरसिंहाचार यांच्या पुस्तकातून)

२८) अ) वीरगळ सर्वात वरच्या पट्टिकेत महालक्ष्मी

ब) वीरगळ शीर्षपट्टिकेत महालक्ष्मी व महाकाली (मुथ्थया वीरगळ)

२९) अभिलेख प्रत (यादव सिंघण(द्वितीय) लेख इ.स.१२१८)

३०) अभिलेख प्रत (यादव सिंघण(द्वितीय) लेख इ.स.१२३५)

अनुक्रमणिका

प्रस्तावना

मातृदेवता किंवा शक्ति हिचे पूजन करण्याची परंपरा हरप्पा संस्कृतीपासून सुरु असलेली दिसून येते. ऋग्वेदातील देवीसूक्त व अदिती या देवतेच्या वर्णनात शक्तिसंप्रदायाचे मूळ असलेले लक्षात येते. परंतु शक्ति देवतेच्या या संप्रदायाची सुरवात नक्की कधीपासून झाली याबद्दल निश्चित असा पुरावा आज उपलब्ध नाही. आभिलेखिक पुरावा लक्षात घेता इ.स. ४थ्या शतकाच्या पूर्वी शक्तिसंप्रदाय अस्तित्वात नव्हता असे दिसते. अगदी मौर्यकाळापासून किंवा त्यापूर्वीही स्त्री देवतांच्या अंकनाची सुरवात झालेली दिसून येते आणि शक्तिसंप्रदायात तंत्राचा अवलंब इ.स. च्या ७ व्या शतकापासून सुरु झाला. शाक्त संप्रदाय शैव संप्रदायाच्या जवळचा संप्रदाय असल्यामुळे शैव क्षेत्रांमध्ये शाक्त संप्रदायाची वाढ झालेली दिसून येते.

मार्कंडेयपुराणातील देवीमाहात्म्य या भागात शाक्त संप्रदायाचे ठळकपणे दिसणारे मूळ दिसून येते. सुरथ राजा व समाधि वैश्य यांच्यावर आलेल्या आपत्तीचे निराकरण करण्यासाठी मार्कंडेय ऋषींनी त्यांना देवीची पूजा अर्चा करण्यास सांगितली व देवीचे माहात्म्य पटवून दिले.नंतर **मत्स्यपुराण,देवीभागवत,देवीपुराण,कालिकापुराण**,शाक्त उपनिषदे या ग्रंथांमधून शक्तिसंप्रदायाविषयी चांगलीच माहिती मिळते.

महालक्ष्मी हीस आद्यशक्ति मानून तिच्यापासून सर्व देवदेवतांची निर्मिती झाली. विश्वाची निर्मिती , तिचे पालनपोषण व संहार करणारी तीच आद्यशक्ति आहे. गीतेतील वैष्णव अवतारवादाच्या पावलावर पाऊल ठेवून ज्या ज्या वेळी भूतलावर असुरांचे साम्राज्य वाढेल त्या त्या वेळी ही देवता वेगवेगळे रूप घेऊन पृथ्वीतलावर अवतरेल, विविध रूपात ती पूजिली जाईल अशा प्रकारची संकल्पना रूढ झाली.

दक्षयज्ञाच्या कथेचा आधार घेऊन शक्तिपीठांची निर्मिती झाली. दक्षाने यज्ञात शिवास आमंत्रण दिले नाही याचा शिवपत्नी सती हीस राग आला. तिने त्याच यज्ञकुंडात उडी मारली. शिवास हे समजताच तो घटनास्थळी आला , त्याने सतीचे कलेवर खांद्यावर घेतले व तो उद्विग्न झाला. त्याचे हे रूप पाहून विष्णूने सतीच्या शवाचे सुदर्शन चक्राने तुकडे केले. सतीच्या अवयवाचे हे तुकडे जेथे जेथे

पडले त्या त्या ठिकाणी शक्तिपीठे निर्माण झाली.याच शक्तिपीठ स्थानांवर नंतर शक्तीबरोबर भैरवदेखील असलेले आढळून येतात. वेगवेगळ्या ग्रंथांत ही पीठसंख्या निरनिराळी आहे. **देवीभागवतात** ही पीठसंख्या १०८ आहे. या ग्रंथातील ७ व्या खंडाच्या ३८ व्या अध्यायात देवीच्या १०८ स्थानांची नांवे आली आहेत. या नावांच्या यादीत महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांना सर्वात वरचे स्थान दिलेले आढळून येते.

कोलापुरं महास्थानं यत्र लक्ष्मी: सदा स्थिता ।

मातु:पुरं द्वितीयं च रेणुकाधिष्ठितं परम् ।।

तुलजापुरं तृतीयं स्यात् सप्तश्रृंगं तथैव च ।

महाराष्ट्रातील ही साडेतीन शक्तिपीठे म्हणजे कोल्हापुरची महालक्ष्मी सत्त्वगुणविशिष्ट पूर्णपीठ, मातापुर वा माहूर गडावरील रेणुका तमोगुणविशिष्ट पूर्णपीठ, तुळजापुरची भवानी रजोगुणविशिष्ट पूर्णपीठ व वणीच्या सप्तश्रृंगीगडावरील जगदंबा हे अर्धपीठ म्हणून प्रसिद्ध आहे. सतीच्या ठिकठिकाणी पडलेल्या अवयवांठिकाणी शक्तीची उपासना कुठे तांदळ्याच्या स्वरूपात, कुठे मूर्ति स्वरूपात तर कुठे अग्निस्वरूपात होत आहे. कोल्हापुरची महालक्ष्मी स्थानक स्वरूपात,चतुर्भुज,दक्षिणाध:करक्रमाने महाळुंग,गदा,खेटक , पानपात्र व मस्तकावर लिंग व योनि धारण केलेली आहे. माहूरची रेणुका तांदळास्वरूपात,तुळजापुरची भवानी अष्टभुजमहिषमर्दिनी स्वरूपात तर सप्तश्रृंगीगडावरील जगदंबा अष्टादशभुजा स्वरूपात पूजिली जाते.

मार्कंडेयपुराणाच्या देवीमाहात्म्याच्या प्राधानिक रहस्यात आलेले महालक्ष्मीच्या रूपाचे वर्णन आज कोल्हापुरात असलेल्या मंदिरातील महालक्ष्मीच्या मूर्तीशी मिळतेजुळते आहे. **देवीमाहात्म्याच्या** प्राधानिक रहस्यात वर्णन केल्याप्रमाणे (स्वत: त्रिगुणात्मक रूप धारण करण्यापूर्वी) हे अखिल जगत् शून्य पाहून महालक्ष्मीने केवळ तमोगुणात्मक असे महाकाली रूप धारण केले. सत्त्वगुणाद्वारे तिने महासरस्वतीचे रूप धारण केले. या तीन देवतांनी मिळून इतर देवतांची निर्मिती केली.

महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वती या तीनही देवतांचे वास्तव्य असलेले मंदिर म्हणजे कोल्हापुरातील महालक्ष्मी मंदिर होय. हे भव्य मंदिर त्रिकूट-देवालय असून यात महाकाली दक्षिणाभिमुख, महालक्ष्मी पश्चिमाभिमुख व महासरस्वती उत्तराभिमुख आहे. अशा रितीने हे मंदिर महाराष्ट्रातील इतर मंदिरापेक्षा आगळेवेगळे आहे.

महालक्ष्मी मंदिराची वैशिष्ट्ये :

स्थापत्यदृष्ट्या ही तीनही मंदिरे वेगवेगळी आहेत. महालक्ष्मी मंदिर सप्तरथ,मेरुमंडोवर प्रकारचे असून त्याच्या बाह्यांगांवरील देवकोष्ठांची शिखरे नागर शैलीची आहेत. महाकाली देवालय पंचरथ प्रकारचे असून देवकोष्ठांवरील शिखरांची रचना वेसर पद्धतीची आहे. तर महासरस्वती देवालय साधे दगडी बांधकाम असलेले आहे. ही तीनही मंदिरे सांधार आहेत. महालक्ष्मी गाभाऱ्याच्या प्रदक्षिणापथाची बाह्य रेषा अनेक रथ असलेल्या वास्तूसारखी आहे. महाकाली गाभाऱ्याचा प्रदक्षिणामार्ग निर्गम-प्रवेशहीन आहे. महासरस्वती गाभाऱ्याचा प्रदक्षिणामार्गदेखील निर्गम-प्रवेशहीन आहे. महाकाली मंदिर महालक्ष्मी मंदिराच्या सभामंडपास तिरके जोडलेले आहे. ते सरळ काटकोनात नाही. महालक्ष्मी मंदिराच्या सभामंडपातील मध्यरेषेशी महाकाली व महासरस्वती मंदिराचे गाभारे सरळ रेषेत नाहीत.महालक्ष्मी मंदिराचा सभामंडप,अंतराळ व गाभारा दुमजली आहे. महाकाली व महासरस्वती मंदिरास अशा प्रकारची सोय नाही. महालक्ष्मी मंदिराच्या गाभाऱ्यात उत्तर ,पूर्व व दक्षिणेस तीन दालने आहेत. अशा प्रकारची दालने खिद्रापुरच्या कोप्पेश्वर मंदिराच्या गाभाऱ्यात बघावयास मिळतात.महालक्ष्मी मंदिराच्या वरच्या मजल्यावरील शिवलिंगाच्या गाभाऱ्यासही तीन दालने आहेत. परंतु त्यांचे प्रवेशमार्ग प्रदक्षिणापथातून आहेत. महालक्ष्मी मंदिराच्या अंतराळातही उत्तर व दक्षिणेस एक एक खोली आहे. महालक्ष्मी व महाकाली मंदिराच्या बाह्यांगाच्या तीनही भद्रांत तीन स्वतंत्र गाभारे आहेत. ८ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबर आणि ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी या काळात सूर्यास्ताच्यावेळी महालक्ष्मी मूर्तीवर सूर्याची किरणे पडतात यावरून महालक्ष्मी मंदिराची बांधणी करताना दिशासाधनाचा अवलंब करण्यात आला असण्याची शक्यता आहे.

इ.स. च्या १२ व्या शतकात या मंदिराची महती इतकी पसरली की या मंदिरासारखे मंदिर आपल्या राज्यातही असावे अशी इच्छा निर्माण होऊन कर्नाटकातील दोड्डगड्डवळ्ळी येथे व गुजरातमधील अन्हिलवाड येथे अशाच प्रकारच्या महालक्ष्मी मंदिराची निर्मिती झाली.

समृद्ध पुरावशेष असलेल्या या प्रदेशात इ.स. १९४४ मध्ये व्यक्तिगत पातळीवर पंचमुखी व कुंदनगार या दोन विद्वानांनी ब्रह्मपुरी (कोल्हापुरनजीक) या प्राचीन टेकाडाची पहाणी केली. इ.स. १९४५-४६ साली डेक्कन कॉलेज, पुणे[1] या संस्थेने सांकळिया व दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली या भागातील सांस्कृतिक क्रम जाणून घेण्यासाठी उत्खनन केले. उत्खननातील पुराव्यांवरून इ.स. पूर्व तिसऱ्या शतकापासून कोल्हापुर व त्याचा परिसर मानवी वसाहतीचे केंद्र असल्याचे आढळून आले. या उत्खननात पहिला कालखंड सातवाहन (काहींच्या मते उदय इ.स.पूर्व ३-२ शतक तर काहींच्या मते १ले शतक; व शेवट इ.स.३रे शतक), दुसरा कालखंड शिलाहार (इ.स.११-१२वे शतक), तिसरा कालखंड बहमनी(इ.स.१५-१६वे शतक)व चौथा कालखंड मोगल(इ.स.१६५८ते१७०७)असा दिसून आला . इ.स.पहिल्या दुसऱ्या शतकात रोमन राज्याशी आंतरराष्ट्रीय व्यापारी संबंध दर्शविणाऱ्या विविध वस्तू उदा. रोमन देवतेचा पुतळा ,ब्रॉन्झची भांडी,रोमन मद्यकुंभ अशा वस्तू उत्खननात सापडल्या. आंबा घाटातून रत्नागिरी आणि जयगड व फोंडा घाटातून मालवण व वेंगुर्ला भागात जाण्यायेण्याच्या मार्गामुळे दख्खन भागात रोमन संस्कृतीशी नाते जुळण्याचे एक महत्वाचे स्थान म्हणून प्राचीन कोल्हापुरास महत्त्व प्राप्त झाले. या भागांवर राष्ट्रकूट,चालुक्य,शिलाहार,यादव,मुसलमान,व मराठा या वंशाच्या राजांनी राज्य केले.

कोल्हापुर व आसपासच्या भागांवर इ.स.११-१२ व्या शतकात शिलाहारवंशीयांनी राज्य केले. या वंशातील राजांनी महालक्ष्मीस आपले दैवत मानले व त्याबरोबरच जैन धर्मीयांशी नातेसंबंध जोडले व जैन धर्माला राजाश्रय दिला. त्यामुळे कोल्हापुर परिसरातच नव्हे खुद्द महालक्ष्मी मंदिराच्या आवारात जैनांची देवालये दिसून येतात.

---

[1] सांकळिया,दीक्षित,१९५२

कोल्हापुरातील या तीनही मंदिरांची ठेवण स्थापत्यदृष्ट्या वेगवेगळी आहे. या मंदिराला इतिहास आहे व आजही वंशपरंपरागत पुजारी या मंदिरातील देवतांची नित्य पूजा करतात.आधी शिव क्षेत्र, शाक्तांचे शक्तिपीठ व आज विष्णुपत्नी रूपात तिची होत असलेली पूजा बघून सहाजिकच या मंदिराचा इतिहास जाणून घेण्याची इच्छा निर्माण झाली व अभ्यासासाठी या विषयाची निवड केली.

एकमेवाद्वितीय असे हे मंदिर विद्वान व इतिहासकारांच्याही कौतुकाचा विषय ठरला. मेजर ग्रॅहम,के.जी.कुंदनगार,म.श्री.माटे,ग.ह.खरे,वा.वि.मिराशी,अ.प्र.जामखेडकर,रा.चिं.ढेरे व गो.बं.देगलूरकर यासारख्या अभ्यासकांनी या मंदिराचा अभ्यास केला व या मंदिरावर आपापली मते मांडली. मेजर ग्रॅहम यांनी आपल्या **Stastical Report On The Principality Of Kolhapur**(इ..स.१८५७) या रिपोर्टमध्ये कोल्हापुरातील अनेक मंदिरांची माहिती दिली.महालक्ष्मी मंदिराची थोडक्यात माहिती देऊन ही महालक्ष्मी जैनांची पद्मावती असावी असा विचार मांडला.यात त्यांनी मंदिर कोणी बांधले याची चर्चा केली नाही. के.जी.कुंदनगार यांनी आपल्या **Notes On Mahalakshmi Temple, Kolhapur** (इ.स.१९२९)या पुस्तिकेत चालुक्य राजा कर्ण याने हे देवालय बांधले व हे देवालय चालुक्य पद्धतीचे देवालय आहे असे सांगितले.

ग.ह.खरे यांनी आपल्या **महाराष्ट्राची चार दैवते** (इ.स.१९५८)या पुस्तकात कोल्हापुरातील महालक्ष्मी व तिचे देवालय यावर विस्तृत लेख लिहून त्यात महालक्ष्मी मंदिर व तिच्या आवारातील देवालये, महालक्ष्मीचा प्राचीन व अर्वाचीन उल्लेख,ताम्रपट व शिलालेखातून आलेले महालक्ष्मीचे उल्लेख, देवालय मतमतांतरे याचा आढावा घेतला. त्यांनी मेजर ग्रॅहम व कुंदनगार यांची मते खोडून काढून महालक्ष्मी मंदिराचा गाभारा व अंतराळ याची रचना ८ व्या शतकात झाली असावी असे सांगितले व हे देवालय व त्यातील देवता हिंदूच आहे हे प्रतिपादित केले. वा.वि.मिराशी यांनी आपल्या **शिलाहार राजवंशाचा इतिहास व कोरीव लेख** (इ.स.१९७४)या पुस्तकात या मंदिराची निर्मिती शिलाहारांपूर्वी क्ऱ्हाड येथून राज्य करणाऱ्या सिंदवंशीय राजाने केली असावी असे मत मांडले. अ.प्र.जामखेडकर यांनी महाराष्ट्र शासनाच्या **स्थापत्य व कला** (इ.स.२००२) या खंडात महाराष्ट्रातील मंदिरांची वर्णने केली त्यात महालक्ष्मी मंदिराचे स्थापत्य वर्णन केले.

रा.चिं.ढेरे यांनी आपल्या **करवीरनिवासिनी श्रीमहालक्ष्मी** (इ.स.२००९)या पुस्तकात महालक्ष्मीचे ताम्रपट व शिलाशासनात आलेले उल्लेख,महालक्ष्मीसंबंधी अनेक कवींनी रचलेल्या कविता, महालक्ष्मीची महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील ठाणी यासंबंधीची महत्वाची भर टाकली.गो.बं. देगलूरकर यांनी **युगयुगीन करवीर इतिहास दर्शन** (इ.स.२०१०)या पुस्तकात महालक्ष्मी मंदिराविषयी थोडक्यात माहिती दिली. या सर्व अभ्यासकांनी या मंदिराचा एक विशिष्ट विषय धरून अभ्यास केला व आपली मते मांडली.

महालक्ष्मी देवालयावर एके ठिकाणी सुसूत्रपणे व मुद्देसूद असा अभ्यास झालेला नाही. कुणी मंदिराच्या स्थापत्याचा, कुणी मंदिराच्या काळाचा, कुणी महालक्ष्मी व तिची इतरत्र ठाणी,अशा विविध पैलूंवर अभ्यास केला. माझा अभ्यास मी हा फक्त महालक्ष्मी मंदिर यावरच केंद्रित केला आहे. धार्मिक वा स्थापत्यदृष्ट्या महाराष्ट्रातील इतर मंदिरांवर आधारित तुलनात्मक अभ्यास खोलात जाऊन मी केला नाही. एकाच मंदिरावर लक्ष केंद्रित करून या मंदिराबद्दल दैवतदृष्ट्या परिपूर्ण अभ्यास करून त्यावर निष्कर्ष काढला आहे.

या विषयाचा अभ्यास करताना मी स्वत: वेळोवेळी मंदिराला भेट दिली. तेथील पुजारी, जाणकार व्यक्तींकडून मंदिराविषयी माहिती मिळविली. या अभ्यासासाठी पुराणांत आलेले महालक्ष्मीचे उल्लेख,प्राचीन ताम्रपट व शिलालेख, पुराभिलेखागारातील प्राचीन कागदपत्रे यांचा उपयोग केला.मंदिरातील नित्य पूजा व नैमित्तिक पूजा जवळून बघितल्या.

महाराष्ट्रातील शक्तिसंप्रदायाचा इतिहास समजून घेण्यास आज आपणाजवळ साधने नाहीत. परंतू ज्ञानेश्वर , तुकाराम,एकनाथमहाराज यांच्या लिखाणातून त्याकाळात घडत असलेल्या शाक्त संप्रदायातील वामाचाराचा अंदाज करता येतो.

या प्रबंधात सर्वात प्रथम कोल्हापुरचा प्राकृतिक भूगोल, प्राचीन स्थान, कोल्हापुर प्रांताची राजकीय पृष्ठभूमि इ.स.५०० ते इ.स. १९४७ पर्यंतचा संक्षिप्त साधार राजकीय इतिहास, कोल्हापुर व आसपास भागावर राज्य करणारी राजघराणी यांचा विचार केला आहे.

महालक्ष्मीचे पुराणांत आलेले उल्लेख,निरनिराळ्या कवीनी केलेली महालक्ष्मीची भक्ती, पौराणिक कथा व दंतकथा, या तिच्या प्रवासाचा आढावा या प्रकरणात घेतला आहे.

अभिलेख व ताम्रपटांतून आलेले महालक्ष्मीचे उल्लेख, महालक्ष्मीशी संबंधित राजघराणी,लेखी कागदपत्रांतील महालक्ष्मीविषयी माहिती यावरून महालक्ष्मी मंदिराच्या निर्मितीचा काळ या विषयाचा उहापोह केला आहे.

महालक्ष्मी मंदिराचे स्थापत्य, महालक्ष्मी मूर्ती महालक्ष्मी देवी शाक्त का वैष्णव, तिच्यावर करण्यात आलेला वज्रलेप, मंदिराच्या आवारातील देवालयांची पूर्वीची व आताची स्थिती, महालक्ष्मी व महाकाली मंदिराच्या बाह्यांगांवरील सुरसुंदरी, यांचे वर्णन आले आहे.

महालक्ष्मी मंदिर संकुल हे एकाच वेळी तयार झालेले झालेले नाही. त्यामुळे टप्प्या टप्प्याने या मंदिराची ताम्रपट व शिलाशासनांवरून कालमानाप्रमाणे मंदिरात होत गेलेली वाढ, या मंदिरासारखी इतर राज्यात (अन्हिलवाड-गुजरात,दोड्डगड्डवळ्ळी-कर्नाटक)बनलेली मंदिरे यांचाही विचार केला आहे.

आज मंदिरात प्रचलित असलेली देवीची नित्य, नैमित्तिक पूजा, उत्सव,सण,रथयात्रा इ.ची माहिती, मंदिराच्या आश्रयाने झालेली कलांची वाढ, वैदिक पाठशाळा यांचे वर्णन केले आहे.

मार्कंडेयपुराणातील आगम परंपरा , **देवीभागवता**तील आगमनिष्ठ संप्रदाय मूळ अस्तित्वात होता काय? याचा तसेच श्रद्धेतून व लोकपरंपरेतून निर्माण झालेले बदल व विकास यांचा आढावा घेतला आहे.

अशाप्रकारे कोल्हापुरातील महालक्ष्मी देवालयाचा सर्वांगाने विचार करून आभिलेखिक पुरावा , पुराणांतील संदर्भ,मंदिराचे स्थापत्य , नित्य पूजा, यांचा अभ्यास करून आपली मते मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रकरण १

कोल्हापुरचा राजकीय इतिहास

करवीरनिवासिनी श्री महालक्ष्मी हे देवालय महाराष्ट्रातील कोल्हापुर शहराच्या मध्यवर्ती स्थानावर वसलेले आहे. अंबरनाथ येथील शिवमंदिर व खिद्रापुर येथील कोप्पेश्वर मंदिर या मंदिराप्रमाणेच हे मंदिर कलाकुसरयुक्त असून या वरील दोन मंदिरांपेक्षाही आकाराने मोठे आहे. इ.स.११ व्या शतकातील या देवालयात आजही वंशपरंपरागत पुजारी देवीची पूजा अर्चा , सण, उत्सव साजरे करतात.

राष्ट्रकूट राजा अमोघवर्ष (प्रथम)पासून लौकिक पावलेल्या या स्थानाला शिलाहारवंशीयांनी आपले दैवत मानले. यादव वंशातील राजांनी या देवतेची मनोभावे सेवा केली. सुल्तानी सत्तेत मूर्ती कपिलतीर्थाजवळील तुळजाभवानी देवळात हलविण्यात आली. मंदिरालाही या आक्रमणाची झळ पोहोचली. परंतु संभाजी (द्वितीय)च्या कारकीर्दीत मूर्तीची पुन:स्थापना करण्यात आली व मंदिरास पुन: वैभव प्राप्त झाले.

या देवतेचा व या स्थानाचा अभ्यास करताना या स्थानाचा प्राकृतिक भूगोल, कोल्हापुर नामव्युत्पत्ती व प्राचीन काळापासून या भागावर राज्य करणाऱ्या राजवंशांचा इतिहास दृष्टिपथास आणणे हे क्रमप्राप्तच झाले.

प्राकृतिक भूगोल :

महाराष्ट्राच्या नैऋत्येतील पठारावर वसलेला कोल्हापुर जिल्हा १५'४३ ते १७'१७ उत्तर अक्षांश व ७३'४०ते ७४'४२ पूर्व रेखांश यामध्ये स्थित आहे[२].या जिल्ह्यात शाहूवाडी,हातकणंगल जिल्ह्यात शाहूवाडी,शिरोळ,करवीर,राधानगरी,कागल,भूदरगड,गडहिंगलज,पन्हाळा,बावडा,आजरा व चंदगड असे एकूण बारा तालुके आहेत. जिल्ह्याचा बराच भाग उंचसखल, पूर्व भाग विस्तृत खोऱ्याचा

[२]चौधरी|१९८९,पृ.२

व डोंगराळ असून पश्चिम घाटांच्या डोंगर रांगांनी व्यापलेला आहे. यामुळे येथे विशाळगड, पन्हाळा, भूदरगड, सामनगड यासारखे किल्ले लाभले.

कोल्हापुर जिल्ह्यातील बहुतेक नद्या पूर्ववाहिन्या आहेत. जिल्ह्यात वारणा, पंचगंगा, वेदगंगा, हिरण्यकेशी व घटप्रभा या प्रमुख नद्या आहेत. कोल्हापुर पंचगंगा नदीच्या काठी वसले असून कासारी, कुंभी, तुळशी व भोगावती या पंचगंगेच्या उपनद्या असून सरस्वती लुप्त आहे. नद्यांच्या मुबलकतेमुळे सुपीक व समृद्ध झालेल्या या भागात वस्ती करून प्राचीन काळातील मानव समृद्ध झाला.

मोठ्या संख्येने पुरावशेष असलेल्या या प्रदेशात इ.स. १९४४ मध्ये व्यक्तिगत पातळीवर पंचमुखी व कुंदनगार यांनी कोल्हापुरनजीकच्या ब्रह्मपुरी या ठिकाणची पहाणी केली. इ.स. १९४५-४६ साली डेक्कन कॉलेज, पुणे या संस्थेने सांकळिया व दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली या भागातील सांस्कृतिक क्रम जाणून घेण्यासाठी उत्खनन केले. यामधील पुराव्यांवरून, इ.स. पूर्व तिसऱ्या शतकापासून कोल्हापुर व त्याचा परिसर मानवी वसाहतीचे केंद्र असल्याचे आढळून आले. या उत्खननात पहिला कालखंड सातवाहन (काहींच्या मते उदय इ.स.पूर्व ३-२ शतक तर काहींच्या मते १ले शतक; व शेवट इ.स.३रे शतक), दुसरा कालखंड शिलाहार (इ.स.११-१२वे शतक), तिसरा कालखंड बहमनी(इ.स.१५-१६वे शतक)व चौथा कालखंड मोगल(इ.स.१६५८तेइ.स.१७०७)असा दिसून आला . इ.स.पहिल्या दुसऱ्या शतकात रोमन राज्यांशी आंतरराष्ट्रीय व्यापारी संबंध दर्शविणाऱ्या विविध वस्तू (उदा. रोमन देवतेचा पुतळा ,ब्रॉन्झची भांडी,रोमन मद्यकुंभ) उत्खननात[३] सापडल्या. आंबा घाटातून रत्नागिरी आणि जयगड व फोंडा घाटातून मालवण व वेंगुर्ला भागात जाण्यायेण्याच्या मार्गामुळे दख्खन भागात रोमन संस्कृतीशी नाते जुळण्याचे एक महत्वाचे स्थान म्हणून कोल्हापुरास महत्व प्राप्त झाले.

कोल्हापुर नाम: ग्रंथांतर्गत

शहराच्या नावाचा इतिहास बघता, कोल्हापुर शहर हे प्राचीन काळात वेगवेगळ्या नावांनी प्रचलित होते असे दिसते.

---

[३] सांकळिया, १९५२

विख्यात परकीय प्रवासी टॉलेमी (सु.इ.स.१५०)हिप्पोकुरचा उल्लेख बॅलिओकुरसची राजधानी असा करतो. भांडारकर यांच्यामते हिप्पोकुर म्हणजेच कोल्हापुर होय.

कोल्हापुरचा उल्लेख :

महाभारत (आश्व.८४-१९) कोल्लगिरि ; **बृहत्संहिता** (अ.१४,१३)कोल्लगिरि ;**मत्स्यपुराण**(अ.१३,२६५३)करवीर,**स्कंदपुराण**(सह्याद्रीखंड,अ.२,२४२७)करवीर;**बृहद्कथाकोश** कोल्लादिगिरिपट्टण;**देवीभागवत**(अ.७.३१.४-५;अ.७,३८.५-६)कोलापुर ; **हरिवंश** (अ.२.३९.५०)करवीरपुर ; **पद्मपुराण (अध्याय** १८६)कोल्हपुर ;**करवीरमाहात्म्य** या ग्रंथात(अ.१.५१) कोल्लकक्षेत्र, (अ.३.५५) करवीरपट्टण व (अ.७.९) कोल्लापुर असा येतो.

कोल्हापुर नाम; अभिलेख व ताम्रशासन

राष्ट्रकूट शासक अमोघवर्ष (प्रथम) याच्या संजान ताम्रपटात[३](इ.स.८७१)जरी सर्वात प्रथम महालक्ष्मीचे नाव आले असले तरी यात कोल्हापुर असा स्थानाचा उल्लेख नाही. चालुक्य जयसिंह (दुसरा)याच्या इ,स.१०२४च्या मिरज ताम्रपटात[४] या स्थानाचा कोल्लापुर असाच उल्लेख येतो. कोल्लापुर हे नामाभिधान द्रितीय गुहल्ल याच्या सावई-वेरे ताम्रपटात [५](इ.स.१०३८)येते. या ताम्रपटातील माहितीनुसार कदंब राजा षष्ठ (द्रितीय) कोल्लापुर येथे महालक्ष्मीच्या दर्शनाला नेहमी येत असे.

शिलाहार वंशाच्या राजा मारसिंहपासून सर्व राजांच्या लेखांत या नगराचा कोल्लापुर असाच उल्लेख येतो. फक्त विजयादित्याच्या लेखात[६] (इ.स.११४२)मात्र एके ठिकाणी क्षुल्लकपुर हे कोल्हापुराचे नाव आढळून आले आहे.

[४] ए.इं. ,खंड १२ ,पृ,३०३-३१५
[५] दीक्षित,१९४६ ,पृ ,४६-६४ (३५१)
[६] मिराशी, १९७४ ,पृ३०४

ग्रंथांतर्गत व ताम्रपट आणि कोरीव लेखांतील कोल्हापुरचे उल्लेख बघता एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे ग्रंथांमधून बरेच ठिकाणी या स्थानाचा उल्लेख करवीर असा आला आहे परंतु कुठल्याही ताम्रपट वा शिलालेखांत करवीर असा क्षेत्रनामाचा उल्लेख नाही.

कोल्हापुर नामव्युत्पत्ती:

महालक्ष्मीच्या क्षेत्रमाहात्म्याचे वर्णन करणाऱ्या **करवीरमाहात्म्य**[७] या ग्रंथात कोल्हासुर व करवीर या नावाच्या दोन राक्षसांवरून या स्थानास कोल्हापुर व करवीर ही नावे प्राप्त झाली[८] अशी माहिती मिळते. याच ग्रंथात आणखी एके ठिकाणी[९] महालक्ष्मीने कोल्हापुरास जलमय होण्यापासून वाचविण्यास आपल्या कुराने(गदेने) वर उचलून धरण्याचा प्रयत्न केला परंतु ते न उचलले गेल्यामुळे आपल्या कराने(हातात) त्यास उचलले. म्हणून या स्थानास करवीर हे नाव पडले.

कत्रे यांच्यामते कोल किंवा कोल्ल हे एका अनार्य जातीचे नाव आहे[१०] त्यावरून या भागास कोल्लापुर हे नाव पडले असावे.

खरे यांच्या मते कोल्ल,खोल्ल व गोल्ल हे कोळ्ळ या कानडी शब्दाचे रुपांतरण आहे. कोल्ल याचा अर्थ उताराची जमीन म्हणून कोल्लापुर म्हणजे नदीच्या खोऱ्यात वसलेले गाव असा त्यांनी अर्थ काढला आहे[११] .

राजकीय इतिहास:

सातवाहन काळ: (इ.स.पूर्व ३रे शतक ते इ.स.२१८) : कोल्हापुर नजिकच्या ब्रह्मपुरी टेकाडावरील उत्खननावरून या काळात या जागी पहिली वस्ती झाल्याचे स्पष्ट झाले आहे. सातवाहनांचा पहिला राजा कृष्णराज यानंतर सिमुक व नंतर सातकर्णी राज्यावर आला. दक्षिण भारताच्या

---

[७] तगारे, २०००
[८] तगारे ,२०००,अ. ३३ श्लोक ४०-४१
[९] तगारे ,२०००, अ.६ श्लोक ५८-५९
[१०] सांकळिया,१९५२ ,पृ.८
[११] खरे ,१९५४,पृ.१७-२२

पश्चिम भागावर कृष्णा नदीपासून माळव्यातील अवंतीपर्यंत राज्य करणाऱ्या या राजवंशाच्या राज्यात कोल्हापुर हा भाग येत होता. या काळात इतर पश्चिमेकडील काही देशांशी व्यापारी संबंध निश्चितपणे होते हे उत्खननावरून स्पष्ट झाले आहे. येथील उत्खननात गौतमीपुत्र सातकर्णी व यज्ञ सातकर्णी यांची नाणी उत्तर सातवाहन काळात सापडतात.

राष्ट्रकूट वंशः (सु.इ.स.२१८ते इ.स.५००) : सातवाहनांनंतर इ.स.तिसऱ्या शतकात वाकाटक साम्राज्याचा उदय झाला. त्याचवेळी राष्ट्रकूट,कदंब, इ. छोटी राज्येही अस्तित्वात होती. अभिमन्यूच्या उंडिकावाटिका ताम्रपटावरून[१२] मानांक हा राष्ट्रकूटांचा पहिला राजा होता. कोल्हापुरजवळील सापडलेल्या पांडुरंगपल्ली ताम्रपटावरून[१३] या भागावर राष्ट्रकूटांचे वर्चस्व दिसून येते.

वातापीचे चालुक्यः (सु.इ.स.५०० ते इ.स.७५०): इ.स.च्या सहाव्या शतकाच्या सुरवातीस प्रबळ अशा चालुक्य वंशाची सत्ता या भागावर अस्तित्वात आली. यांच्या लेखांतून पलयथान विषय, वनवासी विषय,करहाटक व चिपळूण विषय या भागांची नावे आढळतात. त्यावरून कोल्हापुर हे यातील एखाद्या विषयात समाविष्ट असणार.

राष्ट्रकूट वंशः (सु.इ.स.७३५ ते इ.स.९७५): इ.स.च्या आठव्या शतकाच्या मध्यापासून राष्ट्रकूट वंशातील राजांनी दक्षिणेच्या सार्वभौम सत्तेची सूत्रे आपल्या हाती घेतली व जवळ जवळ २२५ वर्षे या भागावर राज्य केले. यांच्या राज्यामध्ये अलक्तक विषय, करहाटक विषय,वनवासी विषय अशा भागांचा समावेश आहे. पहिला राजा दंतिदुर्ग याने इ.स.७३५पासून राज्य करण्यास सुरवात केली. दक्षिण गुजरात व कोकण हे प्रदेश चालुक्यांकडून जिंकून घेतल्यावर त्याने आपली स्वारी दक्षिण महाराष्ट्राकडे वळविली. इ.स.७५३च्या सामनगड ताम्रपटान्वये[१४]त्याने कोल्हापुरनजिकच्या ब्राह्मणांना जमिनी दान दिल्या. उत्तर कर्नाटकाचा काही भाग व संपूर्ण महाराष्ट्र त्याने आपल्या सत्तेखाली आणला. दंतिदुर्गानंतर पहिला कृष्ण (इ.स.७६०ते७७३), दुसरा गोविंद(इ.स.७७३ते इ.स.७७९),ध्रुव(इ.स.७७९ते इ.स.७९३),तिसरा गोविंद (इ.स.७९४ ते ८१४)हे राजे राज्यावर आले.

---

[१२] द क्लासिकल एज,१९७० ,पृ.२००

[१३] द क्लासिक एज,१९७० ,पृ.२००

[१४] इं.एन्टीक्वेरि ,खंड १२ , पृ.३७१-३७५

इ.स.८१४ मध्ये प्रथम अमोघवर्ष गादीवर आला. त्याची इ.स.८१४ते इ.स. ८७९ अशी प्रदीर्घ कारकीर्द झाली. याच्याच काळचा प्रसिद्ध संजान ताम्रपट आहे[१५]. ज्याअन्वये या राजाने प्रजेला होणाऱ्या त्रासापासून वाचविण्यासाठी आपल्या डाव्या हाताची करंगळी महालक्ष्मीस समर्पित केली. भांडारकर यांच्यामते ही महालक्ष्मी कोल्हापुरचीच महालक्ष्मी असावी [१६].परंतु हे ही नमूद केले पाहिजे की अभिलेखात कोल्हापुर स्थानाचा उल्लेख नाही.

यानंतर दुसरा कृष्ण (इ.स.८८० ते ९१४),तिसरा इंद्र, दुसरा अमोघवर्ष,तिसरा कृष्ण यांनी राजगादी सांभाळली. परंतु या सुमारास या वंशाला उतरती कळा लागली. राष्ट्रकूटांच्या आधिपत्याखालील कर्नाटकातील बिजापूर जिल्ह्याच्या बागेवाडी क्षेत्राचा शासक चालुक्य तैलप याने यादव भिल्लम व कलचुरींची मदत घेऊन इ.स.९७३मध्ये राष्ट्रकूट कर्काचा पराभव केला व राष्ट्रकूटांच्या मान्यखेटवर कब्जा करून चालुक्य वंशाची पुन:स्थापना केली.

सिंद वंश: राष्ट्रकूट काळात कोल्हापुर व आसपासच्या भागाचे प्रशासन कोणाकडे सोपविले होते या विषयीची माहिती उपलब्ध नाही.मिराशी यांच्या मताप्रमाणे इ.स.च्या नवव्या दहाव्या शतकात कोल्हापुर व आसपासच्या भागावर सिंदवंशीयांचे राज्य होते[१७] . इ.स.९६५मधील एक अपूर्ण ताम्रपट पुण्याजवळ सापडला. तो सिंद आदित्यवर्मन् याचा आहे[१८].पुणे जिल्ह्यातील नारायणगाव याठिकाणी इ.स.१०११-१०१२चा सिंदवंशीयांचा आणखी एक ताम्रपट[१९] सापडला आहे. हे सिंदवंशीय राजे स्वत:स करहाटपुराधीश्वर म्हणवितात. त्यावरून मिराशी यांचे असे मत झाले की राष्ट्रकूटांच्या काळात या भागावर सिंदवंशीयांचे साम्राज्य होते व महालक्ष्मी देवालय सिंदवंशीय राजानेच बांधले असावे[२०] .

सिंदवंशीयांचे दोन्ही ताम्रपट पुण्याजवळच सापडले आहेत. कोल्हापुर परिसरात मात्र आजतागायत त्यांचा एकही ताम्रपट उपलब्ध झालेला नाही. महालक्ष्मी मंदिराच्या स्थापत्याचा विचार

---

[१५] ए.इं. ,खंड१८ , पृ.२४२ ते २५२
[१६] ए.इं.,खंड १८ , पृ.२४८
[१७]मिराशी, १९७४ ,पृ.७८
[१८] पाठक,२००२ ,पृ.४०१
[१९] ए.इं.खंड ,२५ ,पृ.१६४
[२०] मिराशी,१९७४ ,पृ.८०

करता मंदिराची धाटणी शिलाहारकालीन आहे व शिलाहारांच्या सर्व राजांनी तिला आपली कुलस्वामिनी (श्रीमहालक्ष्मीलब्धवरप्रसादादि)मानले आहे हे त्यांच्या कोरीव लेखांवरून दिसून येते. खिद्रापुरच्या कोप्पेश्वर मंदिराची रचना महालक्ष्मी मंदिराच्या रचनेशी मिळतीजुळती आहे. तेव्हां महालक्ष्मी मंदिराची निर्मिती शिलाहार काळात झाली असावी असे माझे मत झालेआहे.

कल्याणीचे चालुक्य: (सु.इ.स.९७३ ते इ.स.११८९) इ.स. च्या१०व्या शतकाच्या उत्तरार्धात इ.स. ९७१ मध्ये चालुक्य दुसरा तैल याने महाराष्ट्र,कर्नाटक भागावर आपले स्वामित्व प्रस्थापित केले. परंतु याचवेळी कोल्हापुर व आसपासच्या भागावर शिलाहारवंशीयांचे राज्य होते. कोरीव लेखांतून हे राजे स्वत:चा महामंडलेश्वर असा उल्लेख करतात, पण त्याअगोदर चालुक्यांची वंशावळ देत नाहीत. शिलाहारांनी चालुक्यांच्या युद्धांमध्ये त्यांना मदत केल्याचे दिसून येते. चालुक्य विक्रमादित्य सहावा याने शिलाहारांशी वैवाहिक संबंधही जोडलेले दिसून येतात. चालुक्यांशी चांगले संबंध ठेवून शिलाहारांनी आपले राज्य चालवलेले दिसते.

चालुक्य राजा दुसरा जयसिंह (.स.१०१५ ते इ.स.१०४२) याच्या मिरज ताम्रपटावरून[२१] तो काही काळ कोल्हापुरानजिक तळ ठोकून असल्याचे दिसून येते. यानंतर पहिला सोमेश्वर (इ.स.१०४३ ते १०६८)गादीवर आला. इ.स.१०५० ते १०५३ च्या दरम्यान दक्षिणेकडून चोल राजा राजाधिराज प्रथम याने चालुक्य राज्यावर आक्रमण केले. सोमेश्वर प्रथम व राजाधिराजच्या सैन्यामध्ये तुंबळ युद्ध झाले. युद्धात राजाधिराज मारल्या गेला पण त्यावेळी त्याचा भाऊ राजेंद्र याने युद्धाचे नेतृत्व करून सोमेश्वराचा पराभव केला. राजेंद्राने कोल्हापुरात जयस्तंभ उभारला असा उल्लेख येतो. पण अशाप्रकारचा जयस्तंभ आज कोल्हापुरात दिसून येत नाही परंतु याच युद्धाचा पुरावा देणारा एक वीरगळ सध्या लक्ष्मीविलास वस्तुसंग्रहालयात आहे. या वीरगळावरील त्रुटित लेखात, चोल बंधूंनी महालक्ष्मी मंदिर जाळण्याचा प्रयत्न केला असता तेथील फूल माळ्याने(मालागार) मंदिर वाचवण्याचा प्रयत्न करीत आपले प्राण गमविले[२२]असे वर्णन आले आहे. या युद्धात सोमेश्वरास शिलाहार राजा मारसिंह याने मदत केली होती.

---

[२१] ए.इं. ,खंड ८ , पृ.२४

[२२]रित्ती ,२००० ,पृ.१२६

या ताम्रपटावरून इ.स. १०५० ते इ.स.१०५३ याकाळात महालक्ष्मी मंदिराचा काही भाग लाकडी असावा असे अनुमान करता येते.

पहिल्या सोमेश्वरानंतर दुसरा सोमेश्वर व त्यानंतर विक्रमादित्य सहावा (इ.स.१०७६ ते इ.स.११२८) गादीवर आला. राज्यकारभार हाती घेतल्यानंतर या राजाने आपल्या नावाने विक्रम संवत् सुरु केला. बिल्हणच्या **विक्रमांकदेवचरित**(इ.स.१२वे शतक) या ग्रंथात[२३]

समये तत्र पुष्पास्त्रमित्रे विक्रमप्रभूते:

उद्भूतनूतनाश्चर्या श्रौत्रमैत्रीमगात्कथा ।।१।।

यथास्ति विजयस्तम्भप्रशस्तिरिव मान्मथो ।

करहाटपते: पुत्री त्रिजगतेत्रकार्मणम् ।।२।।

विद्याधरकुमारी सा गौरीदयितिशासनात् ।

कृते कस्यापि कुरुते स्वयंवरमहोत्सवम् ।।३।।

चन्द्रलेखेति नामास्याश्चंद्रलेखासमत्विष: ।

मृत्युंजय महानन्दा मैत्रीमेति मनोभुव: ।।४।। (अष्टम् सर्ग)

कऱ्हाडच्या शिलाहार राजाची कन्या चंद्रलेखा उर्फ चंदला हिने स्वयंवरात षष्ठ विक्रमादित्यास वरिले असा उल्लेख आहे. कऱ्हाडच्या शिलाहारवंशीय राजाचा उल्लेख नाही,तो शिलाहारांचा राजा मारसिंहच असावा.

यानंतर सोमेश्वर तिसरा (इ.स. ११२८ ते इ.स.११३८),दुसरा जगदेकमल्ल (इ.स.११३८ ते इ.स. ११५१),तिसरा तैल (इ.स.११५१ ते इ.स.११५७) अशा राजांनी राज्य केले.

---

[२३] बुल्हर, १८७५

सहाव्या विक्रमादित्यानंतर राज्य वैभवास उतरती कळा लागली व इ.स. ११६३ मध्ये कलचुरी वंशाच्या बिज्जलाने चालुक्यांचा राजा तैलप यास पदच्युत करून सत्ता प्रस्थापित केली.

शिलाहार वंश: कोल्हापुर शाखा (सु.इ.स.९४० ते इ.स.१२१२) कोल्हापुरच्या आसमंतात सापडलेल्या ताम्रपट व शिलाशासनावरून इ.स.११व्या शतकात कोल्हापुरावर शिलाहारांचे स्वामित्व असलेले दिसून येते.या लेखांतील भाषेवर कानडीचा प्रभाव असलेला दिसून येतो. कोरीव लेख व ताम्रपटांवरून शिलाहारांच्या दहा शाखा अस्तित्वात होत्या. परंतु त्यातील तीन शाखा प्रबळ असलेल्या दिसून येतात. उत्तर कोकणचे शिलाहार (सु.इ.स.८०० ते इ.स.१२६५)यांचे राज्य मुंबई, ठाणे व रायगड भागावर होते. दक्षिण कोकणचे शिलाहार (सु.इ.स.७६५ ते इ.स.१०१०)यांचे वर्चस्व रत्नागिरी,सिंधुदुर्ग व गोवा या प्रदेशावर होते. कोल्हापुर शिलाहारांची शाखा (सु.इ.स. ९४० ते इ.स.१२१२)सातारा,सांगली, कोल्हापुर व बेळगाव या भागावर राज्य करीत होती.

कोरीव लेखांवरून कोल्हापुर शाखेच्या तीन राजधान्या होत्या. १)खिळिगिल,प्रणालक किंवा पद्मनाल(पन्हाळगड),२)क्षुल्लकपुर किंवा कोल्लापुर (सध्याचे कोल्हापुर),३)वल्लवाड[२४] (वलवाड)

या शाखेचे राजे स्वतःस विद्याधर नृपति जीमूतवाहन याच्या वंशातील मानतात. ते स्वतःचा तगरपुराधीश्वर असाही उल्लेख करतात. याच वंशाने कोल्हापुरच्या महालक्ष्मीस आपले कुलदैवत मानले आहे. महालक्ष्मीच्या वरप्रसादाने (श्रीमहालक्ष्मीलब्धवरप्रसाद)आपणास हे वैभव प्राप्त झाले असे ते मानतात. यावरून त्यांची महालक्ष्मीवरील निस्सीम भक्ती दिसून येते. या वंशाचा ज्ञात असा पहिला ताम्रपट म्हणजे मारसिंह याचा शक संवत् ९८० (इ.स. १०५८) चा मिरज ताम्रपट होय.मारसिंह व त्याच्यानंतरच्या राजांच्या कोरीव लेखांवरून मारसिंहाच्या आधीच्या राजांची माहिती उपलब्ध झालेली आहे.

या वंशाचा पहिला राजा प्रथम जतिग (सु.इ.स.९४० ते इ.स.९६०) हा गोमंध किल्ल्याचा अधिपती व गंग नृपती पेर्मानडि याचा मामा होता. यानंतर नायिवर्मन (सु.इ.स.९६० ते इ.स.९८०) त्यानंतर चंद्र (सु.इ.स.९८० ते इ.स.१०००) व द्वितीय जतिग (इ.स. १००० ते इ.स. १०२०) हे राजे

---

[२४] मिराशी,१९७४ ,पृ.४९-५०

होऊन गेले. हेमचंद्राच्या **द्व्याश्रयकाव्य**[25] या ग्रंथात गुजरातचा राजा चौलुक्य चामुंडराज (इ.स.९९५ ते इ.स.१००८) राज्य करीत असता त्याच्याकडे कोल्हापुरच्या नरेशाने उत्कृष्ट माणकांचा नजराणा पाठविला होता. हा कोल्हापुर नरेश म्हणजे शिलाहार राजा द्वितीय जतिग असावा. मारसिंहाच्या मिरज ताम्रपटात द्वितीय जतिगाचा उल्लेख पन्नाळदुर्गाद्रिसिंह असा आला आहे.याचा अर्थ या राजाने पन्हाळा काबीज केल्याचे दिसते.

यानंतर प्रथम गोंक (इ.स. १०२० ते इ.स.१०५०) गादीवर आला. याच्याच काळात चालुक्य राजा द्वितीय जयसिंह कोल्हापुराजवळ राहून गेला. मारसिंहाच्या मिरज ताम्रपटात गोंक यास करहाट विषयाचा प्रशासक म्हटले आहे.

यानंतर मारसिंह (इ.स. १०५० ते इ.स. १०७५) राज्य करीत असल्याचे दिसते. बिल्हणाच्या **विक्रमांकदेवचरिता**मधील चंदला उर्फ चंद्रलेखेचा पिता हा मारसिंहच होय . चालुक्य राजा षष्ठ विक्रमादित्य हा त्याचा जावई होता. चोलांनी चालुक्य सोमेश्वर प्रथमवर हल्ला केला त्यावेळी मारसिंहाने सोमेश्वरास मदत केली होती.

मारसिंहानंतर द्वितीय गूहल्ल (इ.स.१०७५ ते इ.स. ११००)राज्यावर आला. याचा एकही ताम्रपट आज उपलब्ध नाही. यानंतर बल्लाळ (इ.स. ११०० ते इ.स.११०५) याने राज्य केले.

यानंतर राजा गंडरादित्य याने राज्यकारभार संभाळला. गंडरादित्याने इ.स. ११०५ ते इ.स. ११३५ असे राज्य केले. या शासकाचे अनेक लेख उपलब्ध आहेत. शिरोळ जवळील खिद्रापुर गावी कोप्पेश्वर नावाचे शंकराचे देवालय बांधण्यास यानेच सुरवात केली. गंडरादित्याची माता नागलदेवी व पत्नी कर्णदिवी जैनधर्मी होत्या. गंडरादित्याच्या ताळले ताम्रपटात[26] गंडरादित्याने प्रयाग येथे लक्ष ब्राह्मणांना भोजन दिले. इरिकुडी येथे एक तलाव खोदून त्यास गंडसमुद्र हे नाव दिले. त्याच्या बांधाशेजारी बौध्द,जैन व हिंदू देवळे बांधली. तेरदाळ कोरीव लेखाप्रमाणे[27] गंडरादित्याचा सामंत

---

[25] काठवटे,१९१५ ,पृ.२१२
[26] मिराशी,१९७४ ,पृ .२५० ते २५७
[27] इं.ए. ,खंड१४ ,पृ.१४

निंबरस याने रुपनारायण नामक बसदी कोल्हापुरात बांधली. राजाने आपल्या मल्लपेय या मंत्र्याच्या विनंतीवरून कोल्हापुराजवळ पंचगंगेच्या काठच्या ब्रह्मपुरी उपनगरात खेडादित्याच्या देवालयाला दान केले[२८].गंडरादित्याने आपल्या पुत्रास विजयादित्यास ठाण्याच्या पदच्युत राजास राज्य मिळवून देण्यासाठी मदतीस पाठविले.

गंडरादित्यानंतर विजयादित्य याने इ.स. ११४० ते इ.स.११७५ याकाळात राज्य केले. याचे कलचुरी बिज्जलाबरोबर खिद्रापुर येथे युद्ध झाले. यात विजयादित्याचा विजय झालेला दिसतो. खिद्रापुर देवळातील तुळयांवर बोप्पण नायकाचे स्तुतिपर लेख आहेत. विजयादित्याच्या कोल्हापुर येथील शक संवत् १०६५[२९] च्या लेखात पार्श्वनाथ तीर्थंकराच्या बसदीसाठी दान दिल्याचा उल्लेख आहे.

यानंतर द्वितीय भोज (इ.स. ११७५ ते इ.स. १२१२) गादीवर आला. हा या वंशातील शेवटचा व श्रेष्ठ राजा होता. काही लेखांत त्याने महामंडलेश्वर ही उपाधी जरी घेतली होती तरी सम्राटपद निदर्शक राजाधिराज ,परमेश्वर व परमभट्टारक अश्या पदव्या भूषविल्या होत्या[३०].या शाखेच्या इतर राजांप्रमाणे भोज ही आपणास श्री महालक्ष्मीचा वर प्रसाद लाभलेला मानतो. कोल्हापुर शक संवत् ११०४[३१] व शक संवत् १११२-१११५[३२] या लेखांतून त्याने महालक्ष्मी मंदिराच्या आवारातील उमामहेश्वराच्या मठाकरिता व महालक्ष्मीच्या त्रिकाळ नैवेद्याकरिता दाने दिल्याचा उल्लेख आहे. दुसऱ्या लेखातील दुसरे महालक्ष्मीसाठी दान हे आश्विन शुक्ल प्रतिपदेस दिले आहे. या दिवसापासून शारदीय नवरात्रास प्रारंभ होतो. त्यामुळे हे दान महालक्ष्मी संदर्भात महत्वाचे ठरते.

यावेळी दक्षिणेस देवगिरीच्या शासकांची सत्ता दृढ होत होती. यादव राजा सिंघण द्वितीय (इ.स.१२०० ते इ.स.१२४७) याने राज्यविस्ताराच्या आशेने राजा भोजावर स्वारी केली व पन्हाळ्याला वेढा देवून भोजास कैद केले व शिलाहारांचे राज्य संपुष्टात आणून कोल्हापुर व आसपासच्या भागावर आपले राज्य प्रस्थापिले.

---

[२८]मिराशी,१९७४;पृ.२७१ते२७६

[२९]पूर्वोक्त ,पृ३०२-३०६

[३०]पूर्वोक्त ,१९७४ ,पृ.५८

[३१] पूर्वोक्त , १९७४ ,पृ.३१७-३२३

[३२] पूर्वोक्त , १९७४ ,पृ.३२३-३२८

यादव वंश: (इ.स.१२१२ ते इ.स.१३१७) महालक्ष्मी मंदिर आवारातील गणपती देवळाच्या खांबावर सिंघण (द्वितीय)च्या काळाचा (इ.स. १२१८)कोरीव लेख आहे[३३]. यात शंकराला नमन करून मस्तकावर शिवलिंग धारण करणारी महालक्ष्मी कल्याणद होवो असा उल्लेख आहे. १३ ते १८व्या श्लोकात तैलण नावाच्या सिंघणाच्या अधिकाऱ्याने देवीसमोर तोरण बांधल्याचा उल्लेख आहे.सातव्या श्लोकात राजाने महालक्ष्मीस अनेक अलंकार दिल्याचा उल्लेख आहे.

इ.स. १२३५च्या कोल्हापुर शिलालेखात [३४]सिंघणाने कोल्हापुराचा जंबुद्वीपांतर्गत शिवक्षेत्र म्हणून उल्लेख केला आहे. या लेखात सर्वप्रथम महालक्ष्मीबरोबर महाकालीचा उल्लेख येतो.

कोल्हापुरहून सिंघणाने उत्तर कोकणच्या केशिराजास आपले मांडलिक बनविले. त्यानंतर त्याने गुजरातच्या चालुक्यांवर व कदंबांवर स्वाऱ्या केल्या. सौंदत्तीच्या रट्टांचा शेवट केला. सिंघणाचा शेवटचा कोरीव लेख इ.स. १२४७चा आहे. यानंतर कृष्ण कान्हरदेव (इ.स.१२४७ ते इ.स.१२६१) गादीवर आला. कृष्णाने माळवा,गुजरात,होयसळ या राज्यांवर स्वाऱ्या केल्या. कोल्हापुर जिल्ह्याच्या शिरोळ तालुक्यातील अब्दुल लाट या गावाच्या कल्लेश्वर मंदिरावरील लेखात महालक्ष्मीपीठाचा उल्लेख दक्षिण वाराणसी,शिवक्षेत्र असा आला आहे.या लेखाचा काळ इ.स. १२५७ आहे. या लेखातही महालक्ष्मीबरोबर महाकालीचाही उल्लेख आला आहे[३५] कृष्णाच्या मृत्यूनंतर त्याचा धाकटा भाऊ महादेव(इ.स.१२६१ते इ.स.१२७१) गादीवर आला.याच्या काळातील एक लेख महालक्ष्मी मंदिराच्या आवारातील नवग्रह मंडपाच्या खांबावर कोरलेला आहे. हा लेख[३६] इ.स.१२६६चा असून जैन बसदीला देणगी दिल्याबाबत आहे. या लेखात सुरवातीस महालक्ष्मीची स्तुती केली आहे.याच्याच काळातील लक्ष्मीविलास वस्तुसंग्रहालयातील एका त्रुटित लेखात[३७] महालक्ष्मीच्या दुपारच्या पूजेसाठी एका माळ्याला देवीसाठी फुले पुरवण्यासाठी उत्पन्न दिल्याचे नमूद आहे.

---

[३३] भा.इ.सं.मं वर्ष १४, अंक४ ,

[३४] ग्रॅहम,१८५७ ,पृ.३३० व ४२६

[३५] रित्ती,२००० ,पृ.१०८

[३६]जे.बी.बी.आर्.ए.एस्.खंड २ ,पृ.२६४

[३७]रित्ती २००० ,पृ.११९

यानंतर रामचंद्र उर्फ रामदेव (इ.स.१२७१ ते इ.स.१३१२) आपल्या चुलत भावास पदच्युत करून गादीवर आला. रामचंद्राने माळव्यावर,पूर्वेकडील नागपूर भंडारा भागावर आपले वर्चस्व कायम केले. दिल्लीचा सुल्तान अल्लाउद्दीन याने देवगिरीवर स्वारी केली.यात रामचंद्राने त्याबरोबर तह केला. बरीच खंडणी व आपली मुलगी त्यास दिली. इ.स.१३०६ पर्यंत रामचंद्राने दिल्लीस खंडणी पाठवली, परंतु युवराज तिसरा सिंघण याने यापुढे खंडणी पाठवण्यास नकार दिला.इ.स.१३०७ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने मलिक नाइब काफूर यास देवगिरीस पाठवून रामचंद्रास बंदी बनविले. सहा महिन्यांनंतर त्याला दिल्ली सल्तनतच्या आधीन राहून राज्य करण्यास परवानगी देऊन देवगिरीस पाठविले. रामचंद्राने इ.स.१३१३ पर्यंत राज्यकारभार सांभाळला[३८] .

कर्नाटकातील सिधनुरली येथील सिद्धेश्वर मंदिरावरील लेखात[३९] व कोल्हापुरातील शक संवत् ११९४[४०]च्या लेखात महालक्ष्मीचा निर्देश करणारे मंगल वचन आले आहे. रामचंद्रानंतर त्यचा जावई हरपालदेव गादीवर आला.परंतु इ.स.१३१७ मध्ये अल्लाउद्दीनचा मुलगा मुबारक याने हरपालदेव याचा पराभव करून त्याची हत्या केली. अशाप्रकारे यादवांचे संपूर्ण राज्य मुसलमानांच्या हाती गेले.

यादवांच्या काळात हिंदूंप्रमाणे जैन बसदींना दाने दिल्याचे उल्लेख आहेत व शिलाहारांच्या कुलदैवतेचे वैभव टिकविण्याचे काम या वंशाने केले.

इ.स.१३१८ पासून कोल्हापुर व आसपासचा भाग मुसलमान राजवटीखाली आला. इ.स.१३१७ ते इ.स.१३४७ पर्यंत या भागात राजकीय अस्थैर्यच होते. अल्लाउद्दीन हसन बहमनी याने ऑगस्ट १३४७ मध्ये दिल्लीचे वर्चस्व झुगारून देऊन आपले राज्य स्थापन केले व कोल्हापुर व आसपासचा प्रदेश बहमनीच्या आधिपत्याखाली आला. स्थानिक सत्ताधीशांनी हे आधिपत्य झुगारण्याचा प्रयत्न केला, परंतु हसन गंगू बहमनीने त्यांचा बिमोड करून आपल्या राज्याचे चार भाग केले. कोल्हापुर व आसपासच्या भागाचा समावेश गुलबर्गा प्रांतात झाला. बहमनीच्या राज्यकारभारासंबंधात कोल्हापुर प्रांताचा उल्लेख येत नाही. परंतु इ.स. १४६७ मध्ये महम्मद गवानने कोकण प्रांत जिंकण्यासाठी

[३८]पाठक,२००२,पृ.४३७
[३९]ग्रॅहम ,१८५७ , पृ.४४३-४४६
[४०]ग्रॅहम , १८५७ , पृ.४४३-४४६

कोल्हापुरात तळ ठोकला होता. इ.स.१४७१ मध्ये संगमेश्वर व इ.स. १४७२ मध्ये गोवा काबीज केल्यावर सुल्तान शम्सुद्दीनने कोल्हापुर, गोवा व लोंढा महमूद गवानला जहागिरीत दिले[४१]. इ.स.१४८१मध्ये गवाणचा वध झाला व बहमनी साम्राज्याला उतरती कळा आली.

इ.स. १४८९ ते इ.स.१५१० मध्ये दक्षिणेत पाच शाह्या अस्तित्वात आल्या. अहमदनगरची निजामशाही, विजापुरची आदिलशाही, वऱ्हाडची इमादशाही,बीदरची बरिदशाही व गोवळकोंड्याची कुतुबशाही. कोल्हापुर व आसपासच्या भागावर विजापुरच्या आदिलशाहीचे वर्चस्व होते. हा प्रदेश आदिलशहाकडे १५० वर्षे होता. सुल्तान युसुफ आदिलशहानंतर त्याचा मुलगा इब्राहिम गादीवर आला. त्याने मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा दिला. विजापुरच्या फौजेत हिंदूंची भर्ती करण्यात आली. याच काळात पन्हाळा किल्ल्याची डागडुजी करण्यात आली. त्यामुळेच आज आपणास पन्हाळ्यास अनेक फारसी शिलालेख मिळतात व तेथील शिल्पांवर असलेली मुसलमानी छाप आढळून येते. इब्राहिम नंतर अलि गादीवर आला. परंतू इ.स. १६३६ मध्ये मोगलांबरोबर झालेल्या तहानुसार विजापुरने मोगलांचे आधिपत्य स्वीकारले.

इ.स.१६०० पासून मोगलांची आक्रमणे दक्षिणेवर सुरुच होती. याचा फायदा मराठी राज्याचा अधिपती शिवाजी याने घेतला. या संबंधातले पहिले पाऊल म्हणजे इ.स.१६४६मध्ये त्याने तोरणा किल्ला सर केला. इ.स.१६५७ मध्ये रायगड घेतला.शिवाजीचा बिमोड करण्यासाठी आदिलशहाने अफजलखान, फाजलखान,सिद्दी जोहर यांना धाडले परंतु शिवाजीसमोर त्यांचा टिकाव लागला नाही. इ.स. १६३६ मध्ये औरंगजेबाची दक्षिणेचा सुभेदार म्हणून नेमणुक झाली. इ.स.१६५९ मध्ये औरंगजेबाचा मामा शायस्तेखान याने पुण्यावर चाल केली. इ.स.१६६३ मध्ये पुण्यावर हल्ला करून शिवाजीने शायस्तेखानाची बोटे कापली. इ.स.१६६६च्या पुरंदरच्या तहानुसार आग्र्याला भेट दिली व तेथून आपली सुटका केली. मोगलांबरोबर लढण्यात विजापुरकरांची शक्ती क्षीण झाली, त्याचा फायदा शिवाजीने घेतला. कोंढाणा, पुरंदर व इ.स.१६७३ मध्ये पन्हाळा जिंकून घेतला. इ.स.१६७५ मध्ये कोल्हापुर जिंकले. जवळजवळ २५ वर्षे मोगल व विजापुरकरांशी झुंज देऊन इ.स.१६७४ मध्ये शिवाजीने आपल्या स्वतंत्र राज्याची स्थापना केली.

---

[४१]चौधरी . १९८९ ,पृ.४४-४५

लवकरच इ.स.१६८० मध्ये त्यांचा मृत्यू झाला.बऱ्याच संघर्षानंतर संभाजी गादीवर आला. संभाजीची संपूर्ण कारकीर्द मोगलांबरोबर लढण्यात व विजापुर आणि गोवळकोंडा यांच्याबरोबर मोगलांच्या चाललेल्या युद्धात त्या शाह्यांना मदत करण्यात गेली. इ.स.१६८९ मध्ये औरंगजेबाच्या छावणीत कैद केलेल्या संभाजीचा वध करण्यात आला.

संभाजीच्या मृत्यूनंतर पन्हाळा मोगलांच्या हाती आला. रायगडावरही त्यांचा कब्जा झाला. युवराज शाहू मोगलांच्या कैदेत होता. इ.स.१६९२ मध्ये मराठ्यांनी पन्हाळा परत जिंकुन घेतला. संभाजीनंतर राजाराम आपला जीव वाचवून इ.स.१६९८ मध्ये विशाळगढावर परत आला. रायगड मोगलांच्या ताब्यात असल्यामुळे राजारामाने साताऱ्यास राजधानी बनविली. इ.स.१७०० मध्ये राजारामाचा मृत्यु झाला. त्याची पत्नी ताराराणी हिने सत्तेची सूत्रे आपल्या हाती घेतली.

औरंगजेबाच्या मृत्यू (इ.स.१७०७)नंतर संभाजीचा पुत्र शाहू व ताराबाई या दोघांमध्ये राजसत्तेसाठी झालेल्या धुमश्चक्रीत शेवटी इ.स. १७०८ मध्ये शाहूंनी सातारा येथे स्वत:ला राज्याभिषेक करवून घेतला. महाराणी ताराबाईंनी आपला मुलगा शिवाजी याची मुंज करून पन्हाळा येथे नवीन गादीची इ.स.१७१० मध्ये स्थापना केली व शिवाजी पहिला याच्या नावे स्वत: राज्याची सूत्रे आपल्या हाती घेतली. पहिल्या शिवाजीचा इ.स. १७२६ मध्ये मृत्यु झाला. यानंतर संभाजी दुसऱ्याने यांनी इ.स.१७१४ ते इ.स.१७६० या काळात राज्याची धुरा सांभाळली. सुल्तानी आमलात कोल्हापुरातील कपिलतीर्थानजिकच्या देवळात नेवून ठेवलेली महालक्ष्मीची मूर्ति पुन: मूळ मंदिरात आणून तिची पुन:स्थापना संभाजीच्या कारकीर्दीत करण्यात आली[४२].

संभाजी निपुत्रिक वारल्यानंतर संभाजीची पत्नी जिजाबाई हिने शहाजी भोसले खानवटकर यांचा मुलगा माणकोजी यास दत्तक घेतले व इ.स. १७६२ मध्ये शिव छत्रपती असे नामकरण करून राज्याभिषेक केला. राजा अल्पवयीन असल्यामुळे जिजाबाईंनीच कारभार सांभाळला. जिजाबाईंचा मृत्यू इ.स. १७७३ मध्ये झाला व दुसऱ्या शिवाजीने वयाच्या १९व्या वर्षी राज्याची सूत्रे आपल्या हाती घेतली. इ.स.१७८८ मध्ये पन्हाळ्याची राजधानी कोल्हापुरास आणली. भुईकोट किल्ला बांधून किल्ल्याभोवती

---

[४२]कोल्हापुर पुराभिलेखागार, महालक्ष्मीसंबंधीची कागदपत्रे, रुमाल क्र.१ पत्र क्र३५

खंदक व सर्व बाजूंनी वेशी बांधून घेतल्या. यावेळेपर्यंत इंग्रजांनी भारतात पदार्पण करून आपली सत्ता बळकट करावयास सुरवात केली. याचाच परिणाम म्हणजे इ,स,१८११ मध्ये इंग्रजांचे सहाय्य मिळविण्यासाठी तह करण्यात आला; व तहान्वये कोल्हापुर हे,स्वतंत्र राज्य न राहता इंग्रजांच्या सत्तेच्या संरक्षणाखालील एक संस्थान बनले.

दुसऱ्या शिवाजीचे निधन इ.स.१८१३ मध्ये झाले. त्यानंतर त्याचा पुत्र संभाजी दुसरा गादीवर आला. इ.स.१८२३ मध्ये अंबाबाई चौकात त्याच्यावर खुनी हल्ला झाला व त्यात त्याचा अंत झाला. यानंतर त्याचा भाऊ शहाजी गादीवर बसला. आपल्या विरोधकांवर वचक बसविण्यासाठी इ.स. १८२६ मध्ये त्याने धारवाडचे पोलिटिकल सुपरिटेंण्डन्ट वेबर यांच्याशी तह केला. परंतू या तहामुळे छत्रपतीच्या राज्यकारभारावर मर्यादा पडल्या आणि त्यांच्या लष्करी हालचालींवर पायबंद घालण्यात आला. थोडक्यात कोल्हापुर राज्यावर इंग्रजांचे वर्चस्व वाढले.

इ.स.१८३८ मध्ये शिवाजी तिसरा गादीवर आला. त्याने इ.स.१८६६ पर्यत राज्य सांभाळले. धारवाडचे ॲक्टिंग पोलिटिकल एजंट विल्यम सिमसन याने कोल्हापुरची सूत्रे आपल्या हाती घेतली. कोल्हापुर दरबारात राज्यकारभारात गोंधळ झाल्यामुळे सिमसनच्या जागी टाऊनसेंड याला बोलविण्यात आले. टाऊनसेंड नंतर कॅप्टन रेवीज आला. त्याने धारवाड जिल्ह्याचे दफ्तरदार दाजी कृष्ण पंडित यांची १८४४ मध्ये मुख्य कारभारी म्हणून नियुक्ती केली. याच दाजी पंडिताने महालक्ष्मी मंदिरातील गरुड मंडपाची बांधणी केली. इ.स.१८४४ मध्ये सामनगड, भूदरगड, पन्हाळा, रांगणा, विशाळगड येथील गडकऱ्यांचा उठाव झाला. या बंडात राजाचा काही संबंध नव्हता. पोलिटिकल एजंट रिव्हज् याच्या शिफारशीनुसार कोल्हापुर राज्याची सर्व सूत्रे कंपनी सरकारच्या हाती राहण्यासाठी इ.स. १८४३ ते१८५३ या काळात कॅप्टन ग्रॅहम याची नेमणूक करण्यात आली. यावेळी गादीवर शहाजीचा औरस पुत्र बाबासाहेब होता.

इ.स.१८५७ च्या उत्तरेकडील बंडाचे पडसाद कोल्हापुरातही उठले. कर्नल जेकबच्या नेतृत्वाखाली कोल्हापुरातील बंड दडपून टाकण्यात आले. इ.स.१८५७च्या उठावात छत्रपतीने बंड करणाऱ्यांना मदत केली नसल्यामुळे कोल्हापुर राज्य खालसा झाले नाही. बाबासाहेब महाराजानंतर

इ.स.१८६६ मध्ये नागोजीराव (इ.स.१८६६ ते इ.स.१८७०)याला राजाराम या नावाने राज्याभिषेक झाला.यानंतर दिनकरराव सावर्डेकर हा शिवाजी चौथा म्हणून गादीवर आला. हा राजा अल्पवयीन असल्यामुळे प्रत्यक्ष कारभार पोलिटिकल एजंटानेच बघितला. यानंतर इ.स.१८४४ मध्ये जयसिंगराव घाटगे कागलकर यांचा थोरला मुलगा शाहू छत्रपती म्हणून गादीवर आला. कोल्हापुरच्या सुधारणेत शाहू महाराजाचा फार मोठा वाटा आहे. त्यांनी पूर्णपणाने राज्यकारभाराची सूत्रे इ.स.१८९४या साली हाती घेऊन इ.स.१९२२ पर्यंत राज्य केले. यानंतर राजाराम(इ.स. १९२२ ते १९४४), शिवाजी पाचवे (इ.स.१९४४ ते १९४६) यांनी राज्यकारभार हाती घेतला. शहाजी राजांच्यावेळी भारत स्वतंत्र झाला व राजेशाहीचा अंत झाला. परंतु आजही कोल्हापुरात राजाला मानाचे स्थान दिले जाते. दसऱ्याची महालक्ष्मीची पालखी असो वा रथयात्रा असो कोल्हापुरचे महाराज आजही महालक्ष्मीच्या सेवेस आजही तत्पर असल्याचे दिसून येतात[४३].

वरील सर्व पुराव्यांवरून हे लक्षात येते की

समृद्ध पुरावशेष असलेल्या कोल्हापुर व आसपासच्या प्रदेशात इ.स. १९४५-४६ साली डेक्कन कॉलेज, पुणे या संस्थेने सांकळिया व दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या उत्खननात इ.स. पूर्व तिसऱ्या शतकापासून कोल्हापुर व त्याचा परिसर मानवी वसाहतीचे केंद्र असल्याचे आढळून आले. या उत्खननात पहिला कालखंड सातवाहन , दुसरा कालखंड शिलाहार ,तिसरा कालखंड बहमनी व चौथा कालखंड मोगल असा दिसून आला . इ.स.च्या पहिल्या दुसऱ्या शतकात रोमन साम्राज्य व दक्खन यामधील आंतरराष्ट्रीय व्यापारी संबंध दर्शविणारे पुरावशेष सापडल्याने रोमन संस्कृतीशी नाते जुळणारे एक महत्वाचे स्थान म्हणून प्राचीन कोल्हापुरास महत्त्व प्राप्त झाले.

सातवाहनांनंतर या भागावर राष्ट्रकूटांचे वर्चस्व(सु.इ.स.२१८ते इ.स.५००) दिसून येते. इ.स.च्या सहाव्या शतकाच्या सुरवातीस प्रबळ अशा चालुक्य वंशाची सत्ता (सु.इ.स.५०० ते इ.स.७५०)या भागावर अस्तित्वात आली. पण त्याचा निदर्शक पुरावा या टेकाडावर प्राप्त झाला नाही.इ.स.च्या आठव्या शतकाच्या मध्यापासून राष्ट्रकूट वंशातील राजांनी (सु.इ.स.७३५ ते

[४३]खंडेराव शिंदे, २००८

इ.स.९७५)दक्खनच्या सार्वभौम सत्तेची सूत्रे आपल्या हाती घेतली. इ.स.८१४ मध्ये प्रथम अमोघवर्ष (इ.स.८१४ते इ.स. ८७९) गादीवर आला. याच्याच काळच्या संजान ताम्रपटातून(इ.स.८७१) या राजाने प्रजेला होणाऱ्या त्रासापासून वाचविण्यासाठी आपल्या डाव्या हाताची करंगळी महालक्ष्मीस समर्पित केली ही महत्वाची माहिती व महालक्ष्मीचा येथील स्थानाचा सुगावा लागतो.

मिराशी यांच्या मताप्रमाणे इ.स.च्या नवव्या- दहाव्या शतकात कोल्हापुर व आसपासच्या भागावर सिंदवंशीयांचे राज्य होते[४४]. या सिंदवंशीयांचे प्राप्त दोन्ही ताम्रपट पुण्याजवळच सापडले आहेत. कोल्हापुर परिसरात मात्र आजतागायत त्यांचा एकही ताम्रपट उपलब्ध झालेला नाही. महालक्ष्मी मंदिराच्या स्थापत्याचा विचार करता मंदिराची धाटणी शिलाहारकालीन आहे व शिलाहारांच्या सर्व राजांनी तिला आपली कुलस्वामिनी (श्रीमहालक्ष्मीलब्धवरप्रसाद)मानले आहे हे त्यांच्या कोरीव लेखांवरून दिसून येते. खिद्रापुरच्या कोप्पेश्वर मंदिराची रचना सांप्रतच्या महालक्ष्मी मंदिराच्या रचनेशी मिळतीजुळती आहे. तेव्हां सांप्रतच्या महालक्ष्मी मंदिराची निर्मिती शिलाहार काळात झाली असावी असे म्हणावयास हरकत नाही.

इ.स. च्या१०व्या शतकाच्या उत्तरार्धात इ.स. ९७१ मध्ये या भागावर चालुक्यवंशीयांची सत्ता असलेली दिसून येते.याचवेळी कोल्हापुर परिसरात शिलाहारवंशीयांनी आपली सत्ता बळकट करण्यास सुरवात केलेली दिसून येते. या वंशाने कोल्हापुरच्या महालक्ष्मीस आपले कुलदैवत ही मानले आहे.

चालुक्य राजा पहिला सोमेश्वर (इ.स.१०४३ ते १०६८)राज्य करीत असता इ.स.१०५० ते १०५३ च्या दरम्यान दक्षिणेकडून चोल राजा राजराज (प्रथम) याने चालुक्य राज्यावर आक्रमण केले.यावेळी कऱ्हाड कोल्हापुर व आसपास शिलाहार राजा मारसिंह चालुक्यांच्या आधिपत्याखाली राज्य करीत होता.राजराज प्रथम युद्धात मारल्या गेला तेव्हा त्याचा भाऊ राजेंद्र याने युद्धाचे नेतृत्व करून सोमेश्वराचा पराभव केला. याच युद्धाचा पुरावा देणाऱ्या वीरगळावरील त्रुटित लेखात, चोल बंधूंनी महालक्ष्मी मंदिर जाळण्याचा प्रयत्न केला असता तेथील फूल माळ्याने मंदिर वाचवण्याचा प्रयत्न करीत आपले प्राण गमाविले असे वर्णन आले आहे. या युद्धात सोमेश्वरास शिलाहार राजा मारसिंह याने मदत

[४४]मिराशी. १९७४ .पृ.७८

केली होती. ताम्रपटातील माहितीवरून इ.स. १०५० ते इ.स.१०५३ काळात महालक्ष्मी मंदिराचा मंडपासकट काही भाग लाकडी असावा असे अनुमान करता येते.

हेमचंद्राच्या **द्व्याश्रयकाव्यात** वर्णन केलेला कोल्हापुरचा नरेश शिलाहार राजा द्वितीय जतिग(इ.स.१००० ते इ.स.१०२०) असावा. मारसिंहाच्या मिरज ताम्रपटात द्वितीय जतिगाचा उल्लेख पन्नाळदुर्गादिसिंह असा आला आहे.

बिल्हणाच्या **विक्रमांकदेवचरिता**मधील चंदला उर्फ चंद्रलेखेचा पिता हा शिलाहार राजा मारसिंहच होय . चालुक्य राजा षष्ठ विक्रमादित्य हा त्याचा जावई होता. गंडरादित्यानंतर विजयादित्य याने इ.स. ११४० ते इ.स.११७५ याकाळात राज्य केले. विजयादित्याच्या एका लेखात कोल्हापुरचा उल्लेख क्षुल्लकपुर असा येतो. यानंतर द्वितीय भोज (इ.स. ११७५ ते इ.स. १२१२) गादीवर आला. हा या वंशातील शेवटचा व श्रेष्ठ राजा होता. याने महालक्ष्मीच्या मंदिरासाठी (इ.स.११९०)त्रिकाल नैवेद्यासाठी दान दिले.

यादव राजा सिंघण द्वितीय (इ.स.१२०० ते इ.स.१२४७) याने राज्यविस्ताराच्या महत्वाकांक्षेपोटी राजा भोजावर स्वारी केली व शिलाहारांचे राज्य संपुष्टात आणून या भागावर आपले राज्य प्रस्थापिले. याने महालक्ष्मी मंदिराचे वैभव वाढवले व महालक्ष्मीस अनेक अलंकार समर्पित केले. याच यादव वंशाच्या काळातील इ.स. १२५७ व इ.स.१२६६च्या लेखात महालक्ष्मीबरोबर महाकालीचाही उल्लेख आला आहे

इ.स.१३१८ पासून कोल्हापुर व आसपासचा भाग मुसलमान राजवटीखाली आला.नंतर कोल्हापुर व आसपासच्या भागावर विजापुरच्या आदिलशाहीचे वर्चस्व होत. जवळजवळ २५ वर्षे मोगल व विजापुरकरांशी झुंज देऊन इ.स.१६७४ मध्ये शिवाजीने आपल्या स्वतंत्र राज्याची स्थापना केली.इ,स,१८११ मध्ये इंग्रजांचे सहाय्य मिळविण्यासाठी तह करण्यात आला; व इ.स. १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला व राजेशाही संपुष्टात आली.

प्रकरण २

महालक्ष्मीचे पुराणात आलेले उल्लेख

कोलापुरं महास्थानं यत्र लक्ष्मी: सदा स्थिता ।

मातु:पुरं द्वितीयं च रेणुकाधिष्ठितं परम्।।५।।

तुलजापुरं तृतीयं स्यात् सप्तश्रृंगं तथैव च ।

हिंगुलाया महास्थानं ज्वालामुख्यास्तथैवच।।६।।

(देवीभागवत, ७.३८.५-६)

भारतातील ५१(**ज्ञानार्णवतंत्र**-करवीर) व १०८ शक्तिपीठांमध्ये स्थान पावलेली आणि महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठातील महास्थानावर विराजमान झालेली कोल्हापुरची महालक्ष्मी आज महाराष्ट्रातील लाखो भाविकांची श्रद्धास्थान बनलेली आहे.

महालक्ष्मी ही मूलप्रकृती मानून तिच्यापासून सर्व सृष्टी,देवदेवता यांची निर्मिती झाली.या विश्वाच्या निर्मितीचे ती मूळ कारण असून तीच पालनकर्ती आणि संहारक शक्ति आहे. तिच्यापासून सर्व देवदेवतांची निर्मिती झाली असून आज अस्तित्वात असलेल्या सर्व देवता तिचीच रुपे आहेत अशा एका स्वतंत्र मताची स्थापना होऊन शाक्त पंथ उदयास आला.संपूर्ण भारतात निरनिराळ्या ठिकाणी शक्तिपीठांची स्थापना होऊन भारतातील प्रमुख पांच संप्रदायात (वैष्णव,शैव,शाक्त,सौर व गाणपत्य) या संप्रदायाची गणना झाली.

देवीचे हे रूप काळाप्रमाणे कसे बदलत गेले आणि आज आपणास दिसणारे तिचे रूप कसे अस्तित्वात आले असावे याचा अंदाज बांधण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला आहे.

हरप्पा संस्कृती: तसे बघावयास गेले तर शक्तिसंप्रदायाचे मूळ आपणास हरप्पा संस्कृतीच्या उत्खननात सापडलेल्या पुरावस्तुंमधील मातृदेवतांत दिसून येते. सिंधूच्या खोऱ्यात

सापडलेल्या स्त्री प्रतिमा याची साक्ष देतात. सापडलेल्या या स्त्री प्रतिमांची संख्या एव्हढी जास्त आहे की त्यावरून यांची पूजा घराघरातून चालत असावी असाच तर्क करावा लागतो . प्रजननशीलतेचे द्योतक म्हणून, स्त्रीच्या मातृत्वरुपांना उठाव देवून, तिची पूजा करण्याची पद्धत या काळात प्रचलित असावी. जॉन मार्शल यांच्या मताप्रमाणे मातृदेवतेच्या परंपरेतून निर्माण झालेल्या शाक्त संप्रदायात देवी ही प्रकृति किंवा शक्तिरूपात सर्वशक्तिमान झाली आणि पुरुषतत्वाच्या सान्निध्यात ती जगन्माता किंवा जगदंबा झाली.("Śakti worship was of great antiquity in India; It originated out of the cult of the mothergoddess. The underlying principle of Śaktism is a sexual dualism which has been aptly described as duality in unity. In this development of the primitive mother worship, the goddess was transformed into a personification of female energy (*Śaktī*) and as the eternal productivity principle (*Prakritī*) united with the eternal male (purusha) and became the creator and mother of the universe (*Jagatmātā* or *Jagadambā*) including the gods themselves."[४५])

हडप्पा संस्कृतीच्या काळात मातृदेवतेची पूजा मूर्तिरूपात किंवा योनिरूपात होत असे हे पुरातत्त्वीय आधारांवरून सहज दिसून येते.

वैदिक काळ: **ऋग्वेद** काळात मात्र या मातृदेवतेचे माहात्म्य कमी झालेले दिसते.या काळात (खिस्त पूर्व ४००० ते खिस्तपूर्व १०००[४६]) स्त्री देवतांना गौण स्वरुपाचे स्थान दिल्याचे दिसून येते. वैदिककालीन संस्कृती पुरुषप्रधान असल्यामुळे फारच कमी स्त्रीदेवतांचा उल्लेख या काळात आढळून येतात. उषा,पृथ्वी, अदिति,रात्रि,सरस्वती इ.देवतांचा उल्लेख आला आहे. या देवतांना मात्र मानवी रूप दिल्याचे आढळत नाही .

ऋग्वेद[४७]ात उषा या देवतेचे २० ऋचांमध्ये आवाहन केले असून जवळ जवळ ३००वेळा तिच्या नावाचा उल्लेख करण्यात आला आहे(**ऋग्वेद** १.४८-४९,११३,१२३५.७९-८०;६. ५.७९-

[४५] मार्शल जॉन ,१९८३ .पृ. ५७
[४६] काणे, १९६८,वंशावळ
[४७] सातवळेकर,१९९७

८०;६.१२५;३.६१;४.५१५२;६४६५;८.७५-८०) [४८] या देवतेचा इतक्या जास्त वेळा उल्लेख असला तरी तिला यज्ञाच्यावेळी सोमाचा हविर्भाव देण्यात येत नसे. उषा ही द्युदेवाची कन्या, आदित्य,भग व निशा यांची भगिनी या रुपात वर्णिलेली आहे.

पृथ्वी या देवतेला (**ऋग्वेद** ५.८४)द्युदेवाबरोबर फक्त तीन ऋचांमध्ये स्वतंत्र उल्लेख प्राप्त झाला आहे. रात्रि ही देवता(ऋग्वेद १०.१२७)अनेक प्रदेश व्यापून टाकणारी,आकाशातील लुकलुकणाऱ्या नेत्रांनी सर्वत्र पाहणारी असा तिचा उल्लेख आलेला आहे.

ऋग्वेदात अदिति या देवतेला बरेच वरचे स्थान प्राप्त झालेले आहे. शाक्त पंथातील शक्तिदेवता जी जगज्जननीच्या स्वरूपात आहे. साधारण तिचेच मूळ आपणास ह्या देवतेत दिसून येते. तिचे वर्णन **ऋग्वेदा**त काही अशा प्रकारे केलेले आले आहे.

आदितिर्द्योरदितिरन्तरिक्षमदितिर्मातस पिता स पुत्रः

विश्वे देवाअदितिः पञ्च जना अदितिर्जातमदितिर्जनित्वम् (ऋग्वेद १.८९ १०)

अर्थ- द्यु लोक आणि अंतरिक्ष हे दोन्ही एकाच अदिति देवीचे आविष्कार असून माता,पिता व पुत्र ही सारी तिचीच रुपे होत. समस्त देवगण, पंचजन इतकेच नव्हे तर भूत आणि भविष्य ही सारी देवी अदितिचीच विभिन्न रूपे आहेत[४९].

अदिति ही इंद्र,वरुण,मित्र,अर्यमन,भग दक्ष इ.आदित्यांची माता म्हणून तिचा उल्लेख सापडतो (**ऋग्वेद** १.५०.२;२.१७.१;३.४.११,)[५०] अदितीने लोहकाराप्रमाणे देवांना निर्मिले.(**ऋग्वेद** १०.७२.१)अदितीपासून दक्ष आणि दक्षापासून अदिति निर्माण झाली. (आदितेर्दक्षो अजायत दक्षाददितिः परि १०.७२.४).हे दक्षा तुझ्या अदिति या कन्येपासून अमर आणि पूजनीय देव निर्माण झाले.(अदितिर्ह्यजनिष्ट दक्ष या दुहिता तव। तां देवा अन्वजायन्त भद्रा अमृतबन्धव १०.७२.५)

---

[४८] भट्टाचार्य. १९७४ :पृ१७

[४९] चित्राव.१९६९:पृ

[५०] भट्टाचार्य. १९७४ . पृ.१७

विराट अशा सामर्थ्याच्या एका स्त्री देवतेचा साक्षात्कार वैदिकांनाही झाला होता असे दिसून येते. **ऋग्वेदा**[६१]तील १०व्या मंडलात अदितीचे वर्णन अशा प्रकारे आले आहे.

अहं रुद्रेभिर्वसुभिश्चराम्यह मादित्यैरुत विश्वदेवै:
अहं मित्रावरुणोभा बिभर्म्यहमिन्द्राग्नी
अहमश्विनोभा मया सो अन्नमत्ति
यो विपश्यति य: प्राणिति य ई शृणोत्युक्तम्
अहमेव स्वयमिदं वदामि जुष्टं
देवेभिरुत मानुषेभि ।।४।।
यं कामये तंतेमुग्रं कृमोमि तं ब्रह्माणं तमृषिं तं सुमेधाम् ।।५।।
अहं रुद्राय धनुरा तनोमि ब्रह्मद्विषे शरवे हन्तवा उ
अहं जनाय समदं कृमोम्यहं द्यावापृथिवी आ विवेश ।।६।।
अहमेव वातइव प्र वाम्यारभमाणा भुवनानि विश्वा ।।८।। (ऋग्वेद १०.१०.१२५)

उत्तर वैदिक काळ: अदितीचे ऋग्वेदकाळातील हे रूप मात्र उत्तर वैदिक काळात दिसून येत नाही. **ऋग्वेदा**तील खिलसूक्तातील श्रीसुक्त हे पूर्णत: लक्ष्मीला समर्पित आहे. यात सर्वात पहिल्यांदा महालक्ष्मीचा उल्लेख आलेला आढळून येतो.

विष्णुपत्नीं क्ष्मां देवीं माधवीं माधवप्रियाम्।
लक्ष्मीं प्रियसखीं भूमिं नमाम्यच्युतवल्लभाम् ।।२५।।
महालक्ष्मै च विद्महे विष्णुपत्न्यै च धीमहि तन्नो लक्ष्मी: प्रचोदयात्।।२६।।

(श्रीसूक्त २५-२६[६२])

---

[६१] सातवळेकर, १९९७
[६२] सातवळेकर, १९९७

अर्थ- विष्णुपत्नी क्षमाशील,माधवप्रिया,विष्णुसखी आणि अच्युतवल्लभा लक्ष्मीदेवीला मी वंदन करतो. महालक्ष्मी आणि विष्णुपत्नी लक्ष्मीचे ध्यान करणाऱ्या भक्तांना ती प्राप्त होते.

वरील श्लोकात आलेला महालक्ष्मीचा उल्लेख कदाचित् विष्णुपत्नीच्या स्वरुपातील लक्ष्मीचेच एक दुसरे नाव म्हणून घेण्यात आलेला दिसतो.

उत्तर वैदिक काळात मात्र नवनवीन देवतांची भर पडलेली दिसून येते.अदिती,उषा,पृथ्वी यांची नावे लयास जाऊन अंबिका,उमा,दुर्गा इ.देवींचा उल्लेख या काळात सापडतो. देवी देवतांमध्ये शिव,विष्णु या देवांबरोबर उमा,लक्ष्मी यांची त्यांच्या पत्नीच्या रुपात गणना होऊ लागली. **वाजसनेयि संहिता**(५.५७) **तैत्तिरीय आरण्यक**(१०.१८) यात शिवाला अंबिका वा उमेचा पती म्हणून संबोधिले आहे. **केन उपनिषदा**त (३.२५) उमा या देवतेचा उल्लेख इंद्राला आत्मतत्वाचा उपदेश देणारी हैमवती [५३]म्हणून केला आहे. **तैत्तरीय अरण्यका**त उमा हिचा उल्लेख अग्नीची कन्या असा केला असून दुर्गेचा उल्लेख सापडतो व तिचा संबंध बलियागाशी आहे. **मुंडकोपनिषदा**त(३.२-४)अग्नीच्या सात जिव्हा काली,कराली,मनोजवा,सुलोहिता,सुधूम्रवर्णा,स्फुलिंगिनी व विश्वरुचि अशा सांगितल्या आहेत.

बौधायन धर्मसूत्रात रुद्राच्या पत्नीला बलि द्यावा असे सांगितले आहे.इथे दुर्गेला अंबा,आर्या,भगवती,महावैष्णवी व्यतिरिक्त महाकाली या नावाने संबोधिले आहे. **तैत्तिरीय आरण्यका**त(१०.१७)दुर्गेचे दुर्गावैरोचिनी हे नाव सर्वप्रथम मिळते.**बौधायन गृह्यसूत्रा**त दुर्गेची उपासना ,पूजापद्धती आदींचा उल्लेख मिळतो.(**गृह्यसूत्र,बौधायनसूत्र** काळ ख्रिस्त पूर्व ६०० ते ३००)[५४]

महाभारत : **महाभारताचा** काळ इ.स.पूर्व ४०० ते इ.स.४००[५५], असा सांगितला आहे. **महाभारता**च्या संशोधित आवृत्तीत दुर्गेचा उल्लेख नाही. परंतु आज उपलब्ध असलेल्या महाभारतातील १६व्या अध्यायात युधिष्ठिराने, व ८३व्या अध्यायात अर्जुनाने दुर्गा देवीचे स्तवन केल्याचा उल्लेख आढळतो.

---

[५३] द्विवेदी,२००२, पृ १७
[५४] भट, १९८०, वंशावळ
[५५] काणे, १९६८, वंशावळ

महाभारताच्या विराट पर्वातील १६व्या अध्यायातील पाण्डव प्रवेशात युधिष्ठिराने दुर्गा देवीची स्तुती केली आणि देवी स्वत: प्रगट होऊन तिने युधिष्ठिरास वर दिल्याचे सांगितले आहे.(**श्रीमन्महाभारतअध्याय १६,विराटपर्व,पांडवप्रवेश १-९**)[66]तिचे ब्रह्मस्वरूप अष्टभुजा,महिषासुराचा नाश करणारी,विंध्याचलावर वास्तव्य करणारी ,संग्रामात विजय देणारी अशा स्वरूपात वर्णन केले आहे.

महाभारतातील ८३व्या अध्यायात दुर्योधनाची सेना युद्धासाठी उपस्थित झालेली बघून श्रीकृष्णाने अर्जुनाला दुर्गेची प्रार्थना करण्यास सांगितले व या प्रार्थनेत दुर्गेच्या विविध रूपांचा उल्लेख केला आहे. तिला कुमारी,काली,कपाली,भद्रकाली,महाकाली,कात्यायनी,चंडी अशा रूपांनी युक्त असल्याचे सांगितले आहे(**श्रीमन्महाभारत** अध्याय ८३ ४-१६).

वरील सर्व वर्णनांवरून ज्यावेळी दुर्गा स्तवनांचे हे श्लोक महाभारतात एकरूप करण्यात आले त्यावेळी दुर्गा ही अष्टभुजा महिषासुरमर्दिनी म्हणून अस्तित्वात आलेली होती. या देवतेचा नंतरच्या काळात झालेला प्रचार व प्रसार यामुळे हे भाग महाभारतात नंतर जोडण्यात आले असावेत.

रामायण काळ: **रामायणा**तील (इ.स.पूर्व २०० ते इ.स.२०० ,काणे,) सीता ही मूलत: पृथ्वीदेवता असल्याचे सांगितले आहे. लंकेवर स्वारी करण्याच्या पूर्वी रामाने दुर्गेचे स्तवन केल्याचा उल्लेख आज उपलब्ध असलेल्या रामायणात आहे. परंतु हा भाग मूळ रामायणात नाही **देवीभागवता**त (अध्याय ३०)रामाने नवरात्रात देवीची पूजा केली व तिच्या वरप्रसादाने तो सीतेला सोडवू शकला अशा अर्थाचे श्लोक आले आहेत.**कालिकापुराणा**त (अध्याय५०.१०)ब्रह्माने लंकेत देवीची अश्विन महिन्यात नऊ दिवस पूजा केली व युद्धभूमीवर देवीने त्याला दर्शन दिल्याचा उल्लेख[67] आहे

[66] पाण्डेय.सं.२०४४
[67] भट्टाचार्य.१९७४. पृ१३३

पुराण काळ **वायुपुराण, विष्णुपुराण, कूर्मपुराण** व **मत्स्यपुराण** यांतील काही मूळ भागांचा काळ इ.स.३००तेइ.स.६०० असा आहे[५८] या काळाच्या अंतापर्यंत देवता निर्मिती पूर्ण झाली होती. या पुराणांतही शक्तिपीठांची नांवे आली आहेत. व या शक्तिपीठांमधून शक्तिदेवतांची पूजा चालू होती [५९].

स्कंदपुराण(काळ इ.स.७वे ते ९वे शतक[६०]), **शिवपुराण, कूर्मपुराण** यांत शक्तिला पूर्णतः स्वतंत्र अस्तित्व दिले नसून तिला शिवाची अर्धांगिनी व शिवाची शक्ति म्हणून वर्णिले आहे. **विष्णुपुराणात** (इ.स.चे ४ थे शतक)[६१] विष्णूची योगमाया, हिला विष्णुच्या सर्व अवतारांमध्ये अर्धांगिनीचे स्थान प्राप्त आहे. परंतु यात महालक्ष्मी विष्णूची पत्नी म्हणुन उल्लेख आलेला आहे.**शिवपुराणात** तिला क्रिया ज्ञान व इच्छाशक्तीच्या स्वरूपात वर्णिले आहे. **अग्निपुराणा**त शक्तिचे वर्णन पराशक्त म्हणून केले असून शक्तिला बरेच वरचे स्थान दिलेले दिसून येते. विश्वाची निर्मिती शिव व शक्तिच्या समन्वयाने झाली असून हे दोघे एकरूप आहेत.

सर्व पुराणांत **मार्कंडेयपुराण** यास आगळे वेगळे महत्व प्राप्त झाले आहे.महाकाली,महालक्ष्मी व महासरस्वती या स्वरूपात तिने केलेला राक्षसांचा संहार यांचे वर्णन आले आहे. महालक्ष्मी हीच सृष्टीची निर्माती,पालनकर्ती आणि संहारक म्हणून गौरविली आहे.तिच्यापासून सर्व देवतांची निर्मिती झाली आहे.

आज उपलब्ध असलेल्या **मार्कंडेयपुराणा**तील काही भाग जरी नंतरच्या काळात जोडलेला असला तरी मूळ **मार्कंडेयपुराणा**त देवीमाहात्म्य अंतर्भूत असल्याचा पुरावा आहे. डॉ.राजेंद्र शर्मा यांनी प्रकाशित केलेल्या **श्रीमार्कंडेयपुराणम्**[६२] या ग्रंथाच्या प्रास्ताविकात **मार्कंडेयपुराण** ग्रंथाच्या काळाची चर्चा आहे.पार्जिटर यांच्यामते **मार्कंडेयपुराणा**चा काळ इ.स.९९८च्या पूर्वीचा आहे.ते म्हणतात "Mahamahopadhyay Haraprasad Shastri found a copy of the *Devīmahātmya* in old Newari characters in the Royal Library in Nepal, and it is dated 998 A.D.It

---

[५८] काणे, १९६८. वंशावळ

[५९] प्रभुदेसाई, १९६७.पृ८६

[६०] काणे, १९६८:खंड५.पृ.९१२

[६१] काणे.१९६८ . वंशावळ

[६२] राजेंद्र शर्मा ,२००८.प्रस्तावना

may be safely inferred therefrom, that this poem must have been composed before the beginning of the 10th century at the late".

मार्कंडेयपुराणाच्या **देवीमाहात्म्या**तील आज दिसणारा मंत्रासहित पूजाविधि, प्राधानिक रहस्यम्,मूर्तिरहस्य हा भाग प्रक्षिप्त आहे. ग.ह.खरे यांच्यामते तो भाग १६व्या शतकातील असावे[६३]. प्राधानिक रहस्यात महालक्ष्मीचे वर्णन आले आहे.ते काहीसे कोल्हापुरच्या महालक्ष्मीशी मिळते जुळते आहे.

देवीमाहात्म्य हा उपासनाग्रंथ मूळ **मार्कंडेयपुराणा**तील असून ह्या पुराणातील ८१ ते ९३ हे १३ अध्याय **देवीमाहात्म्या**त १ते १३ अध्याय याप्रमाणे घेतले आहेत. मूळ **मार्कंडेयपुराणा**त एकूण ५७८ श्लोक असून हवनाच्या सोयीसाठी उत्तकालीन तंत्र साहित्यात मूळ **मार्कंडेयपुराणा**तील ५७८ श्लोकांचे ७०० श्लोकांत विभाजन करण्यात आले आहे .म्हणून यास सप्तशती हे नामाभिधान प्राप्त झाले **देवीमाहात्म्य** हा ग्रंथ देवीच्या महाकाली,महालक्ष्मी व महासरस्वती या तीन रूपांच्या पराक्रमांचे तसेच माहात्म्याचे वर्णन प्रथम चरित्र (अध्याय १)द्वितीय चरित्र(अध्याय २-४) व तृतीय चरित्र(५-१३) अशा भागात आढळून येते.

या **देवीमाहात्म्या**त महालक्ष्मीस मूळ प्रकृती मानून तिच्यापासून सर्व सृष्टी व देवदेवतांची निर्मिती झाली अशी कल्पना केली आहे. ही देवी स्वतःच निर्माती, पालनकर्ती व संहारकर्ती आहे.

देवीमाहात्म्यात देवीचे वर्णन काही अशा प्रकारे आले आहे.

त्वयैतत्पाल्यते देवि त्वमत्स्यन्ते च सर्वदा

विसृष्टौ सृष्टिरूपा त्वं स्थितिरुपा च पालने (अध्याय १-७६[६४])

अर्थ- तुझ्याकडूनच या जगाचे पालन होते आणि हे देवी तूच कल्पांती या जगाचा संहार करते. जगाच्या उत्पत्तीचे वेळी तूंच सृष्टीरूप होतेस रक्षणकाळी तूच स्थिति रूप होते.

---

[६३] खरे .१९५८:पृ.५६

[६४] वाडेकर,१९९७

प्रकृतिस्त्वं च सर्वस्य गुणत्रयविभाविनी

कालरात्रिर्महारात्रिर्मोहरात्रिश्च दारुणा

(अध्याय १-७८[६५])

अर्थ- (सत्व रज आनि तम या) गुणत्रयाला प्रगट करणाऱ्या सर्व विश्वाच्या मूलप्रकृतिस्वरूप (हे देवि) तू साक्षात् भयंकर कालरात्रि महारात्रि आणि मोहरात्रि आहेस.

११व्या अध्यायात तर देवीच्या संबंधातील श्लोकात ज्या ज्या वेळी (त्रैलोक्यामध्ये) असुरांकडून पीडा उत्पन्न होईल त्या त्या वेळी अवतार घेऊन मी शत्रूंचा विनाश करीन अशा प्रकारचा श्लोक देवीच्या मुखातून उद्धृत केला आहे.

इत्थं यदा यदा बाधा दानवोत्था भविष्यति

तदा तदावतीर्या हं करिष्याम्यरि सङक्षयम (अध्याय ११.५५) [६६]

गीतेतील श्रीकृष्णाप्रमाणेच देवी ही देखील पुन:पुन: पृथ्वीवर प्रगट होऊन असुरांचा नाश करील असे सांगितले आहे. त्यात तिने शाकंभरी, भ्रामरी व शताक्षी या रुपात अवतीर्ण होणार असल्याचेही सांगितले आहे.

देवीमाहात्म्य[६७]ात तीन ठिकाणी महालक्ष्मीच्या तीन रूपांचे उल्लेख आलेले आढळतात. देवीमहात्म्यातील चौथ्या अध्यायात देवीस्तुती अंतर्गत तीस श्रीदेवी म्हटले आहे. ११व्या अध्यायात तीस विष्णुशक्ति, नारायणी व लज्जा (अ.११, श्लोक-५,८,२२) म्हटले आहे.

देवीमाहात्म्यातील मध्यम चरितात महिषासुरास मारणारी महालक्ष्मी १८ हातांची असून तिने हातात अक्षमाला, परशू, गदा, बाण, कुलिश, पद्म, धनुषा, कुंडिका, दंड, शक्ति, खड्ग, चर्म, शंख, घंटा

[६५] वाडेकर, १९९७

[६६] चित्राव, १९८३

[६७] चित्राव, १९८३

मधुपात्र,शूल पाश व चक्र धरले आहे. या आयुधांवरून तिच्यात शिव(चर्म,मधुपात्र,शूल व पाश), विष्णु (शंख,चक्र,गदा,धनुष व परशू)व ब्रह्मा(अक्षमाला)यांच्या शक्तिंचा अंतर्भाव आहे.

देवीमाहात्म्यातील प्राधानिक रहस्यामध्ये (जे प्रक्षिप्त असावे) महालक्ष्मीच्या मूर्तिचे वर्णन आले आहे.

सर्वसाद्या महालक्ष्मी स्त्रिगुणा परमेश्वरी
लक्ष्यालक्ष्या स्वरूपा सा व्याप्य कृत्स्न व्यवस्थिता ।।४।।
मातुलिंगं गदां खेटं पानपात्रं च बिभ्रती
नागं लिंगं च योनिं च बिभ्रती नृप मूर्धनि ।।५।।
तप्त कांचनवर्गा सा तप्तकांचनभूषणा
शून्यं तदखिलं खेन पूरयानास तेजसा ।।६।।

(उत्तरांग विधि :५ प्राधानिक रहस्यम [६८]श्लोक ४-६)

वरील ५ व्या श्लोकातील महालक्ष्मीचे वर्णन कोल्हापुर येथील महालक्ष्मीशी मिळते जुळते आहे. आयुधे व तिचा क्रम सध्या प्रस्थापित असलेल्या मूर्तिच्या वर्णनाशी मिळता जुळता आहे. शिरावर योनि व लिंगही आहे.फक्त नाग आजच्या मूर्तित अस्तित्वात नाही. त्याऐवजी चांदीच्या पत्र्यावरील नाग तिच्या मस्तकावर सुशोभित केलेला आढळून येतो.

मार्कंडेयपुराणातील हे प्राधानिक रहस्य मूळ पुराणात आढळून येत नसल्यामुळे याचा काळ श्री.ग.ह.खरे [६९] यांनी १६व्या शतकातील दिला आहे.

स्कंदपुराणाच्या रेवाखंडातील १९८व्या अध्यायात (श्लोक ६४-९०) यांत १०८ शक्तिपीठांचा उल्लेख सापडतो.

[६८] चित्राव ,१९८३ ,पृ.२६०
[६९] खरे ,१९५८ ,पृ .५६

रमणा रामतीर्थे तु यमुनायां मृगावती।

करवीरे महालक्ष्मी रूपादेवी विनायके ।।७८।।

याच पुराणाच्या सह्याद्री खंडातील दुसऱ्या अध्यायात खालील श्लोक आला आहे.

योजनं दश हे पुत्र काराष्ट्रो देशदुर्धरः

तन्मध्ये पञ्चक्रोशञ्च काश्यपदाधिकं भुवि

क्षेत्रं वै करवीराख्यं क्षेत्रं लक्ष्मीविनिर्मितम्

तत्क्षेत्र हि महत्पुण्यं दर्शनात् पापनाशनम्

तत्क्षेत्रे ऋषयः सर्वे ब्राह्मणा वेदपारगाः

तेषां दर्शनमात्रेण सर्व पापक्षयो भवेत्

(स्कंदपुराण, सह्याद्री खंड, अध्याय २ २४-२७)

मूळ **स्कंदपुराणात** सह्याद्री खंडाचा उल्लेख नाही परंतु कल्याण तीर्थांका[७०]त हा उल्लेख आढळून येतो.

पद्मपुराण[७१]च्या गीतामहात्म्यातील १८६ व्या अध्यायात कोल्हापुरच्या महालक्ष्मीचा उल्लेख आला आहे.

अस्ति कोल्हापुरं नाम नगरं दक्षिणाथे ।।

सुखानां सदनं साध्वि साधूनां सिद्धिसंभवम् ।।१।।

परशक्ते:परं पीठंसर्वदेवनिषेवितम् ।।

पुराणेषुप्रसिद्धंयद्भुक्तिमुक्तिफलप्रदम् ।।२।।

असे वर्णन आले आहे.

[७०] कल्याण तीर्थांक, १९५७, पृ.२६१; गायतोंडे, १९७१

[७१] राजेंद्र शर्मा, १९८४

महालक्ष्मीं महामायां नत्वतुष्टा वभवितत: । जयत्यपारकरुणाशरण्य जगदंबिका ।।१५

कुर्वाणा जगतौजन्मपालनंक्षपणंद्दशा । यथाशक्त्याकृतादिष्ट:परमेष्ठीसृजत्यसौ ।।१६।।

अवष्टभ्यचतांशक्तिंपालयत्यच्युतोजगत् । ययाशक्त्याकृतावेश:संहरत्यखिलंहर ।।१७।।

तांभजेपरमांशक्तिंसर्गस्थितिलयोर्जिताम् । योगिध्येयांघ्रि कमलेकमलेकमलालये ।।१८।।

स्वभावानखिलान्नस्त्वंगृह्णासींद्रियगोचरान् ।। त्वमेवकल्पनाजालंत्कल्पंकुरुषेमन: ।।१९।।

इच्छाज्ञानक्रियारुपापरसंवित्स्वरुपिणी ।। निष्फलनिर्मलानित्यानिराकारानिरंजना ।।२०।।

निरंतरानिरांतकानिरालंबानिरामया ।। तवैवंमहिमानंहिकोवर्णयितुमीशते ।।२१।।

वंदेनिर्भिन्नषट्चक्रद्वादशांतर्विहारिणीम् ।। अनाहतध्वनिमयींबिंदुनादकलात्मिकाम् ।।२२।।

मातस्त्वंपूर्णशीतांशुगलत्पीयूषवाहिनी ।। पुष्णासिवत्सलेबाला न्सनकादीन्दिगंबरान् ।।२३।।

अनुस्यूताशिवासंविज्जाग्रस्त्वप्नसिषुप्तिषु ।। तुरीयायांवर्त्तमानांदयासूनृतसंधिषु ।।२४।।

ददासिप्राणिनांसर्वा;सततंब्रह्मसंपद: ।।संत्द्दत्यतत्वसंघातंतुरीयातीतयात्वया ।।२५।।

योगिनांबिंबतादात्म्यंदीयतेनिर्विकल्पया ।। परांनमामिपश्यंतींमध्यमांवैखरीमपि ।।२६।।

रूपाणिदेविगृह्णासिजगत्संत्राणहेतवे ।। त्वंब्राह्मीवैष्णवीचत्वंमाहेशीचत्वमंबिके ।।२७।।

वाराहित्वंमहालक्ष्मीर्नारसिंहीत्वमैंद्रिका।। त्वंकौमारीचंडिकात्वंलक्ष्मीस्त्वंविश्वपावनी ।।२८।।

सावित्रीत्वंजगन्माताशशिनीत्वंचरोहिणी ।। त्वंस्वाहात्वंस्वधात्वंहित्वंसुधापरमेश्वरी ।।२९।।

चंडमुंडभुजादंडखंडदोर्दंडमंडिते ।। रक्तबीजगलद्द्रवतपानघूर्णितलोचने ।।३०।।

उन्मत्तमहिषग्रीवोन्मूलनप्रौढदोर्युगे ।। शुंभासुरमहादैत्यदारणायातविक्रमे ।।३१।।

अनंतचरितेतुभ्यंनमस्त्रैलोक्यमातृके ।। भवतकल्पलतेमह्यंप्रसीदपरमेश्वरी ।।३२।।

माते तुझ्या हृदयात अपार माया भरलेली आहे तू सर्व कामना पूर्ण करतेस. आपल्या कटाक्षाने सर्व जगताची तू निर्मिती करतेस, पालन व संहार करतेस. माते, तुझ्या आधारे ब्रह्मदेव सृष्टीची रचना करतात. भगवान अच्युत पालन करतात. इच्छाशक्ति, ज्ञानशक्ति व क्रियाशक्ति ही

सगळी तुझीच रूपे आहेत. तुझे रूप निष्कलंक,निर्मल,नित्य,निराकार,निरंजन,अंतररहित,आतंकशून्य, आलंबहीन तथा निरामय आहे. तूच षट्चक्रांचे भेदन करून अंत:करणाच्या बारा स्थानांवर विहार करतेस. अनाहत ध्वनी,बिंदू,नाद ही तुझीच रूपे आहेत. तूच परा, पश्यंती,मध्यमा, वैखरी व वाणी आहेस.देवी, तूच या जगाचं रक्षण करण्यासाठी नाना रूपं धारण करतेस. अंबिके तूच ब्राह्मी, वैष्णवी,माहेश्वरी,शक्ति आहेस.वाराही,महालक्ष्मी,नारसिंही,ऐंद्री,कौमारी,चंडिका,लक्ष्मी,जगन्माता, सावित्री, चंद्रकला, रोहिणी ही सर्व तुझीच रूपे आहेत.अशा रूपात राजकुमाराने देवीचे वर्णन केले आहे.विश्वाची निर्माती,पालक व संहारक असे तिचे वर्णन करून तीनही शक्तिंची ती रुपे, जगाच्या रक्षणासाठी विविध रूपे घेऊन निरनिराळ्या नावांनी अवतार घेते.

जैनांच्या **पद्मपुराणा**तील गीतामाहात्म्यात जानश्रुतीची एक कथा आलेली आहे. ती प्रमाणे ब्रह्मवादी रैववाच्या शोधार्थ भटकणारा जानश्रुतीचा सारथी कोल्हापुरास आला होता. त्यावेळी त्याला कोल्हापुरचे जे दर्शन झाले त्याचे वर्णन करताना म्हटले आहे

तत: कोल्हापुरं नाम ततो रुद्रगयां प्रति

आस्ते भगवती यत्र लक्ष्मीर्भवितप्रदायिनी

पंचनद्यां नर: स्नात्वा महालक्ष्मीं विलोक्य च

भुक्ता भोगान्यथाकामं भवितं च प्रतिपद्यते[७२]

परंतु या श्लोकाचा काळ माहित नसल्यामुळे कुठल्या काळातील हे वर्णन असावे यावर प्रकाश टाकता येत नाही असे श्री.ग.ह.खरे यांचे म्हणणे आहे. या आधारे एव्हढेच म्हणता येईल की रैववाने कोल्हापुरचे मंदिर बघितले होते व ते त्याकाळात अस्तित्वात होते.

---

[७२] खरे ,१९५८ ,पृ ३५

मत्स्य पुराण ,देवीभागवत पुढे जाऊन **प्राणतोषिणीतंत्र, बृहन्नीलतंत्र** यांत शक्तिपीठांची यादी दिली आहे. त्यात कोल्हापुरच्या महालक्ष्मीचा उल्लेख आला आहे. **कालिकापुराण** व **रुद्रयामलतंत्र** यांत शक्तिपीठांची नांवे आहेत; परंतु यांत कोल्हापुरचा उल्लेख नाही.

या वरील ग्रंथांमधील **मत्स्यपुराण** व **देवीभागवत** या ग्रंथांत दक्षयज्ञकथेचा अंतर्भाव आहे व त्यातून सतीच्या ठिकठिकाणी पडलेल्या अवयवांजागी पीठनिर्मिती झाल्याचा उल्लेख आहे.

१०८ शक्तिपीठांची संख्या सर्वप्रथम **मत्स्यपुराण**[७३]त आढळते.(अध्याय १३,२६-५३) या पुराणाचा इतर पुराणांशी संबंध लक्षात घेता हे सन् २०० ते ३०० या काळातील असावे.**मत्स्यपुराणात** गुप्त वंशाचा उल्लेख नाही; आंध्रांच्या ऱ्हासाचा उल्लेख आलेला आहे. पां.वा. काणे यांच्यामते" *Matsya* should be regarded as composed or revised about the middle or end of 3rd century A.D.,though the possibility of some chapters or verses being added after that date cannot be ruled out"[७४]

मत्स्यपुराणातील कथेनुसार दक्षाने यज्ञ केला आणि त्याने शिवास आमंत्रित केले नाही हे जेव्हा सतीस कळले तेव्हा सतीला राग आला व रागाच्या भरात तिने अग्नीत प्रवेश केला. दक्षाला याचे फार वाईट वाटले व त्याने तिला विचारले आता तू मला कोठे भेटशील? तेंव्हा तिने १०८ जागांची नांवे सांगितली व त्या स्थानांवर आपले वास्तव्य राहील असे तिने सांगितले.

या १०८ पीठांमध्ये कोल्हापुरच्या महालक्ष्मीचा उल्लेख आलेला आहे.

करवीरे महालक्ष्मी रुमादेवि विनायके

आरोग्या वैद्यनाथे तु महाकाली महेश्वरी।।४१।।

(अध्याय १३ श्लोक ४१)[७५]

---

[७३] राजेंद्र शर्मा, २००८ , प्रस्तावना

[७४] काणे,१९६८ , पृ.८९१-९२

[७५] नागशरण सिंह,१९८३

कोल्हापुराचे नाव या ठिकाणी करवीर असे दिले आहे.

देवीभागवत[७६] (काळ ९००-१३५०[७७]) या ग्रंथातील सातव्या खंडातील तीसाव्या अध्यायात

करवीरे महालक्ष्मी रुमादेवी विनायके

आरोग्या वैद्यनाथे तु महाकाले महेश्वरी।।

(देवीभागवत अध्याय ३०, श्लोक ७१)

असे वर्णन आले आहे. याच ग्रंथातील ३८व्या अध्यायात कोल्हापुराचा उल्लेख आला असून १०८ शक्तिपीठांत कोल्हापुरास प्रथम स्थान देण्यात आले आहे.

कोलापुरं महास्थानं यत्र लक्ष्मीः सदा स्थिता।

मातुःपुरं व्दितीयं च रेणुकाधिष्ठितं परम्।।१।।

तुलजापुरं तृतीयं स्यात् सप्तश्रृंगं तथैव च।

हिंगुलाया महास्थानं ज्वालामुख्यास्तथैव च।।२।।

(**देवीभागवत** अध्याय ३८ श्लोक १-२)

इ.स.च्या १० व्या ११ व्या शतकातील **सरस्वतीपुराण** या स्थलपुराणात कोल्हापुरच्या महालक्ष्मीचा उल्लेख आलेला आहे.

पीठं कोल्हापुरं नाम देवीनां प्रीतिवर्धनम्

महालक्ष्मी स नाथस्तु भैरवस्तत्र नायकः

यस्य पूर्वे महालक्ष्मी स्थिता कोल्लाच दक्षिणे

कंकाल पश्चिमे देवी महाकाली तथोत्तरे (**सरस्वतीपुराण** २३२-२३३[७८])

---

[७६] व्यंकटेश प्रेस.१९१९

[७७] नागशरण सिंह.१९९८ .प्रस्तावना

[७८] भिडे,देशपांडे,१९७१ , पृ.२७; अहिरराव,२००२.पृ.

गुजराथमधील अन्हिलवाड येथे सिद्धराज सरोवराच्या तीरावर सिद्धराज सोलंकी या राजाने (राज्यशासन इ.स.१०९३-११४२) कोल्हापुर पीठाप्रमाणे महालक्ष्मीचे पीठस्थान निर्माण केले. येथे पूर्वेला महालक्ष्मी, उत्तरेस महाकाली, दक्षिणेस कोल्ल व पश्चिमेस कंकाल भैरव आहे. **सरस्वती पुराण** हे इ.स.१२व्या शतकाच्या सुरवातीस लिहिल्या गेले .**सरस्वती पुराण** या ग्रंथाच्या ३४व्या अध्यायात देवीतीर्थ माहात्म्याचे वर्णन आले आहे.

सध्या कोल्हापुरात जे महालक्ष्मी देवालय आहे तेथे पूर्वेस महालक्ष्मी, उत्तरेस महाकाली, दक्षिणेस कोल्लाच्या ऐवजी महासरस्वती आहे. सरस्वतीपुराणाप्रमाणे दक्षिणेस कोल्ल व पश्चिमेस कालभैरव पाहिजे पण तो नाही. गणेश मंडपात मात्र भैरव चामुंडा मूर्ती आहे.

गुजराथचा प्रसिध्द जैन ग्रंथकार हेमचंद्र(इ.स,११३०) याने आपल्या **द्व्याश्रयकाव्य** [७९] या ग्रंथात कोल्हापुरच्या महालक्ष्मीचा उल्लेख केला आहे.त्याने सांगितल्याप्रमाणे कोल्हापुरचा राजा ज्यावर देवी लक्ष्मी व गौरीची कृपा होती त्याने मूलराजचा मुलगा चामुंड यास भेटवस्तू पाठवल्या होत्या. त्यावरून अशा देवीचे अस्तित्व कमीत कमी १०० वर्षे आधी तरी असावे.

सरोजवासावरजो महाकालिकावरजेश्च स पद्मरागान्

प्रैषीद्वनं सारसिजं नु कोल्लापुरेश्वरस्तेऽरिमनोजशंभो ।।२२।।

यावरील टीका : सरोजे वासो यस्याः सरोजवासा लक्ष्मीस्तस्या वरः प्रसादस्तत्र जातो महाकालिकावरेजश्च गौरीप्रसादे जातश्च स प्रसिध्दः कोल्लापुरेश्वरः कोल्लापुराख्यमहापुराधिपः पद्मरागाँल्लोहितकमणीन्प्रैषीत् ।। कीदृशान्। सारसिजं वनं नु रक्ततत्वादिगुणै रक्तोत्पलसत्कवनतुल्यान्। कोल्लापुरे ह्यतिश्रेष्ठाः पद्मरागाःस्युः। यतः किं भूतस्य ते। अस्य एरा मनोजः कामस्तत्र शंभोर्विनाशकस्येत्यर्थः । शभोर्हि पूजार्थं शंभूर्भभक्तः सारसिजं वननिव पद्मरागांप्रेषयति।।[८०]

---

[७९] काठवटे,१९१५ ,सर्ग ६ श्लोक २२

[८०] काठवटे,१९१५ , सर्ग ६ श्लोक २२

हरिषेणाच्या **बृहद्कथाकोश**[८१] यात आलेल्या कथेत कोल्लादगिरिपट्टण (दक्षिणपथ) उल्लेख आला आहे. कदाचित हे स्थान म्हणजेच कोल्हापुर असावे.

हेमाद्रीने आपल्या **चतुर्वर्गचिंतामणि**[८२] ह्या ग्रंथातील व्रतखंड भागात महालक्ष्मीचे ध्यान वर्णिले आहे. हेमाद्रीचा काळ शक ११८२ ते १२३१ (इ.स.१२६० ते१३००) असा आहे.

ह्यातील वर्णनानुसार

क्षेत्रे कोलापुरादन्ये महालक्ष्मीर्य्यदोच्यते।

लक्ष्मीवत् सा तदा कार्य्या रुपाभरणभूषिता।।

दक्षिणाधःकरे पात्रमूर्ध्वे कौमोदकी ततः।

वामोर्ध्वे खेटकं धत्ते श्रीफलन्तदधःकरे।।

बिभ्रती मस्तके लिङ्ग पूजनीया विभूतये।

(व्रतखंड अध्याय १)

विश्वकर्मशास्त्र[८३] या ग्रंथात आलेले कोल्हापुरच्या महालक्ष्मीचे वर्णन थोड्याफार फरकाने हेमाद्रीने दिल्यासारखेच आहे.

कोलापुरं विनान्यत्र महालक्ष्मीर्यदोच्यते

लक्ष्मीवत्सा सदा कार्या रूपाभरणभूषिता

दक्षिणाधःकरे पात्रमूर्ध्वे कौमोदकी ततः

वामोर्ध्वे खेटकं धत्ते श्रीफलं तदधः करे

---

[८१] उपाध्याय.१९४३

[८२] शिरोमणि,१९८५ ,पृ.७८-७९

[८३] खरे.१९५८ ,पृ.५५

बिभ्रती मस्तके लिंगं पूजनीया विभूतये

या दोन्ही श्लोकातील महालक्ष्मीच्या हातातील आयुधक्रमांचे सविस्तर विवेचन महालक्ष्मी मूर्तिप्रकरणात देत आहे. हा संदर्भ इथे देण्याचा उद्देश इतकाच की हेमाद्रीच्या काळात महालक्ष्मी कोल्हापुरात अस्तित्वात होती.

महानुभाव संप्रदायाच्या **स्थानपोथी**[८४] या ग्रंथात महालक्ष्मीची २७ स्थाने सांगितली आहेत. राहाटगांव, कडेठाण, आष्टा, वेळापूर, नाशिक, अडगाव, पुणतांबा, बीड, भिंगारी, पिंपळगाव, हवरळिए, बळेग्राम, विंझुगा, जोगेश्वरी, डोंबेग्राम, सरलिया, मीरीगाव, गळनिंबा, भोंकरी, हींगोणी, देवगाव, बादठाणी, रांजणगाव व भाटापुरी या सर्व ठिकाणी महालक्ष्मीची देवालये होती

महानुभाव संप्रदायाचे प्रवर्तक श्री चक्रधरस्वामी (प्रयाण शके ११९६ इ.स.१२७४)यांनी कोल्हापुर व मातापुर(माहूर)या दोन देवीस्थानांचा उल्लेख निषिद्धस्थाने म्हणून केला आहे डॉ.वि.भि.कोलते यांच्यामते **लीळाचरित्र**[८५] हा ग्रंथ मूळ स्वरूपात शके १२०८ (इ.स.१२८६)पूर्वी म्हणजे ज्ञानेश्वरीच्याही आधी ४ वर्षे लिहिला गेला असावा.

लीळाचरित्रात आलेले वर्णन

आपणांते कव्हणीं नेणे: आपण कव्हणाते नेणिजे:

ऐसेया स्थानीं असावे: कानडा देशा तेलंग देशा न वचावे:

ते विषयबहाळ देश: तेथ अवधूत मान्य:

महाराष्ट्री असावे: मातापुरा कोल्हापुरा न वचावे:

तीर्थे साभिमानिये स्थाने: साधकांसि विघ्न करीति:

देशांचा सेवटी झाडातळी जन्म क्षेपावे: (लीळाचरित्र उत्तरार्ध लीळा ६०७[८६])

[८४] कोलते, १९८२
[८५] कोलते, १९८२ , पृ.४
[८६] तुळपुळे, १९६६

कोल्हापुर हे स्थान भुक्ती व मुक्ती देणारे स्थान आहे.तिथे आपल्या इच्छांची पूर्ती होते.इच्छा या पुन: पुन: निर्माण होतात म्हणून महानुभावपंथीयांसाठी हे स्थान वर्ज्य केले आहे.इ.स.च्या १३ व्या शतकात **देवीपुराण,कालिकापुराण,देवीभागवत** यासारखी शाक्तपुराणे लिहिल्या गेली.

देवीपुराणातील वर्णनानुसार विंध्य आणि मलय भागात देवी ही मंगला नावाने पूजिल्या जाते. हिमालयाच्या दक्षिणेस ती नंदा रूपात, किष्किंध पर्वतावर भैरवी,कुरुक्षेत्रात जयंती,कुशस्थलीत रुद्राणी,जालंधरात भद्रकाली,कोला येथे महालक्ष्मी(हे स्थान कदाचित कोल्हापुर येथील महालक्ष्मीचे असावे), सह्याद्रीत कालरात्रि,गंधमादन पर्वतावर अंबिका,उज्जयिनी येथे उज्जानी,जंबुमार्ग येथे महाकाली,विदेहात भद्रकालिका,मुंडीपीठात खंडमुंडा,मलयाद्रीत अघोरा,लंकाद्रीत कालिका,शाकद्विपात विजया,कुशद्वीपात चामुंडा, क्रौंच पर्वतावर योगिनी,शामलद्वीपात वीरांगना,मंदार पर्वतावर धूमिता अणि पुष्करात नारायणी या स्वरूपात पूजिली जाते[८७](देवीपुराण अध्याय ३८-३९;अध्याय३९.१-५;१६-२१)

. जिनप्रभसूरि नावाच्या जैन ग्रंथकाराने संवत् १३६४-१३८९ (इ.स.१३०७-१३३२) च्या दरम्यान रचलेल्या **विविधतीर्थकल्प**[८८] या ग्रंथात कोल्हापुरच्या महालक्ष्मीचा निर्देश करणारी कथा आली आहे.

याच प्रकारची कथा राजशेखरसूरि याने संवत् १४०५(इ.स.१३४८) मध्ये रचलेल्या **प्रबंधकोश**[८९] या ग्रंथात आली आहे.

मेवाडच्या राणा कुंभाचा आश्रित सूत्रभृन्मंडन किंवा सूत्रधारमंडन याने शक १३७२ (इ.स.१४५०) च्या सुमारास **रूपावतार** व **रूपमंडन** या नांवाचे ग्रंथ लिहिले आहेत.त्यात त्याने कोल्हापुरच्या महालक्ष्मीचे वर्णन केले आहे.

रूपावतार ग्रंथात आलेले वर्णन

क्षेत्रे कोल्लापुरादन्ये महालक्ष्मीर्यदार्च्यते।

---

[८७] भट्टाचार्य,१९७४ ,पृ.१३२

[८८] खरे,१९५८,पृ.३२

[८९] खरे,१९५८ , पृ.५५

लक्ष्मीवत्सा सदा कार्या सर्वा भरणभूषिता।।

दक्षिणाध:करे पात्रमूर्ध्वे कौमोदकी भवेत्।

वामोर्ध्वे खेटकं धत्ते श्रीफलं तदध:करे[१०]।।

रूपमंडन[११]या ग्रंथात आलेले वर्णन

क्षेत्रे कोल्लापुरादैत्ये (परादन्ये) महालक्ष्मीर्यदाऽर्च्यते

लक्ष्मीवत् सा तदाकार्या रूपाभरणभूषिता ।।५९।।

दक्षिणाध:करे पात्रमूर्ध्वे कौमोदकी भवेत्

वामोर्ध्वे खेटकं धत्ते श्रीफलं तदध :करे ।।६०।।

(अध्याय ५,५९-६०)

हेमाद्रीच्या **चतुर्वर्गचिंतामणि**[१२] व **विश्वकर्मशास्त्रा**मध्ये आलेले महालक्ष्मीचे वर्णन साधारणत : यासारखेच आहे.

इ.स.च्या १४व्या १५ व्या शतकात लिहिल्या गेलेल्या **आनंदरामायण**[१३] या ग्रंथातील यात्राकांडात भारतातील चारही दिशांतील पवित्र स्थानांचा उल्लेख आलेला आहे. या यात्राकांडातील सातव्या सर्गात दक्षिण भारतातील पवित्र क्षेत्रांचा उल्लेख आलेला आहे. यात करवीरचा उल्लेख अशा प्रकारे आलेला आहे.

धौमं महाबलं नत्वा ययौ कोलापुरं तत :

करवीरपुरं गत्वा, कृष्णावेण्योस्तु संगमे[१४]

---

[१०]खरे,१९५८ , पृ.५५

[११]श्रीवास्तव,१९९६

[१२] शिरोमणि,१९८५;

[१३]गोवर्धनदास लक्ष्मीदास ,१८४७

[१४]पूर्वोक्त, सर्गांक ७,पत्रांक१५-१६

(दक्षिणतीर्थयात्रावर्णनम् सर्गांक७,पत्रांक१५-१६)

या **आनंदरामायणा**चा कर्ता बागलानातील रामानुजीय रामानंदी परंपरेतील एखादा संस्कृत पंडित असावा असे श्री रा.चि.ढेरे यांचे म्हणणे आहे[१५]

शक्तिसंगमतंत्र[१६] या ग्रंथातील क्रमांक ३ पटल७ मध्ये भारतातील ५६ भागांची नावे आली आहेत.त्यात कोल्हापुरचे नाव आले आहे.

मार्जारतीर्थराजेन्द्रे कोलापुरनिवासिनी

तावद्देशो महाराष्ट्र: कर्णाटस्याभिगोचर:

१६ व्या शतकात तंत्राचार्य ब्रह्मानंद आणि पूर्णानंद यांनी लिहिलेल्या **ज्ञानार्णवतंत्र**[१७] या ग्रंथात आठ प्रमुख शक्तिपीठांची यादी दिली आहे.

याच ग्रंथात पुढे पटल १४मध्ये ५० शक्तिपीठांचा उल्लेख आलेला आहे.(पीठ कोल्लगिरिं प्रोक्तमेलापुरमत : परम्[१८] (पटल ५ श्लोक ६६-६८)

त्रिपुरारहस्य [१९]माहात्म्य यात १२ शक्तिपीठांचा उल्लेख आला आहे.

काञ्चीपुरे तु कामाक्षी मलये भ्रामरी तथा

केरले तु कुमारी सा अम्बाऽऽनर्तेषू संस्थिताऽऽ

करवीरे महालक्ष्मी : कालिका मालवेषु सा

प्रयागे ललिता देवीं विन्ध्ये विन्ध्यवासिनी

वङ्गेषु सुंदरी देवी नेपाले गुह्यकेश्वरी

---

[१५] ढेरे,२००९ , पृ.१५७-१५८

[१६] सरकार,इंडियन कल्चर, खंड ८,पृ.३८

[१७] सरकार,१९७३,पृ.१८

[१८] पूर्वोक्त

[१९] मुकुंदलाल शास्त्री,१९३२

बंगालच्या रॉयल एशियाटिकच्या ग्रंथालयात **अष्टादशपीठ** नामक पोथी (हस्तलिखित क्र.५९१३) शंकराचार्य याने लिहिलेली आहे. डॉ.**सरकार**[१००] यांच्यामते या पोथीचा कर्ता शंकराचार्य म्हणजे बंगालचा शंकर आगमाचार्य असावा.(इ.स.१६६१) ज्याने **तारकरहस्यवृत्तिका** या ग्रंथाची निर्मिती केली आहे.

या अष्टादशपीठांत १) लंकेची शंकरी २) आलापुरची युगुला ३) श्रीशैलची भ्रमरांबिका ४)कोल्हापुरची महालक्ष्मी ५) वाराणसीची विशालाक्षी आणि ६)काश्मीरची सरस्वती यांचा उल्लेख आहे[१०१].

१७ व्या शतकातील तंत्राचार्य कृष्णानंद आगमवागीश यांनी लिहिलेल्या **तंत्रसार** ग्रंथातील **पीठन्यास** भागात **ज्ञानार्णवतंत्र** (इ.स.चे १६वे शतक)[१०२] या ग्रंथात दिलेल्याच शक्तिपीठांचा उल्लेख केलेला आहे. यात मात्र ५० च्या ऐवजी ५१ शक्तिपीठांचा उल्लेख आहे.यात कोल्हापुरचा उल्लेख कौलगिरि असा केला आहे.

कामरूपंचं मलयं ततःकौलगिरि स्तथा ।

कुलान्तकं च चौहारं जालन्धरमतः परम् ।।

उड्डीयानं देवकूटपीठाष्टकमिदं क्रमात् ।।६८।। [१०३]

रामतोषण विद्यालंकार यांनी लिहिलेल्या **प्राणतोषिणीतंत्र** या ग्रंथातील (काळ इ.स.१६९०-१७२०[१०४]) **पीठनिर्णय** वा **महापीठनिरुपण** या भागात आलेल्या शक्तिपीठांची संख्या ५१ दिली आहे. शक्तिपीठांच्या नावांबरोबर देवी व तिच्या भैरवांचीही नांवे दिली आहेत.

करवीरे त्रिनेत्रं मे देवी महिषमर्दिनी ।

---

[१००] सरकार,१९७३ ,पृ.१८
[१०१] पूर्वोक्त,पृ .१८
[१०२] पूर्वोक्त .पृ.२०-२१
[१०३] पूर्वोक्त ,पृ.१८,२०-२१
[१०४]पूर्वोक्त ,पृ.१८,२४

क्रोधिशो भैरवस्तत्र सुगंधायाय नासिका ।।५।।[१०५]

तंत्रचूडामणि[१०६] या ग्रंथात

चण्डा च विपदे चैव छागालिङ्गं बलिप्रिया ।

मातृदर्शे जगन्माता करवीरपुरे सती ।।

असा उल्लेख आलेला आहे[१०७]

कोल्हापुर येथील जोशीराव घराण्यातील दाजिबा जोशीराव यांनी मूळ संस्कृत **करवीरमाहात्म्य** या ग्रंथाचे प्राकृतात भाषांतर केले. शहाजी राजे भोसले(इ.स.१८२१-१८३८)यांच्या कारकीर्दीत हा ग्रंथ पूर्ण केल्याचा उल्लेख त्यांनी ग्रंथाचे शेवटी केला आहे. या करवीरमाहात्म्यात ७२ अध्याय असून सुमारे पाच हजार श्लोक आहेत.

मूळ **करवीरमाहात्म्य**[१०८] या ग्रंथाचे संशोधित प्रकाशन तगारे यांनी केले. हा ग्रंथ संस्कृतमध्ये असून यात ७३ अध्याय आहेत. या ग्रंथाचा काळ तगारे यांनी इ.स.१३०० ते इ.स.१३५० असा सांगितला आहे.

या ग्रंथात वाराणसीक्षेत्रापेक्षा हे क्षेत्र कसे श्रेष्ठ आहे त्याबाबतच्या कथा, ऋषि अगस्ती यांचे लोपमुद्रेसह करवीरात आगमन, पाराशर ऋषींची कथा व त्यांचे ब्रह्मगिरीत वास्तव्य , नागांची करवीर यात्रा, त्र्यंबुली कथा, कोल्हासुर वध,कोल्हापुरच्या आसपासच्या तीर्थक्षेत्रांची निर्मितीची कथा व त्यांच्या क्षेत्र दर्शनाने होणारी फलप्राप्ती असे अनेक विषय व त्यांची वर्णने आली आहेत.

या ग्रंथात महालक्ष्मीस विष्णुपत्नी मानून या क्षेत्रास विष्णुक्षेत्र असे म्हटले असले, तरी याच ग्रंथात या क्षेत्रास शिवक्षेत्र, चौसष्ठ योगिनींचा वास असलेले क्षेत्र ,क्षेत्राच्या भोवताली चतुर्लिंगे,

[१०५] पूर्वोक्त ,पृ .४४
[१०६] कल्याण तीर्थांक ,१९५७ ,पृ.५१५-१६
[१०७] सरकार.१९७३ ,पृ .३०
[१०८] तगारे,१९८०

अष्टलिंगे, नवदुर्गा यांचे वास्तव्य या विषयाचा उल्लेख आला आहे. त्यामुळे शिवक्षेत्रानंतर विष्णुक्षेत्रात होत असलेले रूपांतर आपणास या ग्रंथात आढळून येते.

करवीरमाहात्म्य या संस्कृत ग्रंथाचे प्राकृतात ओवीबद्ध रूपांतर दाजीबा जोशीराव यांनी केले आहे. या दाजीबा जोशीराव यांचा कार्यकाल इ.स.१८०० ते इ.स.१८६५ असा आहे.

महालक्ष्मीने धारण केलेल्या आयुधांचे फार सुंदर वर्णन या ग्रंथातील १ल्या अध्यायात आले आहे.

यत्रास्ते दिव्यलक्ष्मीर्विविधगुणवती बिभ्रतीपानपात्रं सव्ये ज्ञानसुधायुतं गदहरं मातुलिङ्ग करेऽन्ये ।
भक्तान् संवदती वरे शिसुवरा: संसारतप्ताश्चिरं पानं कुर्वन्तु चेदं कटु यदि भवेत्तर्हि दास्ये फलंव:।।
यत्रास्ते सर्वमाता भुवनभयहरा व्यक्तखेटादिभूषा पापं संप्रहिणोति या भुवि नृणां संदर्शनात्पापिनाम्
यत्राधिश्मश्रु पीडा न हि भवति तथा कालभर्तुश्च पीडा तत्सेव्यं करवीरकं पुरवरं क्षेत्रं महन्मातृकम् ।.३२।।

(अ.१ श्लोक३२)[१०९]

जी ज्ञानायुक्त पानपात्र। वामहस्तीं घेवोनी पवित्र।। मातुलिंग रोगहर विचित्र । सव्य करी घेवुनी।।४८।।

महालक्ष्मी जेथे राहून।वाटे भक्तांसि बोले वचनकीं बाळ हो भवतापें करून।तुम्हीं तापला यास्तव ।।४९।।

या पानपात्रातील सेवारस्तो तुम्हां कडू लागल्यास।हे गोड मातुलिंग खावयास।तुम्हालागी देयीन ।।५०।।

खेटक गदा आयुधे दोन।जी घे स्वहस्ते करून ।।जींचे घेता दर्शन । सर्व पापे नासती ।।५१।।

ऐसी लक्ष्मी जेथे वसे। तेथे आधिव्याधि पीडा नसे ।। ज्याते महामातृक ऐसे । दुसरे नाम असे पै।।५२।।

(अ. १ श्लोक ४८-५२)[११०]

---

[१०९] तगारे, १९८०, पृ.२

[११०] जोशीराव, २०००

महालक्ष्मीच्या हातांतील आयुधांचे वर्णन करून ते भक्तांसाठी किती फलप्रद आहे ते सांगून या स्थानास महामातृक स्थान म्हटले आहे.

या ग्रंथातील २ऱ्या अध्यायात या पवित्र क्षेत्राचे वर्णन करताना म्हटले आहे-

करवीरे जलं शंभुः पाषाणस्तु जनार्दनः।सिकता मुनयः सर्वे तरवः सर्वदेवताः।।२१।। (अ २श्लोक २१)[111]

जेथे जळरूप असे हर ।। पाषाणरूपे गदाधर ।।

वालुकारूपे मुनिनिकर । वृक्षरूपे देव असती ।।२४।। (अ.२ श्लोक २४)

हे स्थान विष्णूचे स्थान असल्याचा उल्लेख दुसऱ्या अध्यायात आला आहे.

आद्यं तु वैष्णवं क्षेत्रं शक्त्यागमसमन्वितम् ।

भुक्तिमुक्तिप्रदं नृणां वाराणस्या यवाधिकम् ।। २५ ।। (अ.२ श्लोक२५)[112]

जे आधीच विष्णूचे स्थान । नंतर जेथें श्रीचे आगमन ।।

भुक्तीमुक्तीही देते म्हणोन । काशीहून यवाधिक ।।२९।। (अ. २ श्लोक २९)[113]

भुक्ती आणि मुक्ती ही दोन्ही देणारे हे क्षेत्र असल्यामुळे हे क्षेत्र काशीपेक्षा श्रेष्ठ आहे. (काशी क्षेत्रात फक्त मुक्ती मिळते परंतू हे महामातृक स्थान असल्यामुळे येथे मुक्तीबरोबर भक्तांच्या मनातील कामना देखील पूर्ण होते.) याबाबतचा उल्लेख ३ऱ्या अध्यायात आला आहे.

वाराणस्याः सकाशाद्वै करवीरपुरं महत् । मुक्तिमात्रप्रदा या वै भुक्तिमुक्तिप्रदं महत् ।।४७।।

(अ . ३ श्लोक ४७)[114]

---

[111] तगारे, १९८०;पृ.५
[112] तगारे,१८८० ,पृ.५
[113] जोशीराव, २०००
[114] तगारे,१८८० ,पृ.९

8282

मुक्ती मात्र देते काशीपुर । भुक्तीमुक्ती देते करवीर ।

म्हणोनि काशीहून थोर । आहे करवीर नारदा ।।४५।।(अ. ३ श्लोक ४५)[११५]

भुक्ती आणि मुक्ती देणाऱ्या स्थानांचा उल्लेख या ग्रंथातील ३ऱ्या अध्यायात आला आहे.

मुक्तिमात्रप्रदा ह्येताः पुर्यस्ताः श्रृणु नारद । अयोद्धा मथुरा माया काशी कांची अवन्तिका ।

पुरी द्वारावती चैव सप्तैता मोक्षमात्रदाः ।।४८।। (अ.३ श्लोक ४९)[११६]

अयोध्या मथुरा अवंती । काशी कांची द्वारावती ।।

ती माया जिला हरिद्वार म्हणती । या सर्व देती मुक्ती मात्र ।।४७।।

श्रीशैल विरूपाक्ष करवीर । श्रीरंग पांडुरंगकपुर ।।

आणि सेतुबंध रामेश्वर। या सहा भुक्तिमुक्तिंद जाण ।।४८।।(अ . ३ श्लोक ४८)[११७]

महालक्ष्मीच्या सेवेत चौसष्ठ योगिनी असल्याचा उल्लेख ६ व्या अध्यायात आला आहे.

योगिन्यश्चापि तत्काले चामरैर्व्यजनैर्युताः । चतुःषष्टिसमायुक्ताः प्रत्येकमुदयस्वनैः ।

त्रिकाले हि सुसेवन्ते सावधानाःपृथक पृथक ।।९२।।[११८]

तें चौसष्ठ योगिनी । चौऱ्या विंझणे हाती घेवूनी ।।

उदय उदय ऐसे वदोनी । त्रिकाळ श्रीतें सेवेती ।।८७।। (अ.६ श्लोक ८७)

या ग्रंथातील २ऱ्या अध्यायात महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वती या तीनही देवतांचा उल्लेख आलेला आहे. या तीनही देवतांचे हे स्थान आहे.

---

[११५] जोशीराव, २०००

[११६] तगारे,१९८० ,पृ.१०

[११७] जोशीराव, २०००

[११८] तगारे,१९८० ,पृ.२१

महाकालीस्वरूपेण वसत्यत्र महेश्वरः । महासरस्वतीरूपो ब्रह्मा यत्र सुसंस्थितः ।

साक्षाल्लक्ष्मीस्वरूपेण विष्णुस्तत्रैव संस्थितः । त्रयस्त्रिंशत्कोटिदेवाःसर्वेऽप्यत्र समन्ततः ।

आगत्य संस्थिता नित्यं करवीरपुरे वरे ।।४७।।[119]

महाकालीरूपे शिव। सरस्वतीरूपे ब्रह्मदेव ।।

लक्ष्मीरूपे माधव । राहे येथे मार्कंडेया ।।५२।।

तेत्तीस कोटी देवांची पंक्ती । जेथे येवोनि करी स्थित ।।

ब्रह्मा, विष्णू व शिव हे तिघेही देवतारूपाने या स्थानात राहतात. हे स्थान शिवाचे स्थान असल्याचा उल्लेख दुसऱ्या अध्यायात आला आहे.

शिवालयं देवगणालयं च माहेश्वरं योगनिरालयं च। एवं विधित्वा विधिवन्महान्न संत्यजेत्कोलगिरिं कदाचित् ।।७८।। (अ ३ श्लोक ७८)[120]

हे देवगणांचे स्थान । शिवाचेही होय भवन।।

योगिनींचेही पत्तन । महालक्ष्मीही तेथे वसे ।।८६।।

महालक्ष्मीच्या मूर्तीचे वर्णन १५ व्या अध्यायात आले आहे.

मातुलिङ्ग गदां खेटं पानपात्रं च बिभ्रतीम् ।

नागं लिङ्गं च योनिं च बिभ्रती मस्तके शुभे।।१८।। (अ.१५ श्लोक १८)[121]

महालक्ष्मीने हातात महाळुंग,गदा, खेटक व पानपात्र धारण केले आहे.तिच्या मस्तकावर नाग , लिंग व योनि आहे.

---

[119] तगारे,१९८० ,पृ.६

[120] तगारे,१८८०;पृ.७

[121] तगारे,१८८० ,पृ..५३

राजा गंड याचा उल्लेख **करवीरमाहात्म्या**च्या २१ व्या अध्यायात आलेला आहे.

आसीद्राजा गण्डनामा सूर्यभक्तपरायण:। चक्रवर्ती महाशान्त: सत्यवाग्विजितेन्द्रिय: ।।३०।।

(अ.२१ श्लोक३०)[१२२]

हे महाश्चर्य पाहून । तेथेचिं राहती सर्व जन

तेव्हा राजा गंड म्हणोन । करवीरी राज्य करीत होता ।।२३।।

तेणे केली सूर्याची भक्ती। सत्यवादी महामती।।

जितेंद्रिय चक्रवर्ती । पूर्वी सूर्यकुंडी करे तप ।।२४।। (अ. २१ श्लोक २३-२४)[१२३]

करवीरमाहात्म्यातील ३७ व्या अध्यायात ६४ योगिनींचा उल्लेख आलेला आहे.

दिव्ययोगी महायोगी सिद्धयोगी नरेश्वरी।

प्रेताशी शाकिनी चैव कालरात्रिर्निशाचरी ।।३२।।

टङ्काली रूद्रवेताली हुङ्कारी भुवनेश्वरी ।

उर्ध्वकेशी विशालाक्षी शुष्काङ्गी रक्तभोजनी ।।३३।।

बह्वाकारी वीरभद्रा धूम्राक्षी कलहप्रिया ।।

राक्षसी घोररक्ताक्षी विश्वरूपी भयङ्करी ।।३४।।

वीरकौमारी चामुण्डी वाराही मदनवारुणी ।।

भासुरी रौद्रवेताली भीषणी त्रिपुरांतकी ।।३५।।

भारवी ध्वन्विनी क्रोधी दुर्मुखी प्रेतवाहिनी ।।

कालाग्नी ग्रहणी चक्री कङ्काली भुवनाऽधिपा।।३६।।

कण्टकी ताटकी मानी यमदूती करालिनी ।।

---

[१२२] तगारे ,१८८० ,पृ.७४

[१२३] जोशीराव, २०००

असिनी मूर्धनी यक्षी रोमजङ्घाऽपहारिणी ।।३७।।

लक्ष्मीश्च कार्मुकी लोला कालदृष्टीरधोमुखी ।।

धूम्राक्षी विमला घोरा कपाली विषमाऽग्निनी ।।३८।.

चतु:षष्टिस्तु योगिन्यो यूयं वै मत्परिग्रहे ।।

भवन्तु मद्वरेणार्या: शुभाशुभफलप्रदा: ।।३९।।

(अध्याय ३७ श्लोक ३२-३९)[१२४]

या ग्रंथात आलेली ६४ योगिनींची नावे शारदीय नवरात्र पूजाविधी या पोथीपेक्षा भिन्न आहेत.

कोल्हापुर हे स्थान सात कल्पात वेगवेगळ्या नावांनी प्रख्यात होते. या सातही नावांचा उल्लेख या ग्रंथाच्या ५८ व्या अध्यायात आला आहे.

पूर्वं कामालयं नाम पश्चात् पद्मगिरिस्तथा । शिवालयं तत: पश्चाद् ब्रह्मालयमथाभवत् ।

पुनर्यक्षगिरिश्चासीद्राक्षसानामत: परम् ।।६२।।

सप्तमे तु पुन: कल्पे नाम्ना कोलगिरिस्तथा ।

नास्ति तत्तीर्थराजस्य समं तीर्थमिह क्वचित् ।।६३।। (अ.५८,श्लोक ६२-६३)[१२५]

सिद्ध चारणही ज्यांत वसती । सात कल्पे असे ज्याची स्थिती ।।

भिन्न भिन्न नांवेही ज्यातें असती। प्रथम कल्पीं कामालय हे नाम ।।४४।।

द्वितीय कल्पीं पद्मगिरी म्हणतीं । तृतीय कल्पीं शिवालय वदती ।।

चतुर्थ कल्पीं ब्रह्मालय म्हणती । पंचम कल्पीं यक्षगिरी ।।४५।।

षष्ठ कल्पी राक्षसस्थान । सप्तम कल्पी कोलगिरि हे नाम जाण ।।

---

[१२४]तगारे,१९८० ,पृ.१६०

[१२५]तगारे,१८८० ,पृ.२४७

यास्तव कोलगिरि समान । तीर्थ कोठेही नसे धर्म ।।४६।।

(अ . ५८ श्लोक ४४-४६)[१२६]

वरील सर्व वर्णनांवरून **करवीरमाहात्म्या**चा काळ म्हणजे महालक्ष्मीचे शक्तिरूपातून विष्णुभार्या होण्याचा प्रवास असलेला दिसून येतो. विष्णुचे क्षेत्र असल्याचा उल्लेख या ग्रंथातील १५ व्या अध्यायात पाराशर मुनींनी पुत्रप्राप्तीसाठी हरीचे स्तवन केले त्यावेळी त्यांना लक्ष्मी दिसू लागली. त्यांनी तीस विष्णुचे रूप दाखविण्यास सांगितले. त्याप्रमाणे लक्ष्मीने त्यांस विष्णुचे रूप दाखविले.हे विष्णुचे स्थान असले तरी कात्यायनी, नवदुर्गा, चौसष्ठ योगिनी व भैरवांसह नांदणारी महालक्ष्मी ही आदिमायारूपात या क्षेत्री वास करीत आहे.

या माहात्म्यातील वर्णनाप्रमाणे पूर्वीच्या शिवक्षेत्रातील सिंहवाहिनी देवी विष्णुभार्या म्हणून घडत गेली व आज ती पूर्णपणे विष्णुपत्नी रूपात दिसू लागली आहे.

या ग्रंथात तीनही देवता महाकाली,महालक्ष्मी व महासरस्वती यांचा उल्लेख आलेला आहे. राजा श्रृंगणाच्या तीर्थाटनाचा उल्लेख या ग्रंथाच्या ५४ व्या अध्यायात आला आहे.

विघ्नेशं पूजयित्वाथ सर्वाभिष्टप्रदायकम् । महाकालीं पूजयित्वा सरस्वतीमथायजत् ।।४०।।

(अ.५४,श्लोक ३९-४०)[१२७]

पुन: तीर्थयात्रा करून । तीर्थे आणि लिंग पूजून ।।

गयाकृत्यही करून। विघ्नेशाचे पूजन करी ।।२५।।

महाकाळी सरस्वतीस पुजून । काळवेताळातेही पुजुन।।

मग महालक्ष्मीस नमून । यथाविधी पूजिती ।।२६।। (अ ५४ श्लोक २५-२६)[१२८]

---

[१२६] जोशीराव, २०००

[१२७] तगारे,१८८०;पृ.२३२

[१२८] जोशीराव, २०००

करवीरमाहात्म्याचा काळ जर इ.स.१३०० ते इ.स. १३५० गृहित धरला तर मग या काळात या तीनही देवता तिथे अस्तित्वात होत्या,त्यांची देवालये होती हे आपणास मानावे लागेल.

लक्ष्मीविजय[१२१] या ग्रंथाचा कर्ता हरि गोपाळ अंगापुरकर इ.स. च्या १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेला. या ग्रंथकाराने देवी सप्तशती ,**पद्मपुराण** व **करवीरमाहात्म्य** (**करवीरमाहात्म्य पद्मपुराणां**तर्गत आहे असे जरी **करवीरमाहात्म्य** ह्या ग्रंथात म्हणले असले तरी आज उपलब्ध असलेल्या **पद्मपुराणा**त याचा समावेश नाही) या ग्रंथांचा आधार घेऊन **लक्ष्मीविजय** या ग्रंथाची निर्मिती केली. करवीरनिवासिनी महालक्ष्मीच्या अवतारकथा व वीरकथांचे वर्नन या ग्रंथात आहे. कोल्हापुरचे राजे शिवाजी तृतीय (इ.स.१८३८ ते इ.स.१८६६)यांच्या काळात हा ग्रंथ अंगापुरकरांनी लिहिला. आर्थिकदृष्टीने गरिबीत दिवस काढणाऱ्या या ग्रंथकाराला मदत म्हणून छत्रपती यांनी घुणकी गावातील उत्तम जमीन वंशपरंपरेने उपभोगण्यास दिली. **लक्ष्मीविजय** हा ग्रंथ कवीने करवीर क्षेत्री महालक्ष्मी मंदिरात चैत्र शुद्ध पौर्णिमा शके १७०७ (इ.स. १७८५)या दिवशी पूर्ण केला.

महालक्ष्मी रूपाचे वर्णन १ ल्या अध्यायात असे आले आहे.

महालक्ष्मी महासरस्वती । महाकाळी या त्रिमूर्ती ।।
निवृत्ती प्रवृत्ती प्रकृती । त्रिगुणात्मक या अवतरल्या ।।१०१।।
सत्व रज तम आगमनिगमांनी । चित्स्वरूत्रंग सुरंगी ।।
महामाया ते तत्वंगी । त्रिभुवनजगी ब्रह्मरूपे ।।१०२।।

(अ.१ श्लोक १०१-१०२)

महालक्ष्मी मूर्तीचे वर्णन ४ थ्या अध्यायात असे आले आहे.

मातुलिंग गदा खेटक करी । शोभे सुधापानादि अमृतलहरी ।।
भुजंगमलिंग कबरी भारी । त्रिवेणी झळके मस्तकी ।।६९।। (अ.४ श्लोक ६९)

---

[१२१] कुलकर्णी, १९८३

कोल्हापुरातील महालक्ष्मी मंदिरात उत्तरायण व दक्षिणायनाच्या वेळी होणाऱ्या किरणोत्सवाचे वर्णन या ग्रंथातील१५ व्या अध्यायात आले आहे. अशाप्रकारचे वर्णन **करवीरमाहात्म्य** व **केदारविजय** [१३०]या दोनही ग्रंथात आढळत नाही.

दक्षिणायनी उत्तरायणी । रविप्रकाश पडतसे कमलनयनी ।।

हे साक्षी अद्यापी महाजनी । अद्यापि नयनी लक्षती ।।१।।

महालक्ष्मीच्या शक्तिरूपातील वर्णन करताना१६ व्या अध्यायात ग्रंथकार म्हणतो

कात्यायनी छप्पन्न कोटी । नवदुर्गा चामुंडादि नवकोटी ।।

अष्टदश पद्मी भैरव थाटी । नवनाथ वेष्टित त्रैलोक्यनाथ ।।१६।।

ऐशा महामातृकांच्या मेळी । कमला बैसली लावण्यपुतळी ।।

जेवी बीजाक्षरांच्या ओळी । शोभती घनसावळी सुकुमारी ।।१७।। (अ. १६ श्लोक१६-१७)

कूष्मांडभेदनाच्या वेळी त्र्यंबुली रुसून दूर जाऊन पर्वतावर बसली. तिचा रुसवा दूर करण्यास महालक्ष्मी गेली असता तिने त्र्यंबुलीस आपण आपले सुंदर मंदिर निर्माण केल्याचे सांगितले.त्याचे वर्णन १६ व्या अध्यायात आले आहे.

रत्नखचित श्रीयंत्राकार । तुजसाठी निर्मिले निजमंदिर ।।

मंडप विस्तीर्ण अतिसुंदर । नवग्रह यंत्राकार तुजलागीं ।।३५।।

(अ.१६ श्लोक ३५)

या ओवीतून महालक्ष्मीच्या मंदिराचे वर्णन आले आहे.

केदारविजय हा ग्रंथ गोपाळ हरि अंगापुरकर यांनी शके १७१४ साली मराठीत लिहिला. हा ग्रंथ रत्नागिरीचा (जोतिबाचा डोंगर,रत्नागिरिवाडी) जोतिबा याचे माहात्म्य सांगणारा ग्रंथ आहे.

---

[१३०] अंगापुरकर,

या ग्रंथात अध्याय २१ मध्ये महालक्ष्मीचा उल्लेख

हे जाणोनि वैष्णवी माया ।धरिती जाहली सत्व रज तमी काया ।।

ब्राह्मी रौद्री वैष्णवीया । योनि मस्तकी लिंगांकित ।।२६ ।। (अ. २१ श्लोक २६)

हा ग्रंथ पूर्णपणे जोतिबास अर्पित असल्यामुळे करवीरनिवासिनी अंबाभवानी, षड्रिपूंचे स्तोम माजणार हे समजल्यावर, करवीरक्षेत्र सोडून बद्रिकेदारास निघून गेली व नंतर रवळनाथाबरोबर कोल्हासुराचा वध करण्यास परत आली.कोल्हासुराचा वध झाल्यानंतर रवळनाथाने तिची पुन: करवीरी स्थापना केली व तिच्या आग्रहाखातर तो स्वत: रत्नागिरीवाडी डोंगरावर जोतिबा म्हणून राहिला.

शक्तिपीठ निर्मिती :

आज संपूर्ण भारतात निरनिराळ्या शक्तिपीठांतून शक्तिदेवतांची पूजा होत आहे. मार्कंडेयपुराणाच्या निर्मितीपासून (इ.स.४थे ते ७वे शतक)[131]देवी उपासनेला प्राधान्य दिलेले दिसून येते.

या शक्तिपीठांच्या अस्तित्वाचे मूळ दक्षयज्ञात सापडते. दक्षयज्ञाचा सर्वात पहिला उल्लेख ऋग्वेदात सापडतो. (**ऋग्वेद संहिता १०:६१:५-७**)[132]**परंतु** यात दक्षाचा उल्लेख प्रजापति व सतीचा उषा ह्या अर्थाने आला आहे.यात मात्र शक्तिपीठांचा उल्लेख नाही. परंतू नंतरच्या काळात मात्र या कथेत भर पडून सतीच्या पडलेल्या अवयवांठिकाणी शक्तिपीठांची स्थापना झालेली दिसून येते. **शतपथ ब्राह्मण** (माध्यंदिन शाखा १:४ १-८) आणि **ऐतरेयब्राह्मणात** (३. ३३-३४)प्रजापतीच्या आपल्या स्वत:च्या मुलीवर बलात्कार करण्याच्या प्रयत्नात रूद्राने त्यास बाणाने मारल्याचा उल्लेख आहे.

[131]काणे,खंड५ ,पृ.९०३

[132]सातवळेकर, १९९७

डॉ. सरकार यांच्यामते "the same legend later (sometime before the rise of the Guptas in 4th c.A.D.developed into the wellknown story of the destruction of the sacrifice of *Daksha Prajāpatī* by the god *Shiva* also called *Rudra")*[133]

महाभारताच्या संशोधित आवृत्तीत वनपर्वातील तीर्थयात्राभागात पंचनदजवळील भीमास्थानातील योनिकुंड,उद्यत पर्वतावरील व गौरीशंकर पर्वतावरील स्तनकुंड अशी नावें आली आहेत.

महाभारताच्या संशोधित आवृत्तीत नसली तरी आज उपलब्ध असलेल्या आवृत्तीत दक्षयज्ञाची कथा आली आहे. परंतु या कथेत पार्वती दक्षाची कन्या नाही. कालिदासाच्या **कुमारसंभवम्** ग्रंथात दक्षयज्ञाची कथा आली आहे.

शक्तिपीठांचा भैरवांशी संबंध असलेली कथा **देवीभागवतात** आली आहे ती या ग्रंथातील ३०व्या अध्यायात आलेली आहे. ज्या ज्याठिकाणी सतीचे अवयव पडले त्यात्याठिकाणी तिचा विरह न सहन होऊन भैरवदेखील स्थानापन्न झाले.

वरील सर्व पुराव्यांवरून हे लक्षात येते की

सिंधु संस्कृतीतील मातृदेवता पुढे शक्तिसंप्रदायाची अधिष्ठात्री देवता बनली. ऋग्वेदकाळात अदितीस सर्व देवतांची जननी म्हणून तिचा गौरव करण्यात आला.ऋग्वेदातील अदितीस सर्व देवतांची माता व तिच्यापासून सर्व सृष्टीची निर्मिती या कल्पनेत शक्तिसंप्रदायाचे मूळ दिसून येते.ऋग्वेदाच्या खिलसूक्तांतील श्रीसूक्तांत महालक्ष्मीचा उल्लेख(श्रीसूक्त २५-२६) पहिल्यांदा आलेला दिसतो. परंतु ही महालक्ष्मी विष्णुपत्नी आहे.उपनिषद व उत्तर वैदिककाळातही तीस दुय्यम स्थानच लाभले. उत्तर वैदिक काळात स्त्रीदेवतींचा धार्मिकविधीत वावर दिसतो,परंतू या देवतांचे स्थान गौण आहे. रामायण व महाभारतातील तिच्या दुर्गेच्या रूपात पूजनाचे श्लोक प्रक्षिप्त असले तरी तिला त्यात दुर्गेचे पूर्ण रूप आल्याचे दिसून येते.इ.स. ४थ्या शतकापासून पीठनिर्मितीची कल्पना पुढे येऊन आधी ४, नंतर ५१ व

[133]सरकार, १९७३ , पृ.५

पुढे १०८ शक्तिपीठांची निर्मिती झाली. **मार्कंडेयपुराण** मात्र देवीचे माहात्म्य वर्णन करणारा स्वतंत्र व महत्वाचा ग्रंथच आहे. या काळापासून मात्र देवीस अस्तित्व निर्माण होऊन शाक्त संप्रदायाची बैठक तयार झालेली दिसून येते.नंतरच्या पुराणांच्या काळात मात्र शाक्त संप्रदायाची पूर्णपणे वाढ झालेली दिसून येते.**देवीभागवत** (काळ ९००-१३५०) या ग्रंथात तर कोल्हापुरच्या महालक्ष्मीस अग्रस्थान प्राप्त झाले.

मत्स्यपुराण व **देवीभागवतातील** १०८ पीठांच्या यादीत कोल्हापुर स्थानाचे नाव करवीर असे आले आहे. **देवीभागवतात** मात्र आणखी एके ठिकाणी करवीरास कोलापुर म्हटल्याचे दिसते.

चतुर्वर्गचिन्तामणि, विश्वकर्मशास्त्र, रूपावतार व **रूपमंडन** या ग्रंथांतून महालक्ष्मीचे वर्णन आले आहे ते थोड्याफार फरकाने कोल्हापुरच्या आज असणाऱ्या महालक्ष्मीच्या मूर्तीच्या वर्णनाशी मिळतेजुळते आहे.

चक्रधरस्वामी यांच्या **लीळाचरित्रात** मात्र कोल्हापुरास भेट न देण्यास सांगितले आहे. कदाचित मुक्तिबरोबर भुक्तीही देणारे स्थान असल्यामुळे व भोगयभोगच्या विरोधामुळे या स्थानास निषिद्ध स्थान म्हटले आहे.

प्राणतोषिणीतंत्र (काळ इ.स.१६९०-१७२०), **तंत्रसार, तंत्रचूडामणि** या ग्रंथांतही कोल्हापुराचा उल्लेख करवीर असा आला आहे. **प्राणतोषिणीतंत्रातील** पीठनिर्णयात करवीरात महिषमर्दिनी व तिच्याबरोबर क्रोधीश भैरव असल्याचे सांगितले आहे. इ.स.१७ व्या शतकात देवीबरोबर त्या त्या ठिकाणी भैरवाच्या स्थापनेची संकल्पनाही रूढ झाल्याचे दिसून येते.

करवीरमाहात्म्य,लक्ष्मीविजय,केदारविजय,व्यंकटाचलमाहात्म्य (१४-१८ वे शतक) या स्थलमाहात्म्यांतून कोल्हापुरच्या महालक्ष्मीचे वर्णन आलेले दिसून येते. **करवीरमाहात्म्य** व **लक्ष्मीविजय** या ग्रंथांतून महालक्ष्मीचे शक्तिसंप्रदायातील देवतेकडून विष्णुपत्नीरूपात परिवर्तन होत असताना दिसून येते. **व्यंकटाचलमाहात्म्यात** तर तिला स्पष्टच विष्णुपत्नी म्हटले आहे.

निरनिराळ्या कवींनी रचलेल्या रचना

महालक्ष्मीच्या वर्णनाचा भाग आपणास निरनिराळ्या कवींनी रचलेल्या कविता ,पद,आरती यांमधून पहावयास मिळतो. अर्थात हे सर्व कवी १५ ते १९ व्या शतकातील असल्यामुळे ऐतिहासिक दृष्ट्या जरी जास्त महत्व देता आले नाही तरी त्यांच्या अभ्यासावरून या काळातील महालक्ष्मीचे पूर्णपणे विष्णुभार्येत परिवर्तन झालेले दिसून येते.

गौरांगप्रभू : बंगालमधील वैष्णव महासाधू चैतन्य किंवा गौरांगप्रभू याने इ.स.१५१०-१५१२ मध्ये दक्षिणेची यात्रा केली. त्याचे वर्णन कृष्णदास कविराज याने इ.स. १६१६-१६१७ च्या दरम्यान रचलेल्या **चैतन्यचरितामृत** ग्रंथात केले आहे.

कोलापुरे लक्ष्मीदेखि क्षीर भगवती ।

लांगा गणेश देखि चोरी भगवती ।।

वादिराजतीर्थ : उडपी येथील आठ माध्व पीठांपैकी सोदेमठाचे अधिपति वादिराजतीर्थ (इ.स. १४८०-१६००) आपल्या **तीर्थप्रबंध** या ग्रंथात महालक्ष्मीचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे.

अमान – वनज – स्थान – सरसीकुलसंकुले ।

रमा कोल्हापुरक्षेत्रे वसतीति किमद्भुतम् ।। (तीर्थप्रबंध ८४)

अपरिमित कमळांनी भरलेल्या अनेक सरोवरांची भूमी असलेल्या कोल्हापुर क्षेत्रात रमा वसती करून राहिली आहे(कमलालयातच कमला नांदते आहे)यात आश्चर्य ते कसले [१३४]

दुसऱ्या श्लोकात जे मानसी व्यथित आहेत,ज्ञानी आहेत व शांतचित्त आहेत त्यांच्यावर देवी आपली कृपाशक्ति वितरित करीत आहे. जी क्षीरसमुद्रात जन्म पावली आहे ती ब्रह्मादि देवगण यांची जननी आहे. जिच्या पदकमलांची आराधना तपस्वी करतात , नारायणाची प्रेयसी असलेली महालक्ष्मी

---

[१३४] ढेरे,२००९; पृ.१४०

सकलांना विपुल श्रेय देते. वादिराजतीर्थ हे वैष्णव मताचे होते. खरे यांच्यामते त्यामुळेच महालक्ष्मीस त्यांनी रमा म्हटले आहे[१३५]

नामया विष्णूदास : महालक्ष्मीची जुन्यात जुनी मराठी आरती नामया विष्णुदास याची आहे ढेरे[१३६] यांच्या मते याचा काळ इ.स. चे १५वे शतक आहे. अंबिकेचे रूप वर्णन करताना

अवतार कोलापुरि ,केली प्रताप थोर।

मारिले दैत्य विकट, अघट कोल्हासुर ।।[१३७]

असे म्हटले आहे.

कोल्हापुरातील महालक्ष्मीचे वर्णन ज्याप्रकारे आहे तसेच तिचे वर्णन केलेले दिसून येते.

नवकोटी कात्यायनी, चतु:शष्ठीयोगिनी ।

भूचरे जलचरे आई,तुजवाचुनी ।।

ऐसी तू महालक्ष्मी, जगत्राची जननी ।

नामया विष्णूदास, तुझे चिंतन ध्यानी ।।

नवकोटी कात्यायनी व चौसष्ठ योगिनी यांच्या परिवारासह राहणारी त्रिजगताची जननी म्हणून तिचा उल्लेख केला आहे.

शिवदिन केसरी : ज्ञानेश्वर परंपरेतील नाथसंप्रदायी शिवदिन केसरी (इ.स.१६९८-१७३५) यांनी महालक्ष्मीचे वर्णन करताना

हे जगदंबे, विश्वकदंबे, तू निरालंबे,तू शिवसांबे ।। मज अविलंबे , धाव पाव निर्वाणी ।।[१३८]

---

[१३५] खरे ,१९७५ , पृ . ३०

[१३६] ढेरे,२००९ , पृ.१३७.

[१३७] ढेरे.२००९ , पृ.१३८

[१३८] ढेरे , २००९ , पृ,१४७

शिव जिच्यामुळे सांब (अंबेसहित)झाला आहे असे महालक्ष्मीचे वर्णन केले आहे.

मुक्तेश्वर : संत एकनाथाचे नातू मुक्तेश्वर यांच्या बहुतांश रचनांचा काळ इ.स.१७ व्या शतकाचा पूर्वार्ध आहे[१३९] .यांनी लिहिलेल्या आदिपर्व ग्रंथातील उपसंहारात कोल्हापुरच्या महालक्ष्मीचे वर्णन करवीर लक्ष्मी विष्णुभाजा असे केले आहे. मुक्तेश्वराने जी कोल्हापुरच्या महालक्ष्मीची आरती लिहिली आहे. ती आजही तिच्या मंदिरात गायली जाते. या आरतीत त्यांनी महालक्ष्मीला भिन्न भिन्न परंपरेतील नामरूपे दिलेली आढळून येतात.

आरतीच्या ध्रुवपदातच महालक्ष्मीचे वर्णन वससी व्यापकरूपे तू स्थूलसूक्ष्मी असे केले आहे. सूक्ष्म अणुरेणूंच्या अंतर्यामी व स्थूल-स्थिर चिरविश्वास तू व्यापिले आहे असे वर्णन आहे.

महालक्ष्मीच्या रूपाचे वर्णन करताना मुक्तेश्वरांनी

मातुलिंग गदायुक्त खेटक रविकिरणी ।

झळके हाटकवाटी पियुष रसपाणी ।।१।।

माणिकरसना सुरंगवासना मृगनयनी ।

शशिधरवदना राजस मदनाची जननी ।।२।।

असे वर्णन केले आहे.

महालक्ष्मीच्या हातात महाळुंग,गदा,खेटक व अमृत रसाने भरलेली सोन्याची वाटी आहे. रविकिरणी या शब्दावरून हे वर्णन किरणोत्सवाच्या काळात महालक्ष्मी मूर्तिवर जेव्हा सूर्याची किरणे पडतात त्यावेळचे असावे. मूर्तिवर सूर्याचे किरण पडल्यावर तिच्या हातातील हे पात्र झळकत असते.

भिन्न परंपरेतील देवतांशी तिचे साम्य वर्णन करताना मुक्तेश्वरांनी

---

१३९ ढेरे,२००९:पृ .७०.

तारा सुगतागमी शिवभजकां गौरी । सांख्य म्हणति प्रकृति निर्गुण निर्धारी ।।

गायत्री निज बीजा निगमागम सारी । प्रगटे पद्मावती जिनधर्मचारी ।।

महालक्ष्मी ही बुद्धाच्या परंपरेतील तारा या नावाने ,शिवभक्तीच्या क्षेत्रात गौरी या नावाने, सांख्यांच्या विश्वात प्रकृती या नावाने ,वैदिकांची गायत्री तर जैनांच्या परंपरेतील पद्मावती या नावाने प्रिय झाली आहे. मूळ आरतीतील सुगतागमी व जिनधर्मचारी याऐवजी शक्तिअगम्या व निजधर्मचारी असा आरतीत फरक केलेला आढळतो.

मोरोपंत : पेशवेकालीन कवी मोरोपंत (इ.स. १७२९-१७९४) यांनी महालक्ष्मीचे स्तोत्र रचले आहे. महालक्ष्मीचे वर्णन आद्यशक्ति, जगताच्या उत्पत्ती, स्थिती व लयाचे कारण , मार्कंडेय मुनींनी सप्तशतीत सांगितलेले रहस्य तत्व तूचआहेस, भुक्ती व मुक्ती या उभय सुखाची तृप्ती करून देणारी आहेस अशा स्वरूपात वर्णन केले आहे.

नारायण महाराज : श्रीसिद्धेश्वर पंडितांचे सुपुत्र नारायण महाराज (इ.स.१७७४-१८१६)यांनी रचलेल्या महालक्ष्मीच्या दोन आरत्या आजही महालक्ष्मी मंदिरात काकड आरतीच्यावेळी व शेजारतीच्या वेळी म्हणण्याचा प्रघात आहे.

काकड आरती अंबे,तुजला ओवाळी।

उठोनिया सत्वर भक्त जनाते पाळी।

दाजिबा जोशीराव : संस्कृत **करवीरमाहात्म्य** या ग्रंथाचे प्राकृतात ओवीबद्ध करण्याचे कार्य दाजिबा जोशीराव यांनी केले आहे. यांनीच रचलेल्या **चेतोविनोदकाव्य** या ग्रंथात करवीर क्षेत्र व महालक्ष्मी यांचे वर्णन आहे. या ग्रंथाची निर्मिती इ.स.१८२४मध्ये झाली. या ग्रंथात आलेले महालक्ष्मीचे ध्यान अशा प्रकारचे आहे.

कोल्हासुरं या विनिहत्य कोल्हापुरेऽस्ति लिंगोरगयोनिशीर्षा।।

या मातुलिंगं सुगदां च खेटं सुपानपात्रंच बिर्भति हस्तैः।।[१४०]

जिने कोल्हासुराचा वध केल्यानंतर कोल्हापुरात निवास केला,जिच्या मस्तकावर योनिलिंग नागासह शोभते व जिने अनुक्रमे मातुलिंग,गदा,ढाल व पानपात्र आपल्या हाती धरले आहे त्या महालक्ष्मीस मी वंदन करतो.

दाजिबा जोशीराव व त्यांचे पुतणे चिंतामणी यांनी रचलेल्या श्रीगणपती पंचायतनाच्या आरती संग्रहात महालक्ष्मीच्या दोन आरत्या आहेत[१४१] यातील आरतीत महालक्ष्मीस सिंहविराजितगमने , विष्णुच्या उरात विराजमान झालेली (वीष्णूरःसदने), नागांयंकित मस्तक ,हर्यदला(विष्णुपत्नी)इ.नावांनी उल्लेखिले आहे. म्हणजे सिंहारूढ असून नाग ,सयोनिलिंग मस्तकावर असूनही ही विष्णुपत्नीच आहे.

अनंत किर्लोसकर : अनंत महाराज किर्लोसकर (जन्म १९०१) यांनी महालक्ष्मीच्या रूपात दत्तास बघून आरती केली आहे. त्यांनी महालक्ष्मीवर केलेल्या अनेक काव्यात तिला नारायणी, विष्णुशक्ति,पद्मांबा,हरिकांता या विष्णुरूप या नावांनी संबोधित आहे.

अशाच प्रकारे अनेक कवींनी आपली काव्यसुमने महालक्ष्मीवर उधळलेली आहेत.

या सर्व काव्यांत महालक्ष्मी जरी लिंगधारिणी,सिंहावर आरूढ असली तरी ती विष्णुपत्नी लक्ष्मीच असल्याचे वर्णन आहे.

गोंधळ्यांच्या प्रयोगात वापरल्या जाणाऱ्या प्रत्येक गीतांत माहूरची रेणुका, तुळजापुरची भवानी, सप्तश्रृंगी गडावरील जगदंबा यांच्याबरोबर कोल्हापुरच्या महालक्ष्मीचाही उल्लेख असतो. गोंधळ घालतांना या सर्व देवतांना आवाहन केले जाते.तंजावरच्या[१४२] गोंधळ्यांच्या आख्यानांत

---

[१४०] ढेरे,२००९: पृ.१०९

[१४१] ढेरे,२००९; पृ.१०२.

[१४२] ढेरे.२००९:पृ.१५१

महालक्ष्मीचे आख्यान श्रीकोल्हापुर-महालक्ष्मीचरित्र या नावाचे आहे. यात कोल्हासुरवधाची कथा ४६ ओव्या व ५पदांत वर्णन केली आहे.

कोलासुर म्हणे, जननिये।तुझे पाहिले चरणद्वय।शिरीं हात ठेवी सदये । दीना रक्षी गे मजलागी ।।४४।।

मारिला मायावी असुर । स्थला नांव ठेविले कोलापुर ।पूजा घेतसे निरंतर । भक्तजनांकडुनी ।।४५।।

वरील पुराव्यांवरून हे लक्षात येते की

महालक्ष्मीच्या वर्णनाचा भाग आपणास निरनिराळ्या कवींनी रचलेल्या कविता ,पद,आरती यांमधून पहावयास मिळतो. अर्थात हे सर्व कवी १५ ते १९ व्या शतकातील असल्यामुळे ऐतिहासिक दृष्ट्या जरी जास्त महत्व देता आले नाही तरी त्यांच्या अभ्यासावरून या काळातील महालक्ष्मीचे पूर्णपणे विष्णुभार्येत परिवर्तन झालेले दिसून येते.

मुक्तेश्वरांना मात्र ही देवी महालक्ष्मी ही बुद्धाच्या परंपरेतील तारा या नावाने ,शिवभक्तीच्या क्षेत्रात गौरी या नावाने, सांख्यांच्या विश्वात प्रकृती या नावाने ,वैदिकांची गायत्री तर जैनांच्या परंपरेतील पद्मावती अशी दिसली. शैवपंथीयांना ती शिवाच्या जवळ तर वैष्णवांना ती विष्णुपत्नी वाटली. गोंधळ्यांच्या गीतांत मात्र ती भवानी, रेणुका, जगदंबा याच स्वतंत्र रूपात आढळते.

महालक्ष्मी संबंधातील पौराणिक कथा व दंतकथा

कुठल्याही देवतेचे क्षेत्र म्हटले म्हणजे त्या क्षेत्राचे माहात्म्य वर्णन करणाऱ्या कथा आपणास पहावयास मिळतात. अधिष्ठात्री देवतेचे वास्तव्य ,तिने विविध राक्षसांबरोबर केलेली युद्धे व त्या क्षेत्रातील असलेल्या इतर अनेक तीर्थक्षेत्रांचे माहात्म्य वर्णन करणारे ग्रंथ निर्माण होतात. कोल्हापुरच्या महालक्ष्मी संबंधातही असेच घडले.जिनप्रभसूरि (काळ इ.स. १३०७-१३३२) याच्या **विविधतीर्थकल्प**[१४३] या ग्रंथात त्याचप्रमाणे राजशेखरसूरि याच्या **प्रबंधकोश** (इ.स.१३४८) या ग्रंथात कोल्हापुरच्या महालक्ष्मी संदर्भात कथा आलेली आहे.या दोन्ही ग्रंथात आलेल्या कथा महत्वपूर्ण आहेत कारण हे दोन्ही ग्रंथ जैन संप्रदायांचे आहेत.

कोल्हापुर क्षेत्र आणि त्याच्या भोवतालच्या तीर्थक्षेत्रांचे महिमा वर्णन करणारे दोन ग्रंथ आज उपलब्ध आहेत. **करवीरमाहात्म्य** नावाचा ग्रंथ इ.स.१३०० ते इ.स. १३५० या काळात लिहिल्या गेला[१४४]. या ग्रंथात कोल्हापुर स्थानाचे महत्व , या स्थानाच्या अवतीभवती असलेल्या तीर्थस्थानांची निर्मिती व त्यांच्या पूजाप्रसादाने मिळणारे फळ, महालक्ष्मीच्या पराक्रमाच्या गाथा इ.विषयांचे वर्णन आले आहे.

इ.स. १८व्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेलेले हरि गोपाळ अंगापुरकर यांनी **लक्ष्मीविजय** या ग्रंथाची निर्मिती केली. करवीरनिवासिनी महालक्ष्मीच्या वीरगाथांनी ओतप्रोत हा ग्रंथ इ.स. १७८५ साली अंगापुरकर यांनी पूर्ण केला. या वरील तीनही ग्रंथांत आलेल्या कथा पुढे देत आहे.

जैन वाङमयात महालक्ष्मी ; **विविधतीर्थकल्प** व **प्रबंधकोश** :

इ.स.१३०७ ते इ.स. १३३२ या दरम्यान जैन ग्रंथकार जिनप्रभसूरि याने रचलेल्या **विविधतीर्थकल्प** व इ.स.१३४८ मध्ये जैन ग्रंथकार राजशेखरसूरि याने रचलेल्या **प्रबंधकोश** या दोनही

---

[१४३] खरे, १९५८, पृ.३२

[१४४] तगारे, १९८०, पृ.४

ग्रंथात कोल्हापुरच्या महालक्ष्मी संबंधात एक कथा आली आहे. दोन्ही ग्रंथातील ही कथा थोड्या फार फरकाने समानच आहे[१४५]

गोदावरी नदीच्या काठावर पैठण येथे सातवाहनांचा राजा राज्य करीत होता.त्याच्या राज्यकाळात शुद्रक नावाचा एक बळकट पुरुष होता. त्याच्या शक्तीवर खूष होऊन राजाने त्यास पैठण नगरीचा कोतवाल बनविले. शूद्रकाची प्रतिष्ठा जसजशी वाढत गेली तसतसे तेथील मत्सरी प्रजेने त्याच्यावर सूड घेण्याचे ठरविले.तो कोतवाली करीत असता मयासूर नामक राक्षसाने राहूचे रूप घेऊन राजा व राणीस गाण्याची मोहिनी घातली व संधी साधून राणीस पळविले. राजाच्या राणीला भूल देवून पळविले व पळविल्याचा आरोप शूद्रकावर घातला. राजाने या आरोपावर विश्वास ठेवून शूद्रकाला सुळावर चढविण्याचे ठरविले. शूद्रकाने राजाजवळ राणीला शोधून आणण्यास मुदत मागितली. तो आपल्या प्रशिक्षित श्वानांबरोबर राणीला शोधावयास निघाला.आपल्या कुत्र्यांनी दाखविलेल्या मार्गाने शूद्रक श्रीकोल्लापुर नगरातील महालक्ष्मी मंदिरात गेला. तेथे त्याने तीन दिवस अहोरात्र देवीची प्रार्थना केली व देवीला प्रसन्न करवून घेतले . तेंव्हा देवी त्यावर प्रसन्न होऊन त्यास तू यक्षराक्षसादिकांचे बलि दे म्हणजे देव प्रसन्न होऊन तुला राणीची बातमी लागेल असे सांगितले. त्याप्रमाणे शूद्रक होम करीत असता त्या होमाचा धूर मयासुराच्या स्थानापर्यंत गेला. मयासुराने होमाचा नाश करण्यासाठी आपला भाऊ कोल्लासुर यास पाठविले. शूद्रकाची व त्याची लढाई होऊन शूद्रक त्यात मारल्या गेला. पण महालक्ष्मीने शूद्रकास जिवंत केले व अजस्य होण्यासाठी त्यास एक खड्ग दिले. या खड्गाच्या सहाय्याने शूद्रकाने मयासुराच्या धाकट्या भावाच्या मदतीने मयासुराचा शोध घेतला व मयासुरास ठार मारून राणीस घेऊन पैठणला आला. राजाने प्रसन्न होऊन शूद्रकास अर्धे राज्य दिले व गोदावरीच्या काठी पैठण येथे महालक्ष्मीची स्थापना केली.

काही काळाने राजाला दुर्बुद्धी होऊन त्याने राज्यातील जेवढ्या कन्या किंवा तरुणी होत्या त्यांच्याशी विवाह करायला सुरवात केली. यामुळे प्रजा हवालदिल झाली. प्रजेतील एका भक्ताने पीठजा

---

[१४५] खरे. १९५८.पृ. ३२-३३

देवीस प्रसन्न करवून घेतले . देवीने राजाच्याच कन्येचे रूप घेऊन राजास ठार केले. पुढे शूद्रकही कालीमातेकडून मारल्या गेला.

ही कथा सातवाहन काळातील असल्याचे या ग्रंथात सांगितल्या गेले आहे. सातवाहनांच्या काळात कोल्हापुरची महालक्ष्मी अस्तित्वात होती की नाही हा मोठा प्रश्न आहे. आभिलेखिक वा वास्तुशास्त्रीय पुराव्यांवरून तरी सातवाहन काळात ही देवी या ठिकाणी असल्याचे पुरावे उपलब्ध नाहीत. ग्रंथकर्त्याचा काळ बघता (इ.स.१४वे शतक) त्याकाळी महालक्ष्मी कोल्हापुरात अस्तित्वात होती हे नक्की. लीळाचरित्र या ग्रंथात मात्र पैठणमधील महालक्ष्मी व पीठजादेवी या दोहोंचे उल्लेख आलेले आहेत.

पद्मपुराण : **पद्मपुराणाच्या** उत्तर खंडातील (गीतामाहात्म्य) १८५ व्या अध्यायात कोल्हापुरच्या महालक्ष्मी संदर्भात एक कथा आली आहे[१४६]. दक्षिणेत कोल्हापुर नावाचे नगर आहे.त्या नगरात सर्व सुख उपलब्ध आहे. ते सिद्ध महात्म्यांचे निवासस्थान आहे. तेथे वास्तव्य केल्याने सर्व सिद्धी प्राप्त होतात असा त्या क्षेत्राचा लौकिक आहे. एकदा त्या नगरीत एक राजकुमार आला. तो रंगाने गोरा. सुंदर नेत्र असलेला, मोठे खांदे व रूंद छाती असलेला राजकुमार होता. नगरात प्रवेश केल्यावर त्याने सर्व महाल पाहिले व त्याच्या मनात महालक्ष्मीचे दर्शन घेण्याची इच्छा झाली. मणिकुंडात (मनकर्णिका ?) स्नान करून पितरांना तर्पण करून त्याने मंदिरात प्रवेश केला, भावपूर्ण अंत:करणाने लक्ष्मीची आराधना केली.

राजकुमाराची आराधना ऐकून महालक्ष्मी त्यावर प्रसन्न झाली व तिने राजकुमारास वर मागण्यास सांगितले. तेव्हा राजकुमाराने आपला सर्व वृत्तांत तीस सांगितला. आपले वडील राजा बृहद्रथ याने अश्वमेध यज्ञाच्या अनुष्ठानास प्रारंभ केला; परंतु दैवयोगाने रोगग्रस्त होऊन ते मरण पावले. याचवेळी सर्व पृथ्वीची प्रदक्षिणा करून परतलेला अश्व यज्ञयूपाभोवती बांधला होता. पण रात्री कोणीतरी त्या अश्वास बंधनातून मुक्त केले. राजकुमाराने त्या अश्वाचा शोध घेतला परंतू त्यास तो अश्व सापडला

[१४६] जोशी.१९८१.पृ.२५८

नाही. तो अश्व परत मिळविण्यासाठी तो महालक्ष्मीस विनवू लागला. यज्ञाची पूर्तता करून आपल्या पित्याचे ऋण फेडण्याची इच्छा त्याने दर्शविली.

महालक्ष्मीने राजकुमारास सांगितले की या मंदिराच्या दाराशी एक ब्राह्मण राहतो. लोकांत तो सिद्धसमाधी या नावाने प्रसिद्ध आहे. तो माझ्या आज्ञेने हे काम पूर्ण करेल.

महालक्ष्मीच्या आज्ञेनुसार राजकुमार त्या सिद्ध समाधीच्या घरी गेला व त्यासमोर गप्प उभा राहिला. सिद्ध समाधी त्यास म्हणाला ;"तुला माताजींनी पाठवले आहे,ठीक आहे ,मी तुझे काम पूर्ण करीन". त्या ब्राह्मणाने सर्व देवांना आपल्यासमोर बोलाविले व त्यांना आज्ञा केली की या राजकुमाराचा यज्ञातील अश्व रात्री देवराज इंद्राने चोरून नेला आहे. त्याला लवकरात लवकर घेऊन या. त्याप्रमाणे देवतांनी राजकुमाराचा अश्व परत आणला. तेंव्हा राजकुमाराने त्या ब्राह्मणास विनविले की आपण आपल्या पित्याचे शरीर तापलेल्या तेलात राखून ठेवले आहे,त्यास जिवंत करावे. ब्राह्मणाने राजकुमारास यज्ञस्थली चलण्यास सांगितले. तेथे गेल्यावर ब्राह्मणाने अभिमंत्रित जल राजाच्या मृत शरीरावर घालून त्यास जिवंत केले. राजा जिवंत झाल्यावर त्याने ब्राह्मणास प्रणाम करून त्याच्या या अद्भूत सामर्थ्याची प्राप्ती कशी झाली हे विचारले. तेंव्हा गीतेच्या बाराव्या अध्यायाचे पठण केल्यामुळे आपणास ही सिद्धी प्राप्त झाल्याचे ब्राह्मणाने सांगितले.

करवीरमाहात्म्य : **करवीर माहात्म्य** हा पूर्णतः कोल्हापुर क्षेत्राचा वर्णन करणारा ग्रंथ आहे. या ग्रंथाचे प्राकृतात रूपांतर दाजिबा जोशीराव यांनी केल्याचा उल्लेख या पूर्वी आला आहे.

काशीपेक्षा यवाधिक श्रेष्ठ :

उत्तरेकडील काशी हे मुक्ती देणारे क्षेत्र असून ते श्रेष्ठ मानले जाते. परंतू **करवीरमाहात्म्य** या ग्रंथात कोल्हापुर हे दक्षिणेतील काशी असून या क्षेत्री मुक्ती बरोबर भुक्तीही (आपल्या मनातील सर्व कामना पूर्ण होतात) मिळते. त्यामुळे उत्तरेकडील काशीपेक्षा हे क्षेत्र श्रेष्ठ असलेली कथा या ग्रंथात आलेली आहे[१४७].

---

[१४७] तगारे , २०००

एकदा शिव व महालक्ष्मी या दोहोंमध्ये आपापल्या क्षेत्राच्या श्रेष्ठत्वाबद्दल वाद सुरू झाला. शिवाच्या मते काशी क्षेत्र श्रेष्ठ तर महालक्ष्मीच्या मते कोल्हापुर क्षेत्र श्रेष्ठ. या वादाच्या निकालासाठी विष्णूस पाचारण करण्यात आले. विष्णूने तराजूच्या एका पारड्यात काशीस ठेवले तर दुसऱ्या पारड्यात कोल्हापुरास ठेवले. पारडे तोलले असता शिवक्षेत्राचे पारडे वर गेले. शिवाने हर्षाने आपले क्षेत्र श्रेष्ठ असल्याचे सांगितले. महालक्ष्मीने हसून शिवास सांगितले की कोल्हापुर हे क्षेत्र श्रेष्ठ असल्यामुळे ते पारडे जड होऊन खाली राहिले. या क्षेत्रात असलेली तीर्थे ही संख्येने उत्तरेतील काशीपेक्षा जास्त आहेत त्यामुळे हे क्षेत्र श्रेष्ठ आहे.

उत्तरेतील काशीपेक्षा कोल्हापुर श्रेष्ठ असल्याची आणखी एक कथा या ग्रंथाच्या ६व्या अध्यायात आली आहे (श्लोक ४६-५६)[१४८]. काशी व कोल्हापुर या दोन क्षेत्रांच्या श्रेष्ठत्वाबद्दल वाद चालला असता विष्णुने लक्ष्मी व शिवास आपापल्या आयुधांनी आपालल्या स्थानांस वर उचलण्यास सांगितले. शिवाचे क्षेत्र धनुष्याकार असल्यामुळे ते त्याने आपल्या शूलाच्या टोकावर उचलले. लक्ष्मीला आपले स्थान जड असल्यामुळे गदेने उचलता आले नाही. ते तिने आपल्या कराने उचलले त्यावरून या स्थानास करवीर हे नाव पडले. यावरून कोल्हापुर हे काशीपेक्षा श्रेष्ठ असल्याचे निष्पन्न झाले.

राजा गंड :

करवीरमाहात्म्यातील २१ व्या अध्यायात दशाश्वमेध तीर्थाच्या महतीचे वर्णन करताना राजा गंड याची कथा आली आहे

. शिव एकदा ब्राह्मणाचा वेश घेवून दशाश्वमेध तीर्थाजवळ शव होऊन पडला. त्या शवाजवळ गौरी त्याची स्त्री बनून, आक्रांत करू लागली. जमलेल्या लोकांनी त्या शवास उचलण्याचा प्रयत्न केला. तेव्हां कोणासही ते शव उचलेना. ज्याने दहा अश्वमेध केले असतील अशाच व्यक्तीकडून हे शव उचलल्या जाईल असे त्या स्त्रीने सांगितले. यावेळी राजा गंड राज्य करीत असे. तो सूर्याची उपासना करीत असे. त्यास रोज सूर्याकडून अन्नाची थाळी येत असे. त्या दिवशी त्यास अन्नाची थाळी

[१४८] तगारे, १९८०;

आली नाही. याचे कारण जाणून घेण्यासाठी तो गावात फेरी मारावयास निघाला. दशाश्वमेधतीर्थाजवळ आल्यावर त्याने वरील प्रकार बघितला. त्याने शवास उचलण्याचा प्रयत्न केला पण त्यासही जमले नाही. त्याच वेळी एक ब्राह्मण पूजाअर्चा करून भिक्षेसाठी बाहेर पडला व गर्दी बघून या जागी येऊन थांबला. त्यास शवास उचलण्याची अट समजताच तो दशाश्वमेधतीर्थास जावून दहा अश्वमेधांचा संकल्प करून तीर्थात स्नान करून ,पूजाअर्चा करून पुन: शवाजवळ आला. त्याने शवास उचलून अग्नीवर ठेवले. त्याबरोबर शवाजवळ असलेल्या स्त्रीनेही सती जाण्याची तयारी दाखविली. अग्निस्पर्शाने शवाचा शिव व स्त्रीची गौरी झाली.

या कथेत आलेला राजा गंड ऐतिहासिक असण्याची शक्यता आहे. शिलाहार राजवंशात राजा गंडरादित्य होऊन गेला. हा राजा सूर्योपासक होता की नव्हता हे सांगता येत नाही; परंतू या राजाने खेडादित्याच्या मंदिराला[१४९] दान दिल्याचा उल्लेख आढळतो.

राजा इंद्रसेन :

करवीरमाहात्म्य या ग्रंथातील २७व्या अध्यायात राजा इंद्रसेनाची कथा आली आहे. या कथेनुसार राजा इंद्रसेन पाटलीपत्तन या ठिकाणाहून राज्य करीत होता. इंद्रसेनाने अनेक युद्धे करून आपले राज्य प्रबळ बनविले व राजसूय यज्ञ केला. हा यज्ञ केल्यावर आपण केलेल्या युद्धात घेतलेल्या प्राणांचे प्रायश्चित कसे करावे याबद्दल मुनीस विचारणा केली. मुनींनी त्याला दक्षिण काशी असलेल्या करवीर क्षेत्री जावयास सांगितले. त्याप्रमाणे राजा इंद्रसेन करवीरास येऊन इतर तीर्थांचे दर्शन करून महालक्ष्मीच्या सेवेत पाच वर्षे करवीरात राहिला. मधल्या काळात राजाच्या प्रधान व मंत्रिगणात भांडणे होऊन प्रजेचा छळ होऊ लागला. प्रजा राजास परत राज्यात येण्यास विनंती करावयास करवीरास आली. या क्षेत्री वास करून मन:शांती लाभल्यामुळे राजा परत आपल्या राज्यात जावयास तयार होईना. महालक्ष्मीने त्यास दर्शन देऊन राजधर्माची वचने सांगून त्यास आपल्या राज्यात जावयास सांगितले. पाटलीपत्तन येथे राज्य करणारा हा राजा इंद्रसेन कोण असावा याची कल्पना येत नाही.

कोल्हासुर वध :

[१४९] मिराशी .१९७५ .पृ .२७२

करवीरमाहात्म्य या ग्रंथाच्या ३३ व ३४ व्या अध्यायात ब्रह्याचे तीन मानसपुत्र गयासुर ,लवणासुर व कोल्हासुर यांची कथा आली आहे. गयासुराच्या शरीरावर देवतांनी यज्ञ केला याचा राग घेऊन लवणासुराने देवतांशी युद्ध पुकारले व त्यात त्याचा मृत्यू झाला. सुकेशी राजा व त्याचे दोन्ही पुत्र हेति व प्रहेति यांच्याशी युद्ध करून कोल्हासुराने कोल्हापुर जिंकले. करवीर नामक पुत्रास राज्य देऊन कोल्हासुर अरण्यात तप आचरण्यास निघून गेला. गयासुर व लवणासुराचा देवतांनी वध केला हे माहित झाल्यावर करवीराने मुनींना छळावयास सुरवात केली. त्याने मुनींचे यज्ञ मोडून देवालये तोडण्यास सुरवात केली. तेथील मुनीजन प्रथम विष्णूस व त्यानंतर शिवास शरण गेले. शिवाने करवीरास ठार मारले. कोल्हासुराने केलेल्या तपावर लक्ष्मी प्रसन्न झाली व तिने कोल्हासुरास वर मागण्यास सांगितले. कोल्हासुराने लक्ष्मीस एक हजार वर्षांसाठी हे स्थान सोडून जाण्यास सांगितले. त्याप्रमाणे लक्ष्मी हे स्थान सोडून हिमालयात गेली. करवीराचा वध झालेला ऐकून कोल्हासुर राज्यात परत आला. व त्यानेदेखील मुनींच्या यज्ञांचा नाश करावयास व देवालये तोडण्यास सुरवात केली. प्रजेने ब्रह्मदेवास विनवणी केली. सर्व देवतांनी लक्ष्मीस कोल्हासुरास वधावयास सांगितले. देवीने महालक्ष्मीचे अष्टादशभुजा रूप घेतले व कोल्हासुराचा वध केला.

<u>कूष्मांड बलि :</u>

करवीरमाहात्म्य या ग्रंथातील ३७व्या अध्यायात कूष्मांड बलीची प्रथा कशी सुरु झाली याची कथा आली आहे. कोल्हासुराचा वध केल्यानंतर सर्व देवतांनी लक्ष्मीस तो वध कसा केला याची विचारणा केली. महालक्ष्मीने मुक्तिमंडपात एक कोहळा (कोहळा हे राक्षसाच्या शिराचे प्रतीक) ठेवला व त्यास वज्रासमान टणक केले. सर्व देवतांना ते कूष्मांड फोडण्याचे आव्हान केले. कोणीही देवता त्या कूष्मांडाचे भेदन करू शकली नाही . मग देवीने आपल्या तलवारीने कूष्मांडाचे भेदन करून दाखविले. आपले नाव अजरामर होण्यासाठी कोल्हासुराने मरताना दरवर्षी आपल्या शिराचे भेदन आश्विन पंचमीस (याच दिवशी देवीने कोल्हासुरास मारले) करावे असा वर मागून घेतला.

यानंतर त्र्यंबुलीची कथा आली आहे. ब्राह्मण भार्गव व त्याची पत्नी विशालाक्षी यांची अपत्ये जगत नव्हती. त्यांनी लक्ष्मीस नवस केला की होणारे अपत्य आपण लक्ष्मी चरणी अर्पण करू. त्याप्रमाणे

त्यांना कन्या रत्न प्राप्त झाले. ते त्यांनी लक्ष्मीस अर्पित केले. ही कन्या देवीजवळ राहून देवीची नित्य सेवा करीत असे. तिथे असलेल्या मल्हार तीर्थात सोन्याची कमळे उगवत असत. ती कमळे पाताळातील राक्षस चोरून नेत. तिन्ही काळी तीर्थांत उडी मारून तिने पाताळातील सर्व राक्षसांचा नाश केला. त्यावरून महालक्ष्मीने तिचे नाव त्र्यंबुली ठेवले.

कोल्हासुराची पत्नी कराळी हिने कामाक्ष नामक पुत्रास जन्म दिला. या कामाक्षास शुक्राने योगदंड दिला. हा योगदंड व्यक्तीवरून उजव्याबाजूने फिरविल्यास त्याचे शेळ्यामेंढ्यात रुपांतर होई व डाव्या बाजूने फिरविल्यास पुन: ती पूर्ण रूपास येई.

एकदा महालक्ष्मी व देवतागणांनी दरवर्षी प्रमाणे कूष्मांडभेदनासाठी मागवलेले पूजा साहित्य राक्षसांनी लुटले. सर्व देवतागण कामाक्षावर चालून गेले. कामाक्षाने योगदंडाद्वारे सर्व देवतांचे शेळ्यामेंढ्यांत रुपांतर केले. त्र्यंबुली म्हातारीचे रूप घेऊन , अरण्यात शेणींची टोपली घेऊन गेली. या टोपलीत खाली दगड व वर शेणी भरल्या होत्या. शेजारून जसा कामाक्ष जावयास निघाला तसे तिने टोपली उचलण्याचा प्रयत्न केला. तिला ती उचलेना. तिने कामाक्षाची मदत मागितली . कामाक्षाने शिरावर योगदंड ठेवून ती टोपली उचलण्याचा प्रयत्न केला. पण त्या झटपटीत तो खाली पडला. त्याक्षणी त्र्यंबुलीने दगडाने ठेचून कामाक्षाचा वध केला व योगदंड सर्व देवतांवर फिरवून त्यांना मूळ रूपात आणले. श्रीसह सर्व देवता गण आनंदून अंत:पुरात आले व त्यांनी कूष्मांडभेदनाच्या विधीस प्रारंभ केला. लक्ष्मीला त्र्यंबुली दिसेना तेव्हा तिने तीस बोलावून आणण्यास सांगितले. आपल्याला न बोलावता कूष्मांडभेदनाचा विधी सुरु झाल्याचे ऐकून त्र्यंबुली दूर टेकडीवर जाऊन पाठ फिरवून बसली. देवतांच्या आळवणीने सुद्धा ती ऐकेना तेव्हा महालक्ष्मी स्वत: तिच्याजवळ गेली. तिच्या रुसण्याचे कारण विचारले. तिने, कूष्मांड भेदनास न बोलावल्याने रुसल्याचे सांगितले. दरवर्षी अश्विन पंचमीस कूष्मांडभेदनाचा होणारा सोहळा मुक्तिमंडपात न होता आपल्या समोर व्हावा असे वचन तिने देवीकडून घेतले. ते देवीने मान्य केले. तेव्हांपासून कूष्मांडभेदनाचा सोहळा मुक्तिमंडपात न होता त्र्यंबुली समोर होऊ लागला.

कोल्हापुरात आजही ही प्रथा आपणास पहावयास मिळते. शारदीय नवरात्रात अश्विन पंचमीस महालक्ष्मीची उत्सवमूर्ति पालखीत ठेवून ही पालखी त्र्यंबुलीस (टेंबलाई देवळात) जाते व तिच्या समक्ष कूष्मांडभेदनाचा सोहळा कुमारीरूपात देवी करते.

राजा श्रृंगण :

करवीरमाहात्म्य ग्रंथातील अध्याय ४९ ते ५३ यात राजा श्रृंगणाची कथा आली आहे. हा राजा श्रृंगण प्रजेचा चांगला सांभाळ करीत असता एके दिवशी सकाळी अचानक त्याच्या शिरावर श्रृंग (शिंग) दिसले. वैद्यकीय उपचार करूनही ते श्रृंग जाईना. तेंव्हा राजाने नारदाची मदत घेतली. नाारदाने त्यास पूर्वजन्मीच्या फळामुळे हे भोग आल्याचे सांगितले. नारदाने त्यास सर्व तीर्थस्थानांची यात्रा करण्यास सांगितले. ज्या स्थानास हे श्रृंग गळून पडेल त्या स्थानास यज्ञ करावा असेही सांगितले. त्याप्रमाणे आपल्या प्रधानाच्या हाती राज्याची सूत्रे देऊन आपल्या पत्नीसह राजा तीर्थाटनास निघाला. सर्व तीर्थे करून तो करवीरास आला. तेथील विशाळतीर्थात स्नान केले असता तेथे त्याचे श्रृंग गळून पडले. तेथे त्याने यज्ञ केला. महालक्ष्मी व महाकालीचे दर्शन घेवून तो आपल्या स्थळी परतला.

कथेत सांगितल्या प्रमाणे हा राजा सुराष्ट्र देशाचा राजा होता व राजाच्या नावावरून त्या देशाचे नाव श्रृंगणद्वीप असा उल्लेख केला जाई.

करवीरमाहात्म्य या ग्रंथात मुख्यत्वे कोल्हापुर क्षेत्रातील तीर्थांची उत्पत्ती ,त्यांच्या पूजनाचे फल इ. बाबत सविस्तर वर्णन केले आहे.

लक्ष्मीविजय : **लक्ष्मीविजय** हा ग्रंथ महालक्ष्मीच्या अवतार कथा व वीरगाथांचे वर्णन करणारा हरि गोपाळ अंगापुरकर यांनी लिहिला. सप्तशती, पद्मपुराण ,भविष्योत्तर पुराण या पुराणांचा आधार घेवून तो लिहिल्या गेला. यात आलेल्या काही कथा पुढील प्रमाणे आहेत.

महालक्ष्मी ,महाकाली व महासरस्वती अवतारधारण :

ही कथा **लक्ष्मीविजय** या ग्रंथाच्या दुसऱ्या अध्यायात आली आहे. ब्रह्मदेव,विष्णु व शिवाने ८८हजार ऋषींना पाचारण करून यज्ञ करण्यास सुरवात केली.या तीनही देवतांना याचा गर्व झाला तेव्हा आदिमाया आदिशक्ति वृद्ध सवितेचे रूप घेतले व बारा शक्तिबरोबर उंटावर बसून यज्ञ मंडपासमोरून ती जाऊ लागली. या तीनही ब्रह्मादि देवतांना या उंटावर बसलेल्या या देवता कोण याचा ठावठिकाणा लागेना. ब्रह्मदेवाने चौकशी केली. कोणीच बोलेना. उंटावर काय ठेवले आहे हे ब्रह्मदेवाने विचारताच आदिमायेने त्यास एक सुवर्ण अंड दिले. ते ब्रह्म्याच्या हातून उचलले न गेल्याने फुटले व त्यातून महाकाली व महासरस्वती सिद्धलक्ष्मीसह अवतरल्या. महासरस्वतीने ब्रह्मदेवास दुसरे अंड दिले. ब्रह्मदेवाने या अंडात प्रवेश करून बघितले तर तेथेही मोठा यज्ञ चालू होता. आदिमायेचे स्तवन करूनच त्याला बाहेर पडता आले. ब्रह्मदेवाचा गर्व गळून पडला. त्याच्या गर्वातून राक्षस जातीचा जन्म झाला व राक्षस जातीच्या नि:पातासाठी महाकाली,महालक्ष्मी व महासरस्वती यांना अवतार धारण करावे लागले.

गयासुर , लवणासुर व कोल्हासुर कथा :

लक्ष्मीविजय या ग्रंथाच्या तिसऱ्या अध्यायात आलेली ही कथा थोड्याफार फरकाने **करवीरमाहात्म्य** या ग्रंथातही आलेली आहे. केशी राक्षसाने पद्माक्षपुरावर स्वारी करून पद्माक्ष राजास ठार मारले. पद्माक्षाची मुलगी पद्मावती बद्रिकाश्रमात निघून गेली. पद्मपुर उध्वस्त करून केशीने पंचगंगेच्या दक्षिण तीरावर केशिपुर वसविले. त्याने प्रजेवर अत्याचार करून यज्ञयाग बंद पाडावयास सुरवात केली. सर्व ऋषीमुनी विष्णुस शरण गेले. विष्णूने, गयासुरास विनंती करून लवणासुरास व कोल्हासुरास केशी राक्षसाचा नाश करण्यास धाडले. कोल्हासुर व केशी यांच्यात युद्ध होऊन केशी राक्षस मारल्या गेला. कोल्हासुराने तपश्चर्या करून महालक्ष्मीस प्रसन्न करून शंभर वर्षे राज्य करण्याचा वर देवीकडून मागून घेतला व आपला पुत्र करवीर यास राज्यावर बसवून स्वत: तपश्चर्येसाठी वनात निघून गेला.

भस्मासुर कथा :

लक्ष्मीविजय या ग्रंथातील १० व्या अध्यायात भस्मासुराची कथा आली आहे. शंकराच्या वरप्रसादाने भस्मासुरास असा वर प्राप्त झाला होता की तो ज्याच्या डोक्यावर हात ठेवेल तो जळून भस्मसात होईल. भस्मासुर रणांगणात लढावयास आला तेव्हा भयाने सर्व सेना लुप्त झाली. भस्मासुरास रणांगणात कोणीच दिसेना.फिरता फिरता तो एका मंदिराजवळ गेला. तिथे एक नवयौवना फुले वेचित होती. तीवर भस्मासुर मोहित झाला. त्याने तिच्यासमोर लग्नाचा प्रस्ताव मांडला. तिने अट घातली की ती महाकाली समोर नाचणार आहे व जो कोणी तिच्यासोबत नाचेल व नृत्यात जिंकेल त्यालाच ती पती म्हणून स्वीकार करेल. भस्मासुराने तिची ही अट मान्य केली व दोघांनी नाचावयास सुरवात केली. दोघेही बेभान होऊन नाचू लागले. ती करील त्याप्रमाणे भस्मासुर करू लागला. काही वेळानंतर तिने आपले दोन्ही हात डोक्यावर ठेवले. भस्मासुराने तसे करताच त्याच्या सर्व शरीरातून आगीच्या ज्वाळा उसळल्या व तो जळून भस्मसात झाला. ही रूपसुंदरी महालक्ष्मी होती.

शुंभ निशुंभ वध :

लक्ष्मीविजय ग्रंथाच्या १० व्या अध्यायात शुंभ निशुंभाची कथा आली आहे. भस्मासुराचा वध झाल्याचे कळताच राग अनावर होऊन शुंभ निशुंभांनी महालक्ष्मीस जिवंत पकडून आणण्याचे ठरविले. या दोघांना कुण्याच्याही हातून मरण नव्हते. महालक्ष्मीने त्रिभुवनसुंदरीचे रूप घेतले. तिला बघताच शुंभ निशुंभ दोघेही भुलले. दोघांनाही ती स्वतःची पत्नी व्हावी असे वाटू लागले. त्यावरून दोघांत रणकंदन माजले व दोघे एकमेकांवर गदाप्रहार करू लागले व त्यातच त्या दोघांचा अंत झाला.

नेहमान्याचा वध :

लक्ष्मीविजय या ग्रंथातील ११ व्या अध्यायात नेहमान्य राक्षसाचा वध महालक्ष्मीने केला अशी कथा आली आहे. करवीराने नेहमान्यास महालक्ष्मीवर विजय मिळविण्यास पाठविले. तो मोठ्या दिमाखाने मंगलवाद्ये वाजवीत रथावर आरूढ होऊन रणांगणावर आला. महालक्ष्मीच्या अचूक शरसंधानाने नेहमान्याच्या सैन्याची फळी फुटली. नेहमान्याने हजारो अग्निबाणांचा वर्षाव महालक्ष्मीवर

केला. महालक्ष्मीने सर्व बाण छिन्नविच्छिन्न केले. नेहमान्य गदा घेवून सरसावला. महालक्ष्मीने सुदर्शनाने त्याचे डोके उडवून त्याचा अंत केला.

कामाक्ष वध :

करवीरमाहात्म्य या ग्रंथात वर्णिलेली त्र्यंबुलीने कामाक्षाचा वध केल्याची कथा या **लक्ष्मीविजय** ग्रंथात तेराव्या अध्यायात आलेली आहे.

कोल्हासुर वध :

लक्ष्मीविजय ग्रंथातील १५ व्या अध्यायात **कोल्हासुर** वधाची कथा आली आहे. शतानीक व मदिराक्ष या नावाच्या कोल्हासुराच्या दोन नातवांचा वध झाल्याचे कळल्यावर कोल्हासुर संतापला. शेवटचा असुर व स्वशरीरात रक्ताचा अंतिम बिंदू असेपर्यंत लढण्याचा निश्चय करून रणांगणावर आला.महालक्ष्मी व कोल्हासुरात अटीतटीचे शस्त्रयुद्ध व अस्त्रयुद्ध झाले. शक्ति पट्टीश व गदेने युद्ध झाल्यावर महालक्ष्मीने दिव्य वरद बाण घेऊन, त्यावर सहस्त्रधारा सुदर्शन सहित ब्रह्मास्त्र योजून कोल्हासुराचे मस्तक उडविले.

कूष्मांडभेदन :

महालक्ष्मीच्या कूष्मांडभेदनाची कथा **करवीरमाहात्म्य** या ग्रंथातील कथेप्रमाणेच **लक्ष्मीविजय** या ग्रंथात १६व्या अध्यायात आली आहे. या दोन्ही कथा एकसारख्याच आहेत.

दशाश्वमेध घाटाची कथा :

करवीरमाहात्म्य या ग्रंथातील राजा गंडाची कथा लक्ष्मीविजय या ग्रंथात १७ व्या अध्यायात आली आहे. परंतु याठिकाणी राजा गंड नसून पद्माक्षपुरचा राजा पद्माक्ष आहे. बाकी कथा शिवाचे शव व त्याशेजारी रुदन करणारी स्त्री अशीच आहे. ब्राह्मणाने दशाश्वमेधकुंडात स्नान करून शिवाचे शव अग्नीस समर्पित केले.

व्यंकटेशमाहात्म्य[150] : तिरुपती येथे वास्तव्य असलेल्या विष्णूचे क्षेत्र वर्णन करणारा ग्रंथ **व्यंकटाचलमाहात्म्य** आहे. या ग्रंथात आलेल्या कथेनुसार विष्णूची पत्नी लक्ष्मी हिचे स्थान विष्णूच्या हृदयात आहे. एकदा भृगु ऋषी विष्णूस भेटावयास आले.विष्णू लक्ष्मीबरोबर वार्तालाप करीत असल्यामुळे त्यांचे ऋषींकडे लक्ष गेले नाही. भृगु ऋषींनी आपण आल्याची जाणीव करून देताच विष्णुने त्यांचे आदरातिथ्य केले. परंतू सुरवातीस आपल्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे भृगु ऋषींनी विष्णूच्या छातीवर लाथ मारली; विष्णुपत्नी लक्ष्मी हिचे हे स्थान असल्यामुळे तिला राग आला व ती कोल्हापुरास येऊन बसली. विष्णूने तिचा तपास केला, व ती कोल्हापुरात आहे हे कळल्यावर तिला परत येण्यास त्याने विनवणी केली. लक्ष्मीने ते मान्य केले नाही. विष्णुने तिरुपतीस जाऊन जेव्हा पद्मावतीशी विवाह करण्याचे योजिले तेव्हा त्याने सूर्यास लक्ष्मीस घेऊन येण्यास विनविले. सूर्याने लक्ष्मीस येण्यास प्रार्थना केली तेंव्हा विवाहासाठी लक्ष्मी तिरुपतीस गेली व परत आपल्या स्थानास कोल्हापुरात आली.

सूर्याने लक्ष्मीस येण्यासाठी बोलावणे म्हणजेच महालक्ष्मी मंदिरात होणारा किरणोत्सव असावा. मागील २०-२२ वर्षांपासून (त्यापूर्वी ही प्रथा नव्हती)दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी महालक्ष्मीस तिरुपतीहून साडी येते व ही साडी दसऱ्यादिवशी तिला नेसवण्यात येते. तिरुपतीच्या विष्णूचा तिच्याशी संबंध जोडताना आता तर तिरुपति तीर्थाचे दर्शन हे कोल्हापुर महालक्ष्मीचे दर्शन घेतल्याशिवाय पूर्ण होत नाही हा नवा विचार सुरू झाला आहे. त्याला पूरक म्हणून रेल्वे महामंडळाने हरिप्रिया नावाची रेल्वे सेवा दरदिवशी सुरू केली आहे. या गाडीने येणारे बरेच भाविक, तिरुपती यात्रा करून, देवीच्या दर्शनास येतात.

दंतकथा :

महालक्ष्मी मंदिरासंबंधाच्या पूर्वापार परंपरेने चालून आलेल्या दंतकथा भक्तजनांच्या तोंडून ऐकण्यात आल्या आहेत. यांना कुठलाही पौराणिक वा ग्रांथिक आधार नाही. दक्षिणेकडील सर्वसामान्य जन देवळांचा निर्माता जखणाचार्य म्हणून सांगतात. त्याचप्रमाणे लोकपरंपरेतून या देवळाची बांधणी

---

[150] दत्तार्जीराव. १९२५

जखणाचार्य याने केली असे मानतात. राक्षसांनी या देवळाची निर्मिती एका रात्रीत केली अशीही आख्यायिका प्रचलित आहेत.

वरील पुराव्यांवरून हे लक्षात येते की

स्थलमाहात्म्यांपैकी **करवीरमाहात्म्यात** आलेल्या कथांत उत्तर-काशीपेक्षा जवभर वजनदार असलेल्या करवीर क्षेत्रासंबंधीच्या कथा ,कामाक्ष वध व त्या अनुषंगाने त्र्यंबुलीची कथा,कोल्हासुर वध अशा कथा आल्या आहेत.राजा इंद्र,राजा गंड,राजा श्रृंगण यांच्यासंबंधीच्या कथाही आलेल्या आहेत. राजा गंड हा सूर्योपासक होता असे यात सांगितले आहे. शिलाहार राजा गंडरादित्य सूर्योपासक असल्याचा पुरावा उपलब्ध नाही परंतु त्याने खेडादित्याच्या मंदिरास देणगी दिल्याचा उल्लेख आहे..**करवीरमाहात्म्य** या ग्रंथात कोल्हापुर व आसपासच्या तीर्थांची निर्मिती व त्यांचे महत्व या तीर्थांची यात्रा करण्याचा क्रम, अगस्ति व लोपमुद्रा तसेच पाराशर ऋषींनी केलेल्या तीर्थयात्रांचे वर्णन आले आहे.महालक्ष्मी मंदिराच्या मुक्तिमंडपात होणारा कूष्मांडभेदनाचा विधि त्र्यंबुलीसमोर करण्याची प्रथा कशी पडली याची कथा आली आहे. यावरून महालक्ष्मी मंदिरातील मुक्तिमंडपात कूष्मांडभेदनाचा सोहळा पूर्वी होत असे असे दिसून येते.

लक्ष्मीविजय या ग्रंथात **करवीरमाहात्म्यात** आलेल्याच कथा आल्या आहेत पण त्याच बरोबर महालक्ष्मीच्या वीरकथा दिल्या आहेत.**व्यंकटाचलमाहात्म्यात** आलेल्या कथेमुळे तर आज महालक्ष्मीस विष्णुपत्नी असेच मानल्या जाते. तिरुपति संस्थानाकडून येणारी साडी दसऱ्याच्या दिवशी देवीस नेसवल्या जाते. . तिरुपतीच्या विष्णूचा तिच्याशी संबंध जोडताना आता तर तिरुपति तीर्थाचे दर्शन हे कोल्हापुर महालक्ष्मीचे दर्शन घेतल्याशिवाय पूर्ण होत नाही हा नवा विचार सुरू झाला आहे. त्याला पूरक म्हणून रेल्वे महामंडळाने हरिप्रिया नावाची रेल्वे सेवा दरदिवशी सुरू केली आहे. या गाडीने येणारे बरेच भाविक. तिरुपताची यात्रा करून, देवीच्या दर्शनास येतात.

प्रकरण ३

ताम्रपट व शिलालेखांतून आलेले महालक्ष्मीचे उल्लेख

कोल्हापुर हे स्थान इ.स.३ऱ्या शतकापासून मानवी वसाहतीचे केंद्र असल्याचे कोल्हापुरजवळील ब्रह्मपुरी येथील उत्खननावरून[१५१] सिद्ध झाले असल्याचा उल्लेख या पूर्वी करण्यात आला आहे. इ.स. १९४४-४५मध्ये पुण्याच्या डेक्कन कॉलेज केलेल्या उत्खननावरून हे दिसून येते[१५२] की सातवाहन,राष्ट्रकूट,चालुक्य, शिलाहार,यादव व काही काळानंतर मराठे या राजवंशांची सत्ता या स्थानावर होती. महालक्ष्मीशी एकरूप होऊन शिलाहारवंशीयांनी स्वत:स श्रीमहालक्ष्मीलब्धवरप्रसाद असे म्हणवून घेतले आहे. सुल्तानी आक्रमणाच्यावेळी जरी महालक्ष्मीस वनवास पत्करावा लागला तरी मराठी साम्राज्यात तिला आपले गतवैभव प्राप्त झाले व आजतागायत ती आपले स्थान भूषवित आहे.

पुराणांत व ग्रंथांत जसे महालक्ष्मीचे उल्लेख आले आहेत, तसेच ताम्रपट व शिलालेखांमधूनही कोल्हापुरच्या महालक्ष्मीचे उल्लेख सापडतात. या उल्लेखांवरून सुदूर कर्नाटक व गुजरात राज्यांतही या देवीची महती पोहोचल्याचे आढळून येते.

कर्नाटकाच्या हासन तालुक्यातील दोड्डगड्डवळळी येथील महालक्ष्मी मंदिरामध्ये असलेल्या शिलालेखावरून इ.स.१११३च्या सुमारास याठिकाणी कोल्हापुर प्रमाणेच महालक्ष्मी मंदिराचा निर्माण करून त्या जागेस अभिनव कोल्लापुर हे नाव देण्यात आल असे दिसते. सरस्वतीपुराणातील श्लोकानुसार सोलंकी घराण्यातील सिद्धराज राजाने सिद्धराज सरोवराकाठी कोल्हापुरप्रमाणेच पीठाची निर्मिती केली.

महालक्ष्मीचा उल्लेख असलेला परंतु कोल्हापुर नावाचा उल्लेख नसलेला सर्वात प्राचीन ताम्रपट[१५३] राष्ट्रकुट राजा, प्रथम अमोघवर्ष (इ.स.८१४-इ.स.८७९) याच्या काळचा आहे.[१५४] संजान

---

[१५१] सांकालिया, दिक्षित, १९५२, पृ.४

[१५२] सांकालिया.दिक्षित,१९५२

[१५३] एपि. इं., खंड १८,पृ.२३५-२५८

[१५४] एपि.इं. ,खंड १८,पृ.२३५-२५७

या गावी सापडलेला हा ताम्रपट उत्तरायण , पौष ,नंदन संवत्सर, शके ७९३(इ.स.८७१) चा आहे.या लेखात-

सर्पं पातुमसौ ददौ निजतनुं जीमूतकेतोः सुतः ।

श्येनायाथ शिबिः कपोतपरिरक्षार्थं दधिचोऽर्थिने ।।

तेष्वैकैकमतर्पयन् किल महालक्ष्म्यै स्ववामांगुलिम् ।

लोकोपद्रवशान्तये स्म दिशति श्रीवीरनारायणः ।।४७।।

या राजाने जनतेला होणारा उपद्रव शांत करण्यासाठी आपल्या डाव्या हाताची करंगळी महालक्ष्मीस समर्पित केली. या लेखात महालक्ष्मीचा उल्लेख असला तरी कोल्हापुरचा उल्लेख नाही. ही महालक्ष्मी कोल्हापुरचीच असावी ह्या भांडारकरांच्या मतास खरे व मिराशी यांनी दुजोरा दिला आहे .जर हे मत ग्राह्य मानले तर इ.स.८७१च्या सुमारास कोल्हापुरात महालक्ष्मीचे देवालय अस्तित्वात होते. परंतु त्याचे रूप आजच्याप्रमाणे नव्हते हेही तेव्हढेच खरे .

यानंतरचा लेख म्हणजे कदंब कुलातील राजा द्वितीय गुहल्ल (इ.स.९८०-इ.स.१००५) याचा सावई-वेरे ताम्रपट[१५५] आहे .या ताम्रपटाचा काळ बहुधान्य संवत्सर, चैत्र शुद्ध १५,सोमवार,चंद्रग्रहण, शके ९६०(२३ मार्च इ.स.१०३८) असा आहे. या ताम्रपटात षष्ठदेवने केलेल्या सोमनाथ यात्रेचे वर्णन आहे. याबरोबर त्याने गोकर्ण क्षेत्रातील देवतेचे पूजन केले. कोल्हापुरच्या महालक्ष्मीच्या दर्शनास तो नेहमी येत असे. या लेखाची भाषा संस्कृत असून हा लेख पद्यात लिहिला आहे. या लेखाची लिपी नागरी आहे. हा ताम्रपट गोवे कदंबांचा सर्वात जुना ताम्रपट आहे. ताम्रपटातील १०व्या श्लोकापासून प्रस्तुत ताम्रपटाचा दाता दुसरा गुहल्लदेव याचे वडील षष्ठ (दुसरा) याचे गुणवर्णन आले आहे.

गोकर्णः कनकैर्मुहुर्भगवती चार्या च येनार्चिता ।(ओळ १९)

श्रीकोल्लापुरमेत्य येन च महालक्ष्मीः सदाराधिताः (ओळ २०).

---

[१५५] दीक्षित,१९४७,पृ.४६-६८

राष्ट्रकूट राजा (प्रथम)अमोघवर्षाच्या ताम्रपटात (इ.स.८७१)जरी कोल्हापुर या ग्रामनामाचा उल्लेख आलेला नसला तरी या इ.स.१०३८ च्या ताम्रपटात महालक्ष्मी व कोल्हापुर या दोहोंचा उल्लेख आलेला आढळून येतो. लेखावरून कदंब कुलातील षष्ठदेव(द्वितीय) नेहमी महालक्ष्मीच्या दर्शनासाठी कोल्हापुरास येत असे असे दिसते. यावरून इ. स. १०३८ च्या सुमारास महालक्ष्मीचे अस्तित्व कोल्हापुरात असल्याचे दिसून येते .

महालक्ष्मीचे उल्लेख करणारे या काळानंतरचे लेख आपणास कर्नाटक राज्यात मिळाले आहेत. महालक्ष्मी देवीची ख्याती आजच्या महाराष्ट्राबाहेर पसरल्याचे या लेखांवरून दिसून येते. कर्नाटक राज्याच्या बिजापुर जिल्ह्यातील (बागलकोट तालुका)शिरूर गावात सिद्धेश्वर मंदिराच्या भिंतीवर हे लेख कोरलेले आहेत. हे तीनही लेख चालुक्य राजा सोमेश्वर प्रथम(इ.स.१०४२ ते इ.स.१०६८) व सोमेश्वर द्वितीय (इ.स.१०६८ ते इ.स.१०७६) याच्या काळातील आहेत राजा गोंक(इ.स. १०२० ते १०५०) व राजा मारसिंह (इ.स. १०५० ते १०७५) हे त्यांचे समकालीन शिलाहार राजे होते.

पहिला लेख पौष वद्य १२,आदित्यवार, शके ९७० (इ.स. १०४९)[१५६] या काळाचा आहे. हा लेख सिद्धेश्वर मंदिराच्या दक्षिण भिंतीवर कोरलेला आहे. हा लेख संस्कृत भाषेत व कानडी लिपीत कोरला आहे. या शिलालेखातील वर्णनात महालक्ष्मीस –

स्वस्त्यनन्तरतमतमन्धकारविनिर्गतसमुद्भूतनिरामयोत्पत्ति महाशक्ति-

स्वरूप परमोद्धारिकमहामूर्ति सप्तकल्पचतुर्विंशाष्टगुणेत्यष्टाविंशत

युगावतार चतुस्सष्टियोगिनी सिद्धसंदोहपरिवेष्टित जम्बूद्वीपान्तर्गतशिव –

क्षेत्रमहापातकविनासिनि रुद्राद्रीगोतुंगनिवासिनि श्रीविशाळादिसप्त

सततीर्थपवित्रीकितोत्तमांगे ब्रह्माराधित सिंघवाहनि श्रीमत्कोल्लापुर

[१५६] बॉम्बे कर्नाटक इंस्क्रिप्शन्स खंड १ भाग २.लेख ८५

पीठादिपीठाधिष्टिते देवादिदेविश्रीमन्महालक्ष्मीदेव्या (देव्याः) पाद

पद्मोपजीवियरप्प....

कोल्हापुर महालक्ष्मीचे पीठ जम्बुद्रीपांतर्गत शिवक्षेत्रात वसलेले आहे. महालक्ष्मी महापातकविनाशिनी महाशक्ति असून रूद्राची अर्धांगिनी , सिंहवाहिनी , सकल देवगणांच्या आद्यस्थानी असलेली, विशाळादि सप्तशत तीर्थांनी पवित्र झालेली , चौसष्ठ योगिनीं व सिद्ध्र गणांनी परिवेष्टित आहे. या वर्णनां वरून कोल्हापुरची महालक्ष्मी पूर्णपणे शिवरूपात असलेली दिसून येते . सिद्धेश्वर मंदिराला दान करणारा मारसिंघ प्रभु हा कोल्हापुरच्या महालक्ष्मीचा भक्त प्रभुराजवर्मन् याचा वंशज होता.

अशाच प्रकारे वर्णन असलेले आणखी दोन लेख या मंदिराच्या भिंतीवर आढळून येतात. यातील दुसरा लेख[१५७] शोभकृत संवत्सर, शके९८५ (इ.स. १०६३) चा व तिसरा लेख[१५८] शक ९९० (इ.स.१०६८) चा आहे. या सर्व लेखांत कोल्हापुरच्या महालक्ष्मीचे वर्णन वरील लेखाप्रमाणेच जम्बुद्रीपांतर्गत शिवक्षेत्रात वसलेली,रूद्राची अर्धांगिनी, चौसष्ठ योगिनीं व सिद्ध्र गणांनी परिवेष्टित असा उल्लेख आलेला आहे.

शक संवत् ९८०(इ.स.१०५८), विलम्ब संवत्सर , पौष शुक्ल सप्तमी .गुरुवार. या दिवशी वितरित केलेला शिलाहारवंशीय राजांच्या लेखांमधील पहिला ताम्रपट [१५९] राजा मारसिंह याचा आहे. यात राजाने स्वतःस श्रीमन्महालक्ष्मीलब्धवरप्रसाद असे म्हणवून घेतले आहे. या वंशाचा उत्कर्ष व राज्याची समृद्धी कोल्हापुरच्या महालक्ष्मीच्या प्रसादानेच होत असते असा त्यांचा दृढ विश्वास होता.यानंतरच्या कोल्हापुरच्या सर्वच शिलाहारांच्या लेख व ताम्रपटात अशा प्रकारचे महालक्ष्मीला उद्देशून केलेले उल्लेख आढळतात .

चालुक्य विक्रम वर्ष १६, प्रजापति संक्रांत (२५ डिसेंबर १०९१) या दिवशीचा चालुक्य राजा विक्रमादित्य सहावा याच्या काळातील धारवाड जिल्ह्यातील गदग तालुक्यातील सोरटूर गावातील

---

[१५७] बॉम्बे कर्नाटक इंस्क्रिप्शन्स खंड १ भाग २.लेख ९९

[१५८] बॉम्बे कर्नाटक इंस्क्रिप्शन्स खंड १ भाग २.लेख ५३१.पृ.३६०

[१५९] मिराशी.१९७४.पृ.२४६

कल्लेश्वर मंदिरासमोरील भिंतीवरचा शिलालेख [१६०] संस्कृत व कानडी भाषेत व कानडी लिपीत आहे. या काळात शिलाहार वंशीय गंडरादित्य राजा कोल्हापुर येथे राज्य करीत होता . तेल्लिग जक्कियब्बे या स्त्रीने २०० महाजनांकडून काही जमीन विकत घेवून तीजमीन ब्राह्मणांच्या भोजनाच्या सोयीसाठी मंदिरासाठी दान केली. या लेखात दोन तारखा असून पहिली तारीख चालुक्य विक्रम वर्ष १६, प्रजापति,पुष्य शुद्ध १२ गुरुवार उत्तरायण संक्रांती (२५ डिसेंबर १०९१) व दुसरी तारीख चालुक्य विक्रम वर्ष १७, आंगिर पुष्य शुद्ध दशमी रविवार, उत्तरायण संक्रांती (२६ डिसेंबर १०९२) अशा आहेत. हे लेख चालुक्य राजा विक्रमादित्य सहावा याच्या काळचे आहेत .

श्रीमत्कोल्लापुरद महालक्ष्मीदेवियर् सोरटवुरमं दुष्टनिग्रहविशिष्ट प्रतिपाळनेयिनाळदुपरिरक्षिसुत्तमिरे... या उताऱ्यावरून कोल्हापुरची महालक्ष्मी सोरटूर गावाचे रक्षण करणारी देवता होती असे दिसते .

याच चालुक्य राजाच्या काळचा शिलालेख [१६१] त्याच्या ३१ व्या राज्य वर्षी शके १०२८ (इ.स. ११०६) मध्ये व्यय संवत्सर, माघ पौर्णिमेस शुक्रवारी सोमग्रहणासमयी दिल्याचे नमूद केले आहे. या काळापासून महालक्ष्मीस दिलेली दाने आपणास आढळून येतात . या लेखात चालुक्य विक्रमादित्य सहावा या राजाच्या हाताखालील अधिकारी सोमन्नेय कोल्हापुरावर प्रभुत्व गाजवीत असता तो , त्याची पत्नी लखुमादेवी, पुत्र भेड्डय व पुत्री भेडकेव्य या सर्वांनी कोल्हापुर येथील महालक्ष्मीच्या अंगभोगासाठी कपिल गावातील चार मत्तर जमीन व एका घराची जागा कुबेरनायक नावाच्या गृहस्थास दान दिल्याचा उल्लेख आहे . महालक्ष्मीसाठी दान दिल्याचा हा सर्वात पहिला उल्लेख आहे .

कोल्हापुर परिसरात सापडलेला व सध्या लक्ष्मीविलास वस्तु संग्रहालयात असलेला वीरगळ रित्ती आणि करवीरकर [१६२]यांनी प्रथम दृष्टिपथास आणून दिला . या महत्वाच्या वीरगळाचा खालचा अर्धा भाग तुटलेला आहे . लहानसा लेख वरील भागात आहे .

---

[१६०] साऊथ इंडियन इन्स्क्रीप्शन्स .खंड ११.पृ.१६५,खंड १५. पृ.९:बॉम्बे कर्नाटक इंस्क्रिप्शन्स .खंड १ भाग २,.पृ.९

[१६१] खरे.१९५८ .पृ.४८

[१६२] रित्ती व करवीरकर. २००० .लेख क्र.२५ . पृ.१२६

स्वस्ति श्रीमहालक्ष्मीदेवियरल्लिगे चोलमं बंदु देगुलम (मं)

सुडुवागे मालागार मुथ्थय्य देवियरग्गे वेलेगोंडु काडी

या लेखात काळ व तिथीचा उल्लेख नाही .परंतु रित्ती यांच्या मते या लेखाची लिपी ११व्या शतकाच्या मध्यातील आहे . लेखाची भाषा व लिपी कानडी आहे. या लेखात जेव्हा चोल राजाने श्री महालक्ष्मी मंदिरावर आक्रमण करून हे मंदिर जाळण्याचा प्रयत्न केला तेव्हां मुथ्थया नामक फूल विक्रेत्याने या दुष्ट कृतीला विरोध करताना आपले प्राण गमावले असा उल्लेख आहे . लेखावरून महालक्ष्मी मंदिराचा समोरचा काही भाग लाकडी असावा. ढेरे यांच्या मते त्यावेळचे महालक्ष्मी मंदिर म्हणजे त्याचे मंडप शिळांनी बांधले नसावे . आजचे भव्य शिलामंदिर उभारले जाण्यापूर्वीची ही घटना असावी आणि त्यावेळी श्रीमहालक्ष्मीचे मंदिर आजच्या गरुड मंडपासारखे काष्ठद्रव्याने घडविलेले असावे[१६३]चोल राजा राजाधिराज (इ.स.१०१८- ते इ.स.१०५४)याने आपला भाऊ राजेंद्र याच्याबरोबर चालुक्यांवर आक्रमण केले याचा पुरावा आपणास चोलांच्या शिलालेखांवरून मिळतो . जरी चालुक्यांच्या लेखांत या लढाईचा फारसा उल्लेख नसला तरी राजेंद्र चोलाच्या(इ.स.१०५२ ते इ.स.१०६४) मणिमंगल लेखात [१६४](इ.स.१०५५)या लढाईचा विस्ताराने उल्लेख आहे . यात चालुक्य राजा सोमेश्वर प्रथम(इ.स.१०४२ ते इ.स.१०६८) याचा पराभव करून चोलांनी कोल्हापुरात जयस्तंभ उभारल्याचे नमूद केले आहे . आज तो जयस्तंभ जरी उपलब्ध नसला तरी वरील वीरगळाच्या आधारे चोलांचे आक्रमणावेळी महालक्ष्मी मंदिराला आक्रमणाची झळ पोहोचल्याचे दिसून येते.

या वीरगळाचे वैशिष्ट्य म्हणजे याच्या वरील पट्टिकेत उजव्याबाजूस महालक्ष्मी व डाव्याबाजूस महाकाली कोरलेली आहे. मध्यात शिवलिंग व त्याबरोबर पुरुषमूर्ति किंवा गंधर्व कोरलेले आहेत. या वीरगळावरील महालक्ष्मीचे अंकन तो महालक्ष्मीचा भक्त असल्यामुळे असणार. या महालक्ष्मीचे रूप म्हणजे समभंगात उभी असून तिच्या हातात दक्षिणाध:क्रमाने महाळुंग.गदा.खेटक व पानपात्र आहे.महाकाली बैठी असून तिच्या हातातील आयुधे स्पष्ट नाहीत.परंतु तिची बसण्याच्या ढबीवरून महाकाली मंदिराच्या गाभाऱ्याच्या ललाटबिंबावरील मूर्तीसारखी वाटते. अशाच तऱ्हेचे आणखी एक

---

[१६३] ढेरे.२००९ .पृ१५

[१६४]माऊथ इंडियन इन्स्क्रीपशन्स .खंड ३ .लेख क्र.२९

वीरगळ कोल्हापुरच्या टाऊन हॉल वस्तु संग्रहालयात आहेत. टाऊन हॉल वस्तु संग्रहालयातील वीरगळात वरील पट्टिकेत मध्यभागी उभी महालक्ष्मीची मूर्ती असुन तिच्या हातात महाळुंग, गदा, खेटक व पानपात्र आहे. तिच्या शेजारी उजवीकडे एक स्त्री बसलेली आहे. तिच्या हातील वस्तू अस्पष्ट आहे. डाव्याबाजूस एक पुरुष उभा आहे.

विजापुर जिल्ह्यातील जमखंडी तालुक्यातील एरंडा या गावातील नेमिनाथ बसदीच्या भिंतीवरील[165] शक वर्ष ११०४ प्लव संवत्सर, अश्वयुज बहुल ३, आदित्यवार (इ.स.११८१) या तारखेचा लेख[166] कानडी भाषेत असून व कानडी लिपीत लिहिलेला आहे. या लेखात अगस्त्येश्वर, कणलिंगेश्वर, महालक्ष्मी मंदिर कोल्हापुर व महालिंगदेव मंदिर गोकाक येथील घटिकास्थानांचे आचार्य, येळकोटि व गण मंडळी यांनी जमून घोषणा केली की निंबदेव सावंत याने बांधलेली रूपनारायणबसदी पूर्वी गोंकजिनालयाशी संबंधित होती ती तेरदाळमधील मूलस्थान कल्लिदेवाबरोबर जोडण्यात आली आणि गोंकजिनालयाचा आचार्य प्रभाचंद्र पंडित यास योगपट्टिका दान करण्यात आली. महत्त्वाची गोष्ट म्हणजे या लेखात नेमिनाथास महाविरोधियोनिश्वर म्हटले आहे. या लेखावरून त्याकाळात महालक्ष्मी देवालय हे विद्यार्जनाचे मोठे स्थान होते व त्यावेळी हिंदूंचा मोठा पगडा जैनांवर असल्याचे दिसून येते.

शिलाहार राजा भोज द्वितीय याने मंगळवार, पौष वद्य १२ साधारण संवत्सर, उत्तरायण संक्रांत, शके १११२, (२५ डिसेंबर इ.स. ११९०) या दिवशी प्रणालक मुक्कामी उमामहेश्वर देवालय व मठाला दिलेल्या देणगीबरोबर महालक्ष्मीला त्रिकाल नैवेद्यासाठी दानाची सोय केली असा उल्लेख आहे. भाषा संस्कृत गद्य व पद्यात आहे. या लेखाची शिळा महालक्ष्मी मंदिराच्या आवारातील अण्णाचार्य पंडितांच्या घराच्या भिंतीत बसवलेली होती. ती आता लक्ष्मीविलास पॅलेस वस्तुसंग्रहालयात आहे. या लेखात तीन तिथींचा उल्लेख आला आहे. पहिली तिथी पौष वद्य १२, साधारण संवत्सर, उत्तरायण संक्रांत, शके १११२(गतवर्ष) (मंगळवार २५ डिसेंबर ११९०), दुसरी तिथी अश्विन शुक्ल पक्ष १, परिधावि संवत्सर. शके १११४(गतवर्ष), बुधवार, ९ सप्टेंबर ११९२ व तिसरी तिथी शुक्रवार, फाल्गुन शुक्ल ५, प्रमादि संवत्सर, (२८ फेब्रुवारी ११९४) अशी आहे.

---

[165] गोपाल.पृ.२९७-२९९

[166] कर्नाटक इन्स्क्रीप्शन्स सिरीज. खंड ५.पृ.२९७-२९९

या लेखातील[१६७] वर्णन असे आहे-

भौमवारे भानोरुत्तरायणसंक्रमणपर्व्वणि निजराज्याभिवृद्धये सहवासिलोकणनायकेन कारितस्य मठस्य अमृतेश्वरमूर्त्युमामहेश्वरदेवस्य पंचोपचारपूजार्थं सहवासिब्राह्मणभोजनार्थ श्रीमहालक्ष्मि (क्ष्मी)देव्यास्त्रिकालनैवेद्य परिचालार्थ ....

या दानात उमामहेश्वर देवालय व मठाला दिलेल्या देणगी बरोबर महालक्ष्मीला त्रिकाल नैवेद्यासाठी दानाची सोय केली आहे .

दुसऱ्या भोजाच्या पराभवानंतर ह्या प्रांताची सत्ता देवगिरी यादवांच्या हाती गेली. देवगिरीच्या यादवांनीही या देवीस तेव्हढेच मानाने वागविल्याचे दिसून येते.

महालक्ष्मीच्या मूर्तीच्या वर्णनाचा महत्वाचा शिलालेख[१६८] यादव सिंघण द्वितीय याच्या कारकीर्दीतील महालक्ष्मी मंदिराच्या आवारातील गणपती देवालयाच्या पायऱ्या चढताना उजव्या अंगच्या खांबाच्या पूर्व बाजूस कोरलेला आहे . या लेखाची भाषा संस्कृत व लिपी नागरी आहे . या शिलालेखाचा काळ बोधायन संवत्सर , शके ११४० (इ.स. १२१८) असा आहे .हा लेख असा आहे-

श्री ओं नम: शिवाय शुभयास्तु महालक्ष्मीर्भगवंता भवतारिणी ।

बिभ्रती शिरसा लिंगमशेषाघौघहारिणी।।

या लेखात सर्वात्त आधी शंकराला नमन व नंतर डोक्यावर शिवलिंग धारण करणारी असे महालक्ष्मीचे वर्णन केले आहे .याच लेखात नंतर राजा सिंघणाने महालक्ष्मीस अनेक उत्तम आभूषणे दान केली असा उल्लेख आहे .

तोषिता श्रीमहालक्ष्मीर्यनानेकविभूषणे: ।स श्रीसिंघनभू...

याच लेखात तैलण नामक व्यक्तीने महालक्ष्मी मंदिरासमोर एक भव्य तोरण बांधल्याचा उल्लेख आहे

---

[१६७] मिराशी, १९७४ ,पृ.३२६-३२८

[१६८] मिराशी, भा.इ.सं.मं., १९५७ ,पृ. १७-१९

त्य तैलण इति प्रख्यातकीर्ति: कलौ (प्राका) रं भ (भू)वि

शुद्धबुद्धिकरोदे(द्दे)

व्या पुरस्तोरणं ।।शक वर्ष ११४० बहुधान्य संवत्सरे देव्या पुरत:

त)तो(स्तो)रणं

तामिति ।इह हिमालय सभ्र ˘ - नया कृतनिवासरसं सह संभ्रमं

विरचितं त

व तोरण मुत्तमं जयति येन कलौ स च तैलण: ।

महालक्ष्मी मंदिर आवारात सरस्वती देवालयाच्या दर्शनी भिंतीवरील लेख[१५५] यादव राजा सिंघण(द्वितीय) याच्या काळातील आहे. हेमलंबी संवत्सर ,फाल्गुन वद्य १४, शके ११५७ (इ.स. १२३५) . लेखाचा बराच भाग अस्पष्ट आहे . तरीही त्यावरून यादव राजा सिंघण याचा अधिकारी लक्ष्मण याने महालक्ष्मीच्या महालक्ष्मीच्या पूजेअर्चेकरिता दाने दिली असे दिसते.

या लेखात

ओं नम:शिवाय स्वस्ति श्री महाराजाधिराज

श्रीमत् प्रौढ प्रताप चक्रवर्ती श्री सिंघ(ण) देव विजयते राज्योदये

तत्पादपद्मोपजी(वी) श्री महालक्ष्मी वर प्राप्तोत्तराधिकारी

श्री लषुमण क्षितिपाल शके ११६० हेमलंबी संवत्सरे फाल्गुन वदि १४ रात्रौ श्री महालक्ष्मी

१ल महास्थान सहित श्री लक्ष्मुमण मठिया

मालिआ प्रभु.....१० धारापूर्वक विनिर्मत

केला श्री महालक्ष्मीचा धर्म ......

[१५५] बा.बा .महाराज,२००२ , पृ.६३

स्वदत्ता परदत्ता वा विष्टाया (हरेत वसुंधरा) षष्टि व

र्ष सहस्त्राणि विष्टाया जायते ( ) क्रीमहि ।। प्रसेन दत्त

शिलालेखाच्या प्रारंभी सूर्य ,चंद्र ,तलवार,गाय, वासरू व शिवलिंग कोरले आहे. यादव राजा सिंघण याचा अधिकारी लक्ष्मण याने महालक्ष्मीच्या पूजेअर्चेकरिता जी दाने दिली त्यांचा उल्लेख आहे. हा शिलालेख श्री. वाळवेकर यांच्या नजरेस आला व खरे यांनी त्याचे वाचन केले.

यादव सिंघण याच्याकाळातील महालक्ष्मीबरोबर महाकालीचाही उल्लेख आलेला शिलालेख कोल्हापुर येथील रावणेश्वर तळ्याजवळील रामेश्वर मंदिराच्या दक्षिणेकडील भिंतीत बसवलेला शिलाखंड आज लक्ष्मीविलास पॅलेस वस्तुसंग्रहालयात आहे. या शिलाखंडावरील लेख[१७०] मन्मथ संवत्सर ,गुरुवार ३०,श्रावण वदि शके ११५८(१५ ऑगस्ट इ.स. १२३५) या काळाचा आहे . या लेखाची भाषा संस्कृत असून लिपी बाळबोध आहे. या लेखात महालक्ष्मीची स्तुती केली असून सिंघणदेवाची भरभराट होवो अशी इच्छा प्रगट केली आहे.

स्वस्ति श्री शक११५७ मन्मथ संवत्सरे श्रावण बहुल ३० गरउ स्वस्ति श्री जम्बुद्वीपांतर्गत शिवक्षेत्रे सकल त्रैलोक्य प (प्र)थिते कोल्लापुरनिवासिनिश्रीमहालक्ष्मी श्री महाकलिदेव्याश चिरं जयतु स्वस्ति श्री प्रौढ प्रताप चक्रवर्ती(श्री सिंघण देव विज)

या लेखात श्रीकोल्लापुरनिवासिनी श्रीमहालक्ष्मी श्रीमहाकाली या दोन्ही देवतांचा विजय असो असा उल्लेख आहे . या लेखातील महाकालीचा उल्लेख महत्वाचा आहे.महालक्ष्मी बरोबर महाकालीचा उल्लेख हा पहिल्यांदाच आलेला आहे . हा लेख इ.स. १२३५ चा यादव राजा सिंघण द्वितीय याच्या काळचा आहे. त्यावरून इ.स. १२३५ मध्ये महालक्ष्मी बरोबर महाकालीचेही देवालय अस्तित्वात होते असे दिसून येते .

---

[१७०] ग्रॅहम,१८५४:पृ.३३०,४२६

कोल्हापुर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील अब्दुल लाट या गावातील कल्लेश्वर मंदिरात ठेवलेला शिलालेख[171] यादव सिंघण कान्हरदेव याच्या काळातील असून या लेखाची भाषा व लिपी दोन्ही कानडी आहे . या लेखात कोल्हापुरास दक्षिण वाराणसी शिवक्षेत्र चतु:षष्ठीयोगपीठ म्हटले आहे

श्रीमद् अनादि (तीर्थम्) जम्बुद्वीप सि (शि) (खा))मणि दक्षिण वाराणसी (शि)व क्षेत्रम् चौस(श)ष्ठी योग – पीठाधिपती श्रीमहालक्ष्मी ...महाकाली ...चरण... सरसीरुह भ्री (भृ)गरुमं

या लेखाचा काळ आषाढ बहुल (कृष्ण) ११ सोमवार शके ११७४ (सोमवार ९ जुलै इ.स.१२५२) असा आहे . या लेखातही महालक्ष्मी बरोबर महाकालीचा उल्लेख आलेला आहे . त्यावरून एव्हाना महालक्ष्मी बरोबर महाकाली देखील प्रसिद्धी पावलेली होती असे दिसते .

यादव नृपती महादेव याच्या काळचा[172] क्रोधन संवत्सर , माघ शुद्ध पौर्णिमा शके ११८७ (१२ जानेवारी १२६६)चा लेख महालक्ष्मी मंदिराच्या आवारातील नवग्रह मंडपाच्या स्तंभावर कोरलेला आहे . या लेखाची भाषा संस्कृत असून लिपी १३ व्या शतकातील नागरी लिपी आहे. या लेखाचा उद्देश कनकचंद्र आणि हेगडे वसवदेव यांनी ईश्वरकेशव व नरसिंह यांना णेमादेवी बसदीची व्यवस्था लावण्यासाठी काही जमीन देणगीदाखल दिल्याचा आहे.या लेखाचे महत्व म्हणजे एका जैन व्यक्तीने जैन बसदीसाठी दान करीत असता सुरवातीस महालक्ष्मीची स्तुती केली आहे .

स्वस्ति श्री श्रेँयोस्तु श्रीमहालक्ष्म्या साकाप्राक्तनी तनु:।

प्राय (य:) त्रैगुण्यसंपत्ति (र्त्तिं)यत: प्रादि (प)सुरत्रयी ।।

कर्नाटकातील सिधनुरली येथील सिद्धेश्वराच्या देवालयाच्या भिंतीवरील लेखाचा[173] काळ श्रावण पौर्णिमा भौमवार, शक ११९९ असा आहे. या लेखात महालक्ष्मीविषयी मंगल वचन आलेले आहे.

---

[171] रित्ती व करवीरकर.२०००, पृ.१०८

[172] मिराशी.भा.इ.सं.मं. १९५७ ,पृ.२१-२२

[173] खरे.१९५८.पृ.४१

प्रपद्ये श्रीमहालक्ष्मी पदपंकजसंभवाम्

कायामायोपधिं....जनतामोदकौमुदिम्

खरे यांच्या मते शक ११९० ते ११९९ या काळात श्रावण पौर्णिमेस भौमवार येत नाही.काल वाचनात काही चूक असावी.

कोल्हापुरातील वरुणतीर्थ वेशीजवळ कोटाच्या भिंतीत बसवलेल्या लेखाची[१७४] भाषा संस्कृत व लिपी बाळबोध आहे . हा लेख यादव नृपती रामदेव याच्या काळचा माघ पौर्णिमा , चंद्रग्रहण , अंगिरस संवत्सर, शके ११२४ (इ.स.१२७२) चा आहे . या लेखात महालक्ष्मीचा निर्देश करणारे मंगल वचन आले आहे .

रक्षंतु वो महालक्ष्मीकुदाक्षद्वंदकेलय: ।

वारुणासर सिपद्मव-ना द्वैत वृनया ।।

या लेखात राजा रामदेवाने विश्वरूप नामक उपाध्यायाला ब्रह्मेश्वराच्या पंचामृतपूजा, अष्टांगपूजा व मंत्रनैवेद्य यासाठी व ब्राह्मणभोजन घालण्यासाठी दान दिले असा उल्लेख आला आहे.

कोल्हापुरात राशिवडेकर यांच्या घराच्या प्रवेशद्वाराजवळ ठेवलेल्या एका शिळेवर यादव नृपती महादेवाच्या काळातील त्रुटित लेखात[१७५]

।। श्रीमहालक्ष्मी द्विती - ।।।।या वसरमुकुटपाट कुसुमार्थ ती - ।।

।। ग्रामदत्त भूराटत्रया प्रतिवर्ष स्थलप –

।।तिकरोद्वादशनिष्कान्सन्मालाकारेभ्य: ।।स्वस्ति प्रपद्ये श्री महालक्ष्मीपदपद्मातपत्रयो: ।

[१७४] ग्रॅहम.१८५७:पृ.४४३-४४६

[१७५] रित्ती व करवीरकर.२००० .पृ.११८-१२१

असा उल्लेख आला आहे . महालक्ष्मीच्या दुपारच्या पूजेसाठी ,तिचा मुकुट सजविण्यासाठी फुले पुरवावीत असे सांगितले आहे. या लेखाचा काळ व तिथी यांचा उल्लेख नाही .हा लेख सध्या लक्ष्मीविलास पॅलेस वस्तूसंग्रहालयात आहे.

करवीरकर यांच्या दृष्टीपथास आलेला एक शिलालेख (ह्या लेखाची प्रतिकृति करवीरकर यांच्याकडे आहे) ज्योतिबाच्या डोंगरावरील विहिरीजवळच्या कमानीत बसविलेला आहे . यादवकालीन या लेखात चैसास या ब्राह्मणास महालक्ष्मीस नंदादीपासाठी गिरोलग्रामामधील जमीन दान दिल्याचा उल्लेख आहे . या लेखाचे पूर्ण वाचन न झाल्यामुळे काळ व तिथी समजू शकली नाही.

कर्नाटकात अरळीकट्टी (बदामीपासून पूर्वेकडे अर्ध्या मैलावर)दगडावर कोरलेल्या ३०-४० मूर्ती आहेत.त्यात विष्णु व इतर देवतांच्या मूर्ती आहेत . मूर्तींच्या ओळींच्या पूर्वेस महालक्ष्मीविषयी लेख[१७८] आलेला आहे .या लेखाची लिपी नागरी असून भाषा संस्कृत आहे. या लेखात तिथीचा उल्लेख नाही. परंतू अक्षरांच्या ठेवणीवरून लेखाचा काळ इ.स.१६ किंवा १७वे शतक इतका असावा.

स्त्रीकोल्लापुरवरेश्वर्ये स्त्रीमहालक्ष्म्यै नमः

हारीतकुलसंभूतरविदेवत्रिदंडिनः

तुष्टा कोल्लापुरादेवी महालक्ष्मीरिहागता।।

लक्ष्मीमहात्म्यं मंगलम् महाश्री महालक्ष्म्यै नमः

श्री कोल्हापुरच्या महालक्ष्मीला नमन असो . हारीत कुलात जन्मलेल्या रविदेव त्रिदंडीने संतुष्ट केलेली श्रीमहालक्ष्मी कोल्हापुर क्षेत्राहून येथे आली . तिचा महिमा विशेष आहे , तिला पुनः पुनः नमन असो .

कोल्हापुरावर राज्य करणाऱ्या राजांप्रमाणेच त्यांचे मांडलिकही महालक्ष्मीचे भक्त असल्याचे दिसून येते . शिलाहार राजा मारसिंह याच्या आधीही चालुक्य राजा सोमेश्वर प्रथम(इ.स.१०४२ ते

---

[१७८] इंडियन ॲन्टीक्वेरी खंड १० , पृ.६५ ; ढेरे ,२००१ ,पृ.२६६

इ.स.१०६८) याचा मांडलिक चावुंडरायरस[177] याच्या मेदूर येथील उपलब्ध झालेल्या लेखात त्याने स्वतःस श्रीमहालक्ष्मीलब्धवरप्रसाद म्हणवून घेतले आहे . या लेखाचा काळ पार्थिव संवत्सर, माघ शुद्ध पंचमी (१५ जानेवारी १०४६) आहे . या लेखावरून शिलाहार राजा मारसिंह याच्या आधीही हे बिरुद धारण केल्या जात होते असे लक्षात येते.

चालुक्य राजा विक्रमादित्य सहावा याचा मांडलिक अवररस याचा विजापूर जिल्ह्यातील अरसिबेडि इथल्या शिलालेखात[178] या मांडलिकाने स्वतःस महालक्ष्मीलब्धवरप्रसाद म्हणवून घेतले आहे.

महामंडलेश्वर चालुक्य विक्रमादित्य सहावा याच्या अधिसत्तेखाली राज्यकारभार सांभाळणारा भीषणदेवरस याचा[179] चालुक्य वर्ष ३५,नंदन संवत्सर, पौष शुद्ध १०,रविवार,उत्तरायण संक्रांत (२९ डिसेंबर १११२) तारखेच्या लेखात त्याने स्वतःस महालक्ष्मीलब्धवरप्रसादादिस असे म्हणवून घेतले आहे . हा लेख विजापूर जिल्ह्यातील बागेवाडी तालुक्यातील दिंडवाड येथून उपलब्ध झाला आहे .

राजा कर्ण याचे शिलालेख :

महालक्ष्मीचा उल्लेख असलेला एक लेख महालक्ष्मी देवळाच्या एका पाषाणावर[180] असल्याचा उल्लेख ग्रॅहम याने केला आहे . चालुक्य कुलातील राजा कर्णदेव याच्या वंशातील राजा सोमदेव महालक्ष्मीच्या माध्यान्ह पूजेसाठी आला असता त्याने कुंभारगाव हे गाव महालक्ष्मीस दान दिले . या लेखाची लिपी बाळबोध व भाषा संस्कृत आहे . या लेखात कोल्हापुर या ग्रामनामाचा उल्लेख नाही . या लेखाचा ठसा देखील ग्रॅहम याने आपल्या पुस्तकात छापलेला नाही .

अशाच प्रकारचा एक लेख[181] जांभेकर यांनी प्रकाशित केला . या लेखात चालुक्य वंशातील राजा कर्ण याची वंशावळ देऊन त्याचा वंशज सोमदेव वा सोमेश्वर याने महालक्ष्मीच्या रोजच्या माध्यान्ह पूजेच्या वेळी मोदकाच्या नैवेद्यासाठी कुंभार हे गाव दान दिले . जांभेकर यांनी देखील शिलालेखाचा ठसा

[177] अण्णेगिरि,१९६१ , पृ.४०-४३
[178] इं.एन्टी. ,खंड४ ,पृ.१७९
[179] बॉम्बे कर्नाटक इन्स्क्रिप्शन्स . खंड १भाग २ .पृ.१६२
[180] ग्रॅहम,१८५७;पृ.४३४-४३५
[181] जे.बी.बी.आर् ए.एस्. ,खंड १ भाग २ ,पृ१६२

न देता त्याचे भाषांतर प्रसिद्ध केले आहे . ग्रॅहम व जांभेकर यांनी प्रसिद्ध केलेल्या शिलालेखांत थोडा फार फरक आहे . जांभेकर यांनी प्रसिद्ध केलेल्या लेखातही कोल्हापुर या गावाचा उल्लेख नाही . महालक्ष्मी संबंधीचा आणखी एक लेख मांडलिक यांनी[१८२] प्रकाशित केला आहे .या लेखात शालिवाहन शक ३० मध्ये कर्ण नावाचा चालुक्य वंशातील राजाचा उल्लेख आलेला आहे . जांभेकर यांनी या लेखासाठी **संगमेश्वर माहात्म्याचा** आधार घेतला आहे .

कुंदनगार यांनी [१८३]वरील लेखांचा आधार घेऊन महालक्ष्मी मंदिराविषयी आपली मते मांडली .१)**करवीरमाहात्म्य** या ग्रंथाचा काळ इ.स.पूर्व ३रे शतक असून याकाळात याठिकाणी महालक्ष्मीची वेगळी मूर्ति असावी व नंतरच्या काळात कपिलतीर्थाच्या मागील मंदिरातील मूर्ती आणून याठिकाणी स्थापित करण्या आली .

२)महालक्ष्मी मंदिराचा निर्माता चालुक्य कुलातील राजा कर्ण होता व हा राजा इ.स.६व्या शतकानंतर झाला . मांडलिक यांच्या लेखातील शक ३० म्हणजे पुलकेशी द्वितीयने सुरु केलेले शक वर्ष असावे व त्याच काळात हा राजा होऊन गेला .

३)महालक्ष्मी मंदिर हे स्थापत्य दृष्ट्या चालुक्य पद्धतीचे आहे .

खरे यांनी आपल्या **महाराष्ट्राची चार दैवते** या पुस्तकात कुंदनगार यांची ही वरील मते खोडून काढले आहेत. त्यांच्या मते-१)**करवीर माहात्म्य** या ग्रंथाचा काळ इ.स.पूर्व ३रे शतक नसून इ.स.चे १४वे शतक आहे . (तगारे[१८४] यांनी **करवीर माहात्म्य** या ग्रंथाचा काळ इ.स.१३०० ते इ.स.१३५० सांगितला आहे.)

२)ज्या लेखाचा कुंदनगार यांनी पुरावा म्हणून वापर केला आहे तो लेखच अस्तित्वात नाही . चालुक्य राजा कर्ण द्वितीय पुलकेशीच्या काळात होऊन गेल्याचा आणखी कुठलाही पुरावा उपलब्ध नाही .

---

[१८२] जे.बी.बी.आर् ए.एस्. ,खंड ११ ,पृ.१०३-१११
[१८३] कुंदनगार,१९२९ ,पृ. १९-२६
[१८४] तगारे १९८०:पृ.४

पुलकेशी द्वितीय याचा चुलता मंगलीश याच्या काळात चालुक्यांचा कोकणातील अंमल दृढ झाला . कोल्हापुर, सातारा या भागात यावेळी म्हणजे इ.स.च्या ६व्या शतकाच्या उत्तरार्धात चालुक्यांची सत्ता प्रस्थापित झालेली दिसून येत नाही .त्यामुळे त्या वंशातील राजाने कोल्हापुरात देऊळ बांधणे तर्कदृष्ट्या अशक्य होईल .

३) मंदिर हे स्थापत्य दृष्ट्या चालुक्य काळातील म्हणले तर बदामी, ऐहोळे येथिल मंदिरांशी या मंदिराचे काहीही साम्य नाही . शैलीच्या दृष्टीने संगमेश्वर येथील कर्णेश्वर मंदिर११व्या शतकापूर्वीचे नक्कीच नाही (स्थापत्य व शिल्पशास्त्रदृष्ट्या). तसेच ते उत्तर चालुक्य कालीन मंदिरांशीही स्थापत्यदृष्ट्या जवळचे वाटत नाही .

आजही चालुक्य राजा कर्णाबद्दल आणखी काही नवीन माहिती उपलब्ध नाही . ग्रॅहम , जांभेकर व मांडलिक यांच्या लेखांचा आजही पत्ता लागत नाही . त्यामुळे खरे यांनी मांडलेली मते ग्राह्य धरण्यास काही हरकत नाही .

कुंदनगार यांनी कपिलेश्वर मंदिराच्या मागील मंदिरातून आणून बसविलेली आजची महालक्ष्मी आहे असे प्रतिपादन केले आहे . त्यामुळे करवीरपीठातील शंकराचार्य ज्यावेळी महालक्ष्मीच्या दर्शनास येतात त्यावेळी आधी ते कपिलेश्वराचे दर्शन घेतात व त्यानंतर महालक्ष्मीच्या दर्शनासाठी येतात . करवीरपीठाधीशांची मी स्वत: भेट घेऊन त्याबाबत खुलासा विचारला . त्यांचे म्हणणे असे आहे की कपिलेश्वर हे ग्रामदैवत असल्यामुळे आपण आधी ग्रामदैवताचे दर्शन घेतो व त्यानंतर महालक्ष्मीच्या दर्शनास जातो . कागदपत्रांतील पुराव्यांवरून महालक्ष्मीची मूर्ती काही काळ कपिलतीर्थाजवळील भवानी मंदिरात काही काळ ठेवल्याचे निष्पन्न झाले आहे .

१२व्या शतकाच्या सुरवातीस महालक्ष्मी आणि तिच्या मंदिराची ख्याती इतकी पसरली होती की अशा प्रकारचे देवालय आपल्याही राज्यात असावे असे भाविकांना वाटायला लागले व या मंदिरासारखी मंदिरे इतर राज्यातही निर्माण झालेली आपल्याला दिसून येतात.

याचे उत्तम उदाहरण म्हणजे कर्नाटक राज्यातील हासन जिल्ह्यातील दोड्डगड्डवळ्ळी येथील चतुष्कूट देवालय होय. हे मंदिर त्या मंदिरावरील भिंतीत असलेल्या लेखाप्रमाणे[१४५], इ.स. १११३ मध्ये अस्तित्वात आले. दोरसमुद्र येथे होयसळ नृपति विष्णुवर्धन राज्य करीत असता तेथील मोठा व्यापारी कल्हण राहुत व त्याची पत्नी सहजादेवी यांनी अभिनव कोल्लापुरमची निर्मिती केली. या लेखाचा काळ चैत्र शुद्ध १०, गुरुवार, विजय संवत्सर, शक१०३५ (२८ मार्च १११३) असा आहे.

श्रीमन्-महा-वड्डव्यवहारी कुल्हण-राहुतरुम् अर्धांग-शरीरियर अप्प सहजादेवीयरुम् श्रीमतु अभिनव-कोल्लापुरवम् गेयसि श्रीमन् महालक्ष्मी देविय प्रासादवम्

दोड्डगड्डवळ्ळी येथील देवालयातील महालक्ष्मीची मूर्ति मात्र लक्ष्मी स्वरूपात आहे. परंतू तिचे देऊळ कोल्हापुरप्रमाणेच पश्चिमाभिमुख असून उत्तरेस महाकाली आहे. दक्षिणेस मात्र भैरव असून पूर्वेस भुतनाथ आहे.

इ.स. १२व्या शतकात रचलेल्या सरस्वतीपुराण[१४६] या ग्रंथात महालक्ष्मीच्या देवळाचे वर्णन आले आहे.

पीठं कोल्लापुरं नाम देवीनां प्रीतिवर्धनम् । महालक्ष्मीसनाथस्तु भैरवस्तत्र नायकः ।।

यस्य पूर्वे महालक्ष्मी स्थिता कोल्लाच दक्षिणे। कंकाली पश्चिमे देवी महाकाली तथोत्तरे।।

एता पीठेन सहिताः सिद्धराजसरोवरे पीठं दृष्टं समायाता देवीना समये तदा।।

(सरस्वतीपुराण ३२.२४१-२४३)

गुजरातचा प्रसिद्ध राजा सिद्धराज सोलंकी याने अन्हिलवाड येथे सिद्धराज सरोवराकाठी महापीठ निर्माण केले. आज हे देऊळ आपणास पहावयास मिळत नाही, एवढे निश्चित की कोल्हापुरच्या महालक्ष्मीची कीर्ती गुजरातपर्यंत पोहोचली होती.

---

[१४५] आर् नरसिंहाचार. १९१९.

[१४६] ढेरे.२००१.पृ.२९२-२९४

वरील सर्व पुराव्यांच्या आधारे आपणास लक्षात येते की

ताम्रपटीय व आभिलेखिक पुराव्यांवरून महालक्ष्मीचा सर्वात पहिला उल्लेख राष्ट्रकूट राजा अमोघवर्ष (प्रथम) याच्या संजान ताम्रपटात (इ.स.८७१)आला आहे. या लेखात महालक्ष्मीचा उल्लेख असला तरी कोल्हापूरचा उल्लेख नाही. ही महालक्ष्मी कोल्हापूरचीच असावी ह्या भांडारकरांच्या मतास खरे व मिराशी यांनी दुजोरा दिला आहे .जर हे मत ग्राह्य मानले तर नवव्या शतकाच्या तृतीय पादात किंबहुना त्या अगोदर कितीतरी वर्षे महालक्ष्मीचे ठाणे अस्तित्वात होते. परंतु त्याचे रूप आजच्याप्रमाणे नव्हते हेही तेव्हढेच खरे .

आजच्या मंदिराची प्राचीनता जरी त्या काळापर्यंत नेता आली नाही तरी तिचे वास्तव्य त्या ठिकाणी निश्चितच होते.

कदंब कुलातील राजा द्वितीय गुहल्ल याच्या सावई-वेरे ताम्रपटात (२३ मार्च इ.स.१०३८) कदंब राजा षष्ठदेव (द्वितीय)कोल्हापुरास महालक्ष्मीच्या दर्शनास नेहमी येत असे. षष्ठदेवाचा काळ इ.स.१००५ ते इ.स.१०५० असा आहे.या ताम्रपटावरून इ. स. १०३८ च्या सुमारास महालक्ष्मीच्या कोल्हापुरातील ठाण्यास दुजोरा मिळतो.

इ.स. १०४९,इ.स.१०६३ व इ.स.१०६८ मधील कर्नाटकातील शिलालेखांवरून त्याकाळी महालक्ष्मीचे हे ठाणे शिवक्षेत्रात मोडत होते हे लक्षात येते. यातील वर्णनावरुन महालक्ष्मी रुद्राची अर्धांगिनी,सिंहवाहिनी व चौसष्ठ योगिनींच्या सहवासात राहणारी असे वर्णन आले आहे.म्हणजे कोल्हापुरच्या महालक्ष्मीची ख्याती कोल्हापुर परिसराच्या बाहेरही पसरल्याचे दिसून येते.

लक्ष्मीविलास पॅलेस वस्तू संग्रहालयातील ११ व्या शतकातील वीरगळावरून चोल व चालुक्यांमध्ये कोप्पम (आजचे कोप्पेश्वर, तालुका शिरोळ,जि.कोल्हापुर)येथे झालेल्या लढाईत कोल्हापुरातील महालक्ष्मी देवालयास क्षति पोहोचल्याचे दिसून येते.यावेळी मंदिरावर झालेल्या आक्रमणात चोल बंधूंनी मंदिर जाळण्याचा प्रयत्न करीत असता मुथय्या नामक फूलविक्रेत्याने मंदिर वाचवताना आपले प्राण गमावले अशा आशयाचा हा लेख आहे.वीरगळाचा खालील भाग तुटल्यामुळे संपूर्ण माहिती

मिळू शकली नाही, परंतु शिलालेखावरून इ.स.१०५०-५२ याकाळात महालक्ष्मी मंदिराचा निदान मंडपासकट काही भाग तरी लाकडी निश्चितच असावा.

शिलाहार राजा भोज द्वितीय याने महालक्ष्मीला (इ.स.११९०) त्रिकाल नैवेद्यासाठी दानाची सोय केली.यादव सिंघण (द्वितीय) याच्या काळातील (इ.स. १२१८) लेखात शिवलिंग धारण करणारी असे महालक्ष्मीचे वर्णन व राजाचा अधिकारी तैलण याने मंदिरासमोर भव्य तोरण बांधल्याचा उल्लेख आहे.हे तोरण कशाप्रकारचे होते याचा आज अंदाज आज तरी लावता येत नाही.

इ.स.१२३५ च्या यादव सिंघण (द्वितीय)च्या लेखात पहिल्यांदा महालक्ष्मी बरोबर महाकालीचाही उल्लेख आलेला आहे. म्हणजे इ.स. १२३५ च्या काळात महाकालीचे मंदिरही अस्तित्वात होते असे मानावयास हरकत नाही.असाच महालक्ष्मीबरोबर महाकालीचा उल्लेख इ.स.१२५२च्या यादव राजा कान्हरदेव याच्या लेखात आला आहे. इ.स.१२६६ च्या लेखात जैन बसदीला दान देत असता महालक्ष्मीविषयी मंगलचरण आले आहे.यावरून हिंदू व जैन धर्म एके ठिकाणी सुखेनैव एकत्र नांदताना दिसून येतात.

चालुक्य राजा सोमेश्वर प्रथम(इ.स.१०४२-१०६८)याचा मांडलिक चावुंडरायरस , महामंडलेश्वर चालुक्य विक्रमादित्य सहावा याच्या अधिसत्तेखाली राज्यकारभार सांभाळणारा भीषणदेवरस, अवररस हे राजे देखील महालक्ष्मीचे भक्त असलेले देसून येतात.

ग्रॅहम ,जांभेकर व मांडलिक यांनी वर्णन केलेला चालुक्य राजा कर्ण याच्या अभिलेखाचा ठोस पुरावा आजही उपलब्ध नाही. त्यामुळे चालुक्य वंशावळीत कोणी कर्ण नावाचा राजा झाला नाही हे खरे यांनी मांडलेले मत आजही ग्राह्य धरण्यास हरकत नाही .

महालक्ष्मी मंदिराची ख्याती हळूहळू इतकी पसरली की इतर राज्यातही महालक्ष्मीची ठाणी अस्तित्वात आली.इ.स.१११३च्या दोड्डगड्डवळ्ळी येथे मंदिराची निर्मिती झाली व त्या स्थानास अभिनव कोल्लापुर असे म्हणण्यात आले.तेथील मूर्तीचे रूप जरी लक्ष्मीचे असले तरी शिलालेखात तीस महालक्ष्मी असे म्हटले आहे.या मंदिरातही महालक्ष्मीबरोबर महाकाली असलेली दिसून

येते.**सरस्वतीपुराणात** (इ.स.११ वे शतक)आलेल्या माहितीनुसार गुजरातमधील सिद्धराज सरोवराकाठी सिद्धराज सोलंकी याने कोल्हापुरपीठाप्रमाणे मंदिराची निर्मिती केली.

कोल्हापुरच्या महालक्ष्मीचे कागदपत्रातील संदर्भ

कोल्हापुरचे महालक्ष्मी मंदिर व महालक्ष्मी मंदिराचे पुजारी (श्रीपूजक) यांच्या संबंधीची कागदपत्रे महाराष्ट्र शासनाच्या पुराभिलेखागार कार्यालय, कोल्हापुर येथे उपलब्ध आहेत. ही सर्व पत्रे मोडी लिपीत लिहिलेली असून या सर्व पत्रांचे एकत्र प्रकाशन झालेले नाही. ही पत्रे पुराभिलेखागार कार्यालयात महालक्ष्मी मंदिर, कोल्हापुर संबंधीची कागदपत्रे रुमाल क्रमांक १ व रुमाल क्रमांक २ अशा स्वरूपात कपड्यात बांधून ठेवलेली आहेत. मुंबईच्या पुराभिलेखागार कार्यालयाच्या परवानगीने ही पत्रे मला पहावयास मिळाली.पुजाऱ्यांच्या मालकीच्या दानांची कागदपत्रे श्री.शरद मुनीश्वर यांच्या ताब्यात आहेत. या श्रीपूजकांना वारसाने या मंदिरात पूजा करण्याचा हक्क देण्यात आल्याचे या कागदपत्रांवरून दिसून येते

. महालक्ष्मीसंबंधीची काही कागदपत्रे **ताराबाईकालीन कागदपत्रे** (खंड १,खंड २ व खंड ३)[१८७] यामध्ये व **करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने** (भाग १ व भाग २)[१८८] या पुस्तकांत प्रकाशित झालेली आहेत. खरे यांच्या **महाराष्ट्राची चार दैवते** या पुस्तकातही त्यांनी स्वत: बघितलेली काही कागदपत्रे प्रकाशित झालेली आहेत.

कोल्हापुर पुराभिलेखागारातील कागदपत्रांत मंदिराच्या हक्कदार पुजाऱ्यांना वेळोवेळी ईनाम म्हणून दिलेली गावे ,मंदिराच्या दरवर्षी होणाऱ्या उत्सवास निरनिराळ्या किल्लेदारांकडून आलेल्या देणग्या, इ.स. १७७८ ते इ.स. १८६४ दरम्यानचे महालक्ष्मी मंदिराबाबतच्या जमाखर्चाचे वार्षिक ताळेबंद चिकडबंदी स्वरूपात आहेत.

पुराभिलेखागारातील काही कागदपत्रे (मी स्वत: बघितलेली)

१) रुमाल क्र.१,पत्र क्र. १९,ता.२१-४-१७०८:नरहरीभट व शिवरामभट यांना नवीन गावातील (मौजे मजकुरी) जमीन वंशपरंपरेने दिल्याचे दिवाण ठाणे कोल्हापुर यास राजश्रीकडून पत्र.

---

[१८७] अप्पासाहेब पवार, १९६९

[१८८] गुजर, १९६२

२) रुमाल क्र.१, पत्र क्र. ३५, ता. १२-२ १७१९: हे पत्र सर्वात महत्वाचे आहे. हे पत्र हिंदुराव घोरपडे यांच्याकडून आलेले आहे . श्री पूर्वीपासून अवतारामुळे पूर्वापार देवालय सोडून पुजारीयाच्या घरासनिध देवालय बांधून पूजाविधी चालीत होता. कित्येक वर्ष गेलेवर आश्विन शुद्ध विजयादशमीस श्रीची पूजा पूर्वील ओस पडले देवालयात करणेत आली.

अशाच प्रकारचे एक पत्र रुमाल नं.५२ (जमाव दप्तर) यातील तारिख ८-११-१७२३ चे आहे.यातही महालक्ष्मी मूर्तिची प्रतिष्ठापना विजयादशमीस मूळ मंदिरात झाली असे सांगितले आहे.

सतत होणाऱ्या सुल्तानी आक्रमणात राज्याची व्यवस्था बिघडल्यामुळे देवळातील महालक्ष्मीची मूर्ती ठाणेकर पुजारी (श्रीपूजक वारसा हक्काने)यांच्या घरासमोर सध्या अस्तित्वात असलेल्या तुळजा भवानीच्या देवळात (कपिलतीर्थातील कपिलेश्वर मंदिराच्या मागील बाजूस) ठेवण्यात आली होती. ही मूर्ति नेमकी तेथे कधी हलविण्यात आली त्याचा पुरावा आज उपलब्ध नाही. परंतु हे पत्र महालक्ष्मी मंदिर काही काळ ओस पडले होते याची साक्ष देते.

३) रुमाल क्र.१,पत्र क्र. ३३ ता. १०-२-१७१९: या पत्रान्वये नरहरीभट बिन शिवरामभट सावगावकर यांना प्रधान पद देण्यात आले. (प्रधान (सावगावकर) व श्रीपूजक यांच्यामध्ये मंदिराच्या पूजेअर्चेसंबंधी वाद झाला असता प्रकरण कोर्टापर्यंत गेले व कागदपत्रांचा संदर्भ घेऊन कोर्टाच्या निकालाप्रमाणे श्रीपूजक हेच महालक्ष्मी मंदिराच्या पूजेअर्चेचे अधिकारी आहेत हा निर्णय कोर्टाने दिला.)

४) रुमाल क्र. १, पत्रक्र. १६९ : या पत्रान्वये विद्यार्थी राणोजी घोरपडे यांचे नरहरीभट आपा श्रीप्रधान यांस पूजेअर्चेसाठी सावगांव कोल्हापुर येथील चौथाई जागा ईनाम देण्यात आली.

खरे यांनी पुराभिलेखागारातील कागदपत्रांचे वाचन करून आपल्या महाराष्ट्राची चार दैवते या पुस्तकात काही कागदपत्रांचा उल्लेख केला आहे.

- .स. १७७८-७९ मध्ये श्रीचे प्रभावलय व सिंह यास लोखंडाचे मौले बसविले.[१४९]

[१४९] खरे.१९५८,पृ.२३

- .स. १७८८-८९ साली जय विजयास वज्रलेपासाठी ११८। रु.खर्च झाला.या वज्रलेपासाठी लागलेल्या सामानाची यादी या पत्रात दिली आहे[१९०].

- इ.स. १७९१-९२ साली जयविजयाच्या हातास वज्रलेप करण्याविषयी मजकूर आहे[१९१].

- इ.स. १७९०-९१ मध्ये देवालयाच्या काही भागास चुना व चित्रांसाठी रंग खरेदीचे विस्तृत विवेचन आहे.

या काळात मंदिराच्या सभामंडपापर्यंत सर्व खांबांवर चुन्याचा गिलावा दिला जात असे. प्रदक्षिणा पथातील भिंतींवर चित्रे काढली जात असत. नंतरच्या काळात अंतराळातील स्तंभांवर पितळी पत्रे चढविले होते. आता मात्र स्तंभांवरील पितळी पत्रे काढून टाकले आहेत.,त्याचप्रमाणे सगळ्या स्तंभांवरील चुन्याच्या परती काढून टाकल्या आहेत. काही वर्षांपूर्वी प्रदक्षिणा पथातील भिंतींवर संगमरवरी फरशी बसविण्यात आली होती ती देखील आता काढून टाकण्यात आली आहे.

- महालक्ष्मीच्या दर्शनास पूर्वी पोतराज येत असत व देवीसमोर पोत खेळीत असत.इ.स.१७७२-७३च्या पत्रात पोतराजास पातळ व खण दिल्याचा उल्लेख आहे[१९२]. आता पोतराज कधीतरी येऊन दर्शन घेऊन जातात.

- जमाखर्चाचीकागदपत्रे-

  इ.स.१७७८,इ.स.१७७९,इ.स.१७८८,इ.स.१७८९,इ.स.१७९१,इ.स.१८१६,इ.स.१८१७इ.स.१८३२,इ.स.१८४२,इ.स.१८४६,इ.स.१८४८,इ.स.१८४९,इ.स.१८५१,इ.स.१८६२ व इ.स.१८६३ या सालांचे वार्षिक ताळेबंद चिकडबंदी स्वरूपात आहेत. त्यात जमेकडे ऐन जमा व खर्चाकडे ऐन खर्च असे दोन भाग आहेत.ऐन जमेकडे देवीपुढे येणारे रोख रुपये ,खुर्दा , दागिने,सनगे,सोने चांदी,धान्य,नारळ इ.ची नोंद असून आलेल्या पैशांत घेतलेल्या तेल धान्यांची नोंद आहे.

- इ.स. १७७८-७९ मध्ये महालक्ष्मी देवालयाच्या उत्तरेस लक्ष्मीनारायणाची स्थापना केल्या गेला[१९३]

---

[१९०]पूर्वोक्त,पृ.२४
[१९१] पूर्वोक्त, पृ.२४
[१९२] पूर्वोक्त, पृ.२४

• इ.स.१७९३-९४ मध्ये नवरात्रप्रसंगी बिदागी व इतर खर्च आला तो हरिदास १५ रू.,गोंधळी रू.२,उवरीगोसावी रू.२,कलावंतीण ताफा रू.२५,मृदुंग रू.५,टाळकुटे रू.१ असा सांगितला आहे. यावरून ही सर्व मंडळी देवालयात येवून महालक्ष्मीची सेवा करीत असत हे स्पष्ट होते.

महालक्ष्मी मंदिरातील गरुड मंडपात आजही भाविक देवीसमोर गोंधळ घालतात.मात्र या गोंधळात देवीला नैवेद्य पुरणपोळीचा असतो. पूर्वी हा गोंधळ गणेश मंडपात घालीत असत.परंतू वाढती गर्दी ध्यानात घेवून गोंधळ हा गरुड मंडपात घालण्यात येतो. गोंधळ घालणारे गोंधळी हे तुळजापुरच्या गोंधळ्यांचे वारसदार आहेत.

मुनीश्वर घराण्यातील कागदपत्रे :

महालक्ष्मी मंदिरातील पूजेचा वंशपरंपरागत मान मुनीश्वर घराण्यास मिळाला आहे.मात्र काही काळानंतर कन्या हक्काने हा मान चौधरी,ठाणेकर,कुळकर्णी,इ. कुटुंबियांना मिळाला आहे

. प्राचीन अशा मुनीश्वर घराण्याच्या (बाबूराव मुनीश्वर यांच्या मते त्यांचे पूर्वज येथे आंध्रातून आले.ते स्वत:स शैवपंथी मानतात.)मुनीश्वरांजवळील कागदपत्रांना बघण्याची संधी खरे यांना मिळाली मला मात्र ही कागदपत्रे बघावयास मिळाली नाहीत. त्यातील काही कागदपत्रे प्रकाशित झाली आहेत.

खरे यांना या कागदपत्रांतून मिळालेल्या माहितीनुसार

१)खाजगीवाले घराण्यापैकी अव्वल इंग्रजीतील पुरुष गोविंदराव यांची पत्नी रमाबाई हिने आंबेजोगाई,तुळजापुरची भवानी, जेजुरीचा खंडोबा,पंढरपुरचा विठोबा कोल्हापुरची महालक्ष्मी यांना पुत्रप्राप्तीसाठी नवस केला. पुत्राच्या विवाहानंतर या सर्व स्थानांची तिने शक १७४६माघ शुद्ध ७ बुधवार(इ.स.१८२५) शक १७४७, चैत्र शुद्ध१० मंगळवार पर्यंत यात्रा केली[१९४].

---

[१९३] पूर्वोक्त, पृ२३
[१९४] खरे.१९५८,पृ.२५

२)बाळाजी बाजीराव पेशवे यांची पत्नी गोपिकाबाई हिने कोल्हापुरच्या महालक्ष्मीस नवस केला होता व तो नवस जुन्या मोहरा मोडून पावणे चोवीस तोळे दोन गुंजा वजनाचे चार चुडे देवीस अर्पण करून फेडला.पत्राची तारीख शक १६७६,पौष शुध्द १२ (इ.स.१७५४)[१९५]

३)सातान्यातील एका गृहस्थास पोटशुळीचा त्रास होता. तो कोल्हापुरात महालक्ष्मीच्या सेवेस आला. त्याच्या स्वप्नात देवीने त्यास पुण्यास जावून पेशव्यांच्या हाताचे तीर्थ घेण्याची आज्ञा केली. तो पुण्यास येवून पेशव्यांना भेटला व पेशव्यांना ही हकीकत सांगितली. बाळाजी बाजीराव यांचा त्यावर विश्वास बसला नाही.त्याच रात्री त्यांच्या स्वप्नात देवीने येवून त्या गृहस्थास तीर्थ देण्यास सांगितले व त्या तीर्थाने गृहस्थाचा पोटशुळीचा त्रास थांबला.

४)फेब्रुवारी इ.स. १७३२ च्या राजपत्रात गोपाळभट, बाबाभट व शामभट मुनीश्वर यांना कुर्डु व उचगांव या दोन गावांचे उत्पन्न दान दिले. श्री महालक्ष्मीची पूजा तिघांनी तीन दिवस करावी अशी वाटणी करून दिली.

५) राज शक ५० (शक १६४५) कार्तिक वद्य७ भृगु (८ नोव्हेंबर १७२३) या दिवसीचे शंभू छत्रपतींचे पत्र आहे. यात नरहरीभट,शिवरामभट सावगांवकर यांना श्री महालक्ष्मीच्या पारिपत्याचे प्रधानत्वपणाचा अधिकार दिल्याचे नमूद केले आहे.

महालक्ष्मी मूर्तीची आपल्या पूर्वीच्या स्थानावर पुन:स्थापना झाल्याचे आणखी एक पत्र आहे. या पत्रान्वये श्री महालक्ष्मी वास्तव्य करवीर हे अनादि क्षेत्र त्यास अवांतराचे योगास्तव बहुत दिवस पुर्वील देवालय सोडून पुजारियाचे घरी होती. त्यास पूर्वी राज्य विजापुर आदिकरून स्वस्त होते, थोर थोर नामांकित ग्रहस्त होते परंतू पूर्वस्थळी श्रीची स्थापना कोणी केली नाही. सांप्रतकाळी देश उद्वस्त राज्य स्वस्त नसता श्रीने आपणांस (सावगांवकर) साक्षात्कार प्रेरणा करून आपले स्तळी बैसावे हे इच्छा जाली हे वृत्त स्वामीस पूर्वी आपण विदित केले त्यावरून राव मशारनील करवीरास येवून मन्मथ नाम संवत्सर आश्विन शुद्ध विजयादशमी इंदुवासरी (२६ सप्टेंबर इ.स.१७१५) श्रीची स्थापना पूर्व स्थली

[१९५] खरे १९५८,पृ.२५

देवालयात सुमुहुर्ते केली[196]. या पत्रावरून २६ सप्टेंबर इ.स. १७१५ या दिवसापासून महालक्ष्मीची मूर्ती या मंदिरात असल्याचे स्पष्ट होते.

६)२७ नोव्हेंबर इ.स. १७१२ च्या पत्रात कोल्हापुरातील उचगांव हे गाव करवीर येथील देवीस मोकासा दिल्याचे व तेथील शेती महालक्ष्मीचे पुजारी करतील व त्यातून येणाऱ्या उत्पन्नातून देवीची नित्य पूजा व उत्सव चालवल्या जावेत अशा आशयाचे हे पत्र आहे.

७)११ फेब्रुवारी १७३० च्या पत्रात राणोजी घोरपडे यांनी शामभट मुनीश्वर यांना उचगांवच्या उत्पन्नापैकी निम्मे महालक्ष्मीच्या उत्सवासाठी व निम्मे स्वतःच्या योगक्षेमासाठी घ्यावे म्हणून आज्ञा केली[197].

८)औरंगजेबाच्या काळातील दोन कागद मुनीश्वरांजवळ आहेत. १८ जानेवारी १७०७ या तारखेचे एक व साधारण त्याच तारखेच्या जवळपासच्या कागदात कुई हे गाव कोल्हापुरवासी लक्ष्मणभट याजकडे पूर्वीप्रमाणे ईनाम चालत राहील व दुसऱ्या पत्रात पुजारी शामभट, मुकुंदभट व बाबादेवभट यांच्या विश्व्याचा हक्क पूर्वीप्रमाणे राहील असे नमूद केले आहे.

९) याच सुमारास (इ.स. १७०७)पण तारीख नसलेल्या एका फारसी कागदात शामभत मुनीसर पुजारी श्री भवानी असा उल्लेख आलेला आहे [198]

१०)२ऑगस्ट १६५७ च्या कागदात महालक्ष्मीच्या नैवेद्यासाठी सरकारी आदिलशाही सादिलबाद खात्यातून दरसाल १० होन मिळत असत. ते मिळण्याचे बंद झाले. त्यावेळी कोल्हापुर विजापुर आदिलशाहीच्या ताब्यात होते. गावकऱ्यांच्या सांगण्याने ते पुनः सुरु करण्यात आले[199].

[196]खरे,१९५८ , पृ .२८
[197]पूर्वोक्त ,पृ .२९
[198] पूर्वोक्त,पृ .२९
[199] पूर्वोक्त ,पृ.२९

ताराबाईकालीन कागदपत्रे या तीन खंडात प्रसिद्ध झालेल्या पुस्तकातून महालक्ष्मी संबंधीची काही कागदपत्रे प्रकाशित झाली आहेत.

१) दिनांक २२-३-१७०२ या तारखेच्या पत्रात देवस्थानास लाटी सावगाव व सदलगे यांचे उत्पन्न नीट जात नव्हते ते जाण्यास मुतालिकांना ताकीद देण्यात आली आहे[२००]

२) ७ जानेवारी १७२४ या तारखेच्या पत्रात संभाजी महाराज दुसरे यांनी श्री शंकराचार्य मठास ईनामपत्र दिले. या ईनामपत्रात श्री महालक्ष्मीच्या मंदिराचा जिर्णोद्धार करून दिल्याबद्दल आभार प्रदर्शित केले आहे. म्हणजे इ.स. १७२४च्या दरम्यान महालक्ष्मी,महाकाली , महासरस्वती, सभामंडप व गणेशमंडपावरील आज दिसणारी पायऱ्यापायऱ्यांची शिखरे बांधण्यात आली. नगारखाना पांच दीपमाळांचा समूहदेखील याचवेळी बांधण्यात आला असावा.

इब्राहिम अलि आदिलशहा (इ.स.१५३५-१५५८) याने महालक्ष्मीच्या आसपासच्या खुल्या असलेल्या जागेवर देवालयाभोवती चार दरवाजे व ओवरीवजा तटबंदी बांधून दिली असे ग.ह.खरे यांनी आपल्या भाषणात सांगितले.

या सर्व कागदपत्रांवरून हे लक्षात येते की

महालक्ष्मी संबंधीच्या कागदपत्रांवरून सुल्तानी आक्रमणाच्यावेळी महालक्ष्मी मंदिरातून महालक्ष्मीची मूर्ती हलविण्यात आली. ती कपिलतीर्थानजिक असलेल्या तुळजाभवानीच्या मंदिरात ठेवण्यात आली. मराठा काळात तिची पुन:स्थापना मूळ मंदिरात २६ सप्टेंबर इ.स.१७१५ विजयादशमीच्या शुभमुहुर्तावर करण्यात आली.

---

[२००] पवार.१९६९,.पृ.१४८-४९

प्रकरण ४

महालक्ष्मी मंदिर स्थापत्य

कोल्हापुरातील महालक्ष्मी देवालय त्रिकूट देवालय आहे. हे देवालय प्राकारयुक्त असून पश्चिमाभिमुख आहे. या देवालयास तीन स्वतंत्र गाभारे असून मध्यभागी पश्चिमाभिमुख महालक्ष्मी, उत्तरेस दक्षिणाभिमुख महाकाली व दक्षिणेस उत्तराभिमुख महासरस्वती आहे. तीनही गर्भगृहे सांधार आहेत. या मंदिराची रचना वैचित्र्यपूर्ण व वैविध्यपूर्ण आहे असे म्हणता येईल. त्यामुळे महाराष्ट्रातील हे अशा पद्धतीचे एकमेव देवालय आहे असे आपण म्हणू शकतो.

महालक्ष्मी मंदिराची वैशिष्ट्ये :

१) स्थापत्यदृष्ट्या तीनही मंदिरे वेगवेगळी

अ) महालक्ष्मी – सप्तरथ,मेरुमंडोवर पद्धतीची रचना, बाह्यांगावर देवकोष्ठात सुरसुंदरी व त्या देवकोष्ठांवरील शिखरे नागर शैलीची ;

ब) महाकाली – पंचरथ, देवकोष्ठांत सुरसुंदरी व त्यावरील शिखरांची रचना वेसर पद्धतीची;

क) महासरस्वती – साधे दगडी बांधकाम असलेले ;

२) तीनही मंदिरे सांधार

अ) महालक्ष्मी – प्रदक्षिणापथाचा आकार अनेक रथ असलेल्या वास्तूच्या बाह्यरेषेसारखा;

ब) महाकाली – पंचरथ असून प्रदक्षिणामार्ग निर्गम – प्रवेशहीन;

क) महासरस्वती – निर्गम- प्रवेशहीन;

३)महाकाली मंदिर महालक्ष्मी मंदिराच्या सभामंडपास तिरके जोडलेले आहे.

४) महालक्ष्मी मंदिराच्या सभामंडपातून महाकाली व महासरस्वती मंदिराचे गाभारे सरळ रेषेत

दिसत नाहीत.

५) महालक्ष्मी मंदिराचा सभामंडप,अंतराळ व गाभारा दुमजली;

६) मुख्य मंदिराच्या गाभाऱ्यात उत्तर ,पूर्व व दक्षिणेस तीन दालने, मंदिराच्या वरच्या मजल्यावरील शिवलिंग गाभाऱ्यासही तीन दालने.परंतु त्यांचे प्रवेशमार्ग प्रदक्षिणापथातून.

७) महालक्ष्मी मंदिराच्या अंतराळातही उत्तर व दक्षिणेस एक एक खोली

८) महालक्ष्मी व महाकाली मंदिराच्या बाह्यांगाच्या भद्रात तीन स्वतंत्र देवालये.

९) महालक्ष्मी मंदिराची बांधणी करताना दिशासाधनाचा अवलंब; ८ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबर आणि ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी याकाळात सूर्यास्ताच्यावेळी महालक्ष्मी मूर्तीवर सूर्याची किरणे पडतात.

१०) महालक्ष्मी मंदिराच्या प्राकारात शेषशायी मंदिर व नवग्रह मंडप यासारखे जैन

मंदिराचे अवशेष सापडतात.

११) या वास्तुसंकुलातील काही वास्तूअंश मुख्य देऊळ बांधल्या नंतरच्या काळातील आहेत.

प्राकार :

महालक्ष्मी देवालय हे प्राकारयुक्त देवालय आहे. या प्राकारास चार दिशेस चार द्वारे असून पश्चिमेकडील द्वारास महाद्वार म्हणतात. उत्तरेकडील द्वारास घाटी दरवाजा, पूर्वेकडील द्वारास पूर्व दरवाजा व दक्षिणेकडील द्वारास दक्षिण दरवाजा म्हणतात. ही चारही द्वारे सारखी नाहीत;एकमेकाशी काटकोनात नाहीत.पूर्वेचे अगदी पश्चिमेसमोर,तसेच उत्तरेचे दक्षिणेसमोर नाही. पश्चिम व उत्तरेकडील द्वारे आकाराने मोठी आहेत. या द्वारांच्या बांधणीवरून ही इ.स.च्या १६-१७व्या शतकात बांधली

असावीत. या चारही द्वारांना लागून असलेल्या भिंतीस आतल्याबाजूने कमानी असलेल्या ओवऱ्या आहेत. पूर्वी या कदाचित यात्रेकरूंच्या विश्रांतीसाठी बांधल्या असाव्यात. आता मात्र यामध्ये निरनिराळ्या देवतांना स्थानापन्न केले आहे(पहा प्रकरण आवारातील देवालये).पूर्व दरवाज्याच्या पायरीवर त्रिंबकराव दाभाडे याचा लेख आहे.

महाद्वारातून पायऱ्या उतरून आपण प्रांगणात प्रवेश करतो. दोन्ही बाजूस दोन उंच दीपमाळा आहेत. त्यासमोर उत्तरेस एडका तर दक्षिणेस नंदी यांची शिल्पे आहेत.प्राकारात शिरतानाच उजव्याबाजूस वरच्या मजल्यावर नगारखाना आहे.मंदिरातील प्रत्येक आरतीच्यावेळी सनईचौघड्याचे सूर या नगारखान्यातून ऐकू येतात.मराठाकाळात या नगारखान्याची निर्मिती झाली असावी.

महालक्ष्मी मंदिराचे घटक :

१) गरुड मंडप २) मुखमंडप वा गणेश मंडप ३)सभामंडप ४) अंतराळ ५) गाभारा

वरच्या मजल्यावर

६)नंदी मंडप ७)मातुलिंग

सभामंडपातून उत्तरेकडे

८)महाकाली मंडप ९)महाकाली गाभारा

सभा मंडपातून दक्षिणेकडे

१०)महासरस्वती अंतराळ ११)महासरस्वती गाभारा

गरुड मंडप

महालक्ष्मी मंदिरास सर्वात आधी लागतो तो गरुड मंडप. हा मंडप लाकडी असून१६ खांबांवर आधारित व कौलारू छत असलेला आहे. या मंडपात शिरण्यास उत्तर व दक्षिणेकडून प्रवेशमार्ग

आहे.हा मंडप इ.स.१८३८ ते इ.स. १८४२ च्या दरम्यान धारवाड जिल्ह्याचे दप्तरदार दाजी पंडित यांनी बांधला. मंडपात पश्चिमबाजूस चार लाकडी खांबांवर आधारित दगडी चबुतरा आहे. या दगडी चबुतऱ्याच्या पूर्व भिंतीत मध्यभागी गरुडाची मनुष्याकृती,दोन्ही हातांत नाग धरलेली,उभी मूर्ती आहे..म्हणून या मंडपास गरूड मंडप म्हणत असावेत.हा मंडप त्याच्या पूर्वेकडे असलेल्या दगडी गणेश मंडपास जोडून आहे. परंतु या मंडपातून गणेश मंडपात जाण्यास मार्ग नाही.या मंडपाच्या सभोवती पूर्वी अडीच-तीन फुटाचा दगडी कठडा होता. इ.स.१९८० च्या सुधारणाकाळात हा कठडा काढून संपूर्ण मंडपास लोखंडी जाळी बसविण्यात आली आहे.

या मंडपाचा उपयोग महालक्ष्मीच्या उत्सवमूर्तीची पालखी ठेवण्यास करण्यात येतो. मंदिर प्रदक्षिणा ,त्र्यंबुली गमन,नगरप्रदक्षिणा यावेळी महालक्ष्मीची पालखी या मंडपातील चबुतऱ्यावर ठेवण्यात येते व येथूनच प्रदक्षिणेस सुरवात होते. दोलोत्सवाच्यावेळी महालक्ष्मीची मूर्ती मंडपात झोपाळ्यावर ठेवण्यात येते. गणेश चतुर्थी,कृष्णजन्माष्टमी हे उत्सव याच मंडपात साजरे केले जातात. इतर वेळी भजन-कीर्तने येथे होतात. देवीसमोर गोंधळाची पूजा इथेच मांडल्या जाते.महालक्ष्मी मंदिरात गोंधळ घालणारे गोंधळी हे तुळजाभवानीचेच भक्त आहेत.येथे देवीला नैवेद्य पुरणाच्या पोळीचा असतो. वंशपरंपरेने चालत आलेले गोंधळीच येथे देवीसमोर गोंधळ घालतात. पूर्वी हा गोंधळ गणेश मंडपात होत असे. भाविकांच्या वाढत्या गर्दीमुळे आता हा गोंधळ या मंडपात घालण्यात येतो. लग्न,पहिले मूल,नवस अशा निमित्ताने भाविक देवीसमोर गोंधळ घालून घेतात.

मुखमंडप वा गणेशमंडप :

हा मंडप अर्धखुला,आयाताकार,तीनही बाजूस (उत्तर,दक्षिण व पश्चिम) प्रवेशमार्ग असलेला आहे.या मंडपातून सभा मंडपातही जाता येते.गरुड मंडप बांधताना पश्चिमेकडील प्रवेशमार्ग बंद करण्यात आला असावा. आता ह्याठिकाणी गणेश मूर्ती एका देवळीत पूर्वाभिमुख ठेवली आहे.या देवळीस प्रदक्षिणा घालण्यास जागा आहे.म्हणून या मंडपास गणेश मंडप म्हणत असावेत.हा मंडप आकाराने बराच मोठा(म्हणुनच देगलूरकर[२०१] यांनी या मंदिरास दोन मंडप असल्याचे सांगितले

---

[२०१] देगलूरकर,खणे,२०१०,पृ.१७

आहे.),वामन भिंती व वामन स्तंभांनी युक्त आहे. या मंडपाच्या उत्तर व दक्षिणेस कक्षासने असून बाह्यांगावर वेदिकेचे अलंकरण आहे. या मंडपाच्या बांधणीत जुन्या मंदिरांचे अवशेष वापरल्याचे दिसून येतात. यामुळे हा मंडप नंतरच्या काळात (रामचंद्र यादव काळ इ.स. १२७१ ते इ.स.१३१२)बांधला असावा.या मंडपाच्या बाहेरील दर्शनी भागावर अव्यवस्थित रितीने बसवलेली काही शिल्पे आहेत. पश्चिमेस जैन यक्ष व यक्षिणी, उत्तरेस संगमोत्सुक पुरुष व त्यावर प्रहार करणारी स्त्री,जोडपाय व अनेक धड असलेले पुरुष,हयग्रीव,लक्ष्मी,चामुंडा व भैरव व दक्षिणेस बलराम, स्कंदादि सहा शिल्पे आहेत.

हा मंडप अंतराळा इतकाच रूंद आहे. यास १२ वामन स्तंभ,१४ पूर्ण स्तंभ असून तीन स्तंभ आकाराने मोठे आहेत. या मंडपाचे छत उतरत्या पायऱ्यांचे असून मध्यात एका कमळाचा लोलक आहे.वंशपरंपरागत पुजारी श्री.विष्णु मुनीश्वर यांच्या सांगण्याप्रमाणे ही गणेशाची मूर्ती पूर्वी शेंदुराचे आवरण असलेली होती. त्यांनी स्वत: मूर्तीवरील शेंदुराचे संपूर्ण आवरण काढले. त्यांनी सांगितल्याप्रमाणे याठिकाणी आधी श्रीयंत्रासमोरील देवकोष्ठात असलेली गणेशाची मूर्ति स्थापित होती.परंतू ती मूर्ति भंग पावल्यामुळे तिची स्थापना श्रीयंत्रासमोर करण्यात आली.ही घटना १९ व्या शतकाच्या सुरवातीस घडली असावी.

सभा मंडप :

हा मंडपदेखील मुखमंडपासारखाच आकाराने आयाताकार, अर्धखुला, असून तीनही बाजूस वामनभिंती व वामनस्तंभांनी युक्त आहे. या वामनस्तंभांवर तीन पाखभागांचे छत पेललेले आहे.या मंडपातून उत्तरेकडे महाकाली मंदिराच्या मंडपात जाण्यास व दक्षिणेकडे महासरस्वतीच्या अंतराळात जाण्यास मार्ग आहे.

आज आपणास याच मार्गावर पूर्वी येथे बाहेर जाण्याचा मार्ग असावा याची चिन्हे दिसून येतात. फूलविक्रेता मुथ्थय्या याच्या वीरगळाप्रमाणे इ.स.१०५० ते इ.स.१०५२ याकाळात या मंदिरावर चोलांचे आक्रमण झाले व चोलांनी हे मंदिर जाळण्याचा प्रयत्न केला. त्याकाळी याठिकाणी लाकडी मंडप असावा व त्या लाकडी मंडपाला क्षति पोहोचल्यावर हा दगडी सभामंडप बांधला असावा. या मंडपास तीनही बाजूस बाहेर पडण्यास पायऱ्यांचा मार्ग असावा याचा पुरावा तीनही बाजूंनी बाहेर पडण्याच्या मार्गाचे नीट

परीक्षण करता दिसून येते..या मंडपातही स्तंभ एका आकाराचे वा एका धाटणीचे नाहीत. याच वेळी कदाचित मंदिराच्या वरच्या मजल्याची निर्मिती झाली असणार.राजा गंडरादित्याच्या काळातील(इ.स.११०८-इ.स.११३८) अनेक शिलालेख सापडले.परंतु त्याने महालक्ष्मी मंदिरास देणगी दिल्याचा उल्लेख कुठल्याही लेखात नाही.शिलाहार राजा भोज (इ.स.११७५-इ.स.१२१२)याने महालक्ष्मी मंदिराच्या त्रिकाल नैवेद्यासाठी दान दिल्याचा उल्लेख आहे.त्यामुळे त्याने या मंदिराकडे लक्ष देऊन मंदिराच्या विस्तारास मदत केली असावी.

उत्तर व दक्षिणेकडील वामनभिंतींच्या बाह्यांगांवर वेदिकेचे अलंकरण आहे. दक्षिणेकडील वेदिकेवर नरसिंहाची मूर्ती आहेत. या मंडपाच्या वामनभिंतींवर चारही कोपऱ्यात लहान देवळ्या आहेत. उत्तरेकडील भिंतीत पश्चिमेकडे तोंड करून सूर्य,समोरील भिंतीस पूर्वेकडे तोंड करून वरूण,दक्षिणेस पूर्व भिंतीत पश्चिमेस तोंड करून कृष्ण,पश्चिम भिंतीत पुर्वेकडे तोंड करून खळनाथ (कुंदनगार[२०२] यांनी बघितल्याप्रमाणे वासुदेव,विष्णू,मुरलीधर व वीरभद्र)या देवतांची स्थापना लहान देवळीत केली आहे. अर्थात या देवळ्या नंतरच्या काळात बनवल्या असाव्यात. पश्चिमेकडून सभामंडपात प्रवेश करताना उत्तर व दक्षिणेकडील वामनभिंतीत दोन चौरीधरांच्या प्रतिमा उत्तर व दक्षिणेस तोंड करून देवळीत बसवल्या आहेत.

मंडपामध्ये तीन प्रकारचे एकूण २८ स्तंभ आहेत. या मंडपास वामनस्तंभ एकूण ४४ असावेत.मंडपाच्या स्तंभांमधील मधले चार स्तंभ आकाराने सर्वाधिक मोठे आहेत. हेच स्तंभ मूळ स्तंभ वाटतात. बाकी स्तंभ इतर मंदिरांमधले आणून बसवलेले असावेत .सभामंडपातील ह्या मूळ स्तंभांचा शीर्षभाग वरच्या मजल्यावर आढळून येतो.या स्तंभांवर सभापद्म छत पेललेले आहे. वरच्या मजल्यावर या मूळ स्तंभांना काही अर्धस्तंभांची जोड देवून जालवातायने बसवली आहेत.

सभामंडपाच्या पूर्व भिंतीत दोन महाकाय द्वारपाल आहेत. या मूर्तींच्या हातातील आयुधे अस्पष्ट आहेत. त्यामुळे ते शैव का वैष्णव याची ओळख पटत नाही.आज जरी ते जय विजय या नावांनी असले तरी मूळचे काल -वेताल असावेत.

---

[२०२] कुंदनगार,१९२९ ,पृ.३३

द्वारपाल व द्वारबंध यामध्ये जालवातायन आहे. अंतराळाच्या द्वारशाखांस एकापुढे एक असे दोन साधे पट्ट असून एक स्तंभ शाखा आहे. त्यापुढे दोन साधे पट्ट आहेत. ललाटाचा भाग पितळी आवरणाने झाकला आहे. उत्तरांग कलाकुसरविहीन आहे. उत्तरांगाच्यावर महालक्ष्मी मंदिराच्या बाह्यांगावरील वेल कोरलेली दिसून येते.

सभामंडपाच्या पश्चिमेकडील बाह्य भिंतीस उत्तर , पश्चिम व दक्षिणेस वेसर शिखरे असलेली देवकोष्ठे असून त्यात सुरसुंदरी कोरलेल्या आहेत.ही देवकोष्ठे महाकाली मंदिराच्या बाह्यांगावरील देवकोष्ठांसारखीच आहेत.त्यामुळें ज्यावेळी महाकाली मंदिराची निर्मिती झाली त्यावेळी या सभामंडपास हे अलंकरण केले असावे.

अंतराळ :

महालक्ष्मी मंदिराचा अंतराळ व गाभारा हे मंदिराचे सर्वात प्रचीन अवशेष आहेत.अंतराळ आकाराने मोठा, आयाताकार व १२ स्तंभांनी युक्त आहे.हे स्तंभ साधे असून कलाकुसरविहीन आहेत.या स्तंभांची विभागणी चारही कोपऱ्यात प्रत्येकी तीन स्तंभ अशी केली आहे. या अंतराळाचे वैशिष्ट्य म्हणजे यात उत्तर व दक्षिण भिंतीस दालने आहेत. या दालनांची ललाटे सपाट आहेत. दक्षिणेकडील खोली बंद असून उत्तरेकडील खोलीत महालक्ष्मीच्या अंगावर घातले जाणारे दागिने ठेवण्यात येतात. या दालनांत पूर्वी देवतांच्या मूर्ती असाव्यात.जामखेडकर[२०३]यांच्या मते ही जागा पूर्वी चार किंवा सहा दुय्यम देवतांची दालने म्हणून वापरली जात असावी.दक्षिणेकडील एक स्तंभ आकाराने मोठा आहे.

प्रदक्षिणापथ :

अंतराळातून पूर्वेस प्रदक्षिणापथाकडे जाण्यास मार्ग आहे. प्रदक्षिणापथाचा आकार अनेक रथ असलेल्या वास्तूच्या बाह्यरेषेसारखा आहे त्यामुळे नागमोडी आहे. प्रदक्षिणामार्गातील भिंतींवर

---

[२०३]जामखेडकर,२००० ,पृ.१९८

मराठाकाळात देवीदेवतांची चित्रे काढीत.ही चित्रे काढण्यासाठी लागणाऱ्या सामग्रीचा हिशोब पुराभिलेखागारांतील कागदपत्रांत आढळून येतो. काही वर्षांपूर्वी या भिंतींवर संगमरवरी फरशा बसविण्यात आल्या होत्या.आता त्या सर्व फरशा काढुन टाकण्यात आल्या आहेत. प्रदक्षिणापथाच्या दक्षिणेकडील भागात गाभाऱ्याच्या भिंतीवर साधारण तीन फुट उंचीवर एक लहान कुंड आहे. गाभाऱ्यातील मूर्तीला अंघोळ घालण्यासाठी लागणारे पाणी या कुंडातूनच गाभाऱ्यात दिले जात होते. गाभाऱ्याच्या आतील दक्षिण भिंतीत एक गोमुख आहे. कुंडातील पाणी या गोमुखावाटे आत पोहोचत असे. आज या कुंडाचा वापर होत नाही. अशाप्रकारची गाभाऱ्यात पाणी पुरवण्याची रचना आपणास अनेक देवळांत असलेली दिसून येते.

गर्भगृह :

गर्भगृहाच्या द्वारशाखा पंचद्वारशाखा आहे. एकासमोर एक असे शाखांचे दोन पट्ट आहेत. आधी दोन साध्या कलाकुसरहीन शाखा,त्यानंतर स्तंभ शाखा,त्यानंतर आणखी दोन साध्या कलाकुसरहीन शाखा व एक स्तंभ शाखा उत्तरांगावर वेसर पद्धतीच्या शिखरांच्या ५ प्रतिकृति आहेत.

गर्भगृह आकाराने चौरस असून भिंतीत १२ अर्धस्तंभ आहेत. या गर्भगृहाचे वैशिष्ट्य म्हणजे या गर्भगृहास उत्तर ,पूर्व व दक्षिण बाजूस प्रत्येकी एक दालन आहे. खिद्रापुरच्या कोप्पेश्वर मंदिराच्या गाभाऱ्यासही अशाच प्रकारची दालने आहेत. या दालनांच्या द्वारांवर दोन साध्या शाखा व एक स्तंभ शाखा आहे.ललाटबिंबावर देवतेचे अंकन नाही.आज या तीनही खोल्या रिकाम्या आहेत. ज्यावेळी हे मंदिर बांधले त्यावेळी या तीनही खोल्यांत पूर्वेस महालक्ष्मी,उत्तरेस महाकाली व दक्षिणेस महासरस्वती या देवतांच्या मूर्ती असाव्यात. आज या तीन खोल्या उत्तरेकडील खोली स्नानाचे पाणी साठवण्यासाठी, पूर्वेकडील खोली पूजेचे ~~साहित्य ठेवण्यास व दक्षिणेकडील~~ खोली देवीचे शेजघर म्हणून वापरण्यात येते. या सर्व खोल्यांना फरशा बसवल्यामुळे, मूळ खोल्यात पीठस्थाने असल्यास कल्पना येत नाही.

गाभाऱ्याच्या मध्यभागी एका लाकडी मेघडंबरीत महालक्ष्मीची मूर्ति एका चबुतऱ्यावर ठेवण्यात आली आहे. मेघडंबरीची पाठ संगमरवरी फरशीने झाकली आहे. उत्तर व दक्षिण बाजूस दगडी कठडे आहेत. या मेघडंबरीस प्रदक्षिणा घालता येते. या उत्तर व दक्षिणेकडील भिंतीत आतील बाजूने लहान

कोनाडे आहेत. उत्तरेकडील भिंतीच्या बाहेरील बाजूस एक गोमुख आहे. मूर्तीच्या अंघोळीचे पाणी या गोमुखातून बाहेर येते. खाली जमिनीतील मार्गाने हे पाणी मंदिराच्या बाहेरील भागात उत्तरेस असलेल्या प्रणालात जाते. गोमुखाजवळ पाण्यासाठी नळाची सोय आहे.गाभाऱ्यातील ही संपूर्ण रचना मराठा काळात, मूर्तीची जेव्हा पुन:प्रतिष्ठापना झाली त्यावेळी करण्यात आली.गर्भगृहाच्या मध्यपीठावर २ फूट ९ इंचाची महालक्ष्मीची मूर्ती समभंगात उभी आहे. चार हातात (दक्षिणाध:करक्रमाने) महाळुंग,गदा,खेटक व पानपात्र धारण केली आहे.मूर्तीच्यामागे चांदीची प्रभावळ आहे.

गाभाऱ्याचे छत लंबगोलाकार असून समतल प्रकारचे आहे.

या मंदिराचे अंतराळ व गाभारा हे सर्वात प्राचीन घटक आहेत. शिलाहार राजे हे महालक्ष्मीचे भक्त होते. शिलाहार राजा मारसिंह याच्या मिरज ताम्रपटावरून (इ.स. १०५८)आपणास तो महालक्ष्मीचा भक्त असल्याचे दिसून येते.याचा पिता गोंक.याच्या काळात शिलाहारांनी चालुक्यांचे स्वामित्व पत्करले होते. गोंकाच्या काळातील(इ.स. १०२०-इ.स.१०५०) एकही शिलालेख वा ताम्रपट आज उपलब्ध नाहीत. परंतु गोव्याचा कदंब राजा षष्ठ (इ.स.१००५ ते इ.स.१०५०)कोल्हापुरास महालक्ष्मीच्या दर्शनास येत असे त्यावरून इ.स. १०३८च्या सुमारास हे देवालय(अंतराळ व गाभारा)अस्तित्वात होते असे म्हणण्यास जागा आहे. त्यामुळे कदाचित चालुक्यांचे मांडलिकत्व पत्करल्यानंतर गोंकाने या मंदिराची निर्मिती केली असावी.यास आणखी पुरावा म्हणजे इ.स.१०४९,इ.स.१०६३ व इ.स.१०६८ या काळातील कर्नाटकातील बागलकोट जिल्ह्यातील सिद्धेश्वर मंदिराच्या भिंतीवरील लेखांत कोल्हापुरच्या महालक्ष्मीचा उल्लेख आला आहे. त्यावरून या काळात कोल्हापुरात हे महालक्ष्मीचे देवालय होते, हे निश्चित, आणि ते मंदिर हेच असावे असे मानण्यास हरकत नाही.

महाकाली मंदिराच्या पूर्वेकडील प्रवेशद्वाराजवळ आतीलबाजूने महालक्ष्मी मंदिराच्या वरच्या मजल्यावर जाण्यास मार्ग आहे. या मार्गावरून पायऱ्या चढताना महालक्ष्मी मंदिराच्या बाह्यांगाचा काही भाग दृष्टिपथास पडतो. त्यामुळे या पायऱ्या नंतरच्या काळात बंदिस्त केल्या असाव्यात हे लक्षात येते.

नंदिमंडप :

वरच्या मजल्यावर नंदिमंडप व गाभारा आहे. १२ स्तंभांवर आधारित या मंडपात पायऱ्यांच्या चबूतऱ्यावर पूर्वेकडे तोंड करून नंदीचे शिल्प आहे.मंदिराचा हा भाग सतत बंद असतो. फक्त आरतीच्यावेळी पायऱ्यांजवळील दार उघडे असते. कार्तिक चतुर्दशीस मात्र पूर्ण दिवस दर्शनासाठी मंदिराचा हा भाग उघडा असतो.नंदिमंडपास प्रदक्षिणा घालता येते.याचे छत पायऱ्या पायऱ्यांचे आहे.

प्रदक्षिणामार्ग:

या मंडपाच्या पूर्वेस उत्तरेकडून गाभाऱ्यास प्रदक्षिणा घालण्यास मार्ग आहे. हा प्रदक्षिणामार्ग मंदिर रथयुक्त असल्यामुळे निर्गम व प्रवेशयुक्त आहे. या प्रदक्षिणामार्गात उत्तर,पूर्व व दक्षिणेस तीन खोल्या असून त्यांचे प्रवेशमार्ग प्रदक्षिणापथातूनच आहेत.या खोल्यांचे प्रयोजन लक्षात येत नाही . कदाचित खालच्या गाभाऱ्यात असलेल्या खोल्यांच्या प्रयोजनामुळे इथेही खोल्या निर्माण झाल्या असणार.या पथास उत्तर,पूर्व व दक्षिणेस खोल्यांसमोर गवाक्ष आहेत.

गर्भगृह :

महालक्ष्मी मंदिराच्या हा वरचा मजला मातुलिंगेश्वर म्हणून ओळखला जातो. स्थानिक समजुतीप्रमाणे महालक्ष्मी मूर्तीच्या डोक्यावर असणाऱ्या लिंग योनीचे दर्शन सर्वांनाच होत नाही, यासाठी इथे शिवलिंगाची स्थापना केली आहे.हा गाभारा चौरसाकृती असून १२ अर्धस्तंभ असलेला आहे. मध्यभागी शिवलिंग असून त्यामागे पीठावर गणेशाची शेंदुरचर्चित मूर्ती आहे.प्रदक्षिणापथामुळे हा गाभारा सांधार म्हणता येईल.

सभामंडपावरील मजला :

नंदिमंडपाच्या पश्चिमेस हा सभामंडपावरील मजला आहे. सभामंडपातील भव्य चार स्तंभांचे शीर्ष याठिकाणी दिसतात.यास प्रत्येकी दोन अर्धस्तंभ जोडून जालवातायने बसवली आहेत व छतापर्यंत भिंतीने बंद केले आहे. या खोलीस प्रदक्षिणा घालता येते.प्रदक्षिणापथातील बाहेरील भिंतीस अर्धस्तंभ

आहेत.या प्रदक्षिणामार्गात पश्चिमेकडील भिंतीत ३ पायऱ्या चढून गणेश मंडपाच्या छतावर जाण्यास द्वार आहे.या द्वारास बाहेरील बाजूने जुन्या जैन मंदिराच्या द्वाराची चौकट बसवलेली आहे. त्याच्या ललाटावर जिनाचे अंकन आहे. मंदिराच्या पुनर्रचनेवेळी मंदिर परिसरातील जैन मंदिराच्या अवशेषांचा याठिकाणी उपयोग केलेला दिसून येतो.

श्रीयंत्र :

महालक्ष्मी मंदिराच्या सभामंडपातून महाकाली मंदिराच्या मंडपात जाताना पूर्वेकडील भिंतीत एका लहान चबुतऱ्यावर श्रीयंत्र बसविलेले आहे. हे श्रीयंत्र याठिकाणी कोणी व केव्हा स्थापन केले याची माहिती उपलब्ध झाली नाही अथवा अनुमानही करता येत नाही.महालक्ष्मी मंदिराच्या पुजाऱ्यांच्यामते या श्रीयंत्राचा महालक्ष्मीशी संबंध नाही. कोल्हापुरच्या शंकराचार्य करवीरपीठाधीशांकडे ही या श्रीयंत्राबद्दल माहिती मिळू शकली नाही. या श्रीयंत्रास आता काचेचे आवरण चढवले आहे व रोज याची साधी पंचोपचार पूजा केली जाते.

महाकाली मंदिर :

हे मंदिर पंचरथ असून सांधार पद्धतीचे दक्षिणाभिमुख देवालय आहे.मंदिराच्या बाह्यांगांवर तीनही भद्रात तीन देवालये आहेत. या मंदिरास मंडप व गाभारा असे दोन भाग आहेत.या मंदिरास महालक्ष्मी मंदिराप्रमाणे वरचा मजला नाही.या मंदिरात येण्यास महालक्ष्मी मंदिराच्या सभामंडपातून मार्ग आहे. हे मंदिर आराखड्यात महालक्ष्मी मंदिराशी तिरपे जोडलेले आहे. त्यामुळे महाकाली व महासरस्वती यांचे गाभारे समोरासमोर नाहीत. कदाचित मंदिराच्या प्रांगणात असलेल्या अनेक लहान देवालयांमुळे(आज अस्तित्वात नाहीत) हे मंदिर असेच बनवावे लागले असणार.महालक्ष्मी मंदिरास असलेल्या जोडावरून ह्याची नंतरच्या काळात रचना करण्यात आली असावी. महालक्ष्मी मंदिराची जसजशी ख्याती पसरत गेली व दानधर्म करण्यापेक्षा मंदिराची निर्मिती हे जास्त पुण्याचे काम ही समजूत रूढ झाल्यामुळे गाभाऱ्यातील महाकालीसाठी स्वतंत्र मंदिराची कल्पना आली असावी व यादवांच्याकाळात शिलाहार राजा द्वितीय भोज याचा बिमोड करून या भागावर आधिपत्य स्थापन करणाऱ्या यादव राजा सिंघण द्वितीय(इ.स.१२००-इ.स.१२४७) याने महाकाली मंदिराची निर्मिती केली

असावी.कारण याच्याच काळात आपणास महाकालीचा महालक्ष्मीबरोबर उल्लेख मिळतो(कोल्हापुर शिलालेख,१५ ऑगस्ट इ.स.१२३५). या आधी फक्त महालक्ष्मीचेच उल्लेख मिळतात.

महाकाली मंडप :

चार मुख्य स्तंभ व ३ गौण स्तंभांवर आधारित हा मंडप आहे. या मंडपाचे छत सभापद्म प्रकारचे आहे. मंडपाच्या उत्तरेकडील दोन मुख्य स्तंभांस ३-३ गौण स्तंभांची जोड देण्यात आली आहे. या मंडपास पूर्व व पश्चिमेकडून आत येण्यास स्वतंत्र पायऱ्या आहेत. या दोन्ही प्रवेशमार्गांच्या भिंतींची पुनर्बांधणी केल्या सारखी वाटते. या मंदिराचा महालक्ष्मी मंदिरास असणारा जोड महालक्ष्मी मंदिराच्या सभामंडपाच्या बाह्यांगांवर असलेल्या वेसर देवकोष्ठांवरून लक्षात येतो. महालक्ष्मी मंदिर सभामंडपाचा मंडप मुळात अर्धमंडप असावा; नंतरच्या काळात तो अंशतः वर केला असावा.

प्रदक्षिणापथ :

महाकाली मंदिर सांधार पद्धतीचे मंदिर असल्यामुळे प्रदक्षिणामार्ग याच मंडपातून आहे. मंदिर पंचरथ असले तरी आतील प्रदक्षिणा मार्गात महालक्ष्मीच्या गाभाऱ्याप्रमाणे प्रवेश-निर्गम नाहीत. मार्गनिर्गम व प्रवेशहीन आहे.हा मार्ग २४ अर्धस्तंभांवर आधारित आहे.

महाकाली गाभारा :

महाकाली मंदिराचा गाभारा चौरसाकृती आहे .गाभाऱ्यास वेगळे असे अंतराळ नाही. द्वारशाखेवर दोन साधेपट्ट असून एक स्तंभशाखा आहे. ललाटबिंबावर मध्यभागी महाकालीची बैठी मूर्ती आहे. ललितासनात बसलेली मूर्ती चतुर्भुज आहे. हातांत, दक्षिणाधःकरक्रमान। तलवार,डमरू,त्रिशूल व कपाल आहे. तिच्या दोन्हीबाजूस चौरीधर स्त्रिया उभ्या आहेत. महाकालीच्या उजवीकडील स्त्रीने डाव्या हातात चौरी व उजव्या हातात महाळुंग धरले आहे.व डाव्याबाजूकडील स्त्रीने डाव्याहातात महाळुंग व उजव्या हातात चौरी धरली आहे.

गाभाऱ्यातील मागील भिंतीजवळ जुनी दगडी प्रभावळ असल्याच्या खुणा आजही दिसून येतात. त्याच्यासमोर पीठावर महाकालीची उभी मूर्ती आहे. ही मूर्ती चतुर्भुज आहे. तिच्या हातात दक्षिणाध:करक्रमाने त्रिशूळ, तलवार, शंख तसून उरलेल्या खालील डाव्या हाताने ती पायाखालील महिषाची जीभ ओढीत आहे.डावा पाय सरळ तर उजवा पाय महिषाच्या पाठीवर ठेवला आहे. महिषाची मान डावीकडे वळलेली.ही मूर्ती मूळ मूर्ती नाही. मूळ मूर्ती कशाप्रकारची होती याची कल्पना येत नाही.ही मूर्ती १८व्या शतकातील असावी. महालक्ष्मी मंदिरातील मूर्ती बरीच वर्षे कपिलतीर्थातील देवालयात होती.यादवांनतरच्या सुल्तानी काळात कधीतरी हे देवालय निर्जन होते.इ.स.१७२३ मध्ये जेंव्हा महालक्ष्मीच्या मूर्तीची पुन:स्थापना या मंदिरात झाली त्यावेळी महाकाली व महासरस्वती यांच्या निराळ्या मूर्त्या त्या त्या गाभाऱ्यात बसविण्यात आल्याअसाव्यात.

महासरस्वती देवालय :

हे देवालय महाकाली व महालक्ष्मी देवालयाशी विसंगत व दक्षिणाभिमुख आहे. फक्त दगडी चौकोनी तुकडे एकावर एक रचून हे देवालय बांधण्यात आले.देवालयाच्या आतील भागही इतर मंदिराचे अवशेष वापरून बनविण्यात आल्याचे दिसून येते.या मंदिराचा शिलाहार वा यादवकालीन कुठल्याही लेखांत उल्लेख आढळत नाही.त्यामुळे जामखेडकर यांचे मत पटावयास हरकत नाही.त्यांच्यामते महासरस्वती असलेले उत्तराभिमुख गर्भगृह एकतर पुनर्बांधणी झालेले आहे किंवा मध्ययुगीन काळात मुळात द्विगर्भ मंदिर असे स्वरूप असलेल्या मूळ मंदिरात या गर्भगृहाची भर पडली असावी[२०४].

अंतराळ :

महासरस्वती देवालयास महाकाली मंदिराप्रमाणे मंडप या महालक्ष्मी मंदिराप्रमाणे अंतराळ नाही. हे अंतराळ म्हणजे एक लांब पट्टा आहे. ८ अर्धस्तंभ व ९ पूर्ण स्तंभांवर आधारित हे अंतराळ आहे. यातील स्तंभ हे इतर मंदिरातील आणून बसवलेले स्तंभ असावेत.या अंतराळात येण्यासाठी पूर्व व पश्चिमेकडून पायऱ्या आहेत.

---

[२०४] जामखेडकर,२००२ ,पृ.१९४

गाभारा :

महासरस्वतीचा गाभारा चौरस असून आकाराने लहान आहे. हा गाभारा सांधार असून प्रदक्षिणापथ निर्गम - प्रवेशहीन आहे. गाभाऱ्यात पीठावर मूर्ती आहे. ही मूर्ती १७व्या शतकाती जैन यक्षिणीची मूर्ती आहे. ती चतुर्भुज असून तिच्या हातांत, दक्षिणाधःकरक्रमाने, वरद,पाश,अंकुश व वरद अशी लांछने आहेत.

महालक्ष्मी मंदिर बाह्यांग :

महालक्ष्मी मंदिर हा सप्तरथ प्रासाद,मेरुमंडोवर शैलीचे देवालय आहे.या देवालयास जंघा मात्र एकच आहे.पश्चिम भारतीय शैली व कर्नाट शैली यांचे मिश्रण याठिकाणी आपणास दिसून येते.मंदिराच्या बाह्यांगास भद्रातून उत्तर,पूर्व व दक्षिणेस तीन स्वतंत्र लहान देवालये आहेत.या देवालयात येण्यास जगतीवरून पायऱ्यांचे प्रयोजन आहे. उत्तरेकडील देवालयात व्यंकटेश,पूर्वेकडे कात्यायनी व दक्षिणेकडे गौरीशंकर आहेत.कुठल्याही देवालयातील मूर्ती ह्या मूळ वाटत नाहीत.या मूर्त्या नंतर बसवलेल्या आहेत. गौरीशंकर असलेले देवालय मूळ स्वरूपात आहे.या देवालयाच्या द्वारबंधास दोन साध्या शाखा व एक स्तंभ शाखा आहे.ललाटावर कसलेही अंकन नाही.बाकी दोन्ही देवालयांच्या गाभाऱ्याची पुनर्बांधणी केली आहे.या तीनही देवालयात पूर्वी गौरीशंकर,ब्रह्मा व सरस्वती आणि विष्णु व लक्ष्मी असाव्यात.या देवालयावर पोटमाळेही आहेत.

महालक्ष्मी मंदिराच्या जगतीला एकावर एक दोन खूर,कुंभ,कलश व कपोत आहे. यानंतर मंदिराला प्रदक्षिणा घालता येण्यासारखा अवसर आहे.या नंतर एकावर एक दोन खुर,जाडंब,कलश व छाद्य आहेत.छाद्यावर सपाट पट्ट व त्यावर भौमितिक प्रयोजने आहेत[२०१].जंघाभागावर देवकोष्ठे असून त्यांत सुरसुंदरींचे अंकन केले आहे. लहान मोठ्या अशा ७२ देवकोष्ठांत ह्या सुरसुंदरी आहेत(पहा देवालयातील सुरसुंदरी प्रकरण).या देवकोष्ठांवर नागर शैलीतील रेखानागर पद्धतींची शिखरे आहेत. त्यावर वरच्याभागात त्रिकोणाकृती प्रयोजन असलेले उद्गम त्यावर कलश,भरणी,शिरावटी व छाद्य हे भाग येतात. मंदिरावरील अलंकारपट्टांकडे निरखून पाहिल्यास काही ठिकाणचे अलंकरण अर्धवट असलेले

[२०१] जामखेडकर , २००२,पृ.१९९

दिसून येते.वेदीबंधावरील अर्धगोलाकार प्रयोजनात मूर्ती बसविण्यासाठी जागा असलेली दिसून येते. शिरावटी व छाद्याच्यामधील तुळयांवर विद्याधर कोरलेले आहेत.मंदिराचे मूळ शिखर पडलेले आहे. आता जे शिखर दिसते ते कोल्हापुरातील शंकराचार्यपीठाने १८व्या शतकात नवीन बनवलेले आहे.मूळ शिखर नागरशैलीचे असावे.

महाकाली मंदिराचे बाह्यांग :

महाकाली मंदिर हा पंचरथ प्रासाद असून दक्षिणाभिमुख आहे. या मंदिराच्या बाह्यांगावर महालक्ष्मी मंदिराप्रमाणेच भद्रात तीन देवालये आहेत.या देवालयास जाण्यास स्वतंत्र पायऱ्या आहेत. पश्चिमेस भरताची(जैन चौरीधर), उत्तरेस शत्रुघ्नाची (जैन चौरीधर) व पूर्वेस वासुदेवाची देवळी मुखमंडपयुक्त आहे.या लहान मंदिरांच्या उत्तरांगांवर वेसर प्रकारच्या शिखरांच्या प्रतिकृती आहेत. या देवालयांस महालक्ष्मी देवालयाप्रमाणे वरचा मजला नसल्यामुळे पोटमाळे नाहीत.

या मंदिराचे थर महालक्ष्मी मंदिराच्या थरांशी मिळते जुळते आहेत. फक्त हे थर महालक्ष्मी मंदिराच्या थरांच्या मानाने आकाराने मोठे आहेत. कदाचित महालक्ष्मी मंदिराची उंची गाठण्यासाठी अशाप्रकारची योजना केली असावी. जगतीवर एकावर एक असे दोन खुरे,उपान,आंतरपत्र,कुंभ,पद्म इत्यादि थर आढळतात[२०६]. आहेत. या मंदिरास जगतीवर प्रदक्षिणा घालण्यासाठी अवसर नाही. त्यावर जंघा भागात देवकोष्ठे असून या देवकोष्ठांत सुरसुंदरी आहेत.लहान मोठी मिळून एकूण ४० देवकोष्ठे आहेत. परंतू यातील सुरसुंदरींच्या अंकनाची शैली महालक्ष्मी मंदिराच्या सुरसुंदरीपेक्षा वेगळी आहे. देवकोष्ठांवरील मंदिराचे थर आज अस्तित्वात नाहीत त्यामुळे या मंदिरावर आज जरी शिखर असले तरी ते मूळ शिखर नाही. हे मंदिर सांधार प्रकारचे असले तरी या मंदिरावर वेसर पद्धतीचेच शिखर असावे.

महासरस्वती मंदिराचे बाह्यांग :

हे मंदिर सांधारपद्धतीचे असून उत्तराभिमुख आहे.हे देवालय महालक्ष्मी व महाकाली मंदिराप्रमाणे नसून एकदम साधे आहे. दगडी चौकोनी तुकडे एकावर एक रचल्याने स्थापत्यदृष्ट्या अर्थपूर्ण असे

---

[२०६] देगलूरकर.राणे.खणे.२०१०,पृ.१७

कुठलेही थर यावर आढळत नाही. या मंदिरासही तीनही बाजूनी भिंतीतच देवकोष्ठांचे प्रयोजन आहे. पश्चिमेकडील देवकोष्ठात गजलक्ष्मीची मूर्ती ठेवली आहे. दक्षिणेकडील देवकोष्ठ आज बुजवलेले दिसते. परंतु यात महासरस्वती मंदिराच्या अंतराळातील गरुडाची मूर्ती होती. महालक्ष्मीच्या उत्सवमूर्तीच्या मंदिर प्रदक्षिणेत अडथळा येत असल्यामुळे या मूर्तीची स्थापना आता असलेल्या ठिकाणी केली.पूर्वेकडे देवकोष्ठात शनीची मूर्ती होती. ती समोर आता मंडप बांधला आहे,त्याशेजारी एका लहान खोलीत राधाकृष्णाची मूर्ती ठेवली आहे.

शिखर

मंदिरावरील आज दिसणाऱ्या शिखरांची व कळसांची रचना कदाचित महालक्ष्मी मंदिरात महालक्ष्मी मूर्तीची पुन:स्थापना झाल्यावर, इ.स. १७२३च्या सुमारास, शंकराचार्यपीठाने केली असावी. तारिख ७ जानेवारी १७२४ च्या पत्रातील उल्लेखाप्रमाणे संभाजी महाराज दुसरे यांनी श्री शंकराचार्य मठास इनामपत्र दिले आहे . त्यात श्री महालक्ष्मी मंदिराचा जीर्णोद्धार केल्याबद्दल श्री शंकराचार्य विद्यानरसिंहभारती यांना पत्र लिहिले आहे.

महालक्ष्मी मंदिराच्या धाटणी वरून महालक्ष्मी मंदिराचे मूळ शिखर नागर शैलीचे तर महाकाली मंदिराचे मूळ शिखर वेसर पद्धतीचे असावे .

वरील सर्व वर्णनावरून हे लक्षात येते की

कोल्हापुरातील महालक्ष्मी देवालय त्रिकूट,प्राकारयुक्त असून पश्चिमाभिमुख आहे. या देवालयास तीन स्वतंत्र गाभारे असून मध्यभागी पश्चिमाभिमुख महालक्ष्मी, उत्तरेस दक्षिणाभिमुख महाकाली व दक्षिणेस उत्तराभिमुख महासरस्वती आहे. तीनही गर्भगृहे सांधार आहेत. या मंदिराची रचना वैचित्र्यपूर्ण व वैविध्यपूर्ण आहे असे म्हणता येईल.

काळाच्या बदलानुरूप मंदिरात वेळोवेळी बदल करण्यात आले. मराठा काळात जेव्हा महालक्ष्मी मूर्तीची पुन:स्थापना झाली त्यावेळी महालक्ष्मीची मूर्तीच गाभाऱ्याच्या मध्यभागात बसविली. स्वतंत्र कोष्ठाची सोय असताना कुठल्याही मंदिरात मूर्ती बाहेर बसवलेली आढळत नाही.पूजेअर्चेसाठी

लागणाऱ्या पाण्यासाठी नळाची सोय पाणी जाण्यासाठी वाट बनविण्यात आली.मुख्य गाभाऱ्याच्या खोल्यांमध्ये जमिनीवर फरशा बसविण्यात आल्या.मंदिराच्या प्रदक्षिणापथातील भिंतींवर पूर्वी देवीदेवतांची चित्रे काढण्यात येत असत.ती बंद करून नुतनीकरणाच्या नावाखाली भिंतींवर संगमरवरी फरशा बसविण्यात आल्या.नंतर त्यादेखील काढून टाकण्यात आल्या.महालक्ष्मीच्या पालखी परिक्रमेत अडथळा येत असल्यामुळे मंदिराच्या आवारात ठिकठिकाणी असलेल्या लहान देवकुलिका हटविण्यात आल्या.त्यातील मूर्तींचे स्थलांतर ओवऱ्यांत करण्यात आले.मंदिराच्या प्राकारात फरशी बसविण्यात आली.मंदिराच्या आवारात असलेले मनकर्णिकाकुंड बुजविण्यात आले.दक्षिणेस असलेले कारंजे काढून टाकण्यात आले.

महालक्ष्मी मंदिराचा अंतराळ व गाभारा हे मंदिराचे सर्वात प्रचीन अवशेष आहेत.गाभाऱ्यातही तीन स्वतंत्र खोल्या आहेत. या तीन खोल्यांत मध्ये महालक्ष्मी,उत्तरेस महाकाली व दक्षिणेस महासरस्वती या देवतांच्या मूर्तींची सोय असावी.

प्रदक्षिणापथात देवतेच्या पूजनासाठी लागणारे पाणी पुरविण्यासाठी कुंडाचे प्रयोजन आहे.ते पाणी गाभाऱ्यात असलेल्या गोमुखातून येऊ शकते.

अंतराळात उत्तर व दक्षिणेस दोन खोल्या आहेत.आज जरी त्यातील एक खोली बंद व दुसरी खोली दागिने ठेवण्यास वापरत असले तरी या खोल्यांत पूर्वी देवतांच्या मूर्ती असाव्यात.महालक्ष्मी बरोबर हमखास असलेल्या सप्तमातृकांचे अंकन आपणास मंदिरात दिसून येत नाही त्यामुळे महालक्ष्मीच्या परिवारातील या देवतांची स्थापना कदाचित या खोल्यांमध्ये असावी.

शिलाहार राजा गोंक याच्या काळातील(इ.स. १०२०-इ.स.१०५०) एकही शिलालेख वा ताम्रपट आज उपलब्ध नाहीत. परंतु गोव्याचा कदंब राजा षष्ठ (इ.स.१००५ ते इ.स.१०५०)कोल्हापुरास महालक्ष्मीच्या दर्शनास येत असे त्यावरून इ.स. १०३८च्या आधीपासून हे देवालय(निदान अंतराळ व गाभारा या स्वरुपात)अस्तित्वात होते असे म्हणण्यास जागा आहे. त्यामुळे कदाचित चालुक्यांचे मांडलिकत्व पत्करल्यानंतर गोंकाने या मंदिराची निर्मिती केली असावी.यास आणखी पुरावा म्हणजे इ.स.१०४१,इ.स.१०६३ व इ.स.१०६८ या काळातील कर्नाटकातील बागलकोट जिल्ह्यातील सिद्धेश्वर

मंदिराच्या भिंतीवरील लेखांत कोल्हापुरच्या महालक्ष्मीचा उल्लेख आला आहे. त्यावरून या काळात कोल्हापुरात हे महालक्ष्मीचे देवालय होते, हे निश्चित, आणि ते मंदिर हेच असावे असे मानण्यास हरकत नाही.

महाकाली मंदिराच्या पूर्वेकडील प्रवेशद्वाराजवळ आतीलबाजूने महालक्ष्मी मंदिराच्या वरच्या मजल्यावर जाण्यास मार्ग आहे. या मार्गावरून पायऱ्या चढताना महालक्ष्मी मंदिराच्या बाह्यांगाचा काही भाग दृष्टिपथास पडतो. त्यामुळे या पायऱ्या नंतरच्या काळात बंदिस्त केल्या असाव्यात हे सहज लक्षात येते.

सभामंडपाच्या पूर्व भिंतीतील दोन महाकाय द्वारपाल हे आज म्हटले जाते त्याप्रमाणे जय विजय नसून काल-वेताल असावेत.

सभामंडप आयाताकार वामनस्तंभ व वामनभिंतीयुक्त अर्धखुला मंडप आहे.या मंडपाची रचना बघता लक्षात येते की या मंडपातील स्तंभ एकसारखे नाहीत.महालक्ष्मी मंदिराच्या आसपास असलेल्या ,विध्वंस झालेल्या मंदिराचे अवशेष वापरून हा मंडप उभारण्यात आला आहे.इ.स.१०५२-५३ मध्ये झालेल्या चोल व चालुक्यांमधील युद्धाच्यावेळी चोलांनी महालक्ष्मी मंदिरावर आक्रमण करून मंदिर जाळण्याचा प्रयत्न केला अशा आशयाचा वीरगळ उपलब्ध झाला आहे.त्यावरून त्याकाळी या सभामंडपाजागी लाकडी मंडप असावा व त्या आक्रमणानंतर हा मंडप बांधण्यात आला असावा.

या सभामंडपाच्या बाह्यांगाकडे लक्ष देता असे लक्षात येते की बाह्यांगावर सुरसुंदरींचे अंकन आहे.या सुरसुंदरींच्या देवकोष्ठावर वेसर पद्धतीची शिखरे आहेत.महाकाली मंदिराचे बाह्यांगावर अशाच पद्धतीच्या सुरसुंदरी व वेसर पद्धतीची देवकोष्ठे दिसून येतात.त्यामुळे महाकाली मंदिर बांधले त्यावेळी सभामंडपाचा भाग महाकाली मंदिरास जोडण्यात आला असावा.त्याआधी सभा मंडपातून बाहेर जाण्यासाठी पायऱ्या असल्याचा पुरावा आजही उपलब्ध आहे.अगोदरच असलेल्या सभामंडपाला लागून महाकालीचे मंदिर नंतरच्या काळात बांधले असावे.

यादवांच्या काळात शिलाहार राजा द्वितीय भोज याचा बिमोड करून या भागावर आधिपत्य स्थापन करणाऱ्या यादव राजा सिंघण द्वितीय(इ.स.१२००-इ.स.१२४७) याने महाकाली मंदिराची निर्मिती केली असावी.कारण याच्याच काळात आपणास महाकालीचा महालक्ष्मीबरोबर उल्लेख मिळतो(कोल्हापुर शिलालेख,१५ ऑगस्ट इ.स.१२३५).

महासरस्वती मंदिराचा शिलाहार वा यादवकालीन कुठल्याही लेखांत उल्लेख आढळत नाही.त्यामुळे जामखेडकर यांचे मत पटावयास हरकत नाही.त्यांच्यामते महासरस्वती असलेले उत्तराभिमुख गर्भगृह एकतर पुनर्बांधणी झालेले आहे किंवा मध्ययुगीन काळात मुळात द्विगर्भ मंदिर असे स्वरूप असलेल्या मूळ मंदिरात या गर्भगृहाची भर पडली असावी.

महालक्ष्मी मूर्ति

महालक्ष्मी मंदिराच्या मुख्य गाभाऱ्यातील महालक्ष्मीची मूर्ति २फूट ९ इंचाची , उभी , चतुर्भूज स्वरूपाची आहे . हिच्या हातात दक्षिणाधःक्रमाने महाळुंग, गदा(गदेचा आमलक म्हणजे गट्टू जमिनीवर टेकलेला), खेटक(पाठीचा भाग दृश्य) व पानपात्र आहे . तिच्या डोक्यावरील मुकुटावर सयोनि लिंग आहे . तिच्या डाव्या पायाजवळ सिंहाकृती आहे ..मूर्तिची झीज व वज्रलेपामुळे तिच्या अंगावरील दागिने स्पष्ट दिसत नाहीत

ह्या महालक्ष्मीच्या मूर्तिचे वर्णन **मार्कंडेय पुराणातील देवी माहात्म्य** (उत्तरांग विधि :५ प्राधानिक रहस्यम [२०७]श्लोक ४-६,इ.स. १० वे शतक) **विश्वकर्मशास्त्र ,चतुर्वर्गचिंतामणि** (व्रतखंड अध्याय १, हेमाद्रि काळ – इ.स. १२६०-१३०९) , **रूपावतार** (इ.स.१४५०) , **रूपमंडन** (पाचवा अध्याय,५९-६०,इ.स. १५ वे शतक),**नित्यकर्मसंग्रह, करवीर माहात्म्य** (इ.स.१४वे शतक) व **लक्ष्मीविजय** (इ.स.१८ वे शतक) या ग्रंथांत आलेले आहे . यातील **विश्वकर्मशास्त्र, चतुर्वगचिंतामणि, रूपावतार** व **रूपमंडन** यामधील महालक्ष्मीचे वर्णन एकाच प्रकारचे आहे . परंतू **देवी माहात्म्य मार्कंडेय पुराण, नित्यकर्मसंग्रह, करवीर माहात्म्य,**व **लक्ष्मीविजय** या ग्रंथातील महालक्ष्मी मूर्तीच्या लांछनांत फरक आहे .

हेमाद्रीने आपल्या **चतुर्वगचिंतामणि** या ग्रंथात **विश्वकर्मशास्त्र** या ग्रंथातील महालक्ष्मीचे वर्णन घेतले आहे .

क्षेत्रे कोल्लापुरादन्ये महालक्ष्मीर्यदोच्यते
लक्ष्मी वत्सा तदा कार्या रूपाभरणभूषिता
दक्षिणाधःकरे पात्र मूर्ध्वे कौमोदकी ततः
वामोर्ध्वे खेटकं धत्ते श्रीफलं तदधः करे

[२०७]चित्राव ,१९८३:पृ.२६०

बिभ्रती मस्तके लिङ्ग पूजनीया विभूतये ।।५।।[२०८]

रूपावतार व **रूपमंडन** या ग्रंथात महालक्ष्मीच्या वर्णनाचा श्लोक वरील प्रकारेच आलेला आहे .

क्षेत्रे कोल्लापुरादन्ये महालक्ष्मीर्यदार्च्यते

लक्ष्मी वत्सा तदा कार्या रूपाभरणभूषिता

दक्षिणाध:करे पात्र मूर्ध्वे कौमोदकी भवेत्

वामोर्ध्वे खेटकं धत्ते श्रीफलं तदध: करे ।।

वरील चारही ग्रंथांतील वर्णनांप्रमाणे महालक्ष्मीच्या हातात दक्षिणाध:करक्रमाने पानपात्र, गदा ,खेटक व श्रीफळ आहे . मस्तकावर लिंग असल्याचा उल्लेख **विश्वकर्मशास्त्र** व **चतुर्वर्गचिंतामणि** या दोन ग्रंथांत आला आहे . **रूपावतार** व **रूपमंडन** या दोनही ग्रंथांत याचा उल्लेख नाही . सध्याच्या महालक्ष्मीचे रूप बघता तिच्या हातात पानपात्रा ऐवजी महाळुंग व श्रीफलाऐवजी पानपात्र आहे . या चारही ग्रंथांत महालक्ष्मीच्या पायाजवळील वामावर्ती सिंहाचा उल्लेख आलेला नाही .**रूपमंडन** या ग्रंथातील ५ व्या अध्यायातील ३५व्या श्लोकात महालक्ष्मीचेरूप

वरं त्रिशुलं खेटं च पानपात्रंच बिभ्रती।

नीलकण्ठं तथा नागा (गं)महालक्ष्मी:प्रकीर्तिता ।।३५।।

असे आले आहे. महालक्ष्मीच्या प्रतिमेत लिंग व नागाचा उल्लेख आहे मात्र योनिचा उल्लेख नाही.[२०९] हेमाद्रीचा काळ इ.स. १२६० ते १३०७ तर सूत्रधारमंडन याचा काळ इ.स.१४५० आहे .

मार्कंडेय पुराणाच्या देवीमाहात्म्यातील मूर्ती रहस्यातील प्राधानिक रहस्यात महालक्ष्मीच्या मूर्तीचे वर्णन आले आहे .

---

[२०८] भट्टाचार्य,१९८५

[२०९]श्रीवास्तव,१९९६: पृ.१९०

सर्वस्याद्या महालक्ष्मीस्त्रिगुणा परमेश्वरी

लक्ष्यालक्ष्यस्वरूपा सा व्याप्य कृत्स्नं व्यवस्थिता।

मातुलिङ्गं गदां खेटं पानपात्रं च बिभ्रती

नागं लिङ्गं च योनिं च बिभ्रती नृप मूर्धनि ।।५।।[210]

नित्यकर्मसंग्रह या ग्रंथात महालमीचे वर्णन असेच आले आहे .

धृत्वा श्रीर्मातुलिंगं तदुपरि च गदां खेटकं पानपात्रम्

नागं लिंङ्गं च योनिं शिरसि दृतवती राजते हेमवर्णा ।।[211]

करवीर माहात्म्य या ग्रंथात आलेले वर्णन अशा प्रकारचे आहे .

मातुलिंङ्गं गदां खेटं पानपात्रं च बिभ्रतीम्

नागं लिंङ्गं च योनिं च बिभ्रतीं मस्तके शुभे ।।[212]

लक्ष्मीविजय या ग्रंथात महालक्ष्मी मूर्तीचे वर्णन अशा प्रकारे आले आहे .

मातुली गदा खेट करी । शोभे सुधापानादि अमृतलहरी ।।

भुजंगमलिंग कबरी भारी । त्रिवेणी झळके मस्तकी ।।[213]

देवी माहात्म्य , नित्यकर्मसंग्रह , करवीर माहात्म्य व लक्ष्मीविजय या चारही ग्रंथांतील महालक्ष्मीच्या वर्णना महालक्ष्मीने हातात महाळुंग, गदा, खेटक व पानपात्र धरलेले आहे . मूर्तीच्या मस्तकावर लिंग , योनि व नागाचा फणा आहे . परंतू या ग्रंथांतही महालक्ष्मी मूर्तीच्या पायाजवळील सिंहाचा उल्लेख नाही .

---

[210] चित्राव , १९८३;पृ.२६०

[211] खरे, १९५८;पृ.५६

[212] तगारे ,अ.६ श्लोक २५

[213] अंगापुरकर,अ.१०,श्लोक२५

आज दिसणाऱ्या मूर्तीच्या हातातील आयुधे वरील ग्रंथांतील वर्णनासारखीच आहेत परंतू आज तिच्या मस्तकावर सयोनि लिंग असले तरी नागाचा फणा नाही .

या चारही ग्रंथांचा काळ बघितला तर **मार्कंडेय पुराणातील** प्राधानिक रहस्य व **नित्यकर्मसंग्रह** यांचा काळ बऱ्याच नंतरचा(साधारण १६वे शतक) तर **करवीर** माहात्म्याचा काळ तगारे यांच्या मते इ.स.चे १४वे शतक आहे . **लक्ष्मीविजय**चा काळ तर फारच अलिकडचा म्हणजे १८ वे शतक आहे .

इ.स. १०४९,इ.स.१०६३ व इ.स.१०६५ मधील कर्नाटकातील बागलकोट तालुक्यातील सिद्धेश्वर मंदिरावरील लेखात कोल्हापुरच्या महालक्ष्मीस सिंघवाहिनी म्हणले आहे . परंतु वरील कुठल्याही ग्रंथांत सिंहाचा उल्लेख नाही . कागदपत्रांतील पुराव्यांत मात्र पेशवाईतील जमाखर्चाच्या उताऱ्यात महालक्ष्मीच्या सिंहाची दुरुस्ती करण्यास खर्च केल्याचे नमूद केले आहे . सिंहाची मूर्ती स्पष्ट रूपात दिसत नसल्यामुळे कदाचित ग्रंथांत त्याचे वर्णन आले नसावे . किंवा मग विष्णुपत्नी लक्ष्मीच्या रूपात तिचे वर्णन करताना सिंहाचा निर्देश टाळला असावा .

महालक्ष्मीच्या आवारातील गणपतीच्या देवळाच्या एका खांबावरी सिंघण यादवाच्या काळातील (इ.स.१२१८-१९)च्या लेखात महालक्ष्मीची स्तुती आली आहे .

> शुभयास्तु महालक्ष्मीर्भवंतां भवतारिणी ।
>
> बिभ्रती शिरसा लिंगमशेषाघौघहारिणी ।।

या श्लोकात महालक्ष्मीचे वर्णन करताना तिच्या डोक्यावर लिंग असल्याचे सांगितले आहे .

खरे यांनी आपल्या **महाराष्ट्राची चार दैवते** या ग्रंथात महालक्ष्मीच्या मूर्तीचे दोनदा परीक्षण केल्याचे नमूद केले आहे. पहिल्यांदा इ.स. १९३५ मध्ये केले .मूर्तीच्या अंगच्या मुकुटावर लिंग व योनि यांच्या आकृत्या दिसल्या . योनीचा वाटोळा भाग व तीमधील लिंग मागच्या बाजूस असून योनीचा चिंचोळा भाग आहे . देवीच्या मागे वामावर्ती पण समोर तोंड केलेला सिंह आहे, असे म्हणतात . पण

मला तो स्पष्ट ओळखू आला नाही . यानंतर इ.स. १९५४ मध्ये मूर्तीस वज्रलेप करण्यात आला . या वज्रलेपानंतर खरे यांनी मूर्तीचे परत एकदा सूक्ष्म निरिक्षण केले .तेंव्हा मूर्तीच्या डोक्यावर अनुक्रमे नागफणा , त्याखाली लिंग व त्याभोवती योनि असे दृश्य आढळले . पूर्वी मूर्तीच्या डोक्यावर अंगचा नाग नव्हता .

आज आपण जेव्हा महालक्ष्मीची मूर्ती बघतो तेव्हा मूर्तीच्या मस्तकावरील लिंग जरी स्पट असले तरी योनीचा भाग तितकासा स्पष्ट नाही . मूर्तीवर नागफणा मात्र आज दिसत नाही . मूर्तीच्या मागील चांदीच्या प्रभावळीवर नाग दिसतो . दुसऱ्या परीक्षणात मात्र खरेंनी सिंहाचा उल्लेख केलेला नाही . आज मात्र सिंह पुसटशा स्वरुपात दिसतो . मूर्तीच्या झालेल्या झीजीमुळे कदाचित हे घडले असावे .

इ.स.१९३५, इ.स.१९५४ व इ.स.२०१० मध्ये झालेला मूर्तीतील फरक आपण पाहिला . यावरून मूर्तीवर करण्यात येणाऱ्या वज्रलेपामुळे मूर्तीत फरक पडू शकतो हे लक्षात येईल. कदाचित **चतुर्वर्गचिंतामणि,रूपावतार व रूपमंडन** या ग्रंथांत निर्दिष्ट केलेली महालक्ष्मीची लांछने वज्रलेप करताना बदलली असावी अशी शक्यता नाकारता येत नाही .

महालक्ष्मीची मूर्ति ही पद्मावतीची मूर्ति नाही याचे विवेचन खरे यांनी केले आहे व त्यांनी सविस्तरपणे पद्मावती व महालक्ष्मी यातील फरक स्पष्ट केलेला आहे[२१४].

वरील सर्व वर्णनावरून हे लक्षात येते की

महालक्ष्मी मूर्तीच्या एकंदर धाटणीवरून ही मूर्ती इ.स. ११व्या शतकातील असावी. **चतुर्वर्गचिन्तामणि,रूपावतार व रूपमंडन** या ग्रंथांत निर्दिष्ट केलेली महालक्ष्मीची लांछने वज्रलेप करताना बदलली असण्याची शक्यता नाकारता येत नाही .

हेमाद्रीने वर्णन केलेली महालक्ष्मी ही कोल्हापुर सोडून अन्य ठिकाणी नसावी असे जरी म्हटले असले तरी आपणास ताहाकारी येथील देवालयात कदाचित महाकाली.महालक्ष्मी व महासरस्वती यांचे

---

[२१४] खरे,१९५८,पृ.६९-७६

वास्तव्य असावे.इ.स. १२ व्या शतकातील मेथी येथील मंदिरातील मूर्ती कोल्हापुरच्या महालक्ष्मीसारखीच आहे.खरे यांनी[२१५] "सांगितल्याप्रमाणे ग्रंथांतरी कोल्हापुर सोडून इतरत्र महालक्ष्मीची मूर्ती करून बसविणे झाल्यास तिचे रूप लक्ष्मीसारखे करावे म्हणून सांगितले असले तरी तो नियम व्यवहारात प्रत्येक ठिकाणी पाळला गेलाच असे दिसत नाही. खुद्द कोल्हापुरात कपिलतीर्थाजवळ महालक्ष्मीची अशीच मूर्ती आहे.

[२१५] खरे १९५८,पृ.६१

महालक्ष्मी मूर्तीवरील वज्रलेप

इ.स. १९१८-१९च्या सुमारास छत्रपती श्री शाहू महाराज यांचे देवळात अचानक आगमन झाल्यामुळे भांबावून जावून पुजाऱ्याच्या हातून पाण्याचा तांब्या मूर्तीच्या डाव्या हातावर पडला. त्यामुळे मूर्तीचा डावा हात कोपरापासून निखळला. मूर्तीच्या कमरेत चांदीच्या पट्ट्या बसवून त्या हाताला आधार देण्यात आला. देवालयात दुसरी मूर्ति बसविण्याबाबत चर्चा सुरू झाली. परंतू दुसरी मूर्ति बसविण्यास कोणी राजी होईना. यावर उपाय म्हणून छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापुरातील श्री.शंकराचार्य, गुरुमहाराज, राजोपाध्ये या विव्दानांचा सल्ला घेऊन मूर्तीवर सोन्याचे कवच चढविण्याचे ठरविले. परंतु दुर्दैवाने छत्रपतींचे देहावसान झाले व ही योजना प्रत्यक्षात उतरली नाही.

कोल्हापुर संस्थानाच्या विलीनीकरणानंतर देवस्थानाचा कारभार जिल्हाधिकाऱ्यांच्या हातात आला. मूर्तीवर सतत होणारे पंचामृतस्नान,दुग्धाभिषेक यामुळे मूर्तीची बरीच झीज झाली होती व आजही होत आहे.

इ.स.१९५५ साली जगन्नाथपुरीचे शंकराचार्य योगेश्वरानंद महालक्ष्मीच्या दर्शनास कोल्हापुरास आले. त्यावेळी मंदिरातील पुजाऱ्यांनी महालक्ष्मीस वज्रलेप करण्याबद्दल विचारणा केली. नाशिकचे मूर्तीकार दाजीसाहेब क्षीरसागर यांचा सल्ला घेऊन शंकराचार्यांनी वज्रलेप करण्याचा निर्णय घेतला. यासाठी श्रीकरवीरनिवासिनी वज्रलेप समिती स्थापन झाली. या समितीचे अध्यक्ष योगेश्वरानंद स्वामी, उपाध्यक्ष राजवैद्य यशवंत चिं.गुणे व सभासद कृ.म.आष्टेकर, श्री.प.स.देसाई, श्री.दुधगांवकर वैद्य आणि इतर मंडळी होती.[२१६]

शके १८७६ पौष वद्य ८ ते फाल्गुन शुक्ल ३ (१६ जानेवारी १९५५ ते २४ फेब्रुवारी १९५५) या काळात महालक्ष्मी मूर्तीवर वज्रलेप करण्यात आला. श्री.ग.ह.खरे यांच्यामताप्रमाणे वज्रलेपापूर्वीची मूर्ती

[२१६] धर्माधिकारी,२००३ ,पृ.३४

वज्रलेपानंतरची मूर्ती यांत बराच फरक जाणवतो. वज्रलेपानंतर मूर्तीचा आकार ओबडधोबड होऊन चेहरा लहान झाला. पुर्वी मूर्तीच्या डोक्यावर अंगचा नाग नव्हता.[२१७]

वज्रलेप करीत असताना मूर्तीच्या मस्तकावरील लिंग व योनि यांची दिशा बदललेली आढळली.[२१८] हीगोष्ट समिती समोर आणून दिल्यावर लिंग व योनि यांचे स्थान पूर्ववत् करण्यात आले.

फाल्गुन शुद्ध ३ सोमवार अमृतसिद्धी योगावर (२४ फेब्रुवारी १९५५) मूर्तीची पुन:स्थापना करण्यात आली. यावेळी समितीतर्फे वेदपठन, देवीभागवत पारायण, सप्तशतीपाठ, श्रीसूक्त व अथर्वशीर्ष आवर्तने, गायत्री मंत्र, सात यज्ञकुंडे यात गणेश याग, विष्णु याग,शतचंडी, महारुद्र स्वाहाकार असे कार्यक्रम करण्यात आले.

इ.स. १९५५ साली केलेला हा वज्रलेप फार काळ टिकला नाही. मूर्तीवर होणारे सततचे अभिषेक , पंचामृत स्नान यामुळे या कवचाला पोपडे धरले व हा वज्रलेप निखळू लागला आहे. आता तर फक्त चेहऱ्याचाच वज्रलेप शिल्लक आहे.

मूर्तीवरील कवचाचे तुकडे निघाल्याचे लक्षात आल्यानंतर बऱ्याच वर्षांनी कोल्हापुरच्या जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार(दिनांक २६-८-१९८७) मूर्तीवर होणारे अभिषेक बंद करण्यात आले. आता पूर्ण मूर्तीवर अभिषेक होत नाहीत परंतू आजही दिवसातून तीनवेळा मूर्तीच्या पादुकांवर पंचामृताचा अभिषेक केला जातो. दिवसातून तीन वेळा मूर्तीला ओल्या कपड्याने पुसल्या जाते.

शृंगेरी पीठाच्या श्री जगद्‌गुरू शंकराचार्य यांचे सचिव साहित्य महोपाध्याय डॉ.एन्.एस् दक्षिणामूर्ती यानी श्री.प्रफुल्ल मुनीश्वर (श्रीपूजक, महालक्ष्मी मंदीर, कोल्हापुर) यांना दि. २१-२-२००१ या तारखेस लिहिलेल्या पत्रात श्री महालक्ष्मीकी मूर्ति अति प्राचीन है। इसके पूर्व वज्रलेप परिणामकारी न होने से पुनरपि वज्रलेप करना युक्तिसंगत नही है। अतएव स्वर्णकवच धारणद्वारा मूर्तीकी सुरक्षा करनी चाहिये। अशा आशयाचे पत्र पाठविले आहे.

---

[२१७] खरे,१९५८ , पृ ४
[२१८] धर्माधिकारी वा.रा.,२००३ , पृ १४

मूर्तीची होणारी ही झीज वाचवण्यासाठी इ.स.२००८ च्या जानेवारी महिन्यात कोल्हापुरच्या गोखले महाविद्यालयातील डिपार्टमेंट ऑफ जिऑलोजी विभागाचे प्रमुख प्रो.डॉ एम्.के.प्रभू यांनी मूर्तिची शास्त्रीय दृष्ट्या पडताळणी केली. त्यांच्या मते-

" Shree Mahalakshmi statue has been carved out of Basic Igneous Rock of Basoltic Composition. The rock is fine to medium grained, nearly Equigranular, Granular. It is hard and compact. It is dolerite. The rock contains nearly equal amount of plagioclase feldspars and pyroxenes. The rock contains Silica (SiO2), Alumina (A1203), Iron (Fe203 and Fe 304), Lime (CaO), Magnesia (Mgo), Alkalis (NaO) and other minor and trace elements."[219]

डॉ. प्रभू यांच्यामते दगडाची होणारी नैसर्गिक झीज त्याचबरोबर मूर्तीवर केले जाणारे अभिषेक , वारंवार झालेले वज्रलेप यामुळे मूर्ती वज्रलेप करण्यास अयोग्य आहे.

श्री करवीरनिवासिनी अंबाबाई (महालक्ष्मी) हक्कदार श्रीपूजक मंडळ यांनी दि.१०-६-२००८या दिवशी पुण्यातील इंस्टीट्यूट ऑफ रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट इन ओरियंटल स्टडीज, आर्मस् एन्ड आर्मर, पुणे (इरडॉस) या कंपनीस महालक्ष्मी मूर्तीवर वज्रलेप करण्यासाठी शास्त्रीय साधनांच्या माध्यमातून निरीक्षण करण्यास पाचारण केले. या समितीने गाभाऱ्याची परिस्थिती, मूर्तीवर होणारे संस्कार, मूर्तीवरील वस्त्र,फुले, गाभाऱ्यातील उष्णता या सर्वांचा अभ्यास करून रिपोर्ट तयार केला. या रिपोर्ट प्रमाणे मूर्ती वज्रलेप करण्याच्या स्थितीत नाही असा निर्वाळा दिला. तज्ञांच्या मते सुधारित तंत्रज्ञान व विज्ञानाच्या माध्यमातून जुना वज्रलेप काढून त्यावर विशिष्ठ प्रकारच्या औषधांचा पातळ थर देऊन ही मूर्ती संरक्षित करू शकतो[२२०]एकूण त्यांनी देखील श्री शंकराचार्य व डॉ. प्रभू यांच्याच मताला दुजोरा देत वज्रलेप न करण्याचा सल्ला दिला आहे. ही माहिती श्री शरद मुनीश्वर व श्री. उमाकांत राणिंगा यांच्याकडून मिळाली.

---

२१९ साईंटीफिक रिपोर्ट डॉ.एम.के.प्रभू २-१-२००८

२२० इंस्टीट्यूट ऑफ रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट इन ओरियंटल स्टडीज, आर्मस् एन्ड आर्मर, पुणे (इरडॉस) रिपोर्ट पृ.३

महालक्ष्मी मंदिराच्या आवारातील देवालये

महालक्ष्मी मंदिराच्या प्राकारात अनेक देवदेवता आढळून येतात. आज मुख्य देवळाच्या आजूबाजूचा भाग रिकामा दिसत आहे. बदलत्या काळानुरूप हे स्वरूप आज आपणास पहावयास मिळते.या प्रांगणात पूर्वी देवतांची विविध लहान देवालये होती. महालक्ष्मीच्या शुक्रवारी आणि इतर उत्सवांत होणाऱ्या पालखी परिक्रमांत अडथळा येत असल्यामुळे या लहान देवळांमधील मूर्त्या प्राकाराला लागून असलेल्या ओवरींत स्थलांतरीत करण्यात आल्या.ही सुधारणा इ.स.१९५८ मध्ये करण्यात आली.

कुंदनगार[२२१] यांनी मंदिराच्या आवारातील देवतांचे वर्णन केले आहे. तसेच ग.ह.खरे[२२२] यांनी मंदिराच्या आवारातील देवळांचे आणि देवतांचे विस्तृत वर्णन केले आहे. कुंदनगारांनी केलेल्या वर्णनात फक्त देवतांची नांवे व त्यांचे स्थान वर्णन केले आहे.इ.स.१९२९ व इ.स.१९५८ या काळातील वर्णने एकमेकांशी जुळतात; फरक झाला आहे तो त्यानंतरच. धर्माधिकारी[२२३] यांनी बऱ्याच विस्ताराने महालक्ष्मी मंदिराच्या आवारातील देवतांच्या स्थानांचे वर्णन केले आहे. त्यांनी देवतांचे पूर्वीचे स्थान व आता असलेली स्थाने सांगितली आहेत.श्री. दाजिबा जोशिराव यांनी संस्कृत मध्ये महालक्ष्मी मंदिराच्या परिसरातील देवतांच्या स्थानांची वर्णने श्लोक रूपात एका पोथीत[२२४] सांगितली आहेत.

पश्चिमाभिमुख असलेल्या महालक्ष्मी मंदिराच्या महाद्वारातून आत प्रवेश केल्यावर पायऱ्याजवळ उत्तर व दक्षिणेस दोन दीपमाळा आहेत.उत्तरेकडील दीपमाळेसमोर एडका आहे. दक्षिणेकडील दीपमाळेसमोर नंदी आहे.

---

[२२१] कुंदनगार,१९२९ ,पृ.४ - ६

[२२२] खरे ,१९५८ , पृ.८ -१५

[२२३] धर्माधिकारी , २००३, पृ. १६-२५

[२२४] आपटे,१९८४

गणपती देऊळ: महाद्वाराच्या उत्तरेस आज आपणास पाणपोई दिसते. त्याजवळ गारेच्या गणपतीचे देऊळ आहे. पूर्वाभिमुख,१२ खांबांचे लहान गाभारा असलेल्या ह्या देवळाच्या गाभाऱ्यातील गणपतीची मूर्ती उभी व उजव्या सोंडेची असून तिच्या दोन्ही बाजूस चौरीधर स्त्रिया व बाजूला ऋध्दि व सिध्दि आहेत.गणपतीची ही मूर्ती प्राचीन नाही परंतु देवळाच्या मंडपातील एका खांबावरील लेखावरून[२२५] मंडप प्राचीन असण्याची शक्यता आहे. बहुधान्य संवत्सर, शके ११४०(इ.स.१२१८)या काळातील यादव राजा सिंघण याच्या काळातील हा लेख आहे. या लेखात महालक्ष्मीचे "बिभ्रती शिरसा लिंङ्ग "असे वर्णन आले आहे.

१९५८च्या सुधारणाकाळापूर्वी हे देऊळ अंधारातच होते. मंदिरासमोर व महाव्दाराजवळ मिठाईची दुकाने व अंब्याचा पार होता. मंदिर दुमजली होते सुधारणा काळात मंदिराची अतिक्रमणे हटवून मंदिराची माडी व जिना काढून टाकण्यात आला व मंदिराची पुनर्बांधणी केली.

गणपती देवळानंतर आज आपणास पोलीस चौकी आणि देवस्थान व्यवस्थापन समितीचे कार्यालय दिसते.

गुलाबराव महाराज मठ: (आज अस्तित्वात नाही) कोल्हापुरातील रहिवाश्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार तिथे पूर्वी गुलाबराव महाराजांचा मठ होता.कुंदनगार व ग.ह.खरे यांनी त्या जागेवरील वास्तूचा उल्लेख केलेला नाही. मात्र वा.रा. धर्माधिकारी यांनी येथील मठाचे वर्णन केले आहे. १९५८च्या सुधारणाकाळापूर्वी याठिकाणी दत्त संप्रदायातील महंत गुलाबराव महाराज यांचा मठ दुमजली होता. या दुमजली मठात वरच्या माडीवर महंत रहात असत. या मठामागे बाग (तुतुची बाग) होती. शेजारी पंडितराव यांचे घर होते.

सुधारणाकाळात या सर्व ओवऱ्या रिकाम्या करून या जागी पहिल्या ओवरीत पोलिस चौकी व नंतरच्या दोन ओवऱ्यांत व्यवस्थापन समितीचे कार्यालय बनवले आहे. नंतरच्या पांच ओवऱ्यांत विस्थापित देवतांना पुन: स्थापित केले आहे.

---

[२२५] मिराशी .१९५७ . पृ .४३

व्यवस्थापन समितीच्या कार्यालयास लागून पुढे ज्या ओवऱ्या निर्माण झाल्या आहेत त्यात आवारातील देवळ्या काढल्यानंतर ज्या मूर्ती विस्थापित झाल्या त्या या ओवऱ्यांत बसविण्यात आल्या आहेत.या ओवऱ्यांचा उल्लेख वरील दोन्ही लेखकांनी केला नाही.म्हणजे ह्या ओवऱ्या इ.स.१९५८ नंतर बांधलेल्या आहेत.

व्यवस्थापन समितीच्या कार्यालयानंतर असलेल्या ओवऱ्यांत क्रमाने मुक्तेश्वरी, कनकेश्वर, योगेश्वरी, हरिहरेश्वर, हनुमान,शाकंभरी या देवता ओवऱ्यात बसविण्यात आल्या आहेत.(या सर्व देवतांच्या स्वतंत्र देवळ्या होत्या.)

मुक्तेश्वरी : दत्त मंदिरास लागून पूर्वेस, पश्चिमाभिमुख मुक्तेश्वराची देवळी व उघडा मंडप होता. चार खांबांचा हा उघडा मंडप होता. या मंडपात उभे राहून मुक्तेश्वरीचे दर्शन घेता येत होते. सुधारणेनंतर हा मंडप व देऊळ काढून टाकण्यात आले.मुक्तेश्वरीची मूर्ति उभी व अर्वाचीन असून हातांत अनुक्रमे महाळुंग, गदा,ढाल व पानपात्र घेतलेली आहे.

कनकेश्वर: पूर्वी श्री.पंडितराव यांच्या घरात या शिवलिंगाचे देऊळ होते. सुधारणाकाळात पंडितराव यांचे घर पाडण्यात आले व या देवतेची स्थापना या ओवरीत केली.

योगेश्वर: ही देवळी पूर्वी दत्तात्रय मंदिराजवळ असलेल्या अंगाऱ्याच्या कुंडाजवळ पश्चिमाभिमुख होती. तिच्यासमोर रंगशिला त्यावर कासव व ।। दवलतराव भोसले सुभेदार इनामदार मौजे संमसी।। असा लेख होता.[२२६] सुधारणाकाळात हे देऊळ उतरविण्यात आले व तेथील शिवलिंग या ओवरीत बसविण्यात आले.

हरिहरेश्वर: १९५८च्या सुधारणापूर्वकाळात ही शंकराची पिंडी एका देवळात होती. हे देऊळ सध्याच्या दत्त मंदिराच्या मागे पश्चिमेकडे होते. हिच्या दाराच्या दक्षिणेस भिंतीत एक लेख[२२७]आहे. हा शिलालेख

[२२६] खरे ,१९५८ , पृ .९

[२२७] एपि. इं. ,खंड २९ , पृ .१७

पूर्वी श्री.पंडितराव यांच्या घरातील अवशेषात सापडला होता असे म्हणतात[२२८].या लेखाचा काळ शक ११०४,शुभकृत संवत्सर ,पुष्य शुक्ल ४, भौमवार,उत्तरायण संक्रांती(१डिसेंबर ११८२)असा आहे. या लेखात वर्णन केलेले महालक्ष्मी मंदिराच्या पश्चिम द्वाराच्या उत्तरेस असलेले अमृतेश्वर व उमामहेश्व देवालय असावे असे खरे यांचे मत आहे.[२२९]सुधारणेनंतरच्या काळात येथील पिंड इथल्या ओवरीत आणून बसवली व ते देऊळ उतरविण्यात आले.

शाकंभरी: या शाकंभरीचे देवालय मंडपासहित सुधारणापूर्वकाळात मनकर्णिका कुंडाच्या दक्षिण भिंतीस लागून पूर्वाभिमुख होते. सुधारणाकाळात हे मंदिर काढण्यात येऊन मूर्ती या ओवरीत आणून ठेवली आहे. मूर्ती अष्टभुजा महिषमर्दिनीची आहे. रा.चिं.ढेरे यांच्या मते[२३०] कर्नाटकातील बदामीच्या बनशंकरीचे हे ठाणे आहे.

पायऱ्या उतरून खाली प्रांगणात येताना उत्तरेस दक्षिणाभिमुख दोन दुकाने व बँकेची इमारत आहे.

व्यवस्थापन समितीच्या कार्यालयासमोर प्रांगणात एक लहान कारंजे दिसते तो पूर्वी मोठा हौद होता. सुधारणाकाळात तो लहान करण्यात आला आहे.

दीपमाळा: हा भाग सुधारणाकाळानंतरही आहे तसाच ठेवला आहे. उंच कट्टयावर चार कोपऱ्यात चार लहान व मध्ये एक मोठी अशा पाच दीपमाळा आहेत. या कट्ट्याच्या चारही बाजूनीं भिंतीच्या मध्ये चार छोट्या देवळ्या आहेत. त्यात छोटा नाग, पांच फण्यांचा मोठा नाग, बैठा चतुर्भुज भैरव व शिवलिंग अशा मूर्ति आहेत.(हा स्थापत्याचा भाग श्री. ग.ह.खरे यांनी वर्णन केल्याप्रमाणेच आहे).

नाथपंथी समाधी: दीपमाळांच्या उत्तरेस एकापुढे एक अशा दोन नाथपंथीय साधूंच्या समाध्या आहेत. त्यातील उत्तरेकडील समाधीच्या आग्नेय खांबाजवळील खांबावर एक देवनागरी लिपीतील लेख आहे. या लेखातील अक्षरे अस्पष्ट आहेत. परंतू लेख याप्रमाणे आहे-

[२२८] खरे .१९५८ . पृ. ४३
[२२९] खरे .१९५८ . पृ . ९
[२३०] ढेरे,पृ. २७४

१)आखाडा निरंजन पंचायती

२)हेतवे जगतामेव संसारार्णवसेतवे प्रभवे सर्ववि-

११)द्यानां शंभवे गुरवे नम:।। स्वस्ति श्री नृपशालि

१२)वाहन शके १६०६ वर्षे रक्ताक्षि नाम संवत्सरे

१३)दक्षिणायने आस्विनमासे कृस्नपक्षे दशव्या(म्यां)

१४)गुरुवासरे तदिन श्रीमत्परमहंस ग्त (ध)

१५)र्मगिरी श्री दत्तात्रयसन्निधौ समा-

१६)धी जिवंत समाधी समाले

खरे यांच्यामते[२३१] जंत्रीप्रमाणे गत शक १६०६(इ.स. १६८४)रक्ताक्षि संवत्सर पडत असून जंत्रीप्रमाणे आश्विन कृष्ण नवमीस या दोनही साधूंनी जिवंत समाध्या घेतल्या असे दिसते. शिवदयालपुर यांची (दक्षिणेकडील) व भगवानदासपुरी (उत्तरेकडील) यांच्या त्या समाध्या आहेत. १९५८च्या सुधारणाकाळापूर्वी या समाध्यांवर दुमजली इमारत होती. दर १२ वर्षांनी संपूर्ण भारताची यात्रा करणारे नाथ संप्रदायी साधूंच्या झुंडी येथे येऊन वास्तव्य करीत असत.सुधारणाकाळात माडी व निवासाची जागा काढून टाकण्यात आली व समाध्या तशाच ठेवण्यात आल्या. या जागेच्या मोबदल्यात निरंजन आखाड्यास अतिबलेश्वर मंदिराजवळील दोन ओवऱ्या देण्यात आल्या आहेत.

दत्तात्रय: समाधीच्या पूर्वेस, परंतु दक्षिणाभिमुख दत्तात्रयाचे मंदिर आहे.मंडप व गाभारा असलेले हे देऊळ सांधार आहे. शिखर अर्वाचीन आहे. खांबांची ठेवण सिद्धिविनायकाच्या खांबांसारखीच आहे. श्री दत्तात्रय भिक्षेसाठी येथे स्वत: प्रगट झाले अशी आख्यायिका आहे.

दत्तात्रय मंदिराच्या पाठीमागे दोन दुकाने आहेत. त्यांना लागून महालक्ष्मी बाग आहे.सुधारणेच्या काळात मनकर्णिका कुंड काढून त्याठिकाणी बाग करण्यात आली आहे.

---

[२३१] खरे,१९५८, पृ ७-८

मनकर्णिका कुंड: (आज अस्तित्वात नाही) दत्तास लागून असलेल्या मुक्तेश्वरीच्या देवालयाच्या उत्तरेस मोठे कुंड होते. मंदिराच्या सपाटीपासून ४० फूट खोल व ६० फूट लांब व ६० फूट रूंद असे हे तळे होते. आवाराच्याबाहेर काशी कुंडही होते.ही कुंडे पाण्याने बारमाही भरलेली असायची आणि त्यात घाटी दरवाज्यावरून सूर मारून पोहण्यासाठी झुंबड उडालेली असायची. तीर्थाच्या पाण्यात मासे,कासव होते. शहराचा विकास होऊ लागला. मंदिर परिसरात दाटीवाटी वाढू लागली. कालांतराने ही कुंडे दुर्लक्षित होऊन कचरा टाकायचे ठिकाण बनले. त्यात गाळ साचला. तो साफ करण्याचा प्रयत्न केला. त्यात अनेक मूर्त्या सापडल्या. त्यातील काही आपणास आवारात व टाऊन हॉल वस्तू संग्रहालयात बघावयास मिळतात. त्यानंतर ही जलकुंडे बुजवली गेली काशी कुंडाची थोडी जागा उघडी ठेवली व मनकर्णिका जलकुंड बुजवून त्यावर महालक्ष्मी उद्यान नावाचा बगिचा उभा केला.मनकर्णिका कुंडात उतरण्यासाठी उत्तर व दक्षिण अशा दोन्हीं अंगांनी पायऱ्यांच्या वाटा होत्या. या तीर्थाच्या उत्तर भिंतीस लागून पण पूर्वार्धात पाण्याजवळ पांच ओवऱ्या होत्या. पूर्वेच्या ओवरीत पश्चिमाभिमुख मुरलीधर त्याच्या दोन्हींबाजूस दोन चौरीधर स्त्रिया, गदा,पद्मधारी विष्णु ,मारूती अशा मूर्ति होत्या.ग.ह.खरे यांच्यामते या तीर्थाची बांधणी मुसलमानकालीन किंवा मराठेकालीन असावी. याच्या उत्तर, पूर्व व दक्षिणेकडील भिंतीस टेकून सुमारे ५० वीरगळ, तीन बैठे ऋषी,दोन कीर्तिमुखे,शिवपार्वती इ. शिल्पे होती.

खरे यांच्या मतानुसार तीर्थाच्या उत्तरेस प्रथम कुंडलेश्वर व नंतर जोतिबा यांची लहान देवालये होती. ती अस्तित्वात नाही.

घाटी दरवाजा: या बागेला लागून महालक्ष्मी मंदिराच्या आवारात प्रवेश करण्यासाठी असणारा घाटी दरवाजा लागतो.या दरवाज्याची कमान सुमारे ३०-३५ फूट उंच आहे.या कमानीच्या आतील बाजूने वर कीर्तिमुख आहे. ते नंतरच्या काळात बसविण्यात आले आहे. उजव्याबाजूस वर जाण्यासाठी दगडी पायऱ्यांची जिन्याची वाट आहे. वर गेल्यावर चार खांबांवर मजबूत अशी कमानीची मंडपी घुमट बांधली आहे व त्यात एक मोठी घंटा बांधली आहे. महालक्ष्मी पूजेच्या वेळी दिवसातून पांच वेळा घंटानाद करून

आरतीची सूचना दिल्या जाते. याशिवाय किरणोत्सव, महाप्रसाद, त्र्यंबुली यात्रा व दसरा या दिवशींही घंटानाद केल्या जातो. यासाठी व्यवस्थापन समितीचा कर्मचारी नेमलेला आहे.

इ.स.१९०१ साली तडा गेल्यामुळे पूर्वीची घंटा उतरविण्यात आली. ती सध्या टाऊन हॉल म्यूझियममध्ये ठेवण्यात आली आहे. तीवर AVE MARIA GRATIA PLENA DOMINUS TECUM (Hail! Mary Full Of Grace; The Lord Is With Thee) अशा अर्थाचा एक पोर्तुगीज लेख आहे. वसई किल्ला जिंकून आल्यावर, चिमाजी अप्पा यांनी आणलेल्या दोन घंटांपैकी एक घंटा शाहू छत्रपतींना अर्पण केली. या घंटेवर I W Benson LTM Clock Marks Lodgatehill.London .E.C. १९०२ असा लेख आहे. ही घंटा शाहू छत्रपतीनी आपल्या मातोश्री आनंदीबाई यांच्या स्मरणार्थ महालक्ष्मीस अर्पण केली. याच घंटेला तडे गेल्यामुळे आता देवस्थान कमेटीने १९९३ साली नवीन घंटा बनवून लावली.

काशीविश्वेश्वर मंदिर व काशीकुंड: घाटी दरवाज्यातून बाहेर पडल्यानंतर काशीविश्वेश्वराचे देऊळ लागते. मंडप व गाभारायुक्त या मंदिराला दोन शिखरे आहेत. दक्षिणाभिमुख असलेल्या या मंदिराच्या मंडपात गणेशाची मूर्ती आहे. पुढे नंदी व गाभाऱ्यात शिवलिंग आहे.

या मंदिरासमोर एक कुंड सुमारे ३० फूट लांब व ३० फूट रूंद होते. यात उतरण्यास पायऱ्या होत्या. आता हे कुंड वरून बंद करून काही भागावर जाळी टाकण्यात आली आहे. या मंदिराचे व काशीकुंडाचे वर्णन श्री.ग.ह.खरे यांनी केले नाही कदाचित प्राकारात हा भाग येत नसल्यामुळे याचे वर्णन दिले नसावे.

दीपमाळ: काशीकुंडासमोर दीपमाळ आहे. या दीपमाळीखाली अगस्ति व लोपामुद्रा यांच्या मूर्ती आहेत.

घाटी दरवाज्या नंतर पुन: ओवऱ्यांची सुरवात होते. या ओवऱ्या दक्षिणाभिमुख आहेत.

नवग्रहः पहिली ओवरी नवग्रहांची, उंच कट्ट्यावर नवग्रहांची स्थापना केली आहे. कागलकरांच्या एका शाखेच्या वारसाने इ.स. १९४१ मध्ये नवग्रहाच्या मूर्ती अनियमीत पध्दतीने बसवल्या आहेत[२३२].

या नवग्रह ओवरीसमोर एक मंडप आहे. चार खांबांवर आधारित असलेला ह्या मंडपाच्या छतावर अष्टदिक्पाल कोरलेले आहेत. मंडपाच्या एका खांबावर यादव नृपती महादेव याच्या काळचा[२३३] क्रोधन संवत्सर , माघ शुद्ध पौर्णिमा शके ११८७ (१२ जानेवारी १२६६)चा लेख कोरलेला आहे. .या लेखाचे महत्व म्हणजे एका जैन व्यक्तीने जैन बसदीसाठी दान करीत असता सुरवातीस महालक्ष्मीची स्तुती केली आहे .

सूर्य भवानी मंदिरः या ओवरीत रथस्थ-सूर्याचे चक्र, शिवलिंग व अष्टभुजा महिषमर्दिनीची मूर्ति आहे. या ओवरीसमोर चार खांबी मंडप आहे. या मंडपास नवग्रह मंडप म्हणतात.या मंडपाच्या जमिनीवर फुटकी रंगशिळा आहे. छतावर अष्टदिक्पाल आहेत. मंडपाच्या एका खांबावर एक शिलालेख आहे. हा लेख[२३४] शक ११८७, क्रोधन संवत्सर , माघ पौर्णिमा , शुक्रवार (२२जानेवारी १२६६)हा लेख जैनांचा असून त्यात महालक्ष्मीची स्तुती केली आहे.

तोफेची ओवरीः तिसऱ्या ओवरीत महालक्ष्मीच्या उपचाराचा भाग म्हणून उडवण्याची तोफ ठेवतात. सध्याची ही तोफ इ.स. १७१५मध्ये छत्रपती शंभू महाराज यांनी दिली असे सांगतात[२३५] ही तोफ उडविण्यासाठी महादेव चंद्रोजी नाईक जाधव या घराण्यास परंपरागत इनामी जमीन देऊन नियुक्ती केली आहे. दर शुक्रवारी महालक्ष्मीची पालखी प्रदक्षिणा करून गरुड मंडपात आल्यावर तोफेची सलामी देण्याचा प्रघात आहे. तसेच नवरात्रात दररोज पालखीनंतर, रथोत्सवानंतर, पांच पौर्णिमा पालखीनंतर, त्र्यंबुली यात्रेच्यावेळी , दसरा शिलंगण प्रसंगी देवी बाहेर निघताना व आत येतांना तोफेची सलामी दिली जाते. **विठोबा,राही,रखुमाः** या ओवरीत विठोबा ,राही व रखुमाबाई यांच्या मूर्ती आहेत.

---

२३२ खरे, १९५८ , पृ ११
२३३ मिराशी, १९५७ ,पृ.२१-२२
२३४ मिराशी, १९५७.पृ
२३५ धर्माधिकारी, २००३ ,पृ६६

मुद्गलेश्वर,राधाकृष्ण: या ओवरीत मुद्गलेश्वर , राधा कृष्ण यांच्या मूर्ती आहेत.

पंचगंगा: या ओवरीतील पहिली मूर्ती पद्म,गदा, शंख,चक्र धारण केलेली गरुड लांछन असलेली (वैष्णवी), दुसरी उभी शंख व नागधारी, तिसरी बैठी एक हात गुडघ्यावर ठेवलेली व एका हातात कट्यार धारण केलेली ,चौथी मूर्ति पाश धारण केलेली व एक हात मांडीवर ठेवलेली ,व पांचवी कमंडलू धारण केलेली आहे. याच ओवरीत स्वामी समर्थ (अक्कलकोट) यांची संगमरवरी मूर्ति आहे. (ग.ह.खरे यांनी या मूर्तिचे वर्णन केले नाही) ही अर्थातच अर्वाचीन आहे.

दशावतार: दशावताराच्या ओवरीत विष्णूच्या दशावतार मूर्ती आहेत.कृष्णाच्या अवताराच्या जागी विठ्ठल दाखवला आहे. या मूर्तीदेखील अर्वाचीन आहेत.

कार्तिकस्वामी: धर्माधिकारी[२३६] यांच्यामते दशावतार ओवरीला लागून रामाच्या मंदिराजवळून कोपऱ्यात हे कार्तिकस्वामींचे देऊळ होते. खरे यांनी या मंदिराला जाण्यासाठी असण्याऱ्या वाटेचे वर्णन केले नाही. परंतू हे देऊळ आजही रस्त्याच्या पातळी खाली आहे. मला स्वत:ला हे देऊळ बघता आले नाही.स्त्रियांना या देवळात जाण्यास बंदी आहे. परंतु खरे यांनी वर्णन केल्याप्रमाणे शिवपार्वतीची मूर्ती आहे. शिव सव्यललितासनात असून त्याच्या मांडीवर पार्वती आहे. शिवाच्या हातात अक्षमाला,डमरू, नाग असून एका हाताने पार्वतीस आलिंगन दिले आहे.शिवाच्या उजवीकडे गणेश,मध्ये नंदी व डावीकडे स्कंद अशी शिल्पे आहेत. या शिल्पास कार्तिकस्वामी म्हणून कधीपासून पुजायला लागले ते समजू शकले नाही. आता हे देऊळ परिसराच्या बाहेर आहे. सुधारणाकाळात रस्ता रुंदीकरणात हे देऊळ बाहेर काढण्यात आले.

रामाचे मंदिर: ही ओवरी पूर्ण एकच ओवरी पश्चिमाभिमुख आहे. पूर्वी या मंदिराच्या बाहेरील मंडपावर प्रशस्त दोन खोल्या होत्या. वर जाण्यास या मंडपातून दगडी जिन्याची रामाच्या पारावरून वाट होती. या मंदिरातील श्रीराम ,सीता व लक्ष्मणाच्या मूर्ती रामाच्या पारासमोर एका उंच चबुतऱ्यावर बसवल्या होत्या.

---

[२३६] धर्माधिकारी,२००३ ,पृ ६८

सुधारणाकाळात मूर्ति आतील मंदिरात घेण्यात आल्या[237]. याला मंडप व आत दक्षिणाभिमुख राम व उत्तराभिमुख हनुमान आहे.

पूर्व दरवाजा : मंदिरात प्रवेश करण्यासाठी असलेल्या चार दरवाज्यांपैकी तिसरा दरवाजा आहे. यास पूर्व दरवाजा म्हणतात. दरवाज्याच्या पायथ्याच्या आग्नेय भागात ।। त्रीबकराव दाभाडे ।।शके १७७३।। असा लेख आहे व वायव्य भागात पायथ्याशी भगवानराव गायकवाड व ईशान्यभागी ।।भैरजीराव गायकवाड।। शके १७७३।.। असा लेख आहे. या लेखांवरून इ.स. १८६१ मध्ये दाभाडे व गायकवाड यांनी मिळून हा दरवाजा बांधला असावा. हा दगडी कमानीचा दरवाजा सुमारे २५ फूट उंच व १२ फूट रूंद आहे. त्र्यंबुली यात्रा व दसऱ्याच्यावेळी येथूनच पालखी नेतात.

शेषशायी मंदिर: पूर्व दरवाज्यास लागून पश्चिमामुख ज्या ओवऱ्या सुरू होतात त्यातील पहिले हे देऊळ.हे देऊळ उत्तराभिमुख असून सभामंडप व गाभारा असलेले आहे. गाभारा साधा आहे. गाभाऱ्याच्या द्वार ललाटावर पांच शासनदेवता आहेत.त्याखालील तुळईवर जिनांच्या बसलेल्या मूर्ती आहेत.गाभाऱ्यात आज जरी शेषशायी विष्णु असला तरी पूर्वी हे जैनांचे देवालय होते. सभामंडपाला अष्टकोनी व नंतर वर्तुळाकार छत आहे. अष्टकोनी भागात उभ्या तीर्थंकराच्या ६१ मूर्ती आहेत. याखाली चार पट्यांवर कानडी लेख आहे.छतावर कमळाच्या आकृतीचे तीन थर आहेत.वरचे दोन थर अष्टदली व खालचा थर षोडषदली आहे.कोल्हापुरातील ओंकारेश्वर व पार्श्वनाथ बसदी येथे देखील असेच दिगंबर तीर्थंकरांचे चित्रण तुळयांवर आहेत.

नृसिंह: (आता हे देऊळ नाही) शेषशायी मंदिराच्या समोर पारावर पश्चिमाभिमुख नृसिंहाची देवळी होती. ती मूर्ति चोरीला गेली व सुधारणाकाळात ही देवळी उतरविण्यात आली.

महाविष्णु मंदिर: शेषशायी मंदिराला लागून असलेल्या या ओवरीत विष्णूचे मंदिर आहे. यासमोर पूर्वी लाकडी मंडप होता[238] तो सुधारणाकाळात काढून टाकण्यात आला आहे. या मंदिरात विष्णूबरोबर

---

[237] धर्माधिकारी, २००३ , पृ ७०

[238] खरे,१९५८ ,पृ १३

गोकर्णेश्वर (ग. ह. खरे[२३९] यांच्यानुसार लाकडी मंडपाशेजारी हे गोकर्णेश्वराचे मंदिर फक्त गाभारा असलेले होते.सुधारणाकाळात हे देऊळ काढून टाकण्यात आले),महादेवाची पिंड व दुर्गादेवीची मूर्ती ठेवण्यात आली आहे.ग.ह.खरे यांच्या म्हणण्यानुसार दुर्गादेवीची मूर्ती गोकर्णेश्वराच्या गाभाऱ्याच्या भिंतीत मूर्ती होती.

खरे यांनी वर्णन न केलेला एक मंडप[२४०] धर्माधिकारी यांनी सांगितला आहे. शेषशायी मंदिराच्या शेजारी बाहेरील बाजूस ३०-४० फूट लांब व १० फूट रूंद साधारण तीन फूट उंचीचा कट्टा होता. त्यावर कौलारू छप्पर होते. उत्तर हिंदुस्थानातून येणारे बैरागी याठिकाणी थांबत असत.धुनी पेटवून साधना व तपश्चर्या करीत असत. या वास्तूचा उल्लेख खरे यांनी केला नसल्याचे कारण कदाचित त्याकाळाआधीच हा कट्टा काढून टाकण्यात आला असावा.

लक्ष्मीनारायण मंदिर: खरे यांच्या निरीक्षणानुसार ह्या ओवरीस लाकडी मंडप होता. या ओवरीतील मूर्ति संगमरवरी आहेत. तो मंडप आता काढून टाकण्यात आला आहे.

खंडोबा या मंदिराचा उल्लेख खरे यांनी केला नाही, परंतु धर्माधिकारी [२४१]यांनी आपल्या पुस्तकात केला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे सध्या ज्या ओवरीत खंडोबा आहे त्याच्यासमोरच एका स्वतंत्र देवळात या मूर्तीची स्थापना केलेली होती. उंच चबुतऱ्यावर दगडी मंदिराला शिखर होते व या मंदिरात जाण्यासाठी सात पायऱ्या होत्या. या मंदिराशेजारी कीर्तीस्तंभ होता. आज हा कीर्तिस्तंभ कुठे आहे याची कल्पना नाही. सुधारणाकाळात हे मंदिर उतरविण्यात आले व खंडोबाची स्थापना या ओवरीत केली. कदाचित खरे यांनी देऊळ बघितले तेव्हांच ते ह्या ओवरीत असावे म्हणून या मंदिराची कल्पना त्यांनाही नव्हती.खरे यांनी वर्णन केलेले म्हाळसाकांत मल्हारीचे केवळ गाभाऱ्याचे देऊळ धर्माधिकारी यांच्या बघण्यात नाही, परंतु ही मूर्ती आज आपणास या खंडोबाच्या ओवरीत बघावयास मिळते.

---

[२३९] पूर्वोक्त ,पृ १३
[२४०]पूर्वोक्त.पृ१३
[२४१]धर्माधिकारी. २०००. पृ.१२

निरंजन आखाडा: सुधारणा काळानंतर नाथपंथीयांची समाधीकडील जागा काढून घेण्यात आली व या ठिकाणी (खंडोबाच्या ओवरीनंतरची) जागेत त्यांची सोय करण्यात आली. याठिकाणी स्वामी व देवीची मूर्ती स्थापन करण्यात आली आहे. या ओवरीचा उल्लेख श्री. ग.ह.खरे यांनी केलेला नाही.

अतिबलेश्वर मंदिर: हे शिवाचे मंदिर शेषशायीसारखेच जुने मंदिर आहे. मंडप व गाभारा असलेल्या या देवळात मंडपात नंदी व गाभाऱ्यात शिवलिंग आहे.

दक्षिण व्दार: महालक्ष्मी मंदिरात प्रवेश करण्यासाठी असणाऱ्या चार मुख्य दरवाज्यांपैकी हा चौथा दरवाजा आहे. हा दरवाजा पण सुमारे २५ फूट उंच व१२ फूट रूंद आहे.

या नंतर सुरु होणाऱ्या ओवऱ्या उत्तराभिमुख आहेत.धर्माधिकारी[२४२] यांनी वर्णन केल्याप्रमाणे दक्षिण द्वारापासून तुळजाभवानी मंदिरापर्यंतच्या भागात अखंड माडीची जागा होती. या माडीवर अखंड अग्निहोत्र चालू असावयाचे. येथे तीन अग्निकुंडांची रचना केली होती. काटदरे स्वामी अखंड अग्निहोत्र चालवीत असत.परंतु त्यांच्या पश्चात अग्निहोत्र बंद झाले आणि सुधारणेच्या काळात ही माडी काढून टाकण्यात आली. ग.ह.खरे यांनी माडी व अग्निहोत्राचा उल्लेख केलेला नाही .कदाचित त्यांनी देऊळ बघितले तेव्हा ही माडी नसावी किंवा अग्निहोत्र बंद झाले असावे. दक्षिण द्वारानंतरच्या दोन ओवऱ्यांत ओटीच्या सामानाची दुकाने आहेत.

राधाकृष्ण मंदिर: या ओवरीत एका उंच चबुतऱ्यावर राधाकृष्णाची मूर्ती आहे.

काळभैरव: या ओवरीत उंच चबुतऱ्यावर कालभैरवाची दगडी मूर्ती आहे. भैरवाच्या हातात दंड व तलवार ही आयुधे आहेत.

सिंहवाहिनी: या ओवरीत सिंहवाहिनीची मूर्ती आहे.

---

[२४२] धर्माधिकारी. २००० .पृ ७६

तुळजाभवानी:एका लाकडी मेघडंबरीत उंच कट्टयावर ही मूर्ती बसविण्यात आली आहे. महाराणी ताराराणी यांच्या एका लिंबाजी यादव या सरदाराने साताऱ्यातील कडेपूर गावातून ही तुळजाभवानीची मूर्ति आणून येथे बसविली आहे.

इंद्रसभा: या ओवरीत मंदिराच्या आवारांत सापडलेल्य मूर्ति आणून ठेवल्या आहेत. या ओवरीत मूषकावर बसलेला गणपती, वृषभावर आरूढ असलेला यक्ष, एक जैन यक्षिणी, एक वीरगळ व हत्तीवर नर्तन करणारी स्त्री अशा मूर्ती आहेत.

धर्माधिकारी[२४३] यांच्या मते, इंद्रसभेनंतर तीन ओवऱ्यांवरील भागावर व समोर एक तीन मजली इमारत होती. त्यास नारायण स्वामीची इमारत म्हणीत असत. खालच्या मजल्यावर संपूर्ण ओटा होता व दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावर जाण्यासाठी लाकडी जिना होता. दुसऱ्या मजल्यावर संस्कृत पाठशाळा व तिसऱ्या मजल्यावर वैदिक पाठशाळा होती. खरे यांनी या वास्तूचे वर्णन केले नाही तेव्हा कदाचित त्यांनी जेव्हा देऊळ बघितले त्यावेळी या वास्तू तेथे नव्हत्या.

दत्तात्रय: याच नारायण स्वामीच्या इमारतीत खरे यांच्या वर्णनानुसार[२४४] इंद्रसभेनंतर नारायण स्वामींच्या पांच ओवऱ्या लागतात. त्यातील तिसऱ्या ओवरीत लाकडी मेघडंबरीत सहा भुजांचाचा दत्त आहे. त्याच्या हातात माला, त्रिशूल,चक्र, शंख,डमरु व कमंडलू या वस्तू आहेत.

शिवलिंग:पाचव्या ओवरीत शिवलिंग आहे.

लक्ष्मीनारायण: पुढील दोन ओवऱ्यांत लक्ष्मीनारायणाची मूर्ती आहे. या ओवरीपुढे असलेला लाकडी मंडप खरे यांच्या बघण्यात होता. आता हा मंडप काढून टाकण्यात आला आहे. त्यांच्यामते पुढे तीन मोकळ्या ओवऱ्या होत्या. आता तिथे दुकाने सजली आहेत

[२४३]धर्माधिकारी. २००० ,पृ ८०
[२४४] खरे,१९५८ , पृ १४

या दुकानांच्या ओवऱ्यांनंतर स्वयंपाकाची खोली आहे.महालक्ष्मीस दररोज दाखवला जाणारा नैवेद्य येथेच तयार केला जातो.

कारंजे (आता अस्तित्वात नाही)

या ओवऱ्यांसमोर एक लहान हौद व त्यामध्ये एक कारंजे होते. अशाच प्रकारचे कारंजे उत्तरेकडील भागातही होते. या कारंज्यांमध्ये येणारे पाणी कात्यायनीहून (६ मैलांवरून) नळ बांधून आणले होते. पुण्यातील श्री.ठाकुर या गृहस्थाने इ.स.१७९२ मध्ये हे पाणी येथे आणण्याचे काम केले. सुधारणाकाळात हा हौद काढून टाकण्यात आला व त्याठिकाणी फरशी बसवून ही जागा मोकळी ठेवण्यात आली.

नगारखाना: महालक्ष्मी मंदिरात प्रवेश केल्यावर दक्षिणेस महाद्वाराला लागून वरच्या मजल्यावर नगारखाना आहे.महाद्वारास लागून उजव्या हाताला नगारखान्याकडे जाण्यासाठी दगडी जिना होता.तो बुजवून टाकण्यात आला आहे त्याजागी आता लोखंडी जिना दिसतो. देवीच्या प्रत्येक पूजेच्या वेळी सनई व चौघड्याचे मधुर स्वर कानी पडायचे. आता फक्त साडे अकराच्या पूजेच्या वेळी हे सूर कानी पडतात.

या वरील वर्णनावरून हे लक्षात येते की

आवारातील सुधारणाकाळापूर्वीची परिस्थिती व सुधारणेनंतरची आता असलेली परिस्थिती लक्षात येते. सुधारणाकाळापूर्वी बऱ्याच ओवऱ्यांसमोर लाकडी मंडप होते.ते काढून टाकण्यात आले आहेत.१९८० साली संपूर्ण प्रांगणात फरशी बसविण्यात आली. त्यावेळी महालक्ष्मी देवालयाच्या उत्तरेस महाकाली मंदिरात प्रवेश करण्याच्या पायरीजवळ मंदिराचा काही तुटलेला भाग मिळाला परंतु घाई गर्दीत त्या भागास तसेच पुरण्यात येऊन त्यावर फरशी बसविण्यात आली. कोणी म्हणतात ती रंगशिळा होती तर कोणी म्हणतात तो शिखराचा भाग होता. परंतु त्याबाबत विशेष माहिती मिळू शकली नाही.

महालक्ष्मी मंदिर व महाकाली मंदिराच्या बाह्यांगावरील सुरसुंदरी

मंदिराचा सर्वांगीण अभ्यास करावयाचा झाला तर मंदिराच्या बाह्यांगावर शोभा आणणाऱ्या अलंकारित सुरसुंदरींचा विचारही करावयास हवा. निर्गुण निराकार ब्रह्माची उपासना सामान्य दर्शनार्थीच्या अवाक्याबाहेर असते;म्हणून ब्रह्म साकार केले आहे मूर्तीच्याद्वारे. त्याची उपासना करायची मोक्षप्राप्तीसाठी . विषय विकारात लिप्त असणाऱ्यांना मोक्ष दुर्लभ असतो. शब्द,स्पर्श, रूप,रस व गंध या विकारांची यथास्थिती कल्पना देण्यासाठी मंदिरावर सुरसुंदरी कोरलेल्या असतात .[२४५] देगलूरकर यांनी सुरसुंदरींचे वेगवेगळ्या भागात विभाजन केले आहे. भक्तांनी मंदिरात जाताना पत्र.पुष्प, फल किंवा जल यापैकी काहीतरी न्यावे याच अर्थाने डालमालिका, केतकीभरणा, पद्मगंधा व जया यांची शिल्पे, देवतेच्या उपचारांपैकी रंगभोगात भजन,गायन,नर्तन,कीर्तन इ.चा समावेश होतो. या प्रकारात नर्तिका, मर्दला इ. यांचा समावेश होतो. भक्तांनी षड्रिपूंपासून दूर राहण्यासाठी व विकारहीन मनाने दर्शनास जावे याकडे अलसा, काटा काढणारी स्त्री ही शिल्पे त्याकडे लक्ष वेधतात.

मंदिर निर्मिती जशी गतिमान झाली तशी सुरसुंदरी शिल्पे मोठ्या प्रमाणात मंदिराच्या बाह्यांगांवर दिसू लागली. या सुरसुंदरींची नावे व वर्णन **शिल्पप्रकाश** व **क्षीरार्णव** या ग्रंथांत मिळतात.

कोल्हापुरातील महालक्ष्मी व महाकाली मंदिराच्या मंडोवरावरील देवकोष्ठांत अशाच प्रकारच्या सुरसुंदरी आपणास पहावयास मिळतात.ही दोन्ही मंदिरे जरी स्थापत्यदृष्ट्या समान असली तरी कलाकुसरीत भिन्न आहेत. त्याचप्रमाणे या दोन्ही मंदिराच्या मंडोवरावरील सुरसुंदरी कलाकुसरीत भिन्न आहेत.

महालक्ष्मी मंदिराच्या बाह्यांगावरील सुरसुंदरी:

महालक्ष्मी मंदिराच्या बाह्यांगावरील देवकोष्ठांत सुरसुंदरी कोरलेल्या आहेत. यादवांच्या (किंवा चोलांच्याही काळी मंदिरास काही प्रमाणात क्षति पोहोचली असणारच)नंतर या भागावर सुल्तानी सत्ता आली आणि या काळात मंदिराच्या बाह्यांगावरील या सुरसुंदरींना बऱ्याच प्रमाणात क्षति पोहोचलेली

[२४५] देगलूरकर, २०१०.पृ.४३

दिसून येते. आज आपण पहात असलेल्या जास्तीत जास्त सुरसुंदरी ह्या शाडूच्या बनवून बसविलेल्या दिसून येतात.या शाडूच्या मूर्ती कलाकुसरदृष्ट्या हीन दर्ज्याच्या आहेत. या मूर्तींच्या उभ्या राहण्याच्या ढबीवरून या मूर्ती येथे असलेल्या मूळ मूर्तीच्या प्रतिकृती नाहीत हे लक्षात येते.यापैकी मर्दला,नुपुरपादिका,स्त्री व माकड या सुरसुंदरी कलाकुसरदृष्ट्या महाकाली मंदिरावरील देवकोष्ठांवरील सुरसुंदरीशी मेळ खातात.तरी त्याकाळातील सुरसुंदरींची कल्पना येण्यासाठी काही सुरसुंदरीच्या मूळमूर्ती आज आपणास देवकोष्ठांत दिसून येतात.या संख्येने २० आहेत.

या सुरसुंदरींच्या देवकोष्ठांवरील शिखरे नागर शैलीतील रेखानागर पद्धतीची असलेली दिसून येतात. यातील काही पंचांड तर काही नवांड आहेत. ३२मोठी देवकोष्ठ, २९ मध्यम देवकोष्ठ व ११लहान देवकोष्ठात मिळून ७२ देवकोष्ठे आहेत. ३ रिकामे देवकोष्ठ आहेत ज्यांत मूर्ती नाहीत .६४ योगिनींचा आकडा गणितात कुठेही बसत नाही.

मूळ शिल्पांकित सुरसुंदरी या आकर्षित देहयष्टीच्या , उन्नत स्तनांच्या, नाजुक कटिभाग असलेल्या आहेत .स्त्री मूर्तीचे स्तन अनाहत असून कमरेस अधोवस्त्र असलेले दिसून येते.अधोवस्त्रावर मेखला व पादपत्र आहे.अलंकारामध्ये गळ्यात हार,लांब हार व वैकक्षक असून हातात केयूर,काही मूर्तींत बाजुबंद व कंकण यांचा अंतर्भाव ,पायांतील तोडे व नुपुर यांचा अंतर्भाव दिसून येतो.आहेत. मूळ मूर्तीतील हातापायांच्या तुटलेल्या भागांना शाडूने जोडण्याचा प्रयत्न केला आहे त्यामुळे काही मूर्तींच्या हातातील लांछने अस्पष्ट आहेत परिणाम असा की त्या मूर्ती कोणाच्या हे कळणे कठीण झाले आहे असे असतानाही काही मूर्ती ओळखण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

महालक्ष्मी मंदिराच्या जंघाभागावर ३२ देवकोष्ठे मोठी, तर २८ देवकोष्ठे लहान आहेत.३ देवकोष्ठे रिकामी आहेत .महालक्ष्मी मंदिराच्या दक्षिणेस महासरस्वती मंदिराच्या पूर्वेकडील दरवाज्याजवळील जंघाभागाखाली चार देवकोष्ठे आहेत.

१)भैरव : मूर्ति नग्न व भग्न, चतुर्हस्त,हात व पाय तुटलेले,त्रिभंगात,जटामुकुट नरमुंड मालेने सुशोभित,पायांजवळ दोन्ही बाजूस कंकाल,एका कंकालाच्या हातात कुत्रा,भग्न वेसर देवकोष्ठ

२)केतकीभरणा : मूळ मूर्ती , त्रिभंगात,उजवा हात खांद्यापासून तुटलेला, फक्त मनगट वबोटे शाबूत, डावा हात दंडापासून भग्न, उजवा पाय जांघेतून तर डावा पाय पावलाजवळतुटलेला आहे. उजवा हात डोक्यावर फूल माळताना, गळ्यात लहान व लांब हार,वैकक्षक,कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र. शिखर – देवकोष्ठावर शिखर नाही. देवकोष्ठाखाली हत्तीचे तोंड

३) विष्णू : संपूर्ण मूर्ती वज्रलेपांकित त्यामुळे मूळ मूर्तीची कल्पना येत नाही. सध्याची मूर्ती समभंगात, द्विहस्त , उजव्या हातात गदा डाव्या खांद्यावर पेललेली , डावा हात वरदहस्त, अलंकार-डोक्यावर क्रिरीटमुकुट,डोक्यामागे प्रभावळ, कानांत कर्णकुंडल,गळ्यात लहान व लांब हार, हातात केयूर व कंकण, गळ्यात वैजयंतीमाला,कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र, पायात तोडे व नूपुर. शिखर – नागर शैलीचे,देवकोष्ठाखाली विद्याधर देवकोष्ठ पेलताना.

४) शुकसारिका : मूळ मूर्ती त्रिभंगात, डाव्या हातात पोपट, मान डावीकडे कललेली,पोपटाकडे बघत असलेली उजव्या हातातील वस्तू अस्पष्ट, उजवा पाय जांघेतून तुटलेला, डावा पाय पावलाजवळ तुटलेला, केसांचा अंबाडा उजवीकडे, कानांत कर्णकुंडल,गळ्यात लहान व लांब हार, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र, शिखर – वेसरपद्धतीचे ,देवकोष्ठाखाली विद्याधर देवकोष्ठ पेलताना.

यानंतरच्या सुरसुंदरी मंदिराच्या जंघाभागावर दिसून येतात.

१) स्त्री प्रतिमा (नमस्कार मुद्रेत) : संपूर्ण शाडूची मूर्ती, समभंगात, दोन्ही हात पोटाजवळ, मनगट तुटलेले, अलंकार मूळ मूर्तीप्रमाणे बनविण्याचा प्रयत्न परंतु त्यात कौशल्य नाही. कानांत कर्णकुंडले गळ्यात अर्धहार व लांब हार, बाहुंच्यावर केयूर व हातात कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर – नागर शैलीचे, मध्यम देवकोष्ठ.

२) पुरुष प्रतिमा (साधू) : संपूर्ण शाडूची मूर्ती, समभंगात,डाव्या हातात पात्र पोटाजवळ धरलेले, उजवा हात त्या पात्रावर धरलेला, गळ्यात रुद्राक्षमाला, अधोवस्त्र, शिखर - नागर शैलीचे,मध्यम देवकोष्ठ.

३) चामरधारिणी : संपूर्ण शाडूची स्त्रीप्रतिमा,समभंगात, डाव्या हातात चौरी उजव्या खांद्यावर ठेवलेली, उजवा हात सरळ खाली सोडलेला, कानांत कर्णकुंडल,गळ्यात अर्धहार व लांब हार, बाहूत केयूर व हातात कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर नागर शैलीचे,मध्यम देवकोष्ठ.

४) कृष्ण (मूळ सुरसुंदरी) : हे देवकोष्ठ वरील दोन देवकोष्ठापेक्षा मोठे,संपूर्ण शाडूची मूर्ती,समभंगात. डावा पाय सरळ तर उजवा पाय डाव्या मांडीवर ठेवलेला,दोन्ही हात छातीजवळ मुरली धरल्यासारखे, मूर्ती रंगीत, गळ्यात लहान व लांब हार, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर - नागर शैलीचे,मोठे देवकोष्ठ

५) चामरधारिणी : संपूर्ण शाडूची स्त्रीप्रतिमा,समभंगात,उजव्या हातात चौरी डाव्या खांद्यावर ठेवलेली,डावा हात सरळ खाली सोडलेला, कानांत कर्णकुंडल,गळ्यात लहान व लांब हार, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे.शिखर - नागर शैलीचे,मध्यम देवकोष्ठ.

६) दंडधारिणी : संपूर्ण शाडूची स्त्रीप्रतिमा,उजव्या हातात दंड धरलेला, दंडाचे टोक जमीनीला टेकलेले, उजवा पाय डावीकडे व डावा पाय गुडघ्यात वाकवून उजवीकडे, कानांत कर्णकुंडल,गळ्यात लहान व लांब हार, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे.शिखर - नागर शैलीचे,मध्यम देवकोष्ठ.

७) स्त्री प्रतिमा (नमस्कार मुद्रेत) : संपूर्ण शाडूची मूर्ती, समभंगात, दोन्ही हात पोटाजवळ, मनगट तुटलेले, कानांत कर्णकुंडल,गळ्यात लहान व लांब हार, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे, शिखर - नागर शैलीचे,मध्यम देवकोष्ठ.

८) मर्दला : मूळ मूर्ती, इतर मूर्तीपेक्षा आकाराने फार मोठी,त्रिभंगात उभी, मान डावीकडे वळवलेली, उजवीकडे मोठा अंबाडा, पूर्ण शरीर उजवीकडे वळवलेले जणू मृदुंगाच्या थापेवर गिरकी घेण्यास सज्ज आहे, दोन्ही पाय गुडघ्यात वाकवून उजवीकडे, डावा पाय पुढे व उजवा पाय जरामागे अंगठ्याने टेकवलेला.उजव्या मांडीसमोर अलिंग धरलेला. उजवा हात खांद्यापासून व उजवा पाय मांडीपासून

तुटलेला,शाडूने बनवलेला, अधोवस्त्राची गाठ मूर्तीच्या उजव्या बाजूस(दोन्हीबाजूस वस्त्राची गाठही महाकालीमंदिरावरील सुरसुंदरीच्या शिल्पात दिसते),कानांत कर्णकुंडले,गळ्यात अर्धहार व लांब हार, बाहुंच्यावर केयूर,बाजूबंध व हातात कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे .शिखर - नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी दोन उरुश्रृंग,मोठे देवकोष्ठ

९) माता व बालक (मातृमूर्ती) : : मूळ मूर्ती त्रिभंगात उभी, शरिराचा बाक डावीकडे,डाव्या कडेवरील मुलास धरलेले, उजवा हात मुलास कुरवाळताना असावा , बालकाचा डावा हात स्त्रीच्या स्तनावर, स्त्री कौतुकाने बालकास न्याहाळीत आहे, स्त्रीचा अंबाडा उजवीकडे, डावा पाय सरळ उजवीकडे, उजवा पाय गुडघ्यात वाकवून डावीकडे, उजवा पाय तुटलेला शाडूने जोडलेला, कानांत कर्णकुंडल,गळ्यात लहान व लांब हार, हातात केयूर,बाजूबंध व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे . शिखर - नागर शैलीचे,आकाराने लहान.

१०) लहान आकाराचे देवकोष्ठ मूर्ती नाही

११)मूर्ती नाही , मोठे देवकोष्ठ , शिखर - नागर शैलीचे, मूलमंजिरीस दोन शिखरे आणि शेजारी एक उर:श्रृंग, समोर शुकनासिका.

१२) स्त्री प्रतिमा (नमस्कार मुद्रेत) : संपूर्ण शाडूची मूर्ती, समभंगात,हात नमस्कार मुद्रेत, आकाराने मोठ्या देवकोष्ठात मूर्ती मात्र लहान, चेहरा उजवीकडे वळवलेला, दोन्ही हात नमस्कार मुद्रेत, ,डावा पाय जांघेपासून तुटलेला, कानांत कर्णकुंडल,गळ्यात अर्धहार व लांब हार, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर - नागर शैलीचे,समोर शुकनास,मोठे देवकोष्ठ.

१३) स्त्री प्रतिमा: संपूर्ण शाडूची मूर्ती, समभंगात,उजवा हात डाव्या स्तनावर, डावा हात पोटाजवळ, दोन्ही पाय गुडघ्यात जरा वाकवून उजवीकडे, ओळख पटत नाही, लहान व लांब हार, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर - नागर शैलीचे, लहान

१४) स्त्री व माकड : मूळ मूर्ती, त्रिभंगात उभी,उजवा हात डोक्यावर चपेटदान मुद्रेत, चेहरा डावीकडे वळलेला, उजव्या हाताने कमरेजवळील वस्त्र सावरताना, स्त्रीच्या डाव्या पायाजवळ दोन पायांवर उभे

माकड ; ते माकड स्त्रीचे वस्त्र ओढीत आहे, स्त्रीचे वस्त्र कमरेतून निखळलेले, स्त्रीसमोरून नग्न, समोर मांडीभोवती वस्त्राचा काठ दिसतो. शिखर - नागर शैलीचे,लहान देवकोष्ठ

१५)शंकर : मूळ मूर्ती,चतुर्हस्त, समभंगात,शिरामागे प्रभावळ,डोक्यावर मेखला,छातीवे पट्ट,डावा पाय गुडघ्यात वाकून जमीनीवर ठेवलेला उजवा पाय गुडघ्या वाकवलेला, मूळ पाय तुटलेला शाडूने बनवलेला, हातात दक्षिणाध:करक्रमाने पाश,डमरू,वस्तू अस्पष्ट (हात तुटलेला),कपाल, गळ्यात अर्धहार व लांब हार,कमरेस मेखला, कदाचित नग्न,शिखर - नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी दोन उर:श्रृंग,मोठे देवकोष्ठ

१६)स्त्री प्रतिमा: संपूर्ण शाडूची मूर्ती, समभंगात, मान डावीकडे वळलेली,उजवा पाय गुडघ्यात वाकवून उजवीकडे, डावा पाय गुडघ्यात मोडून डाव्या मांडीजवळ,त्या पावलास डाव्या हाताने धरलेले,उजवा हात डोक्यावर, अर्धहार व लांब हार, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर - नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी दोन उर:श्रृंग,मोठे देवकोष्ठ

१७)मूर्ती नाही ,लहान देवकोष्ठ

दक्षिण भद्रावरील गौरीशंकर मंदिर

१८) गुंठना : मूळ मूर्ती त्रिभंगात, पाठमोरी, डाव्या हातातील वस्तू चेहऱ्याजवळ नेलेली पण अस्पष्ट,उजवा हात कोपरात दुमडून चेहऱ्याजवळ, केसाचा मोठा अंबाडा व त्यातून थोडे केस खाली सोडलेले, डावा पाय सरळ, उजवा पाय गुडघ्यात वाकवून जमीनीस डावीकडे अंगठ्याने टेकलेला, हातात बाजूबंद,कमरेस मेखला , अधोवस्त्र व पादपत्र, शिखर - नागर शैलीचे,लहान देवकोष्ठ

१९)नूपुरपादिका : मूळ मूर्ती, आकाराने मर्दलेसारखी फार मोठी, समभंगात, मान डावीकडे झुकलेली, केसांचा अंबाडा उजवीकडे, उजवा पाय गुडघ्यात मोडून जमिनीवर टेकवलेला, डावा पाय वर उचलून दोन्ही हातांनी पायात घुंगरू बांधित आहे, लहान व लांब हार, हातात केयूर व कंकण, कमरेस

अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर - नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी तीन उर:श्रृंग,मोठे देवकोष्ठ

१९) गदाधारिणी : : संपूर्ण शाडूची मूर्ती, समभंगात,उजव्या हातातील गदा जमिनीवर टेकलेली, डावा पाय सरळ उजवा पाय गुडघ्यात वाकवून डाव्या मांडीवर ठेवलेला, डाव्या हाताने मांडीवर ठेवलेले पाऊल धरलेले आहे, मान किंचित डावीकडे वळलेली, अर्धहार व लांब हार, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर - नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी तीन उर:श्रृंग,त्यावर एक उर:श्रृंग,मोठे देवकोष्ठ

२०) साधू : मूर्ती गुळगुळीत असल्यामुळे मूळची आहे की नाही ही शंका आहे. समभंगात उभी, डोक्यावरील केस कुरळे,दोन्ही हात समोर पोटाजवळ, हातातील वस्तू अस्पष्ट, कमरेस लंगोट अंगावर आभूषणे नाहीत. शिखर - नागर शैलीचे,लहान देवकोष्ठ

२२) स्त्री प्रतिमा : मूर्ती गुळगुळीत, त्रिभंगात उभी, उजवा पाय सरळ, डावा पाय थोडा गुडघ्यात वाकवून पाऊल डावीकडे, उजवा हात कमरेवर, डावा हातसमोर डाव्या मांडीजवळ, डावा पाय व उजवा हात शाडूचा, हातातील वस्तू अस्पष्ट, डावा खांदा थोडा वर केलेला, पुष्ट स्तन, कानांत कुंडल,अर्धहार व लांब हार, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर - नागर शैलीचे,लहान देवकोष्ठ

२३) दंडधारिणी : संपूर्ण शाडूची मूर्ती, समभंगात,उजव्या हातात मांडीपर्यंत दंड, डावा हात सरळ खाली, केसांचा अंबाडा डाव्याबाजूस, कानांत कुंडले,अर्धहार व लांब हार, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे.शिखर – नागर शैलीचे, समोर शुकनासिका.

२४) स्त्री प्रतिमा : संपूर्ण शाडूची मूर्ती, समभंगात,उजवा खांदा जरा उंचावलेला, चेहरा डावीकडे झुकलेला, केसांचा अंबाडा उजवीकडे. उजव्या हातात मांडीजवळ गोल वस्तू धरलेली, डावा हात डाव्या स्तनावर, कानांत कुंडले,अर्धहार व लांब हार, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे.शिखर - नागर शैलीचे, समोर शुकनासिका.

२५) स्त्री प्रतिमा(पाशधारिणी) : संपूर्ण शाडूची मूर्ती, समभंगात,उजवा हात उजव्या खांद्याच्या वर, हातात पाश, डावा हात समोर जांघेवर, मान जरा डावीकडे कललेली, कानांत कुंडले,अर्धहार व लांब हार, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर - नागर शैलीचे,लहान देवकोष्ठ

२६) पुरूष प्रतिमा : मूर्ती गुळगुळीत,त्रिभंगात, उजवा पाय गुडघ्यात वाकवून डावीकडे, डावा पाय गुडघ्यात वाकवून उजवीकडे, उजवा हात तुटलेला (शाडूचा बनवलेला)उजव्या मांडीवर, डावा हात गजहस्त, डोक्यावरील केस कुरळे, कानांत कुंडले,कमरेस अधोवस्त्र व पादपत्र,पायात तोडे. शिखर - नागर शैलीचे,लहान देवकोष्ठ

२७) ढालधारिणी : संपूर्ण शाडूची मूर्ती, समभंगात,उजव्या हातात खांद्याजवळ ढाल धरलेली, डावा हात सरळ मांडीजवळ, मान किंचित डावीकडे वळलेली, दोन्ही पाय गुडघ्यात वाकवून टाचेला टाच जोडलेली, कानांत कुंडल,अर्धहार व लांब हार, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे.शिखर - नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी तीन उर:श्रृंग,मोठे देवकोष्ठ.

२८) काली : मूर्ती मूळ रूपात, चतुर्हस्त, त्रिभंगात, डावा खालचा हात तुटलेला,डाव्या वरच्या हातात डमरू,उजवीकडील दोन्ही हात तुटलेले(शाडूने बनवलेले), त्यामुळे हातात आयुधे नाहीत.उजवा खांदा वर , डावा खांदा जरा खाली वाकलेला, मान किंचित डावीकडे कललेली,उजवा पाय गुडघ्यात वाकवून डावीकड अंगत्याने टेकवलेला,डावा पाय गुडघ्यात वाकवून उजवीकडे ठेवलेला, शिरावर मुकुट, कानांत कुंडले,अर्धहार व लांब हार,वैकाक्षक,नरमुंडमाला, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर - नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी तीन उर:श्रृंग,मोठे देवकोष्ठ.

२९)स्त्रीप्रतिमा : संपूर्ण शाडूची मूर्ती, समभंगात,डोक्यामागे अंबाडा, उजवा हात खांद्याजवळ हातात पाश, डावा हात समोर डाव्या मांडीजवळ, दोन्ही पाय सरळ टाचेस टाच लावलेले, गळ्यात अर्धहार,

कानांत कुंडले, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे.शिखर - नागर शैलीचे,लहान देवकोष्ठ

३०) कमलधारिणी : मूर्ती मूळ स्वरूपात, उजवा हात व उजवा पाय शाडूने बनवलेला, डावा पाय गुडघ्यात वाकवून उजवीकडे,उजवा पाय गुडघ्यात वाकवून डावीकडे, उजव्या हातात खांद्याजवळ कमळ धरलेले, डोक्यामागे अंबाडा, गळ्यात लहान हार, कानांत कुंडल, हातात केयूर आणि रुंद बाजूबंद व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे.डावा हात सरळ खाली हाताजवळ खालपर्यंत लांब वस्तू अस्पष्ट,शिखर - नागर शैलीचे,लहान देवकोष्ठ

३१) विष्णू : मूळ मूर्ती समभंगात, उजव्या हातात खांद्याजवळ कमळ धरलेले, हाताचा काही भाग शाडूचा, डावा हात शाडूचा ,डोक्यास किरिट मुकुट, गळ्यात लहान व लांब हार,वैजयंतीमाला, कानांत कुंडल, हातात केयूर आणि रुंद बाजूबंद व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर - नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी तीन उरःश्रृंग,त्यावर एक उरःश्रृंग,मोठे देवकोष्ठ.

३२) गदाधारिणी : संपूर्ण शाडूची मूर्ती, समभंगात,उजव्या हातात गदा,खांद्यापासून जमिनीला टेकलेली, डावा हात सरळ खाली सोडलेला, मान उजवीकडे वळलेली, डाव्याबाजूस अंबाडा, गळ्यात अर्धहार, कानांत कुंडले, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर - नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी तीन उरःश्रृंग,त्यावर एक उरःश्रृंग,मोठे देवकोष्ठ.

३३) स्त्री प्रतिमा : संपूर्ण शाडूची मूर्ती, समभंगात, उजवा हात खांद्याजवळ हातातील वस्तू अस्पष्ट, डावा हात डाव्या स्तनाजवळ, केसांचा अंबाडा उजवीकडे, गळ्यात अर्धहार, कानांत कुंडले, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे.शिखर - नागर शैलीचे,लहान देवकोष्ठ

३४) (लेख)स्त्री प्रतिमा : मूळ मूर्ती , समभंगात, किंचित डावीकडे मान, उजवीकडे अंबाडा, उजवा हात उजव्या खांद्याजवळ, हातातील वस्तू अस्पष्ट, डावा हात पोटावर, डावा पाय सरळ मागे, उजवा पाय किंचित वाकवून पुढे ठेवलेला, गळ्यात अर्धहार, कानांत कुंडले, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे ,शिखर - नागर शैलीचे,लहान देवकोष्ठ

३५) स्त्रीप्रतिमा : : संपूर्ण शाडूची मूर्ती, समभंगात,डावा पाय सरळ , उजवा पाय डाव्या मांडीवर ठेवलेला, उजवा हात सरळ, डावा हाताने उजवे पाऊल धरलेले, मान किंचित डावीकडे वळलेली, अंबाडा उजव्याबाजूस, गळ्यात लहान हार, कानांत कुंडल, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर - नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी तीन उर:श्रृंग,त्यावर एक उर:श्रृंग,मोठे देवकोष्ठ.

३६) खड्गखेटकधारिणी : संपूर्ण शाडूची मूर्ती, समभंगात, उजव्या हातात तलवार खांद्यावर धरलेली, डाव्या हातात ढाल पोटाजवळ धरलेली, मान किंचित उजवीकडे, केसांचा अंबाडा उजव्या बाजूस, गळ्यात लहान हार, कानांत कुंडले, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर - नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी तीन उर:श्रृंग,त्यावर एक उर:श्रृंग,मोठे देवकोष्ठ.

३७) (लेख)नर्तिका : मूळ मूर्ती, एक पाय व दोन्ही हात शाडूचे, समभंगात, गुडघ्यात दोन्ही पाय वाकवून डावीकडे, उजवा हात डोक्यावर, डावा हात पोटाजवळ, अर्धहार व लांब हार,गळ्यात वैकक्षक,कानांत कुंडले, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे.शिखर - नागर शैलीचे,लहान देवकोष्ठ

कात्यायनी मंदिर

३८) स्त्रीप्रतिमा : : संपूर्ण शाडूची मूर्ती, समभंगात,डावा पाय सरळ,उजवा पाय गुडघ्यात वाकवलेला, उजवा हात खांद्याजवळ, डावा हात पोटावर, मान किंचित डावीकडे वळलेली, गळ्यात अर्धहार,

कानांत कुंडले, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे.शिखर - नागर शैलीचे,लहान देवकोष्ठ

३९) नर्तिका : संपूर्ण शाडूची मूर्ती, समभंगात,दोन्ही पाय गुढग्यात वाकवलेले, उजवा हात डोक्यावर, डावा हात सरळ खाली, मान किंचित डावीकडे वळलेली, केसांचा अंबाडा उजव्या बाजूस, गळ्यात अर्धहार व लांब हार,गळ्यात वैकक्षक,कानांत कुंडल, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर - नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी तीन उर:श्रृंग,त्यावर एक उर:श्रृंग,मोठे देवकोष्ठ.

४०) शिवलेल्या कपड्यातील नर्तिका : संपूर्ण शाडूची मूर्ती, समभंगात,मान डावीकडे वळलेली उजवा हात डोक्यावर, डावा हात सरळ खाली, गळ्यात अर्धहार, लांब हार व मोहरांची माळ ,कानांत कुंडले, हातात केयूर व कंकण, कमरेस गुडघ्यापर्यंत परकर,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर - नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी तीन उर:श्रृंग,त्यावर एक उर:श्रृंग,मोठे देवकोष्ठ.

४१) मुरलीवादिका (वशीधरा): मूळ मूर्ती,समभंगात, उजवा पाय सरळ, डावा गुडघ्यात वाकवून उजवीकडे वळवलेला व अंगठ्याने जमिनीवर टेकलेला, चेहरा उजवीकडे वळवलेला, उजवा खांदा खाली,डावा खांदा वर दोन्ही हात चेहऱ्याजवळ मुरली धरल्याप्रमाणे, गळ्यात अर्धहार व लांब हार,गळ्यात वैकक्षक,कानांत कुंडले, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे.शिखर - नागर शैलीचे,लहान देवकोष्ठ

४२) (लेख) स्त्रीप्रतिमा : मूळ मूर्ती, शाडूने दुरुस्त केलेली, समभंगात,उजवा हात मनगटापासून तुटलेला कमरेजवळ,डावा हात सरळ खाली, डोक्यावर मेखला, गळ्यात अर्धहार व लांब हार,गळ्यात वैकक्षक,कानांत कुंडल, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर - नागर शैलीचे,लहान देवकोष्ठ, अधिष्ठानावर लेख रामोज (स्तिीकडून वाचन करून घेतले.)

४३) गदाधारिणी : संपूर्ण शाडूची मूर्ती, समभंगात,डावा पायसरळ, उजवा पाय गुडघ्यात वाकवून डाव्या पायाजवळ अंगठ्याने टेकलेला, मान किंचित डावीकडे वळलेली, उजव्या हाताने दंड धरलेला , डावा हात पोटाजवळ, गळ्यात अर्धहार, लांब हार ,कानांत कुंडले, हातात केयूर व कंकण,कमरेस अधोवस्त्र, मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर = नागर शैलीचे,परंतू आमलक नसलेली शिखरे मूलमंजरीस जोडलेली, मोठे देवकोष्ठ

४४) स्त्री प्रतिमा : संपूर्ण शाडूची मूर्ती, समभंगात,दोन्ही पाय गुडघ्यात वाकवून उजवा पाय उजवीकडे तर डावा पाय डावीकडे, उजवा हात उजव्या स्तनाजवळ,डावा हात डाव्या मांडीवर, चेहरा डाव्याबाजूस कललेला, गळ्यात अर्धहार, लांब हार ,कानांत कुंडले, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र ,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर - नागर शैलीचे,परंतू आमलक नसलेली शिखरे मूलमंजरीस जोडलेली, मोठे देवकोष्ठ

४५)(लेख) नर्तिका : मूळ मूर्ती, पाय दोन्ही गुडघ्यात मोडून चेहरा डावीकडे झुकलेला, उजवा हात खांद्याजवळ, मनगटापासून तुटलेला, त्यामुळे हातातील वस्तू कळत नाही, गळ्यात अर्धहार, लांब हार, कानांत कुंडल, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र ,मेखला व पादपत्र व पायात तोडे. अधिष्ठानावर लेख अक्षरे दामोजय कदाचित मूर्ति घडविणाऱ्याचे नाव असावे.शिखर - नागर शैलीचे,लहान देवकोष्ठ

४६) (लेख) माता व बालक (मातृमूर्ती) : मूळ मूर्ती, समभंगात,डाव्या काखेत मूल, मुलाच्या कमरेस मेखला,मुलाचा डावा हात स्त्रीच्या स्तनावर, डाव्याबाजूस दोन्ही गुडघे जमिनीला टेकवून बसलेली पुरुष मूर्ती, त्याच्या केसांचा मागे अंबाडा,दाढी, उभ्या स्त्रीने दोन्ही हाताने मुलास धरलेले, मान किंचित् मुलाकडे कललेली, स्त्रीच्या कमरेस मेखला,अधोवस्त्र, गळ्यात अर्धहार, लांब हार ,कानांत कुंडले, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र ,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर - नागर शैलीचे,परंतू आमलक नसलेली शिखरे मूलमंजिरीस जोडलेली, मोठे देवकोष्ठ

४७) स्त्रीप्रतिमा : संपूर्ण शाडूची मूर्ती, समभंगात,मान डावीकडे झुकलेली, दोन्ही हाताने पोटाजवळ वाटी धरलेली, केसांचा अंबाडा उजवीकडे, उजवा पाय उजवीकडे किंचित वाकवलेला, डावा पाय

डावीकडे किंचित वाकवलेला, स्त्रीच्या कमरेस मेखला,अधोवस्त्र, गळ्यात अर्धहार, लांब हार ,कानांत कुंडले, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र ,मेखला व पादपत्र व पायात तोडे.शिखर - नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी तीन उरःश्रृंग,त्यावर एक उरःश्रृंग,मोठे देवकोष्ठ.

४८) शालभंजिका : संपूर्ण शाडूची मूर्ती, समभंगात,दोन्ही पाय गुडघ्यात वाकवून जमिनीवर टेकलेले,डाव्या पायाजवळून उजव्या खांद्याकडे झाडाची फांदी घेतलेली, मूर्ती शाडूची असल्यामुळे ओबडधोबड आहे. स्त्रीच्या कमरेस मेखला,अधोवस्त्र, गळ्यात अर्धहार, लांब हार ,कानांत कुंडल, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र ,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर – नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी तीन उरःश्रृंग,त्यावर एक उरःश्रृंग,मोठे देवकोष्ठ.

४९) मूर्ती शाडूची, पूर्णतः भग्न, शिखर - लहान ,नागर शैलीचे.

५०) स्त्री प्रतिमा : संपूर्णतः शाडूची प्रतिमा, समभंगात उभी, उजवा हात कोपरापासून वर खांद्याकडे नेलेला, हातातील वस्तू अस्पष्ट, डावा हात पोटावर, मान किंचित् डावीकडे वाकलेली, अंबाडा उजवीकडे. दोन्ही पाय गुडघ्यात वाकलेले, गोलाकार, उजवा पाय भग्न, स्त्रीच्या कमरेस मेखला,अधोवस्त्र, गळ्यात अर्धहार, लांब हार ,कानांत कुंडले, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र, मेखला व पादपत्र व पायात तोडे.शिखर - नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी तीन उरःश्रृंग,त्यावर एक उरःश्रृंग,मोठे देवकोष्ठ.

५१) स्त्री प्रतिमा – संपूर्णतः शाडूची प्रतिमा, त्रिभंगात उभी, उजवा हात डोक्यावर नेलेला, डावा हात सरळ खालीसोडलेला, गळ्यात माळा, उजव्या मांडीजवळ नरमुंडमालाही दिसते, डावा हात तुटलेला, डावा पाय सरळ, उजवा पाय गुडघ्यात वाकवून डाव्या पायासमोरून डावीकडे अंगठ्याने टेकवलेला, स्त्रीच्या कमरेस मेखला,अधोवस्त्र, गळ्यात अर्धहार, लांब हार ,कानांत कुंडले, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र ,मेखला व पादपत्र व पायात तोडे.शिखर - नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी तीन उरःश्रृंग,त्यावर एक उरःश्रृंग,मोठे देवकोष्ठ.

५२) स्त्री प्रतिमा – संपूर्णत: शाडूची प्रतिमा, त्रिभंगात, डावीकडे मान झुकलेली, उजवा हात खांद्यावर हातातील वस्तू अस्पष्ट, उजवा हात पोटाजवळ, हातातील वस्तू अस्पष्ट, दोन्ही पाय गुडघ्यात वाकवून डावा पायडावीकडे, उजवा पाय उजवीकडे, कमरेस मेखला,अधोवस्त्र, गळ्यात अर्धहार, लांब हार ,कानांत कुंडले, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र ,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर - लहान ,नागर शैलीचे.

५३) स्त्री प्रतिमा – संपूर्णत: शाडूची प्रतिमा,त्रिभंगात, दोन्ही हात छातीवर, उजव्या हातात जपमाला, उजवा पाय किंचित गुडघ्यात वाकवलेला, डावा पाय सरळ, कमरेस मेखला,अधोवस्त्र, गळ्यात लहान, लांब हार ,कानांत कुंडल, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र ,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर - लहान ,नागर शैलीचे.

५४) ध्वजधारिणी : संपूर्णत: शाडूची प्रतिमा,त्रिभंगात,उजव्या हातात ध्वजपताका, डावा हातपोटाजवळ, डावा पाय गुडघ्यात वाकवून डावीकडे, डावा पाय गुडघ्यात वाकवून उजवीकडे, मान डावीकडे वळलेली, कमरेस मेखला,अधोवस्त्र, गळ्यात अर्धहार, लांब हार ,कानांत कुंडल, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र ,मेखला व पादपत्र व पायात तोडे.शिखर - नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी तीन उर:श्रृंग,त्यावर एक उर:श्रृंग,मोठे देवकोष्ठ.

५५) रति : संपूर्णत: शाडूची प्रतिमा, मान डावीकडे वळलेली, उजव्या हातात लांब दांड्यासारखी वस्तू (उसाचा दांडा), डोक्यापासून पायापर्यंत, डावा हात कमरेवर, उजवा पाय गुडघ्यात वाकवून उजवीकडे, डावा पाय गुडघ्यात वाकवून डावीकडे, कमरेस मेखला,अधोवस्त्र, गळ्यात अर्धहार, लांब हार ,कानांत कुंडल, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र ,मेखला व पादपत्र व पायात तोडे.शिखर - नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी तीन उर:श्रृंग,त्यावर एक उर:श्रृंग,मोठे देवकोष्ठ.

५६) स्त्री प्रतिमा – संपूर्णत: शाडूची प्रतिमा,उजवा हात खांद्याजवळ, हातातील वस्तू अस्पष्ट,डावा हात पोटाजवळ, डावा पाय सरळ, उजवा पाय गुडघ्यात वाकवून उजवीकडे ठेवलेला,कमरेस

मेखला,अधोवस्त्र, गळ्यात अर्धहार, लांब हार ,कानांत कुंडले, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र, ,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर - लहान ,नागर शैलीचे.

व्यंकटेश देवालय

५७) स्त्री प्रतिमा – संपूर्णत: शाडूची प्रतिमा, त्रिभंगात उभी, उजवा हात वर उजव्या खांद्याजवळ,हातातील वस्तू अस्पष्ट, डावा हात पोटावर ठेवलेला, मान किंचित डावीकडे वळलेली, उजव्या हातात दांड्यासारखी वस्तू(मांडीपासून खाली दंड) ,डावा हात कमरेवर, केसांचा अंबाडा उजवीकडे, दोन्ही पाय गुडघ्यात वाकवून उजवा पाय उजवीकडे,डावा पाय डावीकडे,कमरेस मेखला,अधोवस्त्र, गळ्यात अर्धहार, लांब हार ,कानांत कुंडले, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र ,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर - लहान ,नागर शैलीचे.

५८) खड्गधारिणी : संपूर्णत: शाडूची प्रतिमा, समभंगात उभी,मान किंचित डावीकडे वळलेली, डाव्या हातात तलवारीची मूठ, डाव्या खांद्यावर तलवार पेललेली, उजवा हात सरळ खाली सोडलेला, डावा पाय सरळ, उजवा पाय किंचित गुडघ्यात वाकवलेला, कमरेस मेखला,अधोवस्त्र, गळ्यात अर्धहार, लांब हार, कानांत कुंडल, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र ,मेखला व पादपत्र व पायात तोडे.शिखर - नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी तीन उर:श्रृंग,त्यावर एक उर:श्रृंग,मोठे देवकोष्ठ.

५९) खड्गधारिणी : संपूर्णत: शाडूची प्रतिमा, समभंगात उभी, उजवीकडील खांदा जरा वर डावीकडील जरा खाली वाकलेला, मान किंचित डावीकडे वळलेली, तलवार हातात आडवी धरलेली, डाव्या हातात मूठ व उजव्या हातात तलवारीचे पाते धरलेले, डावा पाय सरळ, उजवा पाय गुडघ्यात वाकवून डावीकडे, कमरेस मेखला,अधोवस्त्र, गळ्यात अर्धहार, लांब हार ,कानांत कुंडले, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र ,मेखला व पादपत्र व पायात तोडे.शिखर - नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी तीन उर:श्रृंग,त्यावर एक उर:श्रृंग,मोठे देवकोष्ठ.

६०) स्त्री प्रतिमा : समभंगात,अंशत: शाडूने सुधारणा केलेली त्यामुळे दोन्ही हातातील वस्तू अस्पष्ट, डावा हात सरळ, उजवा हात पोटाजवळ, कमरेस मेखला,अधोवस्त्र, गळ्यात अर्धहार, लांब हार ,कानांत कुंडले, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र ,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर - लहान ,नागर शैलीचे.

६१) स्त्री प्रतिमा : संपूर्णत: शाडूची प्रतिमा, समभंगात, डावीकडे मान कललेली, दोन्ही हात स्तनाखाली ओंजळीसारखे, उजवा पाय सरळ, डावा गुडघ्यातून वाकवून उजव्या मांडीवर,कमरेस मेखला,अधोवस्त्र, गळ्यात अर्धहार, लांब हार ,कानांत कुंडले, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र ,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर - लहान ,नागर शैलीचे.

६२) वीणाधारिणी : संपूर्णत: शाडूची (वरून काळा रंग लावलेला व इतर शाडूच्या मूर्तींपेक्षा चांगल्या स्थितीत), मान संपूर्णपणे डावीकडे कललेली, उजव्या मांडीवरून डाव्या खांद्यावर वीणा , दोन्ही पाय गुडघ्यात मोडून उजवीकडे, डावा हात मांडीजवळ व उजव्या हाताने वीणा वाजविताना, गळ्यात लहान, लांब हार ,कानांत कुंडल, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र ,मेखला व पादपत्र व पायात तोडे.शिखर - एकावर एक स्वतंत्र शिखरे खाली पाच त्यावर तीन व वर एक(शिखरशेखरी)

६३) स्त्री प्रतिमा : संपूर्णत: शाडूची प्रतिमा, साध्वी, मान डावीकडे कललेली, समभंगात, दोन्ही पाय गुडघ्यात वाकवून डावीकडे, उजव्या हातात अक्षमाला व हात समोर डाव्या मांडीजवळ, डावा हात स्तनाजवळ, गळ्यात अर्धहार, लांब हार ,कानांत कुंडल, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र, मेखला व पादपत्र व पायात तोडे.शिखर – एकावर एक स्वतंत्र शिखरे खाली पाच त्यावर तीन व वर एक(शिखरशेखरी)

६४) नर्तिका : मूळ मूर्ती, डावा पाय उजवीकडे व उजवा पाय डावीकडे, दोन्ही हात व डावा पाय शाडूने बनवलेला, उजवा हात डोक्यावर व डावा हात मांडीजवळ, मान डावीकडे कललेली, गळ्यात अर्धहार, लांब हार ,कानांत कुंडल, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र ,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर - लहान ,नागर शैलीचे.

६५) स्त्री प्रतिमा : मूळ मूर्ती पण बराचसा भाग शाडूने बनवलेला, डावा पाय गुडघ्यात वाकवून उजवीकडे व उजवा पाय गुडघ्यात वाकवून डावीकडे, चेहरा, दोन्ही हात व उजवा पाय शाडूने बनविलेला, उजवा हात उजव्या स्तनाजवळ चिमटीप्रमाणे मुद्रा, डाव्या हातातील वस्तू अस्पष्ट, गळ्यात अर्धहार, लांब हार,कानांत कुंडल, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र ,मेखला व पादपत्र व पायात तोडे.शिखर - लहान ,नागर शैलीचे.

६६)कमलधारिणी : शाडूची स्त्री प्रतिमा, समभंगात उभी, उजव्या हातात कमळाची कळी,कळी खांद्याजवळ धरलेली, डावा हात सरळ खाली, , गळ्यात अर्धहार, लांब हार ,कानांत कुंडले, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र ,मेखला व पादपत्र व पायात तोडे. शिखर - नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी तीन उर:श्रृंग,त्यावर एक उर:श्रृंग,मोठे देवकोष्ठ.

६७)नर्तिका : मूळ मूर्ती परंतू शाडूने जोडलेली, चेहरा, गळ्यातील हार, स्तन, डावा हात,उजवा पाय व डावे पाऊल शाडूने बनवलेले, उजवा पाय वाकवून डावीकडे,डावा पाय गुडघ्यात वाकवून उजवीकडे, मान डावीकडे झुकलेली, डावा हात डोक्यावर व उजवा हात छातीखाली, , गळ्यात अर्धहार. लांब हार ,कानांत कुंडले, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र ,मेखला व पादपत्र व पायात तोडे, पायात तोड्याबरोबर पैंजण व गळ्यात वैकक्षक. शिखर - नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी तीन उर:श्रृंग,त्यावर एक उर:श्रृंग,मोठे देवकोष्ठ.

६८)स्त्री प्रतिमा : : संपूर्णत: शाडूची प्रतिमा, समभंगात उभी, डावा पाय गुडघ्यात मोडून पाऊल जमिनीवर व उजवा पाय गुडघ्यात मोडून डाव्या मांडीवर, उजवा हात डोक्यावर , डावा हात मांडीजवळ, गळ्यात अर्धहार, लांब हार ,कानांत कुंडल, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र ,मेखला व पादपत्र व पायात तोडे, शिखर - नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी तीन उर:श्रृंग,त्यावर एक उर:श्रृंग,मोठे देवकोष्ठ.

६९)स्त्री प्रतिमा : मूळ प्रतिमा,चेहरा उजवीकडे कललेला, डाव्याबाजूस अंबाडा, दोन्ही हात तुटलेले,उजवा हात शाडूने बनविलेला तो सरळ मांडीजवळ, डावा हात तुटलेला, दोन्ही पाय मांडीपासून शाडूने बनविलेले, उजवा पाय सरळ डावीकडे, डावा पाय किंचित गुडघ्यात वाकवून डावीकडे, गळ्यात

अर्धहार, लांब हार ,कानांत कुंडले, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र ,मेखला व पादपत्र व पायात तोडे, शिखर - नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी तीन उर:श्रृंग,त्यावर एक उर:श्रृंग,मोठे देवकोष्ठ.

७०) साक्षी विनायक :जरा पुढे आलेले देवकोष्ठ, मूर्ती मूळची सुरसुंदरीचीच असावी नंतरच्या काळात तिचे रूप बदलून शेंदुराने मढवून समभंगात उभ्या चतुर्भूज गणेशाचे रूप दिले आहे.(मंदिराच्या दक्षिणेकडील कृष्णाचे असेच झालेले आहे) शिखर - नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी तीन उर:श्रृंग,त्यावर एक उर:श्रृंग,मोठे देवकोष्ठ.

७१) स्त्री प्रतिमा (मर्दला) : संपूर्णत: शाडूची प्रतिमा,दोन्ही पाय गुडघ्यातवाकवून उजवीकडे, मान उजवीकडे कललेली, उजवा हात डोक्यावर, डाव्या हातात अलिंग्य पोटाजवळ धरलेले, गळ्यात अर्धहार, लांब हार ,कानांत कुंडल, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र ,मेखला व पादपत्र व पायात तोडे, शिखर - नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी तीन उर:श्रृंग,त्यावर एक उर:श्रृंग,मोठे देवकोष्ठ.

७२) कमलधारिणी : संपूर्णत: शाडूची मूर्ती, मान डावीकडे वळलेली, समभंगात उभी, उजव्या हातात खांद्याजवळ कमळ धरलेले, गळ्यात अर्धहार, लांब हार ,कानांत कुंडले, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र ,मेखला व पादपत्र व पायात तोडे,शिखर - नागर शैलीचे, मूलमंजरीस दोन शिखरे आणि शेजारी तीन उर:श्रृंग,त्यावर एक उर:श्रृंग,मोठे देवकोष्ठ.

महाकाली मंदिराच्या बाह्यांगावरील सुरसुंदरी

महालक्ष्मी मंदिराप्रमाणे महाकाली मंदिराच्या बाह्यांगावरही सुरसुंदरींची शिल्पे आढळून येतात. या शिल्पांची घडण महालक्ष्मी मंदिरांवरील शिल्पांपेक्षा वेगळी आहे. या मंदिरावरील शिल्पे आकाराने मोठी आहेत. जंघाभागांवरील ही शिल्पे २२ मोठ्या देवकोष्ठात तर १६ लहान देवकोष्ठांत आहेत. १७ रिकामी देवकोष्ठे आहेत.या शिल्पांमध्ये पत्रलेखिका,नर्तिका, मृदुंगधारिणी, धनुर्धारिणी,गुंठना अशा सुरसुंदरींची शिल्पे असून काली, शिव या देवतांचीही शिल्पे आहेत.ही सर्व शिल्पे देवकोष्ठात असून या

देवकोष्ठांवर वेसर प्रकारची शिखरे आहेत. प्रत्येक दोन-तीन शिल्पांनंतर सलिलांतरातही स्तूपिकांसारख्या शिखरांत आकाराने जरा लहान शिल्पे आहेत. या मूर्तींच्या खाली लेख आढळून येत नाही. फक्त महाकालीच्या पूर्व दरवाज्याजवळील एका रिकाम्या देवकोष्ठाच्या खालील पट्टीवर काही अक्षरे कोरलेली स्पष्ट दिसून येतात. त्यांचा अर्थ मात्र लागत नाही. या मूर्तींनाही तुटलेल्या भागांस शाडूने जोडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

महालक्ष्मी मंदिराच्या सभामंडपाच्या बाह्यांगांवरील सुरसुंदरी :

महालक्ष्मी मंदिर व महाकालीमंदिराच्या बाह्यांगांवर जशा सुरसुंदरी आहेत तशाच प्रकारच्या सुरसुंदरी महालक्ष्मी मंदिराच्या सभामंडपाच्या बाह्यांगावर आहेत.या मूर्तींची जडणघडण मात्र महाकाला मंदिरावरील सुरसुंदरींसारखी आहे.

महालक्ष्मी मंदिराच्या सभा मंडपाच्या बाह्यांगावरील देवकोष्ठातील सुरसुंदरी:

१)जया : स्त्रीप्रतिमा समभंगात ,डाव्याबाजूस लहान मूल,स्त्रीच्या डाव्या हातात कुंभ(वर कदाचित नारळ),शरीराचा बांक डावीकडे,स्त्रीचा उजवा हात मुलाच्या डोक्यावर, लहान मुलाने आपली मान उजवीकडे वळवलेली आहे,त्याच्या उजव्या खांद्यावर झोळी आहे व त्याचा दोरीवजा भाग समोर छातीवर लहान मुलाने हाताने धरलेला आहे.मुलाचे दोन्ही पाय मांडीपासून तुटलेले,डोक्यावर मोठा अंबाडा,हातात केयूर व कंकण,मोठ्या स्त्रीचा डावा पाय सरळ,उजवा कमरेपासून तुटलेला, शरिरावर कानांत कर्णकुंडले,गळ्यात लहान हार, हातात केयूर व कंकण,कमरेस अधोवस्त्र,मेखला,पादपत्र,वस्त्राची गाठ डावीकडे, मोठे देवकोष्ठ, शिखर वेसर पद्धतीचे , देवकोष्ठाखाली देवकोष्ठाचा भार उचलताना विद्याधर

२)स्त्रीप्रतिमा : मूळ मूर्ती,त्रिभंगात उभी स्त्री, उजवा हात कोपरापासून तुटलेला तर डावा हात दंडाजवळ तुटलेला, चेहरा भग्न, हातात काहीतरी वस्तू धरलेली असावी, गळ्यात अर्धहार व लांब हार, कमरेस अधोवस्त्र,मेखला,पादपत्र,हातात केयूर व बाजूबंद, मोठे देवकोष्ठ, शिखर वेसर पद्धतीचे

३)नर्तिका : त्रिभंगात, मान उजवीकडे झुकलेली, उजवा पाय गुडघ्यात वाकवून उजवीकडे तर डावा पाय गुडघ्यात वाकवून डावीकडे, केसांचा भांग मधोमध व मागे अंबाडा, उजवा हात खांद्याच्या जरा वर अंगठा व अनामिका बोटाने चिमटीसारखी मुद्रा, डावा हात कमरेवर, शरीराचा बाक डावीकडे, उजवा पाय सरळ तर डावा पाय गुडघ्यात वाकलेला,गळ्यात अर्धहार व लांब हार, कमरेस अधोवस्त्र,मेखला,पादपत्र,पायात नुपुर देवकोष्ठ मोठे ,देवकोष्ठावर वेसर पद्धतीचे शिखर, देवकोष्ठ विद्याधराने पेललेले

४)स्त्रीप्रतिमा (नर्तिका) : भग्न मूर्ती,चेहरा,डावा हात,दोन्ही पाय तुटलेले, उजवा हात छातीजवळ,गळ्यात अर्धहार व लांब हार, कमरेस अधोवस्त्र,मेखला,पादपत्र,पायात नूपुर देवकोष्ठ विद्याधराने पेललेले, देवकोष्ठ मोठे देवकोष्ठावर वेसर पद्धतीचे शिखर

५)स्त्रीप्रतिमा (नर्तिका): त्रिभंगात, उजवा हात कोपरातून तर डावा हात दंडापासून तुटलेला, उजव्या हातात केयूर व नागबंध, दोन्ही पाय मांडीपासून तुटलेले, कदाचित नृत्यमुद्रेत, गळ्यात अर्धहार व लांब हार, कमरेस अधोवस्त्र,मेखला,पादपत्र,पायात नूपुर देवकोष्ठ मोठे देवकोष्ठावर वेसा पद्धतीचे शिखर देवकोष्ठ याठिकाणी हत्तीने पेललेलेआहे

६)नर्तिका : भग्न मूर्ती, डोक्यामागे अंबाडा, उजवा हात दंडापासून तर डावा हात खांद्यापासून तुटलेला, मूर्ती त्रिभंगात, गळ्यात लहान व लांब हार, कमरेस अधोवस्त्र,मेखला,पादपत्र,पायात नूपुर, देवकोष्ठ मोठे,देवकोष्ठावर वेसर पद्धतीचे शिखर देवकोष्ठ विद्याधराने पेललेले,

७)पुरुष प्रतिमा : साधूवेषात, कमरेस लंगोट, दोन्ही हातात केयूराच्या जागी रुद्राक्षाचे बाजूबंद, गळ्यात यज्ञोपवीत, पायांची ठेवण देहुडा

८)नर्तिका : भग्न मूर्ती, त्रिभंगात, चेहरा तुटलेला, हात वर कोपरात वाकवून स्तनाजवळ,डावा हात तुटलेला, हातात केयूर,बाजूबंद व कंकण, कमरेस अधोवस्त्र, मेखला,पादपत्र,वस्त्राची गाठ डावीकडे देवकोष्ठ मोठे देवकोष्ठावर वेसर पद्धतीचे शिखर ,देवकोष्ठ विद्याधराने पेललेले

९)नर्तिका : भग्न मूर्ती , भग्न चेहरा, हात पाय तुटलेले, कमरेस अधोवस्त्र, मेखला,पादपत्र, पायाची ठेवण देहुडा असावी, वस्त्राची गाठ दोन्ही बाजूस, उजवा पाय पावलाजवळ तुटलेला डावा पाय मांडीपासून तुटलेला ,देवकोष्ठ मोठे, देवकोष्ठावर वेसर पद्धतीचे शिखर, देवकोष्ठ विद्याधराने पेललेले

१०)पुरुषप्रतिमा : साधू प्रतिमा, दोन्ही हातात केयूराच्याजागी रुद्राक्ष, कमरेस लंगोटीसारखे वस्त्र, पायांची ठेवण देहुडी

११)नर्तिका : मूर्ती भग्न , त्रिभंगात, चेहरा तुटलेला, उजवा हात स्तनाजवळ,डावा हात तुटलेला, हातात केयूर, बाजुबंद व कंकण,कमरेस अधोवस्त्र, मेखला,पादपत्र,वस्त्राची गाठ डावीकडे,मान डावीकडे कललेला, देवकोष्ठ मोठे, देवकोष्ठावर वेसर पद्धतीचे शिखर, देवकोष्ठ विद्याधराने पेललेले

१२)नर्तिका : भग्न मूर्ती, हात व पाय तुटलेले,कमरेस अधोवस्त्र, मेखला,पादपत्र,वस्त्राची गाठ डावीकडे,मान डावीकडे कललेली देवकोष्ठ मोठे, देवकोष्ठावर वेसर पद्धतीचे शिखर, देवकोष्ठ विद्याधराने पेललेले

महाकाली मंदिराच्या पश्चिम दरवाज्याकडून उत्तरेकडील सुरसुंदरी

१)देवकोष्ठ रिकामे

२)पत्रलेखिका : पाठमोरी, मान किंचित डाव्याबाजूस झुकलेली, डोक्यावरील चौकटीचे डावीकडील टोक डाव्या हाताने धरलेले, उजव्या हाताने चौकटीवर लिहित आहे, केसांचा अंबाडा डाव्या बाजूस, गळ्यातील माळ पाठीवर रुळलेली, कानांत कुंडल, डाव्या हातात केयूर,कंकण व अंगठ्यात अंगुष्ठान ,उजवा हात कदाचित नंतर बसवलेला(कारण डाव्या हातातील केयूर व कंकणाप्रमाणे दागिने उजव्या हातात नाहीत), कमरेस वस्त्र त्यावर मेखला व पादपत्र, वस्त्राची गाठ डाव्याबाजूस दृश्य ,स्त्रीचा डावा पाय सरळ व उजवा पाय किंचित गुडघ्यात वाकवलेला आहे. त्यामुळे शरिरास थोडा बांक आलेला आहे. स्त्रीच्या पायांत तोडे व पैंजण आहेत.

आज मात्र या सुरसुंदरीची पूजा सटवाईच्या रूपात केली जाते. नवअर्भकास आशीर्वाद देणाऱ्या या सटवाईसमोर कठड्यावर नवअर्भकास झोपवून तिचे आशिर्वाद घेतले जातात.

३)देवकोष्ठ रिकामे ,लहान देवकोष्ठ

४)स्त्री युगल : संपूर्ण देवकोष्टात स्त्री युगुल, एक स्त्री उंच, समभंगात उभी, डावा हात तुटलेला परंतु कदाचित तो लहान स्त्रीच्या उजव्या खांद्यामागून डाव्या खांद्यावर ठेवलेला असावा, उजव्या हाताने लहान स्त्रीच्या दंडाला धरलेले आहे, लहान स्त्रीचा उजवा हात कमरेवर व डाव्या हातात पोथीसारखी वस्तू धरलेली आहे, उंच स्त्रीने डावा पाय गुडघ्यात वाकवून उजव्या बाजूस अलगद उभारला आहे, दोन्ही स्त्रियांच्या कानांत कर्णकुंडले, कमरेस अधोवस्त्रत्यावर मेखला व पादपत्र, पायांत तोडे व नूपुर घातले आहेत. मोठे देवकोष्ठ, शिखर वेसर पद्धतीचे

५)मृदंगधारिणी (मर्दला) : स्त्री मूर्ती त्रिभंगात, मान उजवीकडेकललेली, केसांचा अंबाडा डावीकडे,डावा हात मृदुंगावर तर उजवा हात मृदुंग वाजवताना, तिच्या पायाजवळील माकड दोन पायांवर उभे आहे, स्त्रीने उजवा पाय गुडघ्यात मोडून डावीकडे तर डावा पाय गुडघ्यात मोडून उजवीकडे ठेवला ठेवला आहे.कानांत कर्णकुंडले, कमरेस वस्त्र त्यावर मेखला व पादपत्र, वस्त्राची गाठ दोन्हीबाजूस दृश्य मोठे देवकोष्ठ, शिखर वेसर पद्धतीचे

६) नर्तिका : डोक्यामागे प्रभावळीसारखा अंबाडा,नर्तिकेचा उजवा खांदा जरा वर उचललेला , दोन्ही हात दंडापासून तुटलेले असल्यामुळे हाताची ठेवण लक्षात येत नाही(कदाचित उजवा हात डोक्यावर व डावा हात स्तनाजवळ आहे). कानांत कर्णकुंडले, कमरेस वस्त्र त्यावर मेखला व पादपत्र, पायात तोडे,वस्त्राची गाठ दोन्हीबाजूस दृश्य, मोठे देवकोष्ठ, शिखर वेसर पद्धतीचे

७)मोठे देवकोष्ठ, रिकामे, एकेकाळी मूर्ती असावी,शिखर वेसर पद्धतीचे

भरत मंदिर

८)मोठे देवकोष्ठ. रिकामे. एकेकाळी मूर्ती असावी.शिखर वेसर पद्धतीचे

९)लहान देवकोष्ठ,रिकामे,शिखर स्तूपिकेसारखे

१०)युगल मूर्ती (मोहिनी किंवा विजया) : स्त्री व पुरुष आलिंगन मुद्रेत, पुरुष समभंगात, डाव्या हातातील वस्तू शाडूने बनविल्यामुळे अस्पष्ट, उजवा हात स्त्रीच्यामागून तिच्या स्तनाजवळ, डावा पाय तुटलेला, उजवा पाय सरळ, कानांत कुंडल, गळ्यात वैकक्षक, कमरेस अधोवस्त्र, वस्त्राची गाठ डावीकडे, वस्त्रावर मेखला व पादपत्र,हातात केयूरव कंकण, स्त्री किंचित डावीकडे वळलेली, उजवा हात डोक्यावर व डावा हात पुरुषाच्या खांद्यावर, डोक्यावर केसांचा अंबाडा, गळ्यात अर्धहार व लांब हार, कमरेस अधोवस्त्र, मेखला व पादपत्र, वस्त्राची गाठ उजवीकडे.मोठे देवकोष्ठ, शिखर वेसर पद्धतीचे

११) नर्तिका : त्रिभंगात, नृत्यमुद्रेत, दोन हातांचे पंजे व डावा पाय शाडूचा, शरिराचा बांक डावीकडे, उजवा हात वर खांद्याजवळ, डावा हात कमरेवर,डावा पाय सरळ उजवीकडे तर उजवा पाय गुडघ्यात मोडून डावीकडे अंगठ्याने टेकलेला, केसांचा अंबाडा नेहमीप्रमाणे उजव्या वा डाव्याबाजूस नसून डोक्यावर , काही केस मानेवर रुळलेले, कानांत कुंडल, गळ्यात अर्धहार व लांब हार,वैकक्षक, कमरेस अधोवस्त्र, मेखला व पादपत्र, वस्त्राची गाठ उजवीकडे,मोठे देवकोष्ठ, शिखर वेसर पद्धतीचे

१२) लहान देवकोष्ठ, रिकामे,शिखर स्तूपिकेप्रमाणे

१३)केतकीभरणा (भांगात कुंकू भरणारी स्त्री ?) : त्रिभंगात उभी, मान किंचित डावीकडे कललेली, उजवा हात वर डोक्यावर, केसांचा मोठा अंबाडा वर डोक्याच्या मध्यभागी, केसांच्या बटा स्पष्ट, डावा हात खांद्याजवळ, हातातील वस्तू अस्पष्ट, डावा पाय सरळ, उजवा किंचित गुडघ्यात वाकवून डावीकडे ठेवलेला, पाऊल डावीकडे, कानांत कुंडल, गळ्यात लहान व लांब हार,वैकाक्षक, कमरेस अधोवस्त्र, मेखला व पादपत्र, वस्त्राची गाठ उजवीकडे, मोठे देवकोष्ठ, शिखर वेसर पद्धतीचे

१४)धनुर्धारिणी :रति (धनुर्धारिणी) : स्त्री त्रिभंगात उभी, तिच्या उजव्या बाजूस खाली उजवा गुडघा वाकवून डावा गुडघा जमिनीवर ठेवलेली स्त्री, तिच्या गुडघ्यावर उभ्या स्त्रीचा डावा पाय , त्या पायास आलता लावताना (पायातील काटा काढताना?) उभ्या स्त्रीचा उजवा हात बसलेल्या स्त्रीच्या डोक्यावर, व डाव्या हातात डोक्यापासून पायापर्यंत लांब धनुय (उसाचा दंड ?)धरलेला, उभ्या स्त्रीची मान

उजवीकडे कललेली, कानांत कुंडल, गळ्यात अर्धहार व लांब हार,वैकक्षक, कमरेस अधोवस्त्र, मेखला व पादपत्र, वस्त्राची गाठ उजवीकडे पायांत तोडे व नुपुर , मोठे देवकोष्ठ, शिखर वेसर पद्धतीचे

१५)नर्तिका : त्रिभंगात उभी, मान डावीकडे कललेली, केसांची गाठ डोक्यावर मध्यावर, उजवा हात कोपरापासून तुटलेला, शाडूने बनवलेला,डावा हात कोपरापासून तुटलेला,कानांत कुंडल, गळ्यात अर्धहार व लांब हार,वैकक्षक, कमरेस अधोवस्त्र, मेखला व पादपत्र, वस्त्राची गाठ उजवीकडे पायांत तोडे व नुपुर. लहान देवकोष्ठ,शिखर स्तूपिकेप्रमाणे

१६) नर्तिका : त्रिभंगात, मान डावीकडे कललेली, उजव्याबाजूस अंबाडा, उजवा व डावा हात तुटलेला, त्यामुळे हातांची स्थिती लक्षात येत नाही, उजवा पाय गुडघ्यात वाकवून उजवीकडे, डावा पाय गुडघ्यात वाकवून डावीकडे, कानांत कुंडल, गळ्यात अर्धहार व लांब हार,वैकक्षक, कमरेस अधोवस्त्र, मेखला व पादपत्र, वस्त्राची गाठ उजवीकडे पायांत तोडे व नूपुर , लहान देवकोष्ठ, शिखर स्तूपिकेप्रमाणे

१७) नर्तिका : त्रिभंगात, उजवा खांदा जरा वर, डावा खांदा जरा खाली कललेला, डावा हात शाडूने बनविलेला, हात डाव्या मांडीजवळ, उजवा पाय गुडघ्यात वाकवून उजवीकडे, डावा पाय गुडघ्यात वाकवून डावीकडे, डोक्यावरील केसांचा अंबाडा डोक्याच्या मध्यावर, कानांत कुंडल, गळ्यात अर्धहार व लांब हार,वैकक्षक, कमरेस अधोवस्त्र, मेखला व पादपत्र, वस्त्राची गाठ उजवीकडे पायांत तोडे व नूपुर. मोठे देवकोष्ठ, शिखर वेसर पद्धतीचे

१८)स्त्रीप्रतिमा (गुंठना वा योगिनी ?): समभंगात, डावा पाय सरळ, उजवा पाय गुडघ्यात जरा वाकवलेला, चेहऱ्याचा भाग जरा भग्न, दोन्ही हात दंडापासून भग्न, शाडूने जोडलेला, उजवा हात कमरेवर, डावा हात सरळ खाली,कमरेस मेखला पण त्याखाली अधोवस्त्र नाही,मूर्ती नग्न, पायास मांडीभोवती साप गुंडाळलेला, मोठे देवकोष्ठ, शिखर वेसर पद्धतीचे

१९)पाठमोरी स्त्री नमस्कार मुद्रेत (चंद्रावली): त्रिभंगात, पाठमोरी, दोन्ही हात डोक्यावर नमस्कार मुद्रेत, केसांच्या अंबाड्याची गाठ मानेवर, अंबाड्यातून केसांच्या बटा पाठीवर रुळलेल्या, कानांत कुंडले,

हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र व त्यावर मेखला, उजवा पाय डावीकडे जमिनीवर व डावा पाय उजवीकडे अंगठ्याने टेकलेला, पायांत कडे व नूपुर , लहान देवकोष्ठ, शिखर वेसर पद्धतीचे

२०)देवकोष्ठ रिकामे,मोठे देवकोष्ठ, शिखर वेसर पद्धतीचे

शत्रुघ्न मंदिर

२१)देवकोष्ठ रिकामे, मोठे देवकोष्ठ, शिखर वेसर पद्धतीचे

२२)मृदुंगधारिणी (मर्दला) : त्रिभंगात, उजवा खांदा वर , डावा जरा खाली झुकलेला, मान डावीकडे कललेली, अंबाडा उजव्याबाजूस, उजव्याबाजूस मांडीवर अलिंग्य, डावा हात अलिंग्य वाजवताना, उजवा हात अलिंग्याच्या मध्यावर, उजवा पाय गुडघ्यात मोडून डावीकडे अंगठ्याने टेकलेला, डावा पाय गुडघ्यात मोडून उजव्याबाजूस, गळ्यात लांब व लहान हार, कमरेस अधोवस्त्र, मेखला व पादपत्र, पायात तोडे. मोठे देवकोष्ठ, शिखर वेसर पद्धतीचे

२३) धनुर्धारिणी : त्रिभंगात, मान डावीकडे कललेली, उजवा हात शाडूने बनविलेला, डाव्या हातात धनुष्य (उसाचा दांडा?), डाव्या हाताने त्यास धरलेले, डावा पाय उजवीकडे, उजवा पाय डावीकडे, अबाडा डाव्याबाजूस व उरलेले केस खाली सोडलेले, वस्त्राची गाठ दोन्हीबाजूस, गळ्यात लांब व अर्धहार हार, कमरेस अधोवस्त्र, मेखला व पादपत्र, पायात तोडे,मोठे देवकोष्ठ, शिखर वेसर पद्धतीचे

२४)स्त्री देवता (भैरवी) : त्रिभंगात,डोक्यामागे प्रभावळ,मान डावीकडे कललेली, डोक्यावर मुकुट, उजवा हात डोक्यावर हातात डमरू, डावा हात स्तनाजवळ, हातातील वस्तू अस्पष्ट, हातात केयूर, कंकण व बाजूबंद,कमरेस अधोवस्त्र, मेखला व पादपत्र, दोन्ही पाय गुडघ्यात वाकवून उजवा पाय डावीकडे अंगठ्याने टेकलेला, डावा पाय उजवीकडे, लहान देवकोष्ठ, शिखर स्तूपिकेप्रमाणे

२५) साधू : समभंगात, पुरुष प्रतिमा, उजवा हात छातीजवळ, हातातील वस्तू अस्पष्ट, डावा हात कोपरापासून तुटलेला, कमरेस लंगोट, लहान देवकोष्ठ, शिखर स्तूपिकेप्रमाणे

२६) स्त्री व माकड : समभंगात, मान किंचित उजवीकडे कललेली, चेहरा भग्न, अंबाडा डाव्याबाजूस, उजवा हात डोक्यावर चपेतदान मुद्रेत, डावा हात कोपरापासून तुटलेला, शाडूचा बनवलेला तो स्तनाजवळ, हातात केयूर, गळ्यात लहान व लांब हार, कमरेवरचे अधोवस्त्र खाली सरकलेले, डावीकडे पायाजवळ असलेले माकड दोन पायांवर उभे भग्नावस्थेत, स्त्रीच्या वस्त्राची गाठ डावीकडे, गळ्यात लांब व लहान हार, वैकाक्षक,कमरेस अधोवस्त्र, मेखला व पादपत्र, पायात तोडे. मोठे देवकोष्ठ, शिखर वेसर पद्धतीचे

२७) शालभंजिका वा मुग्धा : डाव्याबाजूस झाडाची फांदी त्यावर पाने ,पक्षी व फळे, स्त्री त्या वृक्षाकडे बघताना, मान झाडाकडे बघत उंचावलेली, उजव्याबाजूस अंबाडा, दोन्ही हात शाडूचे त्यामुळे हाताची मूळ स्थिती समजत नाही, कमरेस अधोवस्त्र, मेखला व पादपत्र, वस्त्राची गाठ दोन्ही बाजूस दृश्य, उजवा पाय गुडघ्यापासून तुटलेला, डावा पाय सरळ खाली, मोठे देवकोष्ठ, शिखर वेसर पद्धतीचे

२८) शिव प्रतिमा (भैरव): पुरुष प्रतिमा, डोक्यामागेप्रभावळ, समभंगात,डावा खांदा वर उजवा खांदा जरा खाली झुकलेला, उजव्या हातातील वस्तू अस्पष्ट, कमरेस वस्त्र नाही वर मेखला, जांघेवर सापाचा विळखा, गळ्यात नरमुंडमाला, उजवा पाय सरळ, डावा पाय समोर, पाऊल डावीकडे ठेवलेले, पायात कडे व नुपुर

लहान देवकोष्ठ, शिखर स्तूपिकेप्रमाणे

२९) तोरणा : त्रिभंगात, दोन्ही हात डोक्यावर स्पंदन मुद्रेत, उन्नत स्तन, गळ्यात अर्धहार व लांब हार, हातात केयूर व कंकण, कमरेस अधोवस्त्र, मेखला व पादपत्र, वस्त्राची गाठ उजवीकडे, पाय देहुडा स्थितीत लहान देवकोष्ठ, शिखर स्तूपिकेप्रमाणे

३०) पत्रलेखिका : पहिल्या पत्रलेखिकेपेक्षा आकाराने मोठी, पाठमोरी, त्रिभंगात, डोक्यावर पट्टिका, उजव्या हाताने पट्टिका धरलेली, मान वर पट्टिकेकडे बघताना, केसांचा अंबाडा डावीकडे, उजवा हात पट्टिकेवर लिहिताना, गळ्यात अर्धहार व लांब हार गळ्यात वैकाक्षक, कमरेस अधोवस्त्र,मेखला व पादपत्र,पायात नूपुर व कडे, उजवा पाय गुडघ्यात वाकवून डावीकडे अंगठ्याने टेकलेला, डावा पाय

सरळ, स्त्रीच्या उजव्याबाजूस लहान स्त्री गुडघ्यावर बसलेली, उजवा हात पोटाजवळ, डावा हात मोठ्या स्त्रीच्या मांडीला धरलेला, गळ्यात अर्धहार व लांब हार, मान उजवीकडेवर स्त्रीकडे बघताना, मोठे देवकोष्ठ, शिखर वेसर पद्धतीचे

३१) देवकोष्ठ रिकामे, मोठे देवकोष्ठ, शिखर वेसर पद्धतीचे

३२) देवकोष्ठ रिकामे, लहान देवकोष्ठ, शिखर स्तूपिकेप्रमाणे

३३) देवकोष्ठ रिकामे, मोठे देवकोष्ठ, शिखर वेसर पद्धतीचे(देवकोष्ठाखाली लेख)

वासुदेव देवळी

३४) देवकोष्ठ रिकामे, मोठे देवकोष्ठ, शिखर वेसर पद्धतीचे

३५) देवकोष्ठ रिकामे, लहान देवकोष्ठ, शिखर स्तूपिकेप्रमाणे

३६) देवकोष्ठ रिकामे, मोठे देवकोष्ठ, शिखर वेसर पद्धतीचे

३७) देवकोष्ठ रिकामे, मोठे देवकोष्ठ, शिखर वेसर पद्धतीचे

३८) देवकोष्ठ रिकामे, लहान देवकोष्ठ, शिखर स्तूपिकेप्रमाणे

३९)देवकोष्ठ रिकामे, लहान देवकोष्ठ, शिखर स्तूपिकेप्रमाणे

४०)देवकोष्ठ रिकामे, लहान देवकोष्ठ, शिखर वेसर पद्धतीचे (लेख लेक्क कोड्डु याचा अर्थ लागत नाही.लेखाचे वाचन रित्ती यांनी केले आहे.)

वरील मूर्तींचाचा अभ्यास करता हे लक्षात येते की

महालक्ष्मी व महाकाली मंदिराच्या बाह्यांगांवरील सुरसुंदरींची ठेवण वेगवेगळ्या प्रकारची दिसून येते. सुरसुंदरींच्या अंगावरील दागिन्यांमध्ये ही फरक दिसून येतो.महाकाली मंदिरावरील

सुरसुंदरींच्या वस्त्राची गाठ एक किंवा दोन्ही बाजूस दृष्य आहे तर महालक्ष्मी मंदिराच्या सुरसुंदरींच्या वस्त्राची गाठ दृष्य नाही याला दोन तीन मूर्ति अपवाद आहेत(मर्दला,शिव प्रतिमा,स्त्री व माकडया महालक्ष्मी मंदिरावरील मूर्ति या महाकाली मंदिराच्या मूर्तिच्या धाटणीच्या आहेत.)

महालक्ष्मी मंदिरावरील दोन सुरसुंदरीच्या अधिष्ठानावरील लेखांवरून कदाचित मूर्ती कोरणाऱ्याचे नाव असावे.लेखाची लिपी १३ व्या शतकातील आहे.

महालक्ष्मी मंदिराच्या बाह्यांगावरील सुरसुंदरींचे वर्णन करताना तया चौसष्ठ योगिनी असल्याचा उल्लेख (चौसष्ठ योगिनींनी परिवेष्टित) असा येतो. परंतु या मूर्तीचे निरीक्षण करता लक्षात येते की या योगिनी नसून सुरसुंदरी आहेत. सुल्तानी आक्रमणाच्यावेळी या मूर्तींना क्षति पोहोचली व आज महालक्ष्मी मंदिराच्या बाह्यांगावरील बऱ्याच मूर्ती पुन: शाडूच्या बनविण्यात आल्या आहेत.त्यामुळे मूळ मूर्ती कशा स्वरुपात होत्या हे आज सांगणे कठिण आहे. ३२मोठी देवकोष्ठ, २९ मध्यम देवकोष्ठ व ११लहान देवकोष्ठात मिळून ७२ देवकोष्ठे आहेत. ३ रिकामे देवकोष्ठ आहेत ज्यांत मूर्ती नाहीत .६४ योगिनींचा आकडा या गणितात कुठेही बसत नाही.

प्रकरण ५

महालक्ष्मी मंदिरात कालमानाप्रमाणे झालेली वाढ

महालक्ष्माचे मंदिर हे वैशिष्ट्यपूर्ण देवालय असल्यामुळे अनेक विद्वानांना या मंदिराविषयी कुतुहल असणे स्वाभाविकच होते व आहे. अनेक विद्वानांनी या मंदिराविषयी आपापली मते मांडली. मंदिराच्या निर्मितीचा काळ ठरविताना ह्या मतांचा उहापोह करणे अपेक्षितच आहे.

इ.स. १८५४ मध्ये इंग्रजांचा पोलिटिकल एजंट ग्रॅहम याने आपल्या ग्रंथात कोल्हापुरविषयीची माहिती प्रसिद्ध करताना कोल्हापुर व त्या परिसरात सापडलेल्या शिलालेखांच्या प्रतिलिपी व त्यांचे भाषांतर प्रसिद्ध केले.त्यांच्यामते "little information can be obtained regarding the founder of the great temple,or of the period of its existence;"[२४६]महालक्ष्मी मंदिराच्या गर्भगृहाच्या ललाटावर गणेशाचे अंकन नसल्यामुळे कदाचित हा गैरसमज झाला असावा. "The Jain assert that not only the temple, but the image itself ,originally belonged to them and that the nameof the goddess was *Padmāvatī*".[२४७]

या मतांचाच आधार घेत पुढे के.जी.कुंदनगार यांनी इ.स.१९२९ मध्ये लिहिलेल्या आपल्या पुस्तकात महालक्ष्मी मंदिराविषयी आपली मते मांडली. त्यांच्या मते

१)हे देवालय चालुक्य वंशीय राजा कर्णदेव याने इ.स. ६३४ नंतर बांधले. 'The historical personage who built the *Ambābāī* temple is without doubt Karnadeva of the chalukya dynasty"[२४८].

२)हे मंदिर स्थापत्यदृष्ट्या चालुक्य पद्धतीचे आहे.

---

[२४६] मेजर ग्रॅहम .१८५४ .पृ.३१७

[२४७] मेजर ग्रॅहम . १८५४ .पृ.३१८

[२४८] कुंदनगार.१९२९ .पृ.१६

३)**करवीरमाहात्म्य** या ग्रंथाचा काळ इ.स.पूर्व ३रे शतक असल्यामुळे त्याकाळात याठिकाणी महालक्ष्मीचे मंदिर होते व सध्याच्या महालक्ष्मी मूर्तीऐवजी आणखी कुठली मूर्ती होती. राजा कर्णाने याठिकाणी दर्शनास आल्यानंतर हे देवालय निर्माण केले." Since the story narrated in ***Karveer Mahātmya*** relates to the 3rd c.B.C. we must conclude that by about th 3rd c B.C. the image of the goddess had been setup for public worship"[२४९].

४)राष्ट्रकूटांच्याकाळात कदाचित हे मंदिर जैन बसदीत रूपांतरित केले असावे व नंतर देवगिरी यादवांच्या काळात या बसदीचे रूपांतर परत हिंदु मंदिरात झाले असावे.' Rashtakutas who being Jains might have transformed the Hindu temple into a Jain *Basadi* .After the Rashtrakutas the country came into the possession of later Chalukyas who could not , on account of the matrimonial alliance with the Śilaharas change the *Basadi* into a Hindu temple once again[२५०]. It was again transformed into a Hindu temple by the hindu kings of Devgiri"[२५१].

इ.स.१९५८ मध्ये ग.ह. खरे यांनी *महाराष्ट्राची चार दैवते* या पुस्तकात महालक्ष्मी मंदिरावर आपली मते मांडली. त्यात त्यांनी कुंदनगार यांची सर्व मते खोडून काढली. त्यांच्यामते

१)राजा कर्णाच्या प्रसिद्ध झालेल्या लेखाची शिला अस्तित्वात नाही व इतर पुराव्यांवरून अशा नावाचा राजा होऊन गेला असे ठामपणे सांगता येत नाही[२५२](आजही हा लेख उपलब्ध नाही).

२)महालक्ष्मीची मूर्ती ही पद्मावताची नसून हिंदू देवतेचीच आहे हे पद्मावतीच्या मूर्तिलक्षणांवरून सिद्ध केले[२५३] .

[२४९] कुंदनगार.१९२९ .पृ.१४
[२५०]पूर्वोक्त .पृ.२१
[२५१] पूर्वोक्त.पृ.४४
[२५२] खरे.१९५८ .पृ.३९
[२५३]पूर्वोक्त .पृ.६९-७४

३)महालक्ष्मी मंदिर शके ९०० च्या पूर्वीचे वाटत नाही. फारतर गाभारा थोडा प्राचीन (शके ८००)असण्याचा संभव आहे[२५४].राष्ट्रकूटकाळात तिचे एखादे देऊळ असण्याची शक्यता आहे पण आजचे देऊळ ते नाही[२५५]

४) संजान ताम्रपटाच्या आधारे महालक्ष्मी देवस्थानाचा काळ शक ७९३ इतका मागे नेणे शक्य आहे.त्याकाळी तिचे एखादे देऊळ असणे शक्य आहे पण आजचे देऊळ त्रिकूटात्मक व तारकाकारी असल्यामुळे ते शकाच्या १० व्या शतकापूर्वीचे आणि १२व्या शतकाच्या नंतरचे असेल असे वाटत नाही[२५६].

५) मंदिराचा गणेश मंडप जुन्या पद्धतीचा असला तरी यादवकालीन आहे असे वाटत नाही व असलाच तर यादवांच्या शेवटच्याकाळातील असावा[२५७].

६)महासरस्वतीचे देऊळ पेशवाईत होते. कदाचित मुसलमानीकाळात केंव्हातरी मूळ मंदिर पडले-पाडले गेल्याने त्याचा साध्या स्वरूपात जीर्णोद्धार झाला[२५८].

७)महालक्ष्मी निश्चयाने शैवपंथीय देवता आहे ;पण वैष्णवांना ती स्वपंथीय देवता आहे असे वाटून त्यांनी तीस विष्णुपत्नी लक्ष्मी बनविण्याचा प्रयत्न केला.[२५९]

८)खरे यांनी मात्र आज अस्तित्वात असलेले देवालय कोणी बांधले याची चर्चा केली नाही.

वा.वि.मिराशी[२६०] यांनी कोल्हापुरच्या महालक्ष्मीचे देवालय कोणी व केव्हा बांधले याविषयी लेख लिहून आपले मत मांडले.

---

२५४ पूर्वोक्त.पृ.७६

२५५ पूर्वोक्त.पृ.६५

२५६ खरे,१९५८ .पृ.६६

२५७ पूर्वोक्त .पृ.१

२५८ पूर्वोक्त .पृ.५

२५९ पूर्वोक्त.पृ.५९

२६०.मिराशी.१९७६ .पृ.१४२-१४९

१)कोल्हापूर येथील महालक्ष्मीचे देवालय निदान इ.स.९व्या शतकाइतके प्राचीन असून ते बहुधा करहाट येथील कोणा सिंद राजाने बांधले असावे[२६१] असे त्यांनी अनुमान केले. सिंदवंशीय राजा आदित्यवर्मा याच्या कर्नाटकातील वनवासी सतलिंगे या भागात राज्य करणारा ईश्वर नामक सिंदवंशीय सामंत यांच्या लेखात हे सिंदवंशीय राजे स्वत:स करहाटपुराधीश्वर म्हणवून घेतात. यावरून हे सिंदवंशीय मूळ करहाट प्रांतात राहणारे असावेत. खिस्तोत्तर ९व्या १०व्या शतकात करहाट भागात सिंदवंशीयांचे राज्य असावे. राष्ट्रकूट राजा अमोघवर्ष याच्या संजान ताम्रपटात वर्णन आलेल्या महालक्ष्मीचे देवालय करहाटच्या कोणा सिंदवंशीय राजाने ८व्या ९व्या शतकात बांधले असावे[२६२]. शक संवत् ९३३ नंतर लवकरच या सिंद वंशाचे कऱ्हाडहून उच्चाटन झालेले दिसते.

२)या त्रिकूट प्रासादाचे गर्भगृह व सभामंडप हे भाग प्राचीन आहेत[२६३]

गो.बं.देगलूरकर यांनी **युगयुगीन करवीर इतिहास दर्शन** या संशोधनपर संग्रहात महालक्ष्मी मंदिरावर आपली मते मांडली. यांच्यामते

१)महालक्ष्मी मंदिर ९व्या १०व्या शतकातील राष्ट्रकूटांच्याकाळचे आहे.

२) नंतर बांधले गेले ते महाकालीचे मंदिर सिंद(सेंद्रक) यांनी उभारले असावे.

३) महासरस्वतीचे सध्याचे मंदिर काही शतकानंतरचे पुनर्निर्मित असावे.

४) मुख्य गाभाऱ्यातील महालक्ष्मीची मूर्ती मूर्तिशास्त्रदृष्ट्या दुर्गा आहे[२६४].

महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्राच्या स्थापत्य व कला या खंडात अ.प्र.जामखेडकर यांनी महाराष्ट्रातील मंदिरांचा अभ्यास करून मंदिरांचे वर्णन केले. त्यांच्यामते

[२६१] पूर्वोक्त.पृ.१४५
[२६२]मिराशी.१९७६ ,पृ.१४८
[२६३]मिराशी.१९७६ ,पृ.१४४
[२६४] देगलूरकर.२०१० .पृ.१८

१)महाकाली व महालक्ष्मी ही दोन मंदिरे इ.स.११व्या शतकाच्या अखेरीस व इ.स.१२व्या शतकाच्या सुरवातीस बांधल्या गेली[२६५]

२) सुरवातीला ही दोन मंदिरे एकाच मंदिराचे दोन भाग म्हणून बांधल्या गेली नव्हती.एका मंदिराला नंतर त्याच्या शेजारी नवे मंदिर बांधून जोडण्यात आले.हे बांधकाम एका पिढीतच झाले[२६६]. प्रथम महाकालीचे मंदिर बांधण्यात आले नंतर त्यात महालक्ष्मी व महाकालीची भर पडली.

३) महालक्ष्मी व महाकाली या दोनही मंदिरांची गर्भगृहे सांधार पद्धतीची असल्यामुळे दोन्ही गर्भगृहांवर नागरप्रकारची शिखरे असावीत.

४) महालक्ष्मी मूर्ती इ.स.११व्या शतकातील आहे[२६७].

उषा भेंडे[२६८] यांनी आपल्या प्रबंधात

१)महालक्ष्मी मंदिराचा काळ इ.स.१०व्या शतकाच्या शेवटी व ११व्या शतकाच्या सुरवातीचा ठरवला आहे [२६९].

२) सभामंडपातील स्तंभांवरून सभामंडप पुनर्बांधणी केलेला असावा[२७०].

वरील सर्व मतांचा आढावा घेता महालक्ष्मी मंदिराचे अंतराळ व गाभारे हे घटक प्राचीन आहेत.इ.स.९वे शतक ते इ.स.१२व्या शतकात हे देऊळ बांधण्यात आले. मेजर ग्रॅहम व कुंदनगार यांची मते सोडली तर हे देवालय हिंदूंचे आहे असेच सर्व अभ्यासकांचे मत आहे असे दिसते.

[२६५]जामखेडकर,२००२ ,पृ २०२
[२६६] पूर्वोक्त,पृ .२०१
[२६७]पूर्वोक्त ,पृ .२०२
[२६८] भेंडे,१९८९
[२६९]पूर्वोक्त ,पृ.११३
[२७०]पूर्वोक्त .पृ.१०८

श्रीकांत घारपुरे यांनी आपल्या प्रबंधात महालक्ष्मी मंदिराचा अभ्यास करून आपली मते मांडली. त्यांच्यामते

१) महालक्ष्मी मूर्ती इ,स,१११०-११५० ची असावी[२७१].

२)महालक्ष्मी मंदिर हे इ.स.१११० ते इ.स.११२० या दरम्यान शिलाहार राजा गंडरादित्य याने बांधले.[२७२]

३)महाकाली मंदिर हे इ.स.च्या ११व्या शतकात बांधले.[२७३]

४)महालक्ष्मी मंदिराच्या वरच्या मजल्यावरील नंदिमंडप व गणेश मंडप १३व्या १४व्या शतकात बांधला.[२७४]

५)महासरस्वती मंदिराचा काळ १५व्या शतकाचा उत्तरार्ध असावा[२७५].

माझ्यामते मंदिराचा काळ ठरवितांना

१) महालक्ष्मीचे पौराणिक उल्लेख,२)ताम्रपट व शिलालेखांतून आलेले महालक्ष्मीचे उल्लेख,३)महालक्ष्मीप्रमाणे इतर राज्यांमध्ये निर्माण झालेली देवालये व ४)महालक्ष्मी मंदिर स्थापत्य या सर्व घटकांचा विचार करावा लागेल.

महालक्ष्मीचे पौराणिक उल्लेख ; महालक्ष्मीसंबंधीचा सर्वात पहिला उल्लेख **मार्कंडेय पुराणातील** देवीमाहात्म्याच्या प्राधानिक रहस्यात आलेला आहे.

मातुलिङ्गं गदां खेटं पानपात्रं च बिभ्रती

नागं लिङ्गं च योनिं च बिभ्रती नृप मूर्धनि।।५।।

(उत्तरांग विधी,प्राधानिक रहस्य)[२७६]

---

[२७१]घारपुरे,१९९८ ,पृ.४१
[२७२]पूर्वोक्त ,पृ.४२
[२७३]पूर्वोक्त ,पृ.४२
[२७४]पूर्वोक्त ,पृ.४२
[२७५]पूर्वोक्त ,पृ.४१

कोल्हापुर येथील महालक्ष्मीचे रूप असेच आहे. **मार्कंडेयपुराणा**तील देवीमाहात्म्य जरी १०व्या शतकातील असले तरी प्राधानिक रहस्याचा भाग प्रक्षिप्त आहे. **स्कंदपुराण,मत्स्यपुराण,देवीभागवत** या ग्रंथांमध्ये १०८ शक्तीपीठांचा उल्लेख आलेला आहे. **देवीभागवता**तील ३८व्या अध्यायात कोल्हापुर स्थानाला महास्थान म्हणून सर्वात आधी तिचे स्थान वर्णिले आहे. परंतु या सर्व पुराणातील बराच भाग प्रक्षिप्त असल्यामुळे काळाचा अंदाज येत नाही.

चतुर्वर्गचिन्तामणि (इ.स.चे१३वेशतक) **रूपावतार,रूपमंडन** (इ.स.चे १५वे शतक)यांत कोल्हापुरच्या महालक्ष्मीचे वर्णन आले आहे. **ज्ञानार्णवतंत्र,प्राणतोषिणीतंत्र,तंत्रचूडामणि** या ग्रंथांत करवीर क्षेत्राच्या महालक्ष्मीचा शक्तिपीठ म्हणू उल्लेख आला आहे. परंतू हे सर्व ग्रंथ इ.स.च्या १६व्या शतकात लिहिलेले आहेत. हे सर्व पुरावे जरी कोल्हापुरच्या महालक्ष्मी स्थानासंबंधात असलेतरी हे पुरावे नंतरच्याकाळातील आहेत. **करवीर माहात्म्य** हा ग्रंथ इ.स,१३०० ते इ.स.१३५० या काळात लिहिला गेला. या ग्रंथातील वर्णनावरून,या काळात महालक्ष्मीचे शाक्त रूपातून वैष्णव रूपात रूपांतर होताना दिसून येते.**लक्ष्मीविजय** हा ग्रंथ इ.स.१८ व्या शतकात लिहिलेला असल्यामुळे मंदिराचा काळ ठरविण्यास याचा उपयोग होणार नाही.

पौराणिक साहित्यात महत्वाचा पुरावा म्हणजे जैन ग्रंथकार हेमचंद्र याने लिहिलेले **द्व्याश्रयकाव्य** हे होय.हेमचंद्र हा इ.स.१०८८ ते इ.स.११७३ या काळात होऊन गेला[२७७]. याने लिहिलेल्या **द्व्याश्रयकाव्य** या ग्रंथात मूलराजाचा पुत्र चामुंड यास लक्ष्मी व गौरी या देवींचा वरदहस्त लाभलेल्या कोल्हापुरच्या राजाने भेटवस्तू पाठवल्याचा उल्लेख आहे.

सरोजवासावरजो महाकालिकावजेश्च स पद्मरागान्।

प्रैषद्गनं सारसिजं नु कोल्लापुरेश्वरस्तेरिमनोजशंभो।।२२।।[२७८]

---

[२७६] चित्राव ,१९६९ ,पृ.२६०
[२७७] पारिख व कुळकर्णी,१९६४ ,प्रस्तावना
[२७८] काठवटे,१९१५ ,सर्ग ६

या श्लोकात कोल्हापुरच्या राजाचा उल्लेख नाही . या श्लोकात लक्ष्मी व महाकालिका या दोहोंची कृपा असलेल्या कोल्लापुरेश्वराचा उल्लेख केला आहे. त्यावरून या काळात कोल्हापुरात लक्ष्मीचे वास्तव्य होते. या कोल्हापुरच्या राजाने सोलंकी वंशातील मूलराजाचा मुलगा चामुंड यास भेटवस्तू पाठवल्याचा उल्लेख आहे.या चामुंड राजाचा काळ सु. इ.स.९९५ ते सु.इ.स.१००८[२७९] असा आहे.शिलाहारवंशीय राजा दुसरा जतिग (इ.स.१००० ते इ.स.१०२०) याचा हा काळ आहे. याने सिंदवंशीय आदित्यवर्म्याच्या वंशजाचा पराभव करून दक्षिण महाराष्ट्रात आपला अंमल बसवला असावा[२८०].शिलाहार राजा मारसिंह याच्या मिरज ताम्रपटात द्वितीय जतिगचा उल्लेख पन्नाळदुर्गादिसिंह असा आला आहे. त्यावरून जतिग याने आपल्या राज्यकाळात पन्हाळा काबीज केला होता.

ताम्रपट व शिलालेखातून आलेले उल्लेख :

महालक्ष्मीचा सर्वात प्रथम आलेला उल्लेख म्हणजे राष्ट्रकूट राजा अमोघवर्ष (प्रथम)याचा संजान ताम्रपट(इ.स.८७३) आहे. या ताम्रपटात जनतेला होणाऱ्या उपद्रवापासून जनतेचे संरक्षण करण्यासाठी अमोघवर्षाने आपली डावी करंगळी महालक्ष्मीस समर्पित केली. या लेखात जरी महालक्ष्मीचा उल्लेख असला तरी कोल्हापुर स्थानाचा उल्लेख नाहीअसे असले तरी भांडारकरांच्या मते ही महालक्ष्मी म्हणजे कोल्हापुरचीच महालक्ष्मी असावी या मताला सर्वच विद्वानांनी सहमती दर्शवलेली दिसते. परंतू मंदिराचे फक्त गाभारा व अंतराळ एवढेच घटक घेतले तरी स्थापत्यदृष्ट्या सांप्रतच्या मंदिराचा काळ तेव्हढा मागे नेता येत नाही

यानंतरचा अभिलेख म्हणजे गोव्याच्या कदंबकुलातील द्वितीय गुहल्ल याचा सावई-वेरे ताम्रपट[२८१] होय. या राजाने या लेखात त्याचा पिता षष्ठदेव कोल्हापुरास नित्य महालक्ष्मीच्या दर्शनास जात असे असे म्हटले आहे (गोकर्ण:कनकैर्मुहुर्भगवतिचार्या च येनार्चिताश्री कोल्लपुरमेत्य येन च

[२७९]मिराशी,१९७६ ,पृ.५३

[२८०]मिराशी,१९७६ ,पृ.४८-४९

[२८१]दीक्षित,१९४७ ,पृ.४६-४८

महालक्ष्मीः सदाराधिता).या ताम्रपटात महालक्ष्मी व कोल्हापुर या दोहोंचा उल्लेख आहे. इ.स.१०३८ च्या आधी याठकाणी देवालय अस्तित्वात होते हे लक्षात येते.

या काळातील शिलाहारांचा राजा गोंक याचे या भागावर आधिपत्य होते. गोंकाचा काळ इ.स. १०२० ते इ.स.१०५० असा आहे. याच्याकाळातील कर्नाटकाच्या बागलकोट जिल्ह्यातील शिरूर गावातील सिद्धेश्वर मंदिराच्या भिंतीवरील (इ.स. १०४९) शिलालेखात तर स्पष्टपणे कोल्हापुरातील या क्षेत्राचा शिवक्षेत्र म्हणून व तेथील महालक्ष्मीचा रूद्राची अर्धांगिनी असा स्पष्ट उल्लेख आहे. **त्यावरून शिलाहार राजा गोंक याच्याकाळी महालक्ष्मीचे मंदिर अस्तित्वात असावे असे अनुमान करण्यास काहीही हरकत नसावी.**

पुढे शिलाहार राजा मारसिंह याच्या लेखात त्याने स्वतःस महालक्ष्मीचा वरप्रसाद लाभल्याचे म्हटले आहे. यानंतरच्या जवळजवळ सगळ्याच शिलाहार राजांनी आपल्या लेखांत आपणांस महालक्ष्मीलब्धवरप्रसाद म्हणवून घेतले आहे.राष्ट्रकूट राजा अमोघवर्ष याच्या ताम्रपटात जरी कोल्हापुरचा उल्लेख नसलातरी कदंब राजा गुहल्लदेव याच्या ताम्रपटात महालक्ष्मी व कोल्हापुर यांचा स्पष्ट उल्लेख आहे.यानंतर इ.स.१०४९,इ.स.१०६३ व इ.स.१०६८ मधील कर्नाटकातील सिद्धेश्वर मंदिरावरील लेखांवरून तर स्पष्टच होते की या काळात कोल्हापुर येथे महालक्ष्मीचे मंदिर होते.

सध्या असलेल्या मंदिराचा विचार करता अशाप्रकारचे भव्य मंदिर इ.स. च्या ११व्या शतकाच्या मध्यात नसावे.मंदिराचा स्थापत्यदृष्ट्या विचार केला तर मंदिराचा गाभारा व अंतराळ हे दोन्ही मंदिराचे प्राचीन घटक आहेत. या काळात गाभारा व अंतराळ एव्हढेच मंदिराचे स्वरूप असावे.

इ.स.च्या ११व्या शतकाच्या मध्याचा आणखी एक पुरावा उपलब्ध झाला आहे.त्यावरून चालुक्य राजा सोमेश्वर व शिलाहार राजा मारसिंह यांच्या काळात इ.स. १०५०-इ.स.१०५२ या काळात चोलवंशीय राजा राजराजचोल व त्याचा भाऊ राजेंद्र चोल यांनी चालुक्यांवर आक्रमण केले. ती लढाई कोप्पम येथे झाली. .त्यावेळी चोलांनी कोल्हापुरातील महालक्ष्मी मंदिर जाळण्याचा प्रयत्न केला अशा आशयाचा एक वीरगळ कोल्हापुरात सापडला. या वीरगळात चोलबंधूंनी महालक्ष्मी मंदिर जाळण्याचा प्रयत्न केला असता मुथ्थय्या नामक फूलविक्रेत्याने मंदिर वाचविण्याचा शर्थीने प्रयत्न केला अशा

आशयाचा लेख आहे. यावरून मंदिराचा काही भाग लाकडी असावा . माझ्यामते आज आपणास जसा गणेशमंडपासमोर लाकडी गरुडमंडप दिसतो त्याप्रमाणे गाभारा व अंतराळ यासमोर लाकडी मंडप असावा व तो मंडप जाळण्याचा प्रयत्न चोलांनी केला असावा. त्यावेळी संपूर्ण मंदिर लाकडी नसावे.सध्या महालक्ष्मी मंदिरातील सभामंडप आहे त्याठिकाणी हा लाकडी मंडप असावा. ज्यावेळी हा लाकडी मंडप जाळण्यात आला त्यानंतर या ठिकाणी दगडी सभामंडप बनविण्यात आला असावा.

उत्तरकालीन चालुक्य वंशातील राजा विक्रमादित्य सहावा याचा विवाह शिलाहारवंशीय राजा मारसिंह याच्या कन्येबरोबर झाल्याचा उल्लेख बिल्हणाच्या **विक्रमांकदेवचरित** या ग्रंथात आला आहे. याच राज्याच्या काळातील एक शिलालेख साताऱ्याजवळील औंध येथिल संग्रहालयात आहे. या लेखावरून राजा विक्रमादित्याच्या हाताखालील अधिकारी सोमन्नेय कोल्हापुरावर प्रभुत्व गाजवीत असता तो,त्याची बायको लखुमादेवी, मुलगा भेडय्य व मुलगी भेडकेय्य या सर्वांनी कोल्हापुर येथील महालक्ष्मीच्या अंगभोगासाठी कपिल गावातील चार मत्तर जमीन मंदिरास दान दिली.

महालक्ष्मी मंदिराच्या या सभामंडपास निरखून बघितले असता या सभामंडपातून उत्तर,पूर्व व दक्षिणेकडून बाहेर निघण्यासाठी पायऱ्या असल्याचे अवशेष दिसून येतात. या सभामंडपाची रचनादेखील पूर्णत: स्वतंत्र मंडप बांधल्यासारखी दिसत नाही. चोलांच्या आक्रमणावेळी महालक्ष्मी मंदिराच्या भोवताली असलेल्या मंदिरांचीही नासधूस झालेली दिसून येते. हा मंडप बांधताना या इतरत्र असलेल्या मंदिराचे अवशेष या मंडपात वापरलेले दिसून येतात. या मंडपातील चार स्तंभ भव्य आहेत परंतू इतर स्तंभ मात्र एकसारखे नाहीत. या इतर नासधूस झालेल्या मंदिरातील हे स्तंभ असावेत. हा काळ इ.स.१०५२-५४ चा असावा. या काळात शिलाहार राजा मारसिंह(इ.स.१०५० ते इ.स.१०७५) याचे कोल्हापुरावर राज्य होते.

इ.स. ११-१२व्या शतकातील **सरस्वतीपुराण** या ग्रंथात वर्णन केल्याप्रमाणे गुजरातमध्ये अन्हिलवाड पाटण या ठिकाणी गुजरातचा राजा सिद्धराज सोलंकी याने सिद्धराज सरोवर निर्माण करून त्याच्या काठावर कोल्हापुरातील महालक्ष्मीपीठाप्रमाणे पीठाची स्थापना केली. या मंदिराचे अवशेष सध्या त्याठिकाणी अस्तित्वात नाहीत. त्यामुळे मंदिराची स्थापत्यदृष्ट्या बांधणी कशी होती याचा काहीच

अंदाज येत नाही. परंतु ग्रंथात वर्णन केल्याप्रमाणे येथेदेखील उत्तरेस महाकाली, पूर्वेस महालक्ष्मी, दक्षिणेस कोल्ला व पश्चिमेस कंकाली अशी मंदिराची रचना होती. हे पीठ कोल्हापुराप्रमाणेच पीठ आहे असे वर्णन आले आहे. हे देवालय चतुष्कूट देवालय असावे. म्हणजे या मंदिराच्या निर्माणाआधी कोल्हापुर येथे महाकाली मंदिर असावे.

इ.स. १२व्या शतकाच्या सुरवातीस (इ.स.१११३)कर्नाटकातील हासन तालुक्यातील दोड्डगड्डवळ्ळी येथे महालक्ष्मी मंदिराची निर्मिती झाली.या मंदिरावरील लेखात कोल्हापुरातील महालक्ष्मीप्रमाणे या ठिकाणी मंदिराची निर्मिती झाली. या लेखात या स्थानास अभिनव कोल्लापुर म्हटले आहे. या ठिकाणी महाकाली, महालक्ष्मी, विष्णू (सध्या भैरव) व भूतनाथ या देवतांचे वास्तव्य आहे. याठिकाणी उत्तरेस महाकाली , पूर्वेस पश्चिमाभिमुख महालक्ष्मी , उत्तराभिमुख विष्णू व पूर्वाभिमुख भूतनाथ आहेत. ही सर्व मंदिरे गाभारा व अंतराळ यांनी सभामंडपास जोडलेली आहेत. अशाच प्रकारची काहीशी स्थिती कोल्हापुरची आहे. या मंदिरातही दक्षिणाभिमुख महाकाली ,पश्चिमाभिमुख महालक्ष्मी व उत्तराभिमुख महासरस्वती आहे. सध्याच्या महालक्ष्मी मंदिरात असलेल्या गणेश मंडपावरून तो पूर्वी गाभारायुक्त असल्याची चिन्हे दिसून येत नाही. मात्र महालक्ष्मीशेजारी अंतराळ व गाभारायुक्त महाकाली व दक्षिणेसही अंतराळसदृश भाग व गाभारा असे स्वरूप दिसून येते. म्हणजे इ.स. १११३च्या सुमारास कोल्हापुरास महालक्ष्मीबरोबर महाकालीचे वास्तव्य असावे.या दोन्ही मंदिरांस महाकाली मंदिरात जाण्यास पूर्व व पश्चिमेकडून स्वतंत्र पायऱ्या आहेत.

महालक्ष्मी मंदिराच्या सभामंडपात उभे राहिले असता लक्षात येते की महाकाली व महासरस्वतीस जाण्याचा मार्ग एका समरेषेत नाही. महाकाली मंदिराचा तलविन्यास लक्षात घेता हे देऊळ महालक्ष्मी मंदिरास जरा तिरके जोडलेले दिसून येते. हा तिरकेपणा मंदिराच्या आतील भागांचे निरीक्षण करता स्पष्टपणे जाणवतो.कदाचित मंदिराच्या बाहेर पूर्वेकडे कदाचित आणखी एखादे लहान देऊळ असावे व त्या देवळामुळे हे मंदिर तिरके बांधावे लागले असावे.स्थापत्यदृष्ट्या ही दोन्ही मंदिरे काही प्रमाणात मिळतीजुळती आहेत. दोन्ही मंदिरांचे जंघाभागावरील घटक साधारण सारखे आहेत. महालक्ष्मी मंदिराच्या जंघाभागाची उंची गाठण्यासाठी महाकाली मंदिराच्या जगतीच्या थरांची उंची जास्त ठेवली आहे. दोन्ही मंदिरांवरील अलंकरण मात्र थोडे निराळे आहे. ही दोन्ही मंदिरे एकाच काळात वा

एकाच वेळी बांधली गेली नाहीत. परंतू जामखेडकर यांनी सांगितल्याप्रमाणे दोन्ही मंदिराच्या निर्माणाच्या काळात जास्त तफावतही नसावी. हे महाकाली मंदिर बांधताना महालक्ष्मी मंदिराच्या सभामंडपातील तीनही बाजूचे बाहेर जाण्याचे मार्ग काढून ही दोन मंदिरे जोडण्यात आली.

महालक्ष्मी मंदिर संकुलाचा अभ्यास केल्यानंतर हे लक्षात येते की

१)महालक्ष्मी मंदिराबद्दल निरनिराळ्या विद्वानांनी आपली मते व्यक्त केली. या विद्वानांच्या मताचा या प्रकरणात आपण विचार केला आहे.या सर्वांच्या मताचा आढावा घेऊन असे म्हणता येईल की महालक्ष्मी मंदिराचा सर्वात प्राचीन पौराणिक उल्लेख हेमचंद्राच्या **द्व्याश्रयकाव्य** (हेमचंद्र काळ इ.स.१०८८ ते इ.स.११७३) या ग्रंथात सापडतो. कोल्हापुरच्या राजाने सोलंकी वंशातील मूलराजाचा मुलगा चामुंड यास भेटवस्तू पाठवल्याचा उल्लेख आहे.या चामुंड राजाचा काळ सु. इ.स.९९५ ते सु.इ.स.१००८[२८२] असा आहे.शिलाहारवंशीय राजा दुसरा जतिग (इ.स.१००० ते इ.स.१०२०) याचा हा काळ आहे. या कोल्हापुरच्या राजास लक्ष्मी व गौरी यांचा वरदहस्त लाभला आहे असे त्यात म्हटले आहे.

२) ताम्रपटीय व आभिलेखिक पुराव्यात राष्ट्रकूट राजा अमोघवर्ष (प्रथम)याच्या काळातील ताम्रपटात(इ.स.८७१) जरी कोल्हापुरचा उल्लेख नसला तरी महालक्ष्मीचा उल्लेख आला आहे.परंतु इ.स.१०३८ च्या कदंब गुहल्लदेव याच्या सावईवेरे ताम्रपटात कदंब राजा षष्ठ (दुसरा) कोल्हापुरच्या महालक्ष्मी मंदिराला नेहेमी भेट देत असे असा उल्लेख आला आहे.त्यावरून इ.स.१०३८ च्या आधीही हे मंदिर अस्तित्वात होते. या काळातील शिलाहारांचा राजा गोंक याचे या भागावर आधिपत्य होते. गोंकाचा काळ इ.स. १०२० ते इ.स.१०५० असा आहे. याच्या काळातील कर्नाटकाच्या बागलकोट जिल्ह्यातील शिरूर गावातील सिद्धेश्वर मंदिराच्या भिंतीवरील (इ.स. १०४९) शिलालेखात तर स्पष्टपणे कोल्हापुरातील या क्षेत्राचा शिवक्षेत्र म्हणून व तेथील महालक्ष्मीचा रूद्राची अर्धांगिनी असा स्पष्ट उल्लेख आहे. त्यावरून शिलाहार राजा गोंक याच्या काळी महालक्ष्मीचे मंदिर अस्तित्वात असावे असे अनुमान करण्यास काहीही हरकत नसावी. इ.स.१०४९,इ.स.१०६३ व इ.स.१०६८ मधील कर्नाटकात असलेल्या लेखांत तर कोल्हापुरात हे मंदिर याचा ठोस पुरावा आहे. मंदिराचा स्थापत्यदृष्ट्या विचार केला तर

[२८२]मिराशी.१९७६ ,पृ.५३

मंदिराचा गाभारा व अंतराळ हे दोन्ही मंदिराचे प्राचीन घटक आहेत. या काळात गाभारा व अंतराळ एवढेच मंदिराचे स्वरूप असावे. मंदिराच्या स्थापत्यदृष्ट्या विचार केला तर मंदिराचा गाभारा व अंतराळ हे दोन्ही मंदिराचे प्राचीन घटक आहेत. या काळात गाभारा व अंतराळ एवढेच मंदिराचे स्वरूप असावे.

३)चालुक्य राजा सोमेश्वर व शिलाहार राजा मारसिंह यांच्या काळात इ.स. १०५०-इ.स.१०५२ या काळात चोलवंशीय राजा राजराजचोल व त्याचा भाऊ राजेंद्र चोल यांनी चालुक्यांवर आक्रमण केले. ती लढाई कोप्पम येथे झाली. .त्यावेळी चोलांनी कोल्हापुरातील महालक्ष्मी मंदिर जाळण्याचा प्रयत्न केला अशा आशयाचा एक वीरगळ कोल्हापुरात सापडला. या वीरगळात चोलबंधूंनी महालक्ष्मी मंदिर जाळण्याचा प्रयत्न केला असे म्हटले आहे. माझ्यामते आज आपणास जसा गणेशमंडपासमोर लाकडी गरुडमंडप दिसतो त्याप्रमाणे गाभारा व अंतराळ यासमोर लाकडी मंडप असावा व तो मंडप जाळण्याचा प्रयत्न चोलांनी केला असावा. त्यावेळी संपूर्ण मंदिर लाकडी नसावे.सध्या महालक्ष्मी मंदिरातील सभामंडप आहे त्याठिकाणी हा लाकडी मंडप असावा. ज्यावेळी हा लाकडी मंडप जाळण्यात आला त्यानंतर या ठिकाणी दगडी सभामंडप बनविण्यात आला असावा. शिलाहार राजा भोज (इ.स.११७५-इ.स.१२१२)याने महालक्ष्मी मंदिराच्या त्रिकाल नैवेद्यासाठी दान दिल्याचा उल्लेख आहे.त्यामुळे त्याने या मंदिराकडे लक्ष देऊन मंदिराच्या विस्तारास त्यानेच मदत केली असावी.त्यावेळी गणेश मंडप अस्तित्वात नव्हता व ज्यावेळी महाकाली मंदिराची निर्मिती झाली त्यावेळी सभामंडप जो पूर्वी अर्धमंडप होता त्यासबाहेरून देवकोष्ठ असलेली भिंत बनवली असावी.या सभा मंडपाचे जवळून निरीक्षण करता सभा मंडपाच्या तिन्हीबाजूस(महाकालीकडे जाताना,महासरस्वतीकडे जाताना व गणेश मंदिताकडे जाताना)भिंतीस लागून पायऱ्या असल्याचा पुरावा दिसतो.

४)यादव वंशाच्या सिंघण द्वितीय(इ.स.१२०० ते इ.स.१२४७)ने महाकालीचे मंदिर बांधले असावे. हे मंदिर बांधताना सभामंडपाच्या खुल्या अर्ध मंडपाला बाहेरून सुरसुंदरींची देवकोष्ठ असणारी भिंत बसवून त्या मंडपास बंदिस्त केले.महाकाली मंदिराचा आभिलेखिक सर्वात पहिला पुरावा म्हणजेइ.स.१२३५चा यादव राजा सिंघणाचा लेख आहे.यानंतर यादव कान्हरदेव इ.स. १२५२च्या लेखात महालक्ष्मीबरोबर महाकालीचाही उल्लेख आला आहे.त्यानंतर गणेश मंदिराची जोड देण्यात

आली असावी. हा गणेश मंडप रामचंद्र यादव याच्याकाळात बांधण्यात आला असावा(रामचंद्र यादव काळ इ.स. १२७१ ते इ.स.१३१२).

५)आजचे महासरस्वती मंदिर मूळ मंदिराच्या तुलनेने निकृष्ट दर्ज्याची बांधणी असलेले देवालय आहे. मंदिराच्या बाहेरील भिंती या ओबडधोबड चिऱ्यांनी बांधल्या आहेत. या मंदिराला स्वत:चा असा अंतराळ नाही. दोन बाजूंनी स्तंभांच्या रांगा असलेली अरुंद जागा म्हणजे अंतराळ. सांधार असलेला गाभारादेखील अगदी लहान आहे. या ठिकाणी महालक्ष्मी वा महाकाली मंदिरासारखे पूर्वी मोठे देवालय असावे असे म्हणण्यासारखे स्थापत्याचे अंशही दिसून येत नाही. पण सध्या असलेल्या मंदिरावरून या ठिकाणी असे एखादे मोठे मंदिर नव्हतेच असे ही ठामपणे म्हणता येणार नाही.

महालक्ष्मी मंदिराप्रमाणे इतर राज्यातील मंदिरे

इ.स. च्या दहाव्या व अकराव्या शतकात कोल्हापुरच्या महालक्ष्मीची ख्याती महाराष्ट्राबाहेरही पसरल्याचे दिसून येते .

इ.स.१०४९,इ.स.१०६३ व इ.स.१०६८ या काळातील कर्नाटक राज्यातील बागलकोट तालुक्यातील शिरूर या गावी सिद्धेश्वर मंदिराच्या भिंतीवरील लेखात कोल्हापुरच्या महालक्ष्मीचे क्षेत्रवर्णन केलेले आढळते. या क्षेत्राप्रमाणे आपल्या राज्यातही असे क्षेत्र असावे या इच्छेने आजच्या कर्नाटक व गुजरात राज्यांच्या क्षेत्रात कोल्हापुरच्या महालक्ष्मी पीठाप्रमाणेच पीठांची निर्मिती या राज्यांत झालेली दिसून येते.

दोड्डगड्डवळ्ळी येथील लक्ष्मीदेवी मंदिर

कर्नाटक राज्यातील हासन जिल्ह्यात दोड्डगड्डवळ्ळी येथे महालक्ष्मीचे मंदिर आहे. हे मंदिर इ.स. १२व्या शतकाच्या सुरवातीस बांधलेले आहे . या मंदिराच्या निर्मितीचा काळ सांगणारा लेख मंदिराच्या बाह्य भिंतीतच बसवलेला आहे[२८३]. या लेखानुसार दोरसमुद्र येथे होयसळ राजा विष्णुवर्धन राज्य करीत असता तेथील अत्यंत श्रेष्ठ व्यापारी कुल्हण राहुत व त्याची पत्नी सहजादेवी यांनी या ठिकाणी महालक्ष्मीची स्थापना करून अभिनव कोल्लापुर या क्षेत्राची निर्मिती केली(कुल्हण-राहुतरुम् अर्धांग-शरीरियर अप्प सहजादेवीयरुम् श्रीमतु अभिनव-कोल्लापुरवम् गेयसि श्रीमन् महालक्ष्मी-देवियप्रासादवम् गेयद). या लेखाचा काळ चैत्र शुद्ध १०,बृहस्पतिवार ,विजय संवत्सर म्हणजे १३ मार्च इ.स. १११३ असा आहे. हे मंदिर बेलूरच्या चन्नकेशव मंदिराच्या चार वर्षे अगोदर बांधले आहे. नरसिंहाचार यांच्यामते हे चतुष्कूट बांधणीचे देवालय पूर्ण कर्नाटकात एकमेव आहे.

हे देवालय स्थापत्यदृष्या चतुष्कूट देवालय आहे. या प्राकारयुक्त देवालयास पंचायतन देवालय देखील म्हणता येईल.कारण या देवालय संकुलाच्या प्राकारात चार कोपऱ्यात चार शिखरयुक्त गर्भगृहे आहेत. मुख्य देवालय संकुलाच्या उत्तरेस एक स्वतंत्र मंडप व गाभारा असलेले भैरवाचे

[२८३] नरसिंहाचार,१९१९

शिखरयुक्त मंदिर आहे. या देवालयाचे प्रयोजन कशासाठी आहे हे सांगता येत नाही. मुख्य देवालय संकुलातील चार गर्भगृहे, प्राकारातील चार कोपऱ्यातील चार गर्भगृहे व भैरवाचे देवालय या सर्वांवर एकूण नऊ फांसनाकार शिखरे आहेत.

या प्राकारयुक्त देवालय संकुलात प्रवेश करण्यास पूर्व व पश्चिमेकडून दोन प्रवेशमार्ग आहेत. पश्चिमेकडील प्रवेशमार्ग मुख्य प्रवेशमार्ग असून तो मंडपयुक्त आहे. हा मंडप १६ खांबांनी युक्त असून या मंडपाच्या छतावर आठ दिशांना अष्टदिक्पाल व मध्यभागी तांडकेश्वर शिव कोरलेला आहे.

देवालय संकुलाच्या मुख्य गाभाऱ्यात पश्चिमाभिमुख महालक्ष्मी असून उत्तरेस महाकाली, दक्षिणेस भैरव(पूर्वीचे विष्णुस्थान) व पश्चिमेस भूतनाथ(लिंगरूपात)आहे. सर्व गाभाऱ्यांना अंतराळ असून ही सर्व अंतराळे सभामंडपास जोडलेली आहेत.

महालक्ष्मी गाभाऱ्याच्या ललाटबिंबावर तांडकेश्वर शिव आहे. गाभाऱ्यातील मूर्ति कोल्हापूरच्या महालक्ष्मीच्या मूर्तीपेक्षा भिन्न आहे. येथील मूर्ती ही लक्ष्मीचे एक रूप आहे. कोल्हापुरच्या मूर्तीच्या हातात दक्षिणाधःकरक्रमाने महाळुंग.गदा,ढाल व पानपात्र आहे; तर येथील मूर्तीच्या हातात दक्षिणाधःकरक्रमाने अभयमुद्रा व अंगठ्याभोवती अक्षमाला, शंख, चक्र व गदा आहे.

मंदिराच्या उत्तरेकडील गाभाऱ्यात कोल्हापुर प्रमाणेच महाकालीचे वास्तव्य आहे. गर्भगृहाच्या अंतराळाच्या छतावर वीणावादन करीत नृत्यात मग्न पुरुषाकृती कोरलेल्या आहेत. महालक्ष्मी मंदिराच्या अंतराळात प्रवेश करण्यास कोल्हापुर मंदिराप्रमाणेच पूर्व व पश्चिमेकडून पायऱ्या आहेत.

गाभाऱ्याच्या दर्शनी भिंतींवर दोन्ही बाजूस दोन अक्राळविक्राळ सहा फूट उंचीचे दोन कंकाल आहेत.नरसिंहाचार यांनी त्यांना वेताल हे नामाभिधान दिले आहे. उजवीकडील कंकालाचे दोन्ही हात तुटलेले आहेत. डावीकडील कंकालाच्या उजव्या हातात तलवार व डाव्या हातात छाटलेले मुंडके व कवटी आहे. हे दोन्ही कंकाल नग्न असून त्यांनी लांब जीभ बाहेर काढलेली आहे. त्यांचे शरीर सापळ्यासारखे आहे.

कोल्हापुरच्या महालक्ष्मी मंदिरात महालक्ष्मी गाभाऱ्याच्या सभामंडपाच्या भिंतीवर दोन्ही भिंतीवर जय विजय यांच्या मूर्ति आहेत येथे मात्र महाकालीसमोर दोन कंकाल आहेत.

गर्भगृहातील महाकाली ज्या पीठावर विराजमान आहे त्या पीठाच्या दर्शनी भागावर मध्यात एक कंकाल समोर कुंभ ठेवून उकिडवा बसला आहे. महाकालीची मूर्ती तीन फूट उंचीची असून अष्टभुजा आहे. तिने डाव्या पायाची मांडी घालून उजवा पाय दैत्यावर दाबलेला आहे. महाकालीच्या हातात दक्षिणाध:करक्रमाने त्रिशूळ,खड्ग,बाण,परशू, डमरू, पाश,धनुष्य व पात्र ही लांछने आहेत.कोल्हापुरच्या महाकाली मंदिरातील मूर्ती १८व्या शतकातील आहे.

गाभाऱ्याच्या ललाटबिंबावर दात पुढे असलेले मस्तक असून त्याच्या दोन्ही बाजूस तीन तीन प्रेते आहेत.

दक्षिणेकडील गर्भगृहाच्या ललाटबिंबावर योगनरसिंहाची मूर्ति आहे. या गाभाऱ्यात आज जरी भैरवाची स्थापना केली असली तरी मुळात हा गाभारा विष्णूचा असावा. कारण या गाभाऱ्यातील पादपीठावर गरुडाचे चिन्ह अंकित आहे.

पश्चिमेकडील गाभाऱ्यात भूतनाथ शिवलिंग स्वरूपात आहे.

महालक्ष्मी, भूतनाथ व भैरव या देवतांच्या गर्भगृह व अंतराळातील छतांवर कमलाकृती कोरलेल्या आहेत. या तीनही गर्भगृहांना जोडणारा सभामंडप १० स्तंभ व ८ अर्ध स्तंभांवर आधारित आहे. हा मंडप महाकाली तसेच इतर तीन गर्भगृहाच्या अंतराळास जोडला आहे. या मंडपातून चारही गर्भगृहाच्या अंतराळास जाण्यास मार्ग आहे. या मंडपाच्या छताच्या मध्यावर तांडकेश्वर शिव व भोवताली अष्टदिक्पाल कोरलेले आहेत.

या मंदिराच्या बाह्यांगावर कोल्हापुरच्या महालक्ष्मीमंदिराप्रमाणे कलाकुसर नाही व तसेच भव्यताही नाही. मंदिराच्या बाह्य भिंतीवर महालक्ष्मीच्या दानासंबंधीचे लेख बसविलेले आहेत. या लेखात देवीस महालक्ष्मी असेच संबोधिले आहे.

कोल्हापुर येथील महालक्ष्मी मंदिर व दोड्डगड्डवळ्ळी येथील महालक्ष्मी मंदिरातील साम्य :

१)ही दोन्ही देवालये पश्चिमाभिमुख आहेत.

२) दोन्ही देवालयांच्या उत्तरेस महाकालीचा गाभारा आहे.

३)दोन्ही देवालयात महाकालीच्या अंतराळात शिरण्यासाठी पूर्व व पश्चिमेकडून पायऱ्या आहेत.

कोल्हापुर येथील महालक्ष्मी मंदिर व दोड्डगड्डवळ्ळी येथील महालक्ष्मी मंदिरातील भेद :

१)कोल्हापुरातील महालक्ष्माचे आजचे मंदिर त्रिकूट देवालय आहे तर दोड्डगड्डवळ्ळी येथील देवालय चतुष्कूट वा पंचायतन देवालय आहे.

२) कोल्हापुर येथील देवालयात दक्षिणेस सरस्वतीचा गाभारा आहे तर दोड्डगड्डवळ्ळी येथे दक्षिणेस विष्णु होता (आज भैरवाची मूर्ती आहे).

३)स्थापत्यदृष्ट्या बाह्य अलंकरणात दोन्ही देवालय भिन्न आहेत.

अन्हिलवाड पाटण येथील देवालय :

गुजरातमध्ये अन्हिलवाड पाटण या ठिकाणी गुजरातचा राजा सिद्धराज सोलंकी याने सिद्धराज सरोवर निर्माण करून त्याच्या काठावर कोल्हापुरातील महालक्ष्मीपीठाप्रमाणे पीठाची स्थापना केल्याचा उल्लेख **सरस्वतीपुराण** या ग्रंथात आलेला आहे. आजच्या काळात कुठल्याही मंदिराचे अवशेष त्याठिकाणी अस्तित्वात नाही.

सरस्वती पुराण हे इ.स.१२व्या शतकाच्या सुरवातीस लिहिल्या गेले(ढेरे,२००१,पृ.२९४). **सरस्वती पुराण** या ग्रंथाच्या ३४व्या अध्यायात देवीतीर्थ माहात्म्याचे वर्णन आले आहे.

पीठं कोलापुरं नाम देवीनां प्रीतिवर्धनम् ।

महालक्ष्मीसनाथस्तु भैरवस्तत्र नायकः।।२४१।।

यस्य पूर्वे महालक्ष्मीः स्थिता कोल्लाच दक्षिणे ।

कंकाली पश्चिमे देवी महाकाली तथोत्तरे ।।२४२।।

देवींची प्रीती वाढविणारे कोल्हापुर नावाचे एक पीठ आहे. या तीर्थाचा अधिष्ठाता भैरव आहे. तो येथे महालक्ष्मीसह निवास करतो. याच्या पूर्वेस महालक्ष्मी, दक्षिणेस कोल्ला , पश्चिमेस कंकाली व उत्तरेला महाकाली आहे.

अशी ही महालक्ष्मी सिद्धसरोवरावर आपल्या पीठासह आहे. तेथे सिद्धराजाने सर्व तऱ्हेचे पूजन,अर्चन व बलिप्रदान केले. त्यामुळे प्रसन्न झालेली कोल्ला व इतर देवी यांनी येथे निवास केला आहे. साधकांना सिद्धी देणारे हे कोल्हापुर महापीठ कपालेश्वराच्या दक्षिणेस आहे. या पीठात सिद्धराजाने प्रसन्न करून घेतलेल्या देवी प्रसन्न भैरवासह क्रीडा करीत असतात. कोणत्याही अष्टमी किंवा चतुर्थीला जो येथे देवींना बळी देतो तो या देवीच्या प्रसादाने सर्वार्थसिद्धी पावतो. जो या देवीच्या महापीठाचे दर्शन करतो त्याला भूतप्रेत पिशाचाचे भय रहात नाही. जो साधक विधिपूर्वक या देवीची आराधना करतो तो सिद्धी प्राप्त करतो[२८४] . आज हे देवालयच अस्तित्वात नसल्यामुळे स्थापत्यदृष्ट्या ते कशा प्रकारचे होते किंवा मंदिरातील मूर्ती कशा प्रकारच्या व कोणती आयुधे धारण केलेल्या होत्या याची कल्पना येत नाही.

कोल्हापुर येथील महालक्ष्मी मंदिर व अन्हिलवाड पाटण येथील मंदिर यातील साम्य :

१)दोन्ही पीठांत पूर्वेस पश्चिमाभिमुख महालक्ष्मी विराजमान आहेत.

[२८४]अहिरराव,२००२,पृ.१७५

२)दोन्ही पीठांत उत्तरेस महाकाली आहे.

कोल्हापुर येथील महालक्ष्मी मंदिर व अन्हिलवाड पाटण येथील मंदिर यातील भेद :

१)कोल्हापुरातील देवालय त्रिकूट देवालय आहे तर अन्हिलवाड पाटण येथील देवालय वर्णनावरून चतुष्कूट स्वरूपाचे असावे.

२)कोल्हापुर येथील महालक्ष्मी मंदिरात दक्षिणेस महासरस्वती आहे तर अन्हिलवाड पाटण यातील पीठात दक्षिणेस कोल्लादेवी आहे.

दोड्डगड्डवळ्ळी येथील महालक्ष्मी मंदिर व अन्हिलवाड पाटण येथील मंदिर यातील साम्य :

१)दोन्ही देवालये चतुष्कूट स्वरूपाची आहेत.

२)दोन्ही देवालयांत पूर्वेस महालक्ष्मी व उत्तरेस महाकाली आहे.

दोड्डगड्डवळ्ळी येथील महालक्ष्मी मंदिर व अन्हिलवाड पाटण येथील मंदिर यातील भेद :

१)दोड्डगड्डवळ्ळी येथील पीठात दक्षिणेस विष्णु (सांप्रत भैरव)आहे तर अन्हिलवाड पाटण येथे कोल्ला देवीचे स्थान आहे.

२)दोड्डगड्डवळ्ळी येथील पीठात पश्चिमेस भूतनाथ शिवलिंग स्वरूपात आहे तर अन्हिलवाड पाटण येथे पश्चिमेस कंकालीचे स्थान आहे.

या तीनही मंदिरांचा अभ्यास करताना हे लक्षात येते की

या महालक्ष्मी मंदिराप्रमाणेच कर्नाटकातील हासन जिल्ह्यात दोड्डगड्डवळ्ळी येथे कोल्हापुराप्रमाणे पीठाची निर्मिती झाली. याठिकाणी पश्चिमाभिमुख महालक्ष्मी,उत्तरेस महाकाली ,दक्षिणेस भैरव(पूर्वीचे विष्णूचे स्थान) व पश्चिमेस भूतनाथ आहे. **सरस्वतीपुराण** या ग्रंथात गुजरातमधील अन्हिलवाडपाटण याठिकाणी गुजरातचा राजा सिद्धराज सोलंकी याने सिद्धराज सरोवर

निर्माण करून त्याच्या काठावर कोल्हापुरातील महालक्ष्मीपीठाप्रमाणे पीठाची स्थापना केली. दोड्डगड्डवळ्ळी, अन्हिलवाड पाटण व कोल्हापुर या तीनही मंदिरांची तुलना करता हे स्पट दिसून येते की दोड्डगड्डवळ्ळी व अन्हिलवाड पाटण येथील देवालये चतुष्कूट स्वरूपाची आहेत तर कोल्हापुर येथील महालक्ष्मी मंदिराच्या मुखमंडपात जरी गणेशाची स्थापना केलेली असली तरी स्थापत्यदृष्ट्या पूर्वी तेथे गाभारा असल्याची चिन्हे आज तरी असलेल्या परिस्थितीत दिसून येत नाही.या तीनही मंदिरांत पूर्वेस महालक्ष्मी व उत्तरेस महाकाली विराजमान असलेल्या दिसून येतात. दोड्डगड्डवळ्ळी व कोल्हापुर येथील महाकाली मंदिराच्या अंतराळातून बाहेर जाण्यासपूर्व व पश्चिमेस पायऱ्या आहेत.

प्रकरण ६

श्रीमहालक्ष्मीचे नित्य कार्यक्रम व उत्सव

महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठातील एक प्रमुख शक्तिपीठ म्हणून कोल्हापुरच्या महालक्ष्मीची ख्याती आहे. महाराष्ट्राप्रमाणे भारतातील इतर राज्यांतून अनेक भाविक महालक्ष्मीच्या दर्शनास येतात. महालक्ष्मी हे कित्येक घराण्यांची कुलस्वामिनी आहे.

कोल्हापुरची महालक्ष्मी हे जागृत दैवत आहे अशी भाविकांची श्रध्दा आहे. या देवीला नवस बोलणे, कौल लावणे वगैरे प्रकार नाहीत. कोणी भक्त नवस करीत असेल तर तो फक्त भक्ताला व देवीलाच माहित असतो. नवसाप्रमाणे फलप्राप्ती होताच कोल्हापुरास येऊन तो आपल्या ऐपतीप्रमाणे नवस फेडीत असतो .

बऱ्याच भक्तांची ही कुलस्वामिनी असल्यामुळे लग्न, बाळाचा जन्म या प्रसंगी भक्त मंडळी देवीच्या दर्शनास येतात. या देवीस खणानारळाने व साडीचोळीने ओटी भरायची पद्धत आहे. देवीस अलंकार साडी चोळीप्रमाणे काचेचे,चांदीचे, सोन्याचे वा हिऱ्याचे डोळे दान करण्याची देखील परंपरा आहे. आपण अर्पण केलेल्या डोळ्यांनी देवीने जगाकडे पहावे ही त्यामागील भावना असावी. साखर फुटाणे,कुरमुरे,तांदुळ, पेढे असे अनेकविध नैवद्य भक्त घेऊन येतात.

महालक्ष्मीला सुवासिक फुले, बेल,तुळस वाहतात. कमळाची वेणी देवीस प्रिय आहे. वर्षातून फक्त एक दिवस देवीला दुर्वा सुद्धा वाहतात. तो दिवस म्हणजे श्रावण महिन्यातील पौर्णिमेपूर्वीचा शुक्रवार किंवा पौर्णिमा शुक्रवारी असेल तर त्या दिवशी.

१) नित्य पूजा

महालक्ष्मीची नित्य पूजा काकड-आरती, साडे आठची सकाळची आरती (षोडषोपचार अभिषेकाची पूजा), साडे अकराची आरती व महानैवद्य , अलंकारपूजा, रात्री आठची आरती व

शेजारती अशा भरगच्च कार्यक्रमाने होते.यात पुजाऱ्यांप्रमाणे भक्तदेखील मोठया संख्येने उपस्थित असतात व सर्वजण तन्मयतेने देवीची आराधना करतात.

अ) काकड आरती

श्रीमहालक्ष्मीचा नित्य क्रम पहाटे साडे चार वाजता घंटानादाने सुरु होतो. घंटानाद सुरु होताच देवीचे पुजारी मंदिराच्या दरवाज्यापाशी येताच चौकीदार दरवाजा उघडतो. पुजारी मुख्य गाभाऱ्याचा दरवाजा उघडतात. देवीवरील निर्माल्य उतरवून देवीच्या पायांवर आणि चांदीच्या पादुकांवर पाणी घातल्या जाते. नंतर दूध घालतात. पादुकांवरचं दूध भक्तांसाठी तीर्थ म्हणून ठेवले जाते. शंखोदक घालून वस्त्राने पादुका पुसतात आणि पंचोपचारे पादुकांची पूजा करतात. यावेळी अंतराळ, सभामंडप, गणेश मंडप यांत भक्तजन देवीची भूपाळी म्हणत असतात.

देवीला साखर, केळीचा नैवेद्य दाखवून काकडआरती पेटविली जाते. काकडआरती घेऊन घाट वाजवीत आरती महाकालीकडे जाते. महाकालीला गंध, हळद- कुंकू, फुलं, अक्षता घालून देवीची पूजा केली जाते. साखरेचा नैवेद्य दाखवून काकडआरती ओवाळतात. याच प्रकारची पूजा मातुलिंग, श्रीचक्र, महासरस्वती व गणपतीची केली जाते. तेथून पुजारी गाभाऱ्यात परततात. महालक्ष्मीस कापूर आरतीने ओवाळतात.

ब) साडे आठची आरती (अभिषेक व षोडषोपचार पूजा)

महालक्ष्मीच्या नित्य पूजेमध्ये षोडषोपचार पूजेला फार महत्व आहे. ही पूजा सोळा उपचारांनी – आवाहन ,आसन ,पादयपूजन , अर्घ्य, आचमन, स्नान, वस्त्र, यज्ञोपवीत, गंध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य,नमस्कार, प्रदक्षिणा, मंत्रपुष्प अशा तऱ्हेने केली जाते.

दुसरी पूजा पंचोपचार पूजा. यात स्नान, गंध, धूप, दीप व नैवद्य हे प्रकार मोडतात. श्रीमहालक्ष्मी अष्टकाच्या आठ श्लोकाअखेर अकरा आवर्तने म्हणतात. ही आवर्तने म्हणून पुढील फलश्रुतीचे श्लोक म्हणण्याची परंपरा आहे. यानंतर श्रीसूक्त म्हणण्याची प्रथा आहे. अभिषेकाच्या वेळी श्रीसूक्ताची तीन

किंवा अकरा अवर्तने म्हणतात. पहिल्या तीन मंत्राअखेर आवर्तने म्हणतात. आवर्तने पूर्ण झाल्यानंतर पद्मासने पद्मऊरु पद्माक्षि.... पासून फलश्रुतीचा चौथा मंत्र म्हणण्याचा प्रघात आहे. महालक्ष्मीला **श्रीसूक्त,रुद्र,** किंवा **पवमान** म्हणून अभिषेक करतात[२८५].

सकाळी साडेआठ वाजता पुन: घंटानाद होतो व महालक्ष्मीच्या पूजेस प्रारंभ होतो. पूर्वी पंचामृत स्नान ,दुग्धाभिषेक मूर्तीवर होत असे. परंतु तिला केलेला लेप निखळून जायला लागल्यामुळे आता सर्व अभिषेक उत्सवमूर्तीवर केल्या जातात. नित्य अभिषेकात वापरल्या जाणाऱ्या द्रव्यांमुळे मूर्तीची होणारी झीज पाहून श्रीपूजक व माननीय जिल्हाधिकारी यांच्या दि. २६-८-१९८७ च्या आदेशानुसार सध्या मूळ मूर्तीवर होणारे अभिषेक बंद आहेत. महालक्ष्मीच्या मूर्तीस पाण्याने धुवून कपड्याने पुसून वस्त्रे घातली जातात. भक्तांचे अभिषेक उत्सव मूर्तीवर केले जातात. ही उत्सव मूर्ती [२८६]पंचधातूंची सिंहाच्या पाठीवर डमरुसारख्या आकाराच्या आसनावर बसलेली मूर्ती आहे. महालक्ष्मीच्या मूर्तीप्रमाणेच हातात महाळुंग,गदा, ढाल व पानपात्र आहे. मूर्तीच्या मस्तकावर शिवलिंग आहे. मूर्तीच्या मस्तकामागे नागाचा फणा आहे.मूर्तीखालील सिंह उग्र स्वरूपाचा आहे.

देवस्यत्वा सवितु: म्हणून पुजारी देवीला (उत्सवमूर्तीला) महाभिषेकाचे स्नान घालतात. व नंतर **तदस्तु मित्रावरुणा** मंत्र म्हणून शंखातून देवीला ओल्या कपड्याने पुसून काढतात.मूर्तीच्या मस्तकावरील लिंग-योनीला गंध लावून बेलाचे पान वाहतात. व किरीट घालतात. देवीस हळद-कुंकू, गंध, फुलं, अक्षता वाहतात.

व्यवस्थापनाकडून खिरीचा नैवेद्य, धूपारती व पंचारतीसह येतो. देवीस पंचारती करून महाकाली, मातुलिंग, श्रीयंत्र, सरस्वती व गणपती यांना आरती केली जाते. भक्तांना शंखतीर्थ प्रसाद मिळावे म्हणून ठिकठिकाणी थांबून शंखाने तीर्थ शिंपडतात.

[२८५] चौधरी,१९८८

[२८६] राणिंगा .(अप्रकाशित लेख)

क) साडेअकराची आरती व महानैवेद्य

साडे अकरा वाजता घंटा निनादते. पुजारी देवीची पाद्यपूजा करतात.व्यवस्थापनाकडून पंचारती व नेवैद्याची बुट्टी येते. यात पुरणपोळीचा नैवेद्य असतो. आरती धूपारती करून देवीस नैवेद्य दाखवला जातो.मशालीसह प्रदक्षिणा घालून महाकाली, मातुलिंग, श्रीयंत्र, महासरस्वतीस हा नैवेद्य दाखवला जातो. भक्तांवर शंखतीर्थ शिंपडल्या जाते.

ड) अलंकारपूजा

यावेळी महालक्ष्मीस वस्त्र नेसवून अलंकार घातल्या जातात. ह्या स्वरूपातील पूजा बघण्यासारखी असते. पुजारी खजिनदाराकडून दागिने घेतात.यास जाप्ता असे म्हणतात. महालक्ष्मी, महाकाली व महासरस्वतीस वस्त्र नेसवून दागिने घालतात.यास पूजा बांधणे असे म्हणतात. महालक्ष्मीच्या दागिन्यात सोळापदरी सोन्याचा चंद्रहार, बोरमाळ, मोहरांची माळ, ठुशी, नथ, नेत्र, कुंडल, महाळुंग वगैरे सोन्याचे दागिने घालतात. महालक्ष्मीचा मळवट गंधाने भरतात. हे तिचे सुंदर रूप बघून भक्तांच्या तोंडून सहजच 'सर्व मंगलमांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके शरण्येत्र्यंबके गौरि नारायणि नमोऽस्तुते' असे उद्गार सहजच निघतात. एव्हढे अलंकार घालूनही देवीस कवड्यांची माळ घातल्या जाते.

इ) रात्री आठची आरती

घंटेचा स्वर कानी पडताच भक्तगणांची रीघ देवळाकडे लागते. व्यवस्थापनाकडून पंचारती, धूप व फराळाचं ताट येतं. महालक्ष्मीची आरती करून महाकाली, मातुलिंग, श्रीयंत्र, गणपती, सरस्वती व गणपतीकडे आरती फिरुन गाभाऱ्यात येते.शंखात पाणी घेऊन तीनदा देवीवरून ओवाळून भक्तांवर शंखतीर्थ शिंपडल्या जाते. देवीवरील महावस्त्र व दागिने उतरवून जमादारखान्यात परत दिल्या जातात.दागिने घेताना व देताना सविस्तर हिशोब व सहीने हे काम होते. देवीच्या अंगावर उत्तरीय वस्त्र (तीन वाराचे) घातले जाते.

फ) शेजारती

साधारण रात्री साडेदहा वाजता शेजारतीस प्रारंभ होतो. भक्त विडा म्हणत असतात. पुजारी देवीस आरती करून शेजघराला आरती ओवाळतात. आरती भक्तांच्यामधून गणपतीकडे जाते. नंतर गाभाऱ्यात आल्यावर नैवेद्याचं दूध तीर्थप्रसाद म्हणून वाटण्यात येतं. शेजघरात तांबुल व पान ठेऊन शेजघराचा दरवाजा लावून घेतात.देवी रात्री शेजघरात झोपायास जाते असा भाविकांचा समज आहे. पुजारी मोठा दरवाजा बंद करतात. सभामंडपातील दरवाजा चौकीदार बंद करताल. भक्तांना दर्शन घेण्यास पुन: दुसऱ्या दिवसाची वाट बघावी लागते.

२) देवीचे उत्सव

महालक्ष्मीच्या नित्य पूजेप्रमाणे देवीचे उत्सव ही फार मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात.या उत्सवात भारतातील विविध भागातून श्रध्दाळू देवीचे रूप आपल्या मनात साठवून घेण्यास उत्सुक असतात.

क) शुक्रवार

देवीचे मंगळवार व शुक्रवार हे दिवस. करवीरनिवासिनी महालक्ष्मीचा वार शुक्रवार .प्रत्येक शुक्रवारी रात्री आठच्या आरतीनंतर महालक्ष्मीची पालखी मंदिर प्रदक्षिणेस निघते. पालखी सभामंडपात सजविल्या जाते. पूर्वीच्या लाकडी पालखीस आता चांदीचा पत्रा चढविला आहे. देवीचे भालदार, चोपदार, चवरीवाले, मशालजी यांच्यासह पालखीची **अनंतकोटि ब्रह्मांडनायक राजराजेश्वरी नवकोट कात्यायनी भक्तवत्सल भक्ताभिमानी श्रीकरवीरनिवासिनी महालक्ष्मी** या गजराने सुरवात होते. पालखी गणेश मंडपाकडून उत्तर दरवाज्याच्या पायऱ्यांवरून दत्त मंदिरासमोर थांबते. पालखीपुढे वाजंत्री व बँड असतो. पालखीपुढे लोक कापुर लावतात. पालखी घाटी दरवाज्यातून अगस्ति, लोपमुद्रा व ज्योतिबा यांना भेटून शेषशायी मंदिराजवळ व तेथून शनीसमोर व शेवटी पालखी गरुड मंडपाच्या दक्षिणद्वाराजवळ थांबून गरुड मंडपाला वळसा घालून मंडपाचे उत्तर दरवाज्यातून मंडपात येते. शुक्रवार देवीचा उपवासाचा दिवस

असल्यामुळे या दिवशी सकाळी साबुदाण्याच्या खिरीचा नैवेद्य दाखवला जातो. दुपारी उपवासाच्या पदार्थांचा नैवेद्य असतो. शुक्रवारी रात्री पुरणपोळीचा महानैवेद्य दाखवला जातो.

संस्थानी कारकीर्दीत पालखीपुढे हत्ती, घोडे, उंट वगैरे लवाजमा असे. प्रत्येक थांब्यावर नृत्यांगनांचे नृत्य व गायन होत असे. पालखीवाहक सनदी नोकर असत. परंतु आता हे इतिहास जमा झाले आहे. आता भक्तमंडळीच स्वेच्छेने पालखी वाहण्याचे काम करतात.

ख) रथोत्सव

महालक्ष्मीचा रथोत्सव चैत्र महिन्यात असतो. जोतिबाच्या डोंगरावरील श्रीकेदारनाथाची यात्रा झाली की लगेच दुसऱ्या दिवशी रथोत्सव असतो. कधी त्या दिवशी प्रतिपदायुक्त पौर्णिमा असते तर कधी चैत्र प्रतिपदा असते.

रथोत्सवासाठी सुमारे वीस फूट उंचीचा दुमजली रथ बनविलेला आहे. दर वर्षी रथाची रंगरंगोटी होते. या दिवशी रथाची मेघडंबरी फुलांच्या माळा, साखरेच्या गाठी, रंगबिरंगी विद्युतदिवे यांनी सजवितात. मेघडंबरीत खालच्या मजल्यावर देवीचे आसन सजविल्या जाते. रात्री साडे सातच्या सुमारास देवीची उत्सवमूर्ती रथारूढ होते. रात्री नऊ वाजता महाद्वारातून निघालेला रथ गुजरी, नगारखान्यातून भवानी मंडपात येतो. या ठिकाणी भवानीमातेला भेटण्याचा कार्यक्रम होतो. तेथून मिरजकर तिकटी, बिनखांबी गणपती वरून महाद्वारातून रथ मंदिरात येतो.महाद्वारात उत्सवमूर्तीस पालखीत बसवून मंदिर प्रदक्षिणा होते. पालखी परत आल्यावर चोपदारिणीकडून देवीची दृष्ट काढल्या जाते . देवीवरून नैवेद्य ओवाळून टाकला जातो.

कोल्हापुर संस्थान विलीन होण्याआधी संस्थानाचे छत्रपती रथाचे मागून आपल्या सर्व अधिकारी व दरबारीमंडळीसह रथाबरोबर चालीत असत. संस्थानाबरोबर आता ते वैभवही लयास गेले आहे.

ग) गंधलेपनोत्सव

चैत्र व वैशाख ह्या कडक उन्हाळ्यात गंधलेपनाचा उत्सव म्हणून देवीची गंधलेपनपूजा बांधण्यात येते. गंधलेपन म्हणजे सर्वांगास गंध लावणे. गंधलेपन पूजेसाठी चंदन, केशर, कस्तुरी, अत्तर, अष्टगंध, सोनेरी व चांदेरी चमक वगैरे वस्तु वापरण्यात येतात. गंधलेपन पूजा ज्यादिवशी असते त्यादिवशी अलंकारपूजा बांधीत नाहीत. या पूजेसाठी पाच किलो चंदनाचे गंध लागते. प्रथम देवीच्या सर्व अंगावर गंधाचा लेप लावतात. नंतर कौशल्याने ओचा, पदर, चुण्याकाठ व चोळी कोरतात. केशर, कस्तुरी, अष्टगंध या द्रव्यांच्या सहाय्याने काठ पदराचे सुबक बेलबुट्टी नक्षीकाम करतात.

आता हा उत्सव फार दुर्मिळ झाला आहे.गंधलेपन पूजा बांधणारे पुजारीही दुर्मिळ झालेत.महागाईच्या काळत खर्चही जास्त येत असल्यामुळे हा योग कधीतरीच येतो.

घ) दोलोत्सव

अक्षयतृतीया हा चैत्रगौरीच्या हळदी-कुंकू समारंभाचा शेवटचा दिवस.या दिवशी गरुडमंडपात झोपाळा बांधण्यात येतो. दुपारी दोन-तीन वाजता देवीची उत्सवमूर्ती श्रृंगारलेल्या झोपाळ्यावर आणून बसवितात. हा कार्यक्रम मुख्यत: स्त्रियांचा असतो. हरबऱ्याचे बीजाणे, कैरीचे पन्हे, उसाचा रस, हरभऱ्याच्या डाळीची कोशिंबीर व काकडीच्या चकत्या या दिवशी वापरण्यात येतात. देवीची बिजाण्यांनी ओटी भरतात. याच बरोबर हळदी-कुंकवाचा कार्यक्रम होतो.

ङ) नागपंचमी :

या दिवशी महासरस्वतीच्या मंदिराजवळ श्रीपूजकांमार्फत मातीच्या नागाची पूजा केल्या जाते.

च) वरदलक्ष्मी

हा उत्सव श्रावण महिन्यात श्रावणी पौर्णिमा शुक्रवारी आली तर त्या दिवशी, नाही तर पौर्णिमेपूर्वीचा शुक्रवार या दिवशी साजरा करतात. सायंकाळी चारच्या सुमारास घाटी दरवाज्याची घंटा

निनादते. या दिवशी दुपारी अलंकार पूजा नसते. देवीची षोडषोपचारे पंचामृत पूजा करतात. देवीला एक हजार तुळशीची पाने वाहिली जातात. देवीच्या पदकमलावर १०८ अक्षता वाहतात. फक्त याच दिवशी देवीला दुर्वा वाहतात. फक्त याच दिवशी संध्याकाळी देवीची पंचामृती पूजा असते(अन्य कोणत्याही दिवशी देवीस संध्याकाळी स्नान घालीत नाहीत).नंतर पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून देवीची आरती होते व हा उत्सव समाप्त होतो.

च) कुंकुमार्चन:

हा विधी पुजारी भक्ताकरिता करतो. महालक्ष्मी मंदिरातील चांदीच्या पादुकांवर कुंकवाचा अभिषेक केल्या जातो. हा विधी पूर्वी गाभाऱ्यात देवीसमोर होत असे. आता वाढत असलेल्या गर्दीमुळे हा विधी सभामंडपात होतो. एका मोठ्या परातीत चांदीच्या पादुका ठेवण्यात येतात. भक्तांनी आणलेले कुंकू पुजारी देवी अष्टक म्हणून पादुकांवर चिमटी चिमटीने अर्पित करतात. संपूर्ण कुंकवाचा अभिषेक झाल्यानंतर अभिषेकातील काही कुंकू पुजारी भक्तास प्रसाद म्हणून देतो.

छ) हळदीकुंकू सडा:

पतीच्या उत्तम आयुष्यासाठी हा विधी स्त्रिया करतात. दोन निरनिराळाया भांड्यात कुंकवाचे व हळदीचे पाणीदार मिश्रण तयार करतात. प्रदक्षिणापथावरून काठाने हे मिश्रण घालीत जातात.

च) नवरात्र महोत्सव

देवीभागवतात ह्या पूजेचा उल्लेख असून ही पूजा चैत्र, आषाढ,आश्विन व माघ या चार महिन्यात शुक्ल प्रतिपदेपासून नवमी पर्यंत होत असे. कालांतराने चैत्र व आश्विन ही दोनच नवरात्र अस्तित्वात राहिली आणि इतर दोन मागे पडली[२८७] . गोव्यातील बांदिवडे येथील महालक्ष्मी मंदिरात हा उत्सव चैत्र महिन्यात साजरा केला जातो.

---

[२८७]प्रभुदेसाई ,१९६७ , पृ.२२०

देवीच्या उत्सवांत नवरात्रोत्सव फार मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. आश्विन शुद्ध प्रतिपदेला या उत्सवाची सुरवात होते. व दसऱ्याच्या दिवशी रात्री या उत्सवाची सांगता होते. भाद्रपद एकादशी दिवशी मंदिर आतून व बाहेरून स्वच्छ करण्यात येते. मंदिराच्या आतून भिंतीवर चित्रे काढण्याची पद्धत होती. नंतर तो मार्ग संगमरवरी फरशीने आच्छादण्यात आला होता.परंतु आता संगमरवरी फरशा देखील काढून टाकण्यात आल्या आहेत.

आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नऊ दिवस देवीची अलंकारपूजा विविध रूपात बांधल्या जाते.दरवर्षी वेगवेळे अवतार धारण करून देवी भक्तांस आपले दर्शन देते.पहिल्या दिवशी देवीची बैठी पूजा बांधल्या जाते. पाचव्या दिवशी देवी गजारूढ असते. कारण या दिवशी ती त्र्यंबुलीस भेटावयास जाते. आठव्या दिवशी ती महिषमर्दिनीच्या रुपात असते. इतर दिवशी देवी व्याघ्रवाहिनी, मयुरारूढ, हंसारूढ, गरुडारूढ इ.अनेक रूपात भक्तांस दर्शन देते.देवीच्या पूजा फक्त पहिल्या दिवशी बैठी पूजा, पंचमी दिवशी गजारूढ व अष्टमी दिवशी महिषासुरमर्दिनी रूपात बांधण्यात येतात. इतर दिवशी पूजा वेगवेगळ्या स्वरूपात बांधतात.

प्रतिपदेपासून नवरात्रास प्रारंभ होतो. हा घटस्थापनेचा दिवस.मातीच्या गोलाकार कट्ट्यावर चुना व काव यांनी रंगवलेला मातीचा कलश ठेवतात. काळ्या मातीत भात, जोंधळे, गहू, हरभरे जवस, सातू, राळे, उडीद, मका ही नऊ धान्ये पेरून ठेवतात. मातीखाली पळसाची पत्रावळी घालतात. धान्य पेरून ठेवलेल्या मातीच्या गोलाकार मध्यभागी कलश ठेवतात. कलशात सोने, चांदी, रत्न, मोती, प्रवाळ,ही पंचरत्न घालून ठेवतात. कलशावर आंब्याची किंवा विड्याची पाने घालून नारळ ठेवतात. या सर्वाला घट म्हणतात. या घटावर फुलांची माळ घालतात.घटस्थापना झाल्याचे निदर्शक म्हणून घटावर, समईवर व देवीवर मंत्राक्षता वाहतात.

देवीच्या उत्सवमूर्तीची षोडषोपचारे पंचामृत पूजा होते. देव बसल्याचे निदर्शक म्हणून तोफ उडवितात. देवीची पूजा (नाममंत्राने) करतात.संपूर्ण नवरात्रात देवीची नित्य पूजा नेहमीप्रमाणेच होते. शेजारती झाल्यावर दररोज रात्री म्हटली जाणारी 'शेज निद्रा करी मंची 'म्हणत नाही.कारण नवरात्रात देवी जागीच असते.

संपूर्ण नवरात्रात दररोज रात्री दर शुक्रवारप्रमाणे पालखी मंदिर प्रदक्षिणा करते. दररोज पालखी वेगवेगळया स्वरुपात सजवितात.भक्तांची आलोट गर्दी उसळलेली असते.

कवळापंचमी

आश्विन शुद्ध पंचमी ही ललितापंचमी या नावाने प्रसिद्ध आहे. कोल्हापुरात हिला टेंबलाई पंचमी अथवा कवळापंचमी म्हणतात. टेंबलाई देवस्थान कोल्हापुरच्या पूर्वेस तीन-चार कि.मी.वर आहे.

करवीर माहात्म्यात आलेल्या कथेनुसार [२८८] कोल्हासुराचा मुलगा कामाक्ष याच्याजवळ असलेला योगदंड त्र्यंबुलीने मोठ्या कौशल्याने हिरावून घेवून देवतांना जिवंत केले.महालक्ष्मीने कोल्हासुराचा वध केला. करवीर नगरीत विजयोत्सव सुरु झाला. पण त्र्यंबुलीची दखल घेतली गेली नाही. म्हणून ती रुसली व करवीर नगराकडे पाठ फिरवून बसली. सर्व देव देवतांना कामाक्षाने शेळी मेंढीत रुपांतरीत केल्यामुळे देवीने कोल्हासुराचा वध कसा केला हे कुणीच पाहिले नव्हते. महालक्ष्मीने मुक्तिमंडपात कुष्मांडाचे दगडात रुपांतर करून कोल्हासुर वधाचे प्रात्यक्षिक दाखविले. त्यावेळी त्र्यंबुलीस आमंत्रण नसल्यामुळे ती रुसली.म्हणून दरवर्षी अश्विन शुध्द पंचमीस महालक्ष्मी त्र्यंबुलीच्या भेटीस जात असते. कोल्हासुराचा वध तिने कसा केला हे महालक्ष्मी कोहळा भेदन करून तीस दाखविते.

या दिवशी सकाळी सकाळी लवाजमा व वाजंत्रीसह चांदीच्या पालखीत बसून देवी त्र्यंबुलीच्या भेटीस निघते.वाटेत कोटितीर्थावर पालखी थांबते. तेथे पूजा व आरती झाल्यावर पालखी तक्रतीर्थावर थांबते. तेथून आरती घेवून पालखी त्र्यंबुलीच्या देवळात जाते. देवीची उत्सवमूर्ती त्र्यंबुलीच्या गाभाऱ्यात नेली जाते. तिथे पूजा व आरती होते. नंतर देवी बाहेर येते. यानंतर कूष्मांडभेदनाचा कार्यक्रम होतो. कसबाबावडा येथील वतनदार पाटील घराण्यातील कुमारिका महालक्ष्मीच्या रुपात असते. तिचे पूजन छत्रपतींच्या हस्ते होते. ती आपल्या डाव्या पायाने कोहळ्यास स्पर्श करते.छत्रपती चांदीच्या त्रिशुळाने कुष्मांड फोडतात. पूर्वी वतनदार गावकामगार पाटील भाल्याने कोहळा फोडीत असत. छत्रपतींच्या हातून कोहळा फोडण्याची पद्धत दोन वर्षापूर्वीपासून सुरु झाली. कोहळा भेदनानंतर आरती, शंखतीर्थ,

---

[२८८] जोशीराव ,२००० ,अ . ३८

मानाचे विडे व नारळ दिल्यानंतर पालखी मंदिरात परत येते. पालखीने मंदिरात प्रवेश केल्यावर तोफ उडविल्या जाते.

अष्टमी

आश्विन शुद्ध अष्टमी हा नवरात्रातील महत्वाचा दिवस. कोल्हासुर व महालक्ष्मी यांच्यामधील युद्धाचा हा अटीतटीचा दिवस. महालक्ष्मीने चौफेर फिरत कोल्हासुराला झुलत ठेवले. योग्य संधी मिळताच नवमी सुरु होण्याच्या पहाटेस महालक्ष्मीने कोल्हासुराचा वध केला. या दिवशी महालक्ष्मी चौफेर फिरली म्हणून महालक्ष्मीची पालखी दिवसा व रात्री दोन्ही वेळेस नगरप्रदक्षिणेस निघते.

सकाळी महाद्वारातून भवानी मंडप, मिरजकर तिकटी,दैवज्ञ बोर्डिंग, खारी कॉर्नर, गांधी मैदान, निवृत्ती चौक, महाकाली मंदिर, चौपाटी रोड,जावळाचा गणपती , दुधाळी,अनुगामिनी, उत्तरेश्वर पेठ, महादेव मंदिर, तेली गल्ली, गोंधळी गल्ली, काळाईम्राम तालीम, महापालिका, माळकर तिकटी, खाटिक मंडई, गजेंद्रलक्ष्मी, बिंदुचौकातून सबजेलमार्गे भवानी मंडप अशी पालखी जाते.

या दिवशी जागरपूजा असते. शेतकरी जागरादिवशी देवीला नवीन ऊस अर्पण करतात. हे ऊस पर्णांकित असतात.ऊस देवीच्या मखराचे दोन्हीबाजूस लावतात. महिला कडकणी देवीला अर्पण करतात. ही कडकणी देवीच्या मंडपावर बांधतात

रात्री साडे आठ ते नऊच्या दरम्यान देवीची पालखी निघते. देवी पालखीत बसून नगरप्रदक्षिणेस निघते. दोहोबाजूला सिंह असलेले सिंहासन उत्तम तऱ्हेने सजवितात. त्या सिंहासनावर सजविलेली देवीची उत्सव मूर्ती ठेवतात.पालखीसमोर मानकऱ्यांचा लवाजमा असतो.वाहनाच्या सुरवातीस मानाचा अश्व पाठीमागे गुरुमहाराजांची पालखी असते.पालखी महाद्वारातून गुजरी,रंकभैरव,श्रीगुरुमहाराज वाडा येथून गुरुमहाराजांची पालखी सोबत, भवानी मंडपात येते. भवानी देवी व महालक्ष्मीची मंदिरात भेट होते. येथे पूजा, आरती व मानपान झाल्यावर गुरुमहाराजांच्या वाड्यावरून बिनखांबी मंदिराला वळसा घालून महाद्वार रस्त्याने पालखी गरुडमंडपात येते. विविध रंगी रांगोळी ,फुलांच्या पायघड्या व

अंबाबाईच्या नावाने चांगभलं या निनादाने नगरप्रदक्षिणा सोहळा होतो. वाहन मंदिरात आल्यावर खातेदार आणि त्यांचे कुलोपाध्याय उत्तररात्री देवीची नवार्णपूजा करतात.

या रात्री देवीची जागरपूजा असते. देवीचा अंतर्गाभाऱ्यातील दरवाजा बंद असतो. यावेळी भक्तांना देवळात प्रवेश नसतो. या पूजेस संधिकाल पूजा असेही म्हणण्यात येते. काणे यांच्यामते ' A short period of time, viz.the last *ghatika* (अष्टमीनवमीसन्धौ तृतिया खलु कथ्यते।तत्र पूज्या त्वहं पुत्र योगिणीगण संयुता ।(कालिकापुराण ६२.५०-५१)of *mahāshtamī* and first *ghatika* of *navamī* was called *sandhī* .During that period of two *ghatikas* a *pujā* of *Devī* together with *yoginis* is to be performedwhich is deemed to be a holiest *pujā*. This *pujā* is to be performed like the *pujā* on *mahāshtamī* but the *balī* is to be offered at and after the *mahānavamī* ." [२८१] महालक्ष्मीचे वंशपरंपरागत पुजारी मुनीश्वर यांच्याकडील पोथीत वर्णिलेल्या पूजेत अशाच प्रकारच्या पूजेचा समावेश आहे. परंतु या पूजेस हे पुजारी गुप्त पूजा म्हणतात. ही पूजा मुनीश्वर घराण्यातील पुजारी व त्यांचा कुलोपाध्याय लाटकर हे दोघे मिळून करतात.या पूजेवेळी या दोहोंशिवाय गाभाऱ्यात कोणीही नसते. याविषयी जास्त माहिती देण्यास पुजाऱ्यांनी नकार दिला. परंतू पोथीवरून ही पूजा योगिनींसह होणारी पूजा आहे.यास पुजारी 'शाक्तपूजा' असेही म्हणतात. शाक्त परंपरेतील पूजेचे हे अवशेष असेही आपणास म्हणता येईल. त्यादृष्टीने ही पूजा महत्वाची ठरते.ही पूजा साधारण दीड ते दोन तास चालते.या पूजेनंतर मात्र बलि देण्याची प्रथा नाही.या पूजेनंतर महाकाली समोरील यज्ञकुंडात यज्ञाचा प्रारंभ होतो.यावेळी गणेशपूजन व पुण्याहवचन होते. रात्री दोनचे सुमारास यज्ञास प्रारंभ होतो. नवचंडी होमास प्रारंभ होतो. नंतर येथे कूष्मांडभेदन होते.नंतर पूर्णाहुती होऊन यज्ञ समाप्त होतो.पूर्णाहुतीसाठी तांदळाची खीर, त्यात ऊसाचे गरे घातले जातात.बलि म्हणून कोहळ्याचा उपयोग केला जातो.पूर्वी हा यज्ञ व कुष्मांडभेदनाचा कार्यक्रम मुक्तिमंडपात होत असे. हा मुक्तिमंडप श्रीदत्त मंदिराचे पूर्व भिंतीला लागून मनकर्णिका कुंडालगत होता.

---

[२८१] काणे. १९७४ ,पृ .१७८

नवमीच्या दिवशी खंडीपूजन शस्त्रपूजन असते.साडे अकरा वाजता पूजा व आरती झाल्यावर घटावर अक्षता घालून घट हलवितात. नंतर तोफ होते. तोफ उडाली की देव ऊठले हे भाविकांना समजते. नंतर तोफेचे पूजन व आरती करतात.

विजयादशमी

या दिवशी देवीच्या अलंकारपूजेच्या वेळी व्यंकटेश देवस्थान कमिटी, तिरुमल तिरुपती, आंध्रप्रदेश यांच्याकडून आलेली साडी नेसवण्याचा प्रघात आहे. ही प्रथा कधी आणि केव्हां सुरु झाली याबाबत विशेष माहिती मिळत नाही. परंतु **व्यंकटेश माहात्म्या**तील कथेनुसार ज्यावेळी भृगु ऋषि विष्णूस भेटावयास आले त्यावेळी विष्णू झोपलेले होते. ते ऋषिंचा आदरातिथ्य करू शकले नाहीत . भृगु ऋषिंनी रागावून विष्णूच्या छातीवर लाथ मारली. विष्णूचे हृदय हे लक्ष्मीचे निवासस्थान . या कृत्याचा लक्ष्मीस राग आला व लक्ष्मी रुसून कोल्हापुरास येऊन बसली. असा तिरुपती व महालक्ष्मीचा संबंध लावल्या जातो. या प्रथेप्रमाणे आता नवरात्राच्या पहिल्या दिवशी व्यंकटेशाने पाठवलेली साड़ी वाजत गाजत देवळात आणल्या जाते.

या दिवशी संध्याकाळी साडे चार वाजता महालक्ष्मीची पालखी भवानीची पालखी वाजतगाजत दसरा चौकात नेण्यात येते. दसरा चौकात छत्रपतींच्या हस्ते शमीचे पूजन होते व सोने लुटले जाते. तेथून देवीची पालखी महारवाड्यात जाते.हा वर्षातील एकच दिवस असतो ज्या दिवशी महालक्ष्मी महार वस्तीतील भक्तांना दर्शन देण्यास स्वत: महारवाड्यात जाते. नंतर पालखी नदीवर गुरुमहाराजांचे समाधीजवळ जाते. तेथुन पालखी छत्रपति मंदिरात येते. याचवेळी रंकतीर्थावर आपटापूजन करून रंकभैरवाची पालखी येथे येते. येथे सर्वांचा दरबार भरून मानाचे विडे दिले जातात. नंतर पालखी गंगावेशीतून महाद्वारपथाने महाद्वाराजवळ प्रवेश करते.

छ) महाप्रसाद

आश्विन शुद्ध पौणिमा (कोजागिरी पोर्णिमा) या दिवशी महाप्रसाद असतो. पूर्वी महाप्रसादाचा खर्च संस्थानातर्फे होत असे. आता महालक्ष्मी भक्तमंडळातर्फे केला जातो. मंदिरात देवीची

पूजा व आरती महानैवेद्य झाला की महाप्रसादास सुरवात होते. महाप्रसादासाठी वरण, भात, आमटी, भाजी, गव्हाची खीर व बुंदीचे लाडू वगैरे पदार्थ असतात. रात्री देवीचे सर्व मंदिर, शिखरे व प्राकार रंगबिरंगी विद्युतदीपांनी सजविले जातात.नंतर दर शुक्रवारच्या प्रथेप्रमाने मंदिर प्रदक्षिणा होते.नंतर तोफ उडाल्यावर पालखी मंदिरात येते. कापुरआरती झाल्यावर शेजारती होऊन नवरात्रोत्सवाची सांगता होते.

ज) दुग्धस्नानोत्सव

आश्विन वद्य चतुर्दशी म्हणजे नरकचतुर्दशी. या दिवसापासून त्रिपुरारी पौर्णिमेअखेर हा दुग्धस्नानाचा उत्सव चालू असतो. पहाटे तीन वाजण्याचे सुमारास घाटी दरवाज्यावरील घंटा घणाणू लागते. कार्तिक स्नान आटोपुन भक्तगण देवळात येतात.येताना दूध घेवून येतात. नंतर देवीच्या दुग्धस्नानोत्सवास सुरवात होते. साधारणपणे १५-१६ घागरी दूध जमते. नखशिखांत दुधाने नहात असलेली देवी प्रशांत व सुंदर दिसते.स्नानाचा सोहळा संपताच देवीस वस्त्र घातल्यानंतर देवीची आरती होते. या पंधरा दिवसांत देवीची साडे आठ वाजता होणारी आरती बंद असते. त्रिपुरारी पौर्णिमेस दुपारी देवीची अलंकार पूजा बांधतात. पूर्वी रात्री सर्व शिखरे कापूर व तेलाच्या दिव्यांनी पाजळली जात. आता सगळीकडे दिव्यांची रोषणाई करण्यात येते.देवीची पालखी निघते. महालक्ष्मी मूर्तीची होणारी झीज बघता आता देवीस दुधाची अंघोळ घालण्याची प्रथा बंद झालेली आहे.

कार्तिक चतुर्दशीस महालक्ष्मी मंदिराच्या वरच्या मजल्यावरील मातुलिंगाचे दर्शन घेता येते. या दिवशी भाविक नंदी व मातुलिंगास बेल अर्पण करण्यास येतात.

झ) किरणोत्सव

महालक्ष्मीच्या सर्व उत्सवांचा मेरुमणी म्हणजे किरणोत्सव होय.हा नैसर्गिक उत्सव आहे. सूर्याच्या उद्धरायण व दक्षिणायन भ्रमणात विशिष्ट तारखांना सूर्याची किरणे महालक्ष्मीवर पडतात. अशा पद्धतीने या मंदिराची रचना करण्यात आली आहे. १६.४ उत्तर अक्षांश व ७४.१६पूर्व रेखांशावर स्थित अशा या मंदिरात कार्तिक व माघ मासात सूर्याची किरणे महालक्ष्मीच्या मूर्तीवर पडतात. ठरल्या दिवशी व ठरल्यावेळी ही सूर्यकिरणे देवीच्या पायापासून देवीचे मस्तकापर्यंत पडतात. प्रथम सूर्य उत्तरेकडून

दक्षिणेकडे सरकत असता (दक्षिणायन) इंग्रजी कालगणनेप्रमाणे ९नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर व परत दक्षिणेकडून उत्तरेकडे सरकत असता (उत्तरायण) इंग्रजी कालगणनेप्रमाणे ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी या दिवस दरम्यान हा किरणोत्सव बघावयास मिळतो.

पहिला किरणोत्सव चार दिवस तर दुसरा किरणोत्सव तीन दिवस चालतो. प्रथम दिवशी सूर्याची किरणे देवीचे पायांवर पडतात. दुसरे दिवशी ही किरणे देवीच्या कमरेपर्यंत व तिसरे दिवशी संपूर्ण मूर्तीवर ही किरणे पडतात. यावेळी सर्व दिवे बंद करून अंधार केल्या जातो. दक्षिणायन व उत्तरायण या दोन खगोलशास्त्रीय घटनातील अचुक ८० दिवसांचेअंतर यांचा अभ्यास करून मूर्तीचे स्थान ,तिचा आकार व मंदिराचे मंडप करण्यात आले असावेत. या किरणोत्सवाचा उल्लेख लक्ष्मीविजय ग्रंथात आला असला तरी करवीरमाहात्म्यात या घटनेचा उल्लेख नाही.

ञ) **मकरसंक्रांती**

जानेवारी १३, १४, १५या तीन दिवस मंदिरात मकरसंक्रांती उत्सव साजरा केल्या जातो. भोगी दिवशी देवीला मुगाच्या डाळीची खिचडी त्यावर ओले खोबरे बाजरीची तीळ लावलेली भाकरी त्यावर लोण्याचा गोळा, वांग्याची वाल घातलेली भाजी .मटरची उसळ असा नैवेद्य असतो. संक्रांती दिवशी गुळाच्या पोळ्या, मसालेभात याचा नैवेद्य असतो.या दिवशी महालक्ष्मीची संपूर्ण अलंकार पूजा बांधतात.किंक्रांती दिवशी शृंगारलेल्या गरुडमंडपात महालक्ष्मीची उत्सवमूर्ती आणून बसवतात. स्त्रियांचा हळदी-कुंकवाचा कार्यक्रम होतो.

ट) गुढीपाडवा

गुढीपाडव्यादिवशी देवीला साखरेच्या पुतळयांची माळ घालतात.

ठ) जन्माष्टमी

कृष्ण जन्माष्टमीच्या दिवशी रात्री साडेआठच्या आरती नंतर सभामंडपात जन्माष्टमीचे कीर्तन होते.रात्री बारा वाजता श्रीकृष्ण जन्म झाल्यानंतर सुंठवड्याचा प्रसाद होऊन देवीची शेजारती होते.

ड) गणेश चतुर्थी

गणेश चतुर्थीपासून अनंत चतुर्दशीपर्यंत गरुड मंडपात गणेशोत्सव थाटामाटाने पार पडतो.

ढ) ग्रहण

ग्रहणकाळी देवीपुढे मंत्रोच्चार केले जातात.वेध लागल्यावर आरती, नैवेद्य केले जात नाहीत. ग्रहण संपल्यावर देवीची पंचोपचार पूजा करून आरती केल्या जाते.

ण) गोंधळ

महालक्ष्मी मंदिराच्या गरुडमंडपात देवीसमोर गोंधळ घातल्या जातो. हे गोंधळ देवीचे नवसाचे वा घराण्यात परंपरेने चालत आलेले असतात. हे गोंधळ सकाळी साडेआठच्या आरतीच्यावेळी,साडे अकराच्या किंवा दुपारच्या दोनच्या पूजेवेळी घातले जातात. पूर्वी हा गोंधळ गणेश मंडपात घालण्यात येत असे. वाढती गर्दी व जागेची कमी यामुळे हा गोंधळ आता गरुड मंडपात घातल्या जातो. या गोंधळात मात्र देवीला नैवेद्य पुरणपोळीचा असतो. खास कोल्हापुरच्या महालक्ष्मीचे गोंधळी आढळून येत नाहीत. तुळजापुरातील देवीचे गोंधळीच या देवीसमोर गोंधळ घालतात. त्याच देवीचे हे एक रूप असल्याची भक्तांची भावना आहे.

नवसाला पावणारी देवी

बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांची पत्नी गोपिकाबाई हिने महालक्ष्मीस कांही नवस केला होता. नवस काय होता व हेतू काय होता याचे स्पष्टीकरण मिळत नाही. परंतु नवस सफल झाला असावा कारण जुन्या मोहरा वितळवून पावणेचोविस तोळे दोन गुंजा वजनाचे चार चुडे करण्यात आले व ते राजश्री नारो बाबाजी भावे याजकडील समाधी विश्वनाथ याजकरवी आणि चिटको अनंत वाईकर यांचे हस्ते कोल्हापुरी पाठविले असा मजकूर पौष शुद्ध १२ शके १६७६(२६डिसेंबर

१७५४)च्या नोंदीत मिळतो[२९०].पुण्याच्या खाजगीवाले घराण्यापैकी अव्वल इंग्रजीतील पुरुष श्री गोविंदराव यांना मुलगा नव्हता. त्यांची पत्नी रमाबाई हिने पुत्रप्राप्तीसाठी अंब्याची जोगाई ,तुळजापुरची भवानी,कोल्हापुरची महालक्ष्मी ,पंढरपुरचा विठोबा,विजापुरचा खळनाथ व जेजुरीचा खंडोबा या देवांना नवस केला होता. नवसाला सारे देव पावले. तिला मुलगा झाला. पुढे मुलाचे लग्न झालेनंतर आपला मुलगा नीळकंठराव व सून यांचेसह रमाबाईने वरील सर्व देवस्थानांचे दर्शन घेतले. प्रत्येक ठिकाणी जाऊन रमाबाईंनी त्या त्या देवाचा नवस फेडला. ती बुधवारी माघ शुद्ध सप्तमी शके १७४६ (२६-१-१८२५) रोजी वरील नवस फेडण्यास यात्रेस निघाली व चैत्र शुद्ध दशमी शके १७४७(१९-३-१८२५)रोजी परत आली[२९१].

सातारा विभागातील एक गृहस्थ पोटशूळाच्या विकाराने त्रस्त झाला होता. सर्व प्रकारचे औषधोपचार करुनही व्याधी थांबेना. अखेर त्याने श्रीमहालक्ष्मीची आराधना सुरु केली. त्याची श्रद्धायुक्त उपासना पाहून देवी प्रसन्न झाली. त्या गृहस्थास स्वप्नात दृष्टांत झाला. त्याला पुण्याचे पेशवे श्रीमंत नानासाहेब यांचे चरणतीर्थ घेण्याची अनुज्ञा झाली. सदर गृहस्थ दृष्टांताप्रमाणे पुण्यास गेला व श्रीमंत पेशवे सरकारांना साद्यंत वृत्तांत सांगितला. व चरणतीर्थ देण्याची विनंती केली. ते चरणतीर्थ देण्यास टाळाटाळ करू लागले.तेव्हा नानासाहेब पेशव्यांना देवीचा साक्षात्कार होऊन त्या गृहस्थास चरणतीर्थ देण्याची अनुज्ञा केली.त्याप्रमाणे श्रीमंतांनी त्या व्याधिग्रस्त गृहस्थास देवीचे नामस्मरण करून चरणतीर्थ दिले.आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या चरणतीर्थाने त्या गृहस्थाचा पोटशूळ बरा झाला[२९२].

श्रीपूजक

महालक्ष्मीचे पुजारी श्रीपूजक या नावाने ओळखल्या जातात. विद्यमान मुनीश्वर घराणे हे मूळचे आंध्र प्रांतातील. त्यांचे पूर्वज मुकुंद महामुनी साधारणतः सहाशे सातशे वर्षांपूर्वी कोल्हापुरास आले व देवीचे सेवक म्हणून राहिले. महालक्ष्मीच्या सेवेबद्दल त्यांना जमीनी देणगी दाखल दिल्या व ते श्रीपूजक बनले.सध्या श्रपिूजक म्हणुन असलेले मुनीश्वर ही त्यांची ५२वी पीढी आहे.

[२९०]कुलकर्णी.१९९२:पृ.४५
[२९१] कुलकर्णी.१९९२:पृ.४५
[२९२]कुलकर्णी. १९९२ ,पृ .४६

श्री महालक्ष्मीचे पुजारी गोपाळ भट, बाबा भट व शाम भट मुनीश्वर यांच्यामध्ये महालक्ष्मीच्या पूजेअर्चेच्या अधिकारावरून तंटे निर्माण झाले. तेव्हां करवीर संस्थानचे छत्रपती संभाजी उर्फ शंभूराजे यांनी राजपत्राद्वारे तिघांनी पाळीपाळीने क्रमश: तीन दिवस पूजा करावी असा निर्णय दिला. हे राजपत्र राजशक ५८ फाल्गुन शुध्द १४ इंदुवार (दि.२८ फेब्रुवारी सन१७३२)चे आहे.

परंतु हा निर्णय पुजाऱ्यांना मान्य न झाल्यामुळे पुढे हा तंटा पैठणच्या धर्मपीठापुढे गेला असावा. पैठणास पुढील प्रमाणे निर्णय लागला. बाबा भट व गोपाळ भट यांचे दोन व शाम भट यांचा एक आठवडापूजेसाठी देण्यात आला. तेव्हा सदर निवाड्याप्रमाणे सर्वांनी वागण्याची आज्ञा शंभू छत्रपतींनी राज शक६० अश्विन वद्य ११ शके १६५५ (दि.२२अक्टोबर १७३३) या दिवशी दिली[२१३].

या मुनीश्वरांचे श्रीपूजनाचे हक्क कन्या वारसाने रेंदाळकर, लाटकर, नवलिहाळकर, गोटखिंडीकर, चौधरी, बिडकर यांचेकडे हिश्शाने आले.

महालक्ष्मीचे प्रमुख दागिने

१) जडावाचे दागिने -किरीट , कुंडले ,पिंपळपान , लफ्फा, चिंचपेटी ,सातपदरी मोत्याचा कंठा,पेंडे;

२) सोन्याचे दागिने- सोळापदरी चंद्रहार (वजनभार ७६ तोळे अंदाजे), अकबरी मोहरांची माळा(७४९ अकबरी मोहरा त्यावर शाह आलम शाहा असा ठसा आहे), बोरमाळ मणी७४, पादुका २, किरीट;

सारे अलंकार व त्यांच्या हस्तांतराचा व्यवहार जामदारखान्याचे हवालदार श्री.खांडेकर पाहतात. श्री. खांडेकर वंशपरंपरागत पगारी सेवक आहेत.

---

[२१३] कुलकर्णी,१९९२, पृ.४२

देवीच्या अलंकाराप्रमाणे देवीच्या पूजेची उपकरणे व अन्य भांडी आहेत. त्यात पूजेची सर्व उपकरणे,छत्रचामरासह प्रभावळ , घंगाळे, घागर, कटांजन, घंटा, पंचारती, समया, नैवेद्याची ताटे,वाट्या इ. पात्रे अस्सल चांदीची आहेत.

मंदिराची व्यवस्था :

इ.स. १९६९ साली महाराष्ट्र शासनाने **पश्चिम महाराष्ट्र देवस्थान मंडळाची** स्थापना केली. मंदिराच्या एकूण व्यवस्थापनाची जबाबदारी या सरकारनियुक्त देवस्थान मंडळाची आहे. मंदिराचा जिर्णोद्धार,झाडलोट,स्वच्छता,दिवाबत्ती.रंगरंगोटी,उत्सव इ. कामे या मंडळाला पहावी लागतात.साधारणपणे इ.स.१७२४ पासून मंदिराच्या व्यवस्थापनाचे काम संस्थानच्या खाजगी खात्याकडे होते. त्यानंतर ही व्यवस्था इलाखा पंचायत, कोर्ट ऑफ वॉर्ड यांच्याकडे व पुढे परत राजाराम महाराजांच्या कारकीर्दीत खाजगी खात्याकडे आली. त्यानंतर इ.स.१९६९ मध्ये ही व्यवस्था पश्चिम महाराष्ट्र देवस्थान मंडळाकडे आली. भक्तांनी दिलेल्या देणग्या ,आवातील दुकानांची भाडी ,पूर्वी दिलेल्या देणगीदाखल जमिनींचे उत्पन्न अशा आधारावर ही संस्था काम करते.देवळामध्ये उंबऱ्याच्या आत आलेले उत्पन्न पुजाऱ्याचे असते. दानपेटीतील उत्पन्न मंडळास जाते.

करवीरपीठाधीश शंकराचार्य वर्षातून दोनदा महालक्ष्मीच्या दर्शनास येतात. आद्यशंकरांच्या जन्मदिवशी शंकराचार्यांची पालखी आधी कपिलतीर्थास जाते व त्यानंतर पीठाधीश महालक्ष्मीच्या दर्शनास जातात. कपिलतीर्थ हे ग्रामदैवत असल्यामुळे आधी ते ग्रामदेवतेचेदर्शन घेतात. महालक्ष्मीस षोडषोपचार पूजा करून साडी, खणानारळाची ओटी भरतात. नवरात्रातही एक दिवस शंकराचार्य महालक्ष्मीचे दर्शन घ्यावयास जातात.

महालक्ष्मी मंदिरात रोज होत असलेली पूजा बघता असे लक्षात येते की

महालक्ष्मी देवीच्या पूजे-अर्चेत झालेले बदल जाणून घेण्यास आज तरी आपल्याजवळ काही पुरावे नाहीत. तरी महालक्ष्मी मूर्तीच्या डोक्यावरील लिंगयोनि तसेच मंदिराच्या वरच्या मजल्यावरील शिवलिंग त्याची होणारी नित्य पूजा यावरून तिचा शैव रूपाशी असलेला संबंध व शारदीय नवरात्रात

अष्टमी दिवशी होणारी संधिकाल पूजा ,तिचा चौसष्ठ योगिनींशी असणारा संबंध यावरून कालमानाने देवीच्या पूजेत बदल घडून आला असावा असे वाटते.

आगम संप्रदायात असलेले रथोत्सव,दोलोत्सव असे उत्सव या मंदिरात होतात.

आज तिचे दिसणारे सात्विक रूप पूर्वीच्या काळातही होते याचा पुरावा आज उपलब्ध नाही,परंतु देवीभागवत व शाक्त तंत्रातील तिच्या या स्थानाला शक्तिपीठ वर्णिल्यामुळे नंतरच्या काळात तिचा तिरुपतीच्या बालाजीबरोबर जोडलेला संबंध यावरून तिचे आजचे हे वैष्णव रूप म्हणजे काळाच्या ओघात झालेला बदलच म्हणावा लागेल. तिच्या आज दिसणाऱ्या पूजाक्रमात संधिकाल पूजा सोडली तर सगळे पूजाविधी सात्विक स्वरूपातलेच दिसून येतात. परंतु ही पूजा करणारे पुजारी मात्र शैव संप्रदायी आहेत. ३०-४० वर्षांपूर्वी देवीस नवरात्रात अष्टमी दिवशी गुप्त नैवेद्य (मांसाहारी) दाखवण्यात येत असे असे काही स्थानिकांचे म्हणणे आहे, परंतु आताचे पुजारी ही देवी पूर्णतः सात्विकरूपात असल्याचे सांगतात.

श्री महालक्ष्मी अष्टकम्

नमस्तेतु महामाये श्रीपीठे सुरपूजिते।शंखचक्रगदाहस्ते महालक्ष्मि नमोऽस्तु ते।।१।।

नमस्ते गरुडारूढे कोल्हासुरभयंकरि ।सर्व पाप हारे देवि महालक्ष्मि नमोऽस्तु ते ।।२।।

सर्वज्ञे सर्ववरदे सर्वदुष्टभयंकरि । सर्वदु:खहरे देवि महालक्ष्मि नमोऽस्तुते ।।३।।

सिध्दिबुध्दिप्रदे देवि भक्तिमुक्ति प्रदायिनि। मंत्रमूर्ते सदा देवि महालक्ष्मि नमोऽस्तु ते।४।

आद्यन्तरहिते देवि आद्यशक्ति महेश्वरि। योगजे योग सम्भूते महालक्ष्मि नमोऽस्तु ते ।५।

स्थूलसूक्ष्म महारौद्रे महाशक्ति महोदरे । महापापहरे देवि महालक्ष्मि नमोऽस्तु ते ।।६।।

पद्मासनस्थिते देवि परब्रह्मस्वरूपिणि । परमेशि जगन्मातर्महालक्ष्मि नमोऽस्तु ते ।।७।।

श्वेतांबरधरे देवि नानालंकारभूषिते । जगत्स्थिते जगन्मातर्महालक्ष्मि नमोऽस्तु ते ।।८।।

महालक्ष्म्यष्टकस्तोत्रं य: पठेत् भक्तिमान्नर: । सर्वसिद्धि मवाप्नोति सर्वदा ।।९।।

एककाले पठेन्नित्यं महापापविनाशनम्।द्विकालं य: पठेन्नित्यं धनधान्य समन्वित:।१०।

त्रिकालं य: पठेन्नित्यं महाशत्रुविनाशनम् । महालक्ष्मीर्भवेन्नित्यं प्रसन्ना वरदाशुभा।११।

इतिन्द्रकृत: श्रीमहाक्ष्म्यष्टक स्तव: संपूर्ण: ।।

श्रीमहालक्ष्मी अष्टकाची आठ श्लोकाअखेर अकरा आवर्तने म्हणतात. हीआवर्तने म्हणून झाल्यानंतर फलश्रुतीचे श्लोक म्हणण्याची प्रथा आहे.

।। श्रीसूक्तम् ।।

हरि: ॐ हिरण्यवर्णां हरिणीं हिरण्यरजतस्रजाम् ।। चंद्रां हिरण्मयीं लक्ष्मीं जातवेदो म आ वह।।१।।

तां म आ वह जातवेदो लक्ष्मीमनपगामिनीम् ।। यस्यां हिरण्यं विन्देयं गामश्वं पुरुषानहम् ।।२।।

अश्वपूर्वां रथमध्यां हस्तिनादप्रबोधिनीम् ।।श्रियं देवीमुपह्वये श्रीर्मा देवीश्रिजुषताम् ।।३।।

कां सोस्मितां हिरण्यप्राकारामाद्रां ज्वलंन्ती तृप्तां तर्पयन्तीम्।। पद्मेस्थितां पद्मवर्णाम् तामिहोपह्वये श्रियम् ।। चन्द्रा प्रभासां यशसा ज्वलं लोके देवजुष्टामुदाराम् तां पद्मिनीमीं शरणं प्रपद्ये अलक्ष्मीर्मे नश्यतां त्वां वृणे। । आदित्यवर्णे तपसोधि जातो वनस्पतिस्तव वृक्षोऽथ बिल्व: ।। तस्य फलानि तपसा नुदन्तु मायान्तरायाश्च बाह्या अलक्ष्मी: ।।

उपैतु मां देवसख:कीर्तिश्च मणिना सह ।। प्रादुर्भूते सुराष्ट्रेऽस्मिन् कीर्तिमृद्धिं ददातु मे ।।

क्षुत्पिपासामलां ज्येष्ठामलक्ष्मीं नाशयाम्यहम् ।।अभूतिम समृद्धिं च सर्वा निर्णुद मे गृहात् ।।

गंधव्दारां दुराधर्षाम् नित्यपुष्टां करीषिणीम् ।। ईश्वरीं सर्वभूतानां तिमिहोपह्वये श्रियम् ।।

मनस: काममाकूतिं वाच: सत्यमशीमहि ।। पशूनां रूपमन्नस्य मयि श्री: श्रयतां यश: ।।२।।

कर्दमेन प्रजा भूता मयि संभव कर्दम ।। श्रियं वासय मे कुले मातरं पद्ममालिनीम् ।।

आप: स्रजन्तु स्निग्धानि चिक्लीत वस मे गृहे ।। नि च देवीं मातरं श्रियं वासय मे कुले ।।

आर्द्रां पुष्करिणीं पुष्टिं पिंगलां पद्ममालिनीम् ।। चंद्रां हिरण्मयीं लक्ष्मीं जातवेदो म आ वह ।।

तां म आ वह जातवेदो लक्ष्मीमनपगामिनीम् ।।यस्यां हिरण्यं प्रभूतं गावो दास्योऽश्वान् विन्देयं पुरुषानहम् ।।

य शुचि: प्रयतो भूत्वा जुहुयादाज्यमन्वहम् ।।सूक्तं पंचदशर्चंच श्रीकाम: सततं जपेत् ।।३।।

अभिषेकाचे वेळी श्रीसूक्ताची तीन किंवा अकरा आवर्तने म्हणतात. पहिल्या तीन मंत्राअखेर आवर्तने म्हणतात.आवर्तने पूर्ण झाल्या नंतर

पद्मासने पद्मऊरु पद्माक्षि पद्मसंभवे ।। तन्मे भजसि पद्माक्षि येन सौख्यं लभाम्यहम् ।। अश्वदायै गोदायै धनदायै महाधने ।। धनं मे लभतां देवि सर्वकामांश्च देहि मे ।। पद्मानने पद्मविपद्मपत्रे पद्मप्रिये पद्मदलायताक्षि ।। विश्वप्रिये विष्णुमनोनुकुले त्वत्पाद पद्मं मयि सन्निधत्स्व ।.

पुत्र पौत्र धनं धान्यं हस्त्यश्वादि गवे रथम् ।। प्रजानां भवसि माता आयुष्मंतं करो तु मे ।।

धनं अग्निवर्धनं वायुर्धनं सूर्योधनं वसु: ।। धन इंद्रो बृहस्पतिर्वरुणे धनं अस्तु मे ।।

वैनतेय सोमं पिब सोमं पिबतु वृत्रहा ।। सोमं धनस्य सोमिन: मह्यं ददातु सोमिन: ।।

न क्रोधो न च मात्सर्यं न लोभो नाशुभा मति: ।। भवंति कृत पुण्यानां भक्तानांश्रीसूक्तं जपेत ।।

सरसिजनिलये सरोजहस्ते धवल तरांशुकगंधमाल्यशोभे .. भगवति हरिवल्लभे मनोज्ञे

त्रिभुवनभूतिकरि प्रसीदमह्यम ।। विष्णुपत्नीं क्षमां देवीं माधवीं माधवप्रियाम् ।।

लक्ष्मीं प्रियसखीं देविं नमाम्य अच्युतवल्लभाम् ।।महालक्ष्मीं च विद्महे विष्णुपत्नीं च धिमहि ।।

तन्नोलक्ष्मी: प्रचोदयात् ।। श्रीवर्चस्वं आयुष्यं आरोग्यं आविधात् शोभमानं महीयते ।।

धान्यं धनं पशुं बहुपुत्रलाभं शतसंवत्सरं दीर्घमायु: ।।४।।

श्रीमहालक्ष्म्या: आर्तिक्यम्

करवीरालयवासिनि मंगलगुणशाले ।। कोलासुरबलमर्दिनि सुपयोनिधि बाले ।

कटितटिचुंबितजांबुनदचारुदुकुले ।। मुकुटोत्कटकरनिकरालंकृतनिजभाले ।।

जय देवि जय देवि जय सुंदरि कमले ।। कमलासनकमलाधवपूजितपदकमले ।।१।।

चामीकरकृतकंकणमंडितकरजाले ।। कांचनमणिमयकांचीकिंकिणीरव हेले ।

हृदयस्थलपरिरंजित मुक्ताफलमाले ।। राकाहिमकरवदनस्मितचारुकपोले ।।२।।

इंदीवरदलनयने नंदितशुभशीले ।। बिंबाधररुचिराजितरदनाधरलीले ।

पार्श्वद्वयधृतवाणीकालीप्सितमौले ।। वरदे शिवयतिफलदे सुखदे हरिमहिले ।।३।।

भूपाळी

उठि उठि हो माय भवानी।अंबे कोल्हासुरमर्दिनी।।जय जय परब्रह्मरुपिणी।सुखदायिनी भक्तांची ।।१।।

झाला उषःकाल सुंदर । गाती भक्त तुझे सुस्वर ।।

होतो स्नानाशी उशीर । उठि सत्वर माउलिये ।।२।।

द्वारी चौघडे गर्जती । नाना वाजंत्री वाजती ।।

सनया सुस्वर आलापिती । तुज संप्रति सुखवाया ।।३।।

भाविक नारीनर पातले । द्वारी उबे सुचिर ठाकले ।।

दर्शनोत्सुक मनी जाहले । उघडी डोळे मायगे ।।४।।

अवघे अर्चक जन पातले । पूजा साहित्यहि आणिले ।।

सांडी निद्रासुख चित्कले । दीन दयाळे अंबिके ।।५।।

देउनि दर्शन सकलानिके । करि वो पावन जगदंबिके

भक्ताभिप्सित वरदायिके । भवतारिके भय भंगे ।।६।।

पायी लीन तुझ्या होउनि । आलो शरण तुज स्वामिनी ।।

पुरवी दासाची विनवणी । देउनी चरणी ठव गे ।।७।।[२९४]

---

[२९४] कुळकर्णी. १९९२:पृ.८४-८६

काकड आरती

काकड आरती तुजला आदि शक्तिमाते। ।सूर्यरथावरि बैसुनी आला जागी हो अंबे ।धृ।

शुक मयूर कोकिळादिकांचा शब्द कानी पडतो।। कमळावरुनी सुगंध घेउनी वायु मंद येतो ।।१।।

तुझ्या दर्शनासाठी इंद्रासह देव सर्व आले ।। भ्रमर निकर हे चक्रवाक समहर्षित बहु झाले ।।२।।

हंसहि मुक्ताफळे भक्षिती कमळांतरीची ।। त्रिपुर सुंदरी कांती पहा ही महपद्मिनीची ।।३।।

त्रिगुणाचा काकड आणिला ओवाळायला ।। द्वैत घृताने भिजउनी पावक तेजे उजळिला ।।४।।

आरती केली मनोभावे म्यां ही कौतुके ।।साक्षात्कार तुझा अपरोक्ष व्हावा अंबिके ।।५।।

इथे गाऊनी ओवाळतील भक्तजन कोणी ।।त्याला दर्शन अंबा नागशयनरुपिणी ।।६।।[२९५]

महालक्ष्मीची आरती

सतराव्या शतकाच्या पूर्वार्धातील रचनाकार मुक्तेश्वर यांनी रचलेली महालक्ष्मीची आरती [२९६] आजही महालक्ष्मीसमोर गायली जाते

जयदेवी जयदेवी जय महालक्ष्मी ।।वससी व्यापकरूपे तू स्थूलसूक्ष्मी ।।धृ।।

करविरपुरवासिनी सुरवरमुनिमाता ।। पुरहरवरदायिनी मुरहरप्रियकांता ।।

कमलाकारे जठरीं जन्मविला धाता ।। सहस्त्रवदनी भूधर न पुरे गुण गातां ।।१।।

मातुलिंग गदायुत खेटक रविकिरणीं ।।झळके हाटकवाटी पीयुषरसपाणी ।।

माणिकरसना सुरंगवसना मृगनयनी ।।शशिधरवदना,राजस मदनाची जननी ।।२।।

तारा सुगतागमीं(शक्ति अगम्या),शिवभजकां गौरी।।सांख्य म्हणती प्रकृती निर्गुण निर्धारी ।।

गायत्री निजबीजा निगमागम सारी ।। प्रगटे पद्मावती जिनधर्माचारी (निजधर्माचारी)।।३।।

अमृतभरिते सरिते,अघदुरितें वारी ।। मारी दुर्घट असुरां भव दुस्तर तारी ।।

---

[२९५] कुळकर्णी. १९९२ :पृ.७१

[२९६] गोखले,१९६७:पृ .३४१

वारीं मायापटल प्रणमत परिवारीं ।। हे रूप चिद्रूप तद्रूप दावी निर्धारी ।।४।।

चुतराननें कुश्चितकर्मांच्या ओळी ।।लिहिल्या असतिल माते,माझे निज भाळीं ।।

पुसोनि चरणातळीं पदसुमने क्षाळी ।।मुक्तेश्वर नागर क्षिरसागरबाळी ।।५।।

(रचयिता- मुक्तेश्वर)

शेजारती

निर्गुण निर्मल निष्कल जे, ते तु त्रिगुणा।। सर्वसाद्या तुजला म्हणतो जन सगुणा ।।

दिसते जव तव अंगी मणिगण जेवि गुणा ।।जाणति योगी-मुनिजन जाणुनी याच खुणा ।

जयदेवी जयदेवी जय चित्सुख सदनि।।जय करवीर-निवासिनी कमले शशिवदनी ।। जयदेवी ।।धृ।।

फिरती रवि-शशि गगनी, करि अंबुद वृष्टी ।। तुझेनि आज्ञे निर्मित कमलोद्भव सृष्टी ।।१।।

कमलाकर हरवांछित त्वत्करुणादृष्टी ।। त्वत्करलेखन हरि-हरि-विधिच्या अदृष्टी ।।जयदेवी ।।२।।

मस्तकि लिंग-महीधर हस्तकि दिव्यगदा ।। खेटक, हाटक, पात्रक मातुललिंग सदा ।

विलसे श्रीमुख सुंदर पहाता मोहमदा।।वारुनि दे सुख शाश्वत भवभय नाही कदा।।जयदेवी ।।३।।

व्युत्पत्ति-गर्व विसर्जुनि त्वत्पद जे ध्याती ।।तत्पर होउनि सत्पधि, चित्सुख ये हाती ।।

उत्पत्ति-प्रलयाविरहित अखंड जे राहती।।तत्पद शंकर नंदन स्तवितो दिनराती ।।४।। जयदेवी।।[२३७]

[२३७] कुळकर्णी, १९९२ ,पृ.७१-७२

विडा

निद्रा करि मंची जगदंबे । पालित भक्त कदंबे ।।धृ।।

साधन चतुष्टय खुरचार । गाते अर्थ रुचिर विणला सत्संगेसुंदर

श्रद्धातुलीवर।।१।। निद्रा करि मंची ।।

अद्वय भवित हे कुसुमाली अंबेवर अंथरली। अद्भुत बोध उसी लघुतुली।

विवेक विरक्ते भरली ।।२।।निद्रा करि मंची।।

अनुभव दीप महा सोज्वळ। अभ्यास हे तैल। वाती अहंममता प्रकाश ।

भासे अवगत मळ।।३।।निद्रा करि मंची।।

षड्रिपु सुपारी फोडुन। सवात्मक मन पान।अहंता जाळुन लावियले ।

जगदंबेवरि चूर्ण।।४।।निद्रा करि मंची।।

शुद्धबुद्धी हे जायफळ।लवंग तुर्या विमळ ।सत्व हा खादिर अति धवल।

अर्क गुणांच्या निर्मळ।।५।।निद्रा करि मंची।।

अंबे तांबुल हा घेणे । सर्वा आज्ञा देणे . श्रीरामचंद्र सहशयने ।

विनवी नारायण ।।६।। निद्रा करि जगदंबे ।।[२९८]

जोगवा

आम्हाला जायचं दूरवरी हो कोल्हापुरच्या बाजारी।।धृ।।

कोल्हापुरी जाईन। हळदी-कुंकू घेईन ।। आईला माझ्या वाहीन ।अंबेचे दर्शन घेईन ।।१।।

कोल्हापुरी जाईन । नारळ लिंबू घेईन।।जगदंबेला वाहीन। आईचे दर्शन घेईन ।।२।।

[२९८] कुळकर्णी. १९९२ .पृ.७३

कोल्हापुरी जाईन । साडी चोळी घेईन ।।ओटी आईची भरीन। अंबेचे दर्शन घेईन।।३।।

कोल्हापुरी जाईन । माळ परडी घेईन ।। जगदंबेला वाहीन। आईचं दर्शन घेईन ।।४।।

गोंधळ

श्री गणराया गोंधळाला या। रेणुकामायी गोंधळाला या ।।

करवीरच्या महालक्ष्मी गोंधळाला या। अंबामाता गोंधळाला या ।।

उदे उदे उदे ग अंबे उदे ।.

आम्ही अंबेचे गोंधळी।हाती घेतला भक्तीचा संबळ।।

द्वैताचे घालुनी तेल अहंभावाचा पाजळिला पोत।

षड्रिपुंचे पेटवुनी काकडे, घालितो आम्ही अंबेचा गोंधळ।।१।।

लावुनी अंबेचा अंगारा। द्वैत भाव मागे सारा।।

हाती घेता कवडी परडी। कोल्हासुराची नरडी मोडी।।

उदे ग अंबाबाई । भवसागर तरुनी नेई ।।२।।

आईचा ऐकुनी गोंधळ।जमले गगनी सारे सुरवर ।।

घालुनी अद्वैताची माळ। करु नवविध भक्तीचे नवरात्र ।।३।।

तू आदिशक्ति आदिमाया । तूच भगवती दुर्गा आणि चामुंडा।

शिवरायासाठी होसी भवानी। महाराष्ट्राच्या कुलस्वामिनि।

नमि तो तुझ्या चरणी ।।४।।

मिळुनी सारे भक्तगण । घालितो आम्ही अंबेचा गोंधळ।।[२९९]

[२९९] कुळकर्णी. १९९२:पृ.७३

(देवीच्या नित्य पूजा व उत्सवांचे वर्णन श्री.दा.वि.कुलकर्णी यांचे जावई नाबार्डचे जनरल मॅनेजर व श्रीपूजक चि.रा.चौधरी यांच्या लेखनातून घेतले आहे. देवीचे सर्व कार्यक्रम बघणे शक्य नसल्यामुळे पुस्तकातील बराच भाग तसाच घेतला आहे.)

महालक्ष्मी देवीच्या पूजे अर्चेत झालेले बदल जाणून घेण्यास आज तरी आपल्याजवळ काही पुरावे नाहीत. तरी महालक्ष्मी मूर्तीच्या डोक्यावरील लिंगयोनि तसेच मंदिराच्या वरच्या मजल्यावरील शिवलिंग त्याची होणारी नित्य पूजा यावरून तिचा शैव रूपाशी असलेला संबंध व शारदीय नवरात्रात अष्टमी दिवशी होणारी संधिकाल पूजा ,तिचा चौसष्ठ योगिनींशी असणारा संबंध यावरून कालमानाने देवीच्या पूजेत बदल घडून आला असावा असे वाटते. आज तिचे दिसणारे सात्विक रूप पूर्वीच्या काळातही होते याचा पुरावा आज उपलब्ध नाही,परंतु देवीभागवत व शाक्त तंत्रातील तिच्या या स्थानाला शक्तिपीठ वर्णिल्यामुळे नंतरच्या काळात तिचा तिरुपतीच्या बालाजीबरोबर जोडलेला संबंध यावरून तिचे आजचे हे वैष्णव रूप म्हणजे काळाच्या ओघात झालेला बदलच म्हणावा लागेल. तिच्या आज दिसणाऱ्या पूजाक्रमात संधिकाल पूजा सोडली तर सगळे पूजाविधी सात्विक स्वरूपातलेच दिसून येतात. परंतु ही पूजा करणारे पुजारी मात्र शैव संप्रदायी आहेत. ३०-४० वर्षांपूर्वी देवीस नवरात्रात अष्टमी दिवशी गुप्त नैवेद्य (मांसाहारी) दाखवण्यात येत असे असे काही स्थानिकांचे म्हणणे आहे, परंतु आताचे पुजारी ही देवी पूर्णतः सात्विकरूपात असल्याचे सांगतात.

कोल्हापुरची धार्मिक परंपरा

कोल्हापुर क्षेत्राचा धार्मिक दृष्टीने विचार करता या भागात प्राचीन काळी हिंदू, जैन व बौध्द या तीनही धर्मांचे अस्तित्व असलेले दिसून येते. उपलब्ध अभिलेखांद्वारे प्राप्त झालेल्या माहिती वरून निरनिराळ्या राजवंशांनी निरनिराळ्या देवदेवतांना वंदन करून सर्व धर्म समभाव दाखवल्याचे दिसून येते.

सातवाहन काल:

इ.स.१८७७ मध्ये कोल्हापुर शहराजवळील ब्रह्मपुरी येथील उत्खननात एका चैत्याचे अवशेष सापडले. यावरून इ.स. पूर्व २ ऱ्या शतकात कोल्हापुरात बौद्ध धर्म अस्तित्वात होता. सातवाहन सम्राट जरी वैदिक हिंदू असले तरी त्यांनी बौद्ध धर्माला राजाश्रय दिला होता. कोल्हापुरच्या वायव्येस असलेली पोहळ्याची लेणी इ.स. पहिल्या शतकातील बौद्ध लेणी आहेत.

यानंतर इ.स.५०० ते इ.स. ७५० याकाळात कोल्हापुर हे पूर्वीसारखे महत्वाचे स्थान असलेले दिसून येत नाही.

राष्ट्रकूट राजा अमोघवर्ष (प्रथम) हा जैन धर्मानुयायी होता. परंतू त्याच्या संजान ताम्रपटाद्वारे त्याने प्रजेच्या संरक्षणासाठी आपली स्वतःच्या डाव्या हाताची करंगळी महालक्ष्मीस अर्पण केली . त्याने बौद्ध विहारालाही देणग्या दिल्या.

शिलाहार काळ:

शिलाहारांच्या शासनकाळापासून पूर्वी होणारे मोठमोठे वैदिक यज्ञ बंद झालेले दिसतात. यावेळी हिंदू धर्मावर स्मृती, पुराणे व निबंधांमध्ये सांगितलेल्या कर्मकांडांचा प्रभाव झालेला दिसून येतो. पंचमहायज्ञ, व्रत आणि उपवास, मूर्तिपूजा, दान देणे अशा प्रकारचे विधी हिंदू धर्माची वैशिष्ट्ये झालेली दिसून येतात. पंचमहायज्ञात बलि,चरु(देवतांना अन्नार्पण),वैश्वदेव(विश्वदेवांची पूजा), अग्निहोत्र (शास्त्रोक्त पद्धतीने अग्नि सर्वकाळ ठेवून पूजा करणे) व अतिथीपूजन यांचा समावेश होतो. या

काळात पुराणोक्त देवतांची पूजाअर्चा प्रचलित होती, आणि मंदिरांची निर्मिती, पंचोपचारयुक्त पूजेची व्यवस्था, देवळात नंदादीप तेवत ठेवण्याची व्यवस्था, मठांना दानधर्म इ. प्रकारची धार्मिक कार्ये राजांनी केल्याचे कोरीव लेख व ताम्रपटाधारे दिसून येते.

कोल्हापुर शिलाहारांच्या (इ.स.११ वे शतक)लेखांद्वारे शिलाहार राजे स्वत:स जरी महालक्ष्मीचा वर लाभलेले महालक्ष्मीचे असीम भक्त असले तरी त्यांनी जैनधर्मीयांशी विवाह करून जैन धर्माबद्दलची आपुलकी व्यक्त केली. कोल्हापुरचे शिलाहार शिवभक्तही होते. दूरदूरच्या शैव मुनींना आपल्या राज्यात आदराने बोलावून त्यांना ग्रामदाने दिलीत. शैव पंथाचे शैव, पाशुपत, कालामुख व कापालिक असे चार पंथ होते. शिलाहार नृपति मारसिंह याच्या ताम्रपटात[300](मिरज ताम्रपट शके ९८०)) पाशुपत पंडित ब्रह्मेश्वराची स्तुती केली आहे. शिव व इतर पौराणिक देवतांच्या पूजेत **अंगभोग** व **रंगभोग** यांची पद्धत होती . अंगभोगात जलस्नान, चंदनलेप, पुष्प, अक्षता,धूप,दीप, नैवेद्य व तांबूल अशी अष्टविधी अर्चना होती. **रंगभोग** म्हणजे यात भजन ,गायन,नर्तन, कीर्तन इ.चा समावेश होता. इ.स.११०६ चा चालुक्य राजा विक्रमादित्य सहावा याचा अधिकारी सोमन्नेय याने आपल्या पत्नी व मुलासह महालक्ष्मीचे दर्शन घेतले त्यावेळी महालक्ष्मीच्या अंगभोगासाठी कुंभरगाव दान दिल्याचे उल्लेख आहे.

शिलाहार गंडरादित्याने[301] प्रयाग येथे लक्ष ब्राह्मणांना भोजन घातले (ताळले ताम्रपट,श.स.१०३३), त्याने अजुरिका येथे जिनालय बांधले व त्याचा सामंत निंबदेवरस याने कोल्हापुरात जैनांच्या बसदीची निर्मिती केली[302](कोल्हापुर लेख, श.स. १०५८). गंडरादित्याने इरिकुडी येथे तलाव खोदून त्यास गंडसमुद्र असे नाव दिले व त्याच्या काठावर बांधाशेजारी हिंदू, बौद्ध व जैन धर्माची देवालये बांधली(ताळले ताम्रपट,पूर्वोक्त). कोल्हापुरजवळ पंचगंगा नदीच्या काठी ब्रह्मपुरी उपनगरात खेडादित्याच्या देवालयास दान दिले[303](कोल्हापुर ताम्रपट, श.सं.१०४८).शिलाहार राजा विजयादित्यानेपार्श्वनाथ तीर्थंकराच्या बसदीच्या डागडुजीसाठी दान दिले[304](कोल्हापुर

[300]सी.आय.आय., खंड ६,पृ.२००-२०६

[301] पूर्वोक्त ,पृ.२०७-२१५

[302]पूर्वोक्त, पृ.२२१-२३५

[303]पूर्वोक्त , पृ.२२४-२२९

[304]पूर्वोक्त ,पृ.२४१-२४६

शिलालेख,श.सं.१०६५). द्वितीय भोज याने महालक्ष्मी देवालयाच्या पश्चिमद्वाराजवळील उमामहेश्वराच्या मठासाठी ब्राह्मणांना दान दिल्याचे उल्लेख आहेत[305] (कोल्हापुर शिलालेख,श.सं.११०४).श.सं. १११२-१११५च्या कोल्हापुर शिलालेखात[306] अमृतेश्वरासाठी दिलेल्या दानाबरोबरच महालक्ष्मीच्या त्रिकाळ नैवेद्यासाठी दान दिल्याचा उल्लेख आहे.

यादव काळ:

शिलाहार काळात कोल्हापुरच्या महालक्ष्मीस मिळालेले वैभव त्यानंतर आलेल्या यादव वंशीय राजांनी वृद्धिंगतच केले. महालक्ष्मी मंदिराच्या आवारातील गणपती देवळाच्या खांबावरील इ.स.१२१८च्या लेखात[307] महालक्ष्मीचे वर्णन केले आहे व देवालयासमोर तैलण नामक व्यक्तीने भव्य तोरण बांधल्याचा उल्लेख आहे. इतर राजांच्या शिलालेखातही महालक्ष्मी व त्याबरोबर महाकालीचाही उल्लेख आला आहे[308]. यादव काळात वैष्णव धर्माच्या महानुभाव या नवीन पंथाचा उदय झाला .त्याचवेळी कर्नाटक प्रदेशामध्ये उदयाला आलेल्या वीरशैव संप्रदायाची यादव वंशाच्या शासनकाळात महाराष्ट्रामध्ये सोलापुर, नांदेड ही मोठी केंद्रे होती. यादव राजा भिल्लम पाचवा व सिंघण द्वितीय हे शैव पंथातील कालमुख पंथाचे आश्रयदाते होते.

सुल्तानी काळ:

यादव काळानंतर या भागाची राजसत्ता मुसलमानांच्या हाती गेली व ब्रह्मपुरीवर मुसलमान वस्ती झाली , याच काळात हिंदू धर्मावर अवकळा पसरली. मंदिरांची नासधूस झाली. एव्हढेच नव्हे तर कोल्हापुरातील महालक्ष्मीसही आपले स्थान काही काळासाठी सोडावे लागले.

---

[305] सी.आय.आय ..खंड६.पृ.२५८-२६३

[306] सी.आय.आय. .खंड६.पृ.२६४-२६७

[307] मिराशी. भा.इ.सं.मं.. १९५७ .पृ. १७-१९

[308] ग्रॅहम,१८५४:पृ.३३०,४२६

मराठा काळ:

शिवाजीच्या काळात कोल्हापुर व आसपासचा भाग शिवाजी व मोगलांच्या धुमश्चक्रीतच राहिला. शिवाजी महाराजानी स्वतंत्र राज्य स्थापल्यानंतर लवकरच त्यांचे निधन झाले. काही काळानंतर त्यांची सून ताराराणी (इ.स.१७००-१७६१) हिने राज्यकारभार संभाळला. त्यानंतर राज्याची घडी नीट बसविण्यास सुरवात झाली. छत्रपती घराण्याची गादी १८व्या शतकाच्या उत्तरार्धात स्थिरस्थावर झाल्यावर कोल्हापुरात राजोपाध्याय व पंडितराव घराण्यांनी सर्व प्रकारच्या श्रौत स्मार्त विद्यांचा अध्ययन व अध्यापनाला राजाश्रय मिळवून दिला.

करवीर राज्य संस्थापिका ताराबाई हिने अष्टप्रधानांची निवड करून त्यांना लहान मोठ्या जहागिरी दिल्या होत्या. त्यापैकी पंडितराव ही उपाधी श्री शंकराचार्य मांगलेकर यांना दिली. काही प्रसंगानी जनतेमध्ये निर्माण होणाऱ्या विवादात्मक प्रश्नांची स्मृतिग्रंथांच्या आधाराने वैदिक व धार्मिक परंपरेचा अभ्यास करून उत्तरे शोधावी असा त्यामागचा हेतू होता. थोरले शहाजी राजे यांच्यापासून परंपरेने चालत आलेले राजोपाध्ये पद आर्वीकर मल्हार भट यांच्या कोल्हापुरातील वंशजाकडे कायम ठेवले होते. छत्रपती घराण्यात खाजगीकडे जी नित्य व नैमित्तिक धर्मकृत्ये सतत चाललेली असत त्याकडे लक्ष देवून निरनिराळ्या ब्राह्मण वर्गाकडून ती निर्विघ्नपणे पार करून घेण्याची जबाबदारी राजोपाध्ये यांची होती. ग्रामजोशी ही पदवी धारण करणाऱ्या व्यक्तीकडे करवीर क्षेत्रातील काही धार्मिक परंपरा सोपविण्यात आल्या. देवीच्या नवरात्र व इतर उत्सवात त्यांचा ग्रामजोशी म्हणून आजही सन्मान केला जातो.

अशा प्रकारच्या वातावरणात व अशा व्यवस्थेमुळे कोल्हापुरात अनेक शास्त्रांत पारंगत अशी घराणी निर्माण झाली. त्यांत वामन पंडित,सामराज,मुक्तेश्वर,मोरोपंत यांचा उल्लेख करता येईल.

गेल्या दोनशे वर्षातील जुनी ऐतिहासिक कागदपत्रे जर थोडी नजरेखाली घातली तर त्यावरुन असे दिसून येते की या करवीरक्षेत्री वेदशास्त्रांच्या अनेक पाठशाळा उत्साहाने चालविल्या जात असून

त्यांना राजाश्रय व लोकाश्रयही मोठा होता[३०१]. खुपरेकरांनी आपल्या लेखात दिलेल्या उताऱ्यावरून वेगवेगळ्या पाठशाळा कोल्हापुरात कार्यरत होत्या असे दिसते.उदा.जनार्दन भट्ट अग्निहोत्री यांच्या घरी वेदाची शाळा, रावजी बिन्न आत्मारामभट पराडेकर यांच्या घरी शास्त्राची शाळा ,बाबाशास्त्री द्रवीड यांचे घरी आपस्तंब व शास्त्राची शाळा.दाजीकाका जोशी यांच्या घरी शास्त्र व ज्योतिष यांच्या शाळा चालविण्यात येत असत. निरनिराळ्या ठिकाणी पाठशाळांमधून विकृतीसह ऋग्वेद व यजुर्वेद,व्याकरण,न्याय,साहित्य,काव्य,ज्योतिष,वेदांत इ. प्राचीन संस्कृत वाङमयांचे शिक्षण दिल्या जात असे. काही ठिकाणी विनामूल्य तर काही ठिकाणी मूल्य घेवून हे शिक्षण दिल्या जात असे.

श्री शंकराचार्य जगद्गुरू यांच्या कोल्हापुरातील पीठवास्तव्यामुळे देखील वैदिक विद्याभ्यासास चालना मिळाली. इ.स.१४व्या शतकात विजयनगर साम्राज्याची स्थापना झाल्यावर धर्म प्रसाराच्या कार्यासाठी विद्यारण्यस्वामी यांनी आठ शंकराचार्यांच्या उपपीठांची स्थापना केली.त्यात करवीर संकेश्वर पीठाचा समावेश आहे. या पीठाचे पहिले गुरू विद्या शंकरभारती हे होत. इ.स. १९०५ पर्यंत हे पीठ संकेश्वर करवीरपीठ या जोडनावाने ओळखले जाई. त्यानंतर मात्र दोन्ही वेगवेगळी झाली व दोन्ही मठ स्वतंत्र कारभार पाहू लागले. इ.स.१७७६ मध्ये कागवडचे कान्हेरराव पटवर्धन यांनी मठ लुटला व जाळला. त्यात मठाची सर्व जुनी कागदपत्रे नष्ट झाली . त्यानंतर या मठाची पुनर्बांधणी करण्यात आली. धार्मिक बाबीतील न्याय निवाड्यामध्ये शंकराचार्य पीठ,कोल्हापुरातील ब्राह्मण वृंद यांचे फार मोठे योगदान आहे.

प्राचीन विद्यांच्या शिक्षणसंस्था जशा लोकाश्रयावर चालविल्या जात तशाच राजाश्रयाखाली अनेक शिक्षण संस्था स्थापित झाल्या.चतु:शास्त्रीय ब्राह्मण विद्यार्थ्यांना षडंगवेदाचे शिक्षण देणारे वेदमूर्ती नारसिंह भट,गुळवणी,नरसिंहाचार्य, घळसासी,शंकरभट फळसणकर,नाना वडणेगेकर,भाऊभट येडूरकर,विठ्ठलभट स्मार्त,सितारामभट हळदीकर,गुंडाचार्य कट्टी, विष्णूभट धर्माधिकारी,दत्तभट सदलगेकर,बाळभट्ट धर्माधिकारी,बाळाचार्य घळसासी,नारायणभट सेवेकरी,त्र्यक्शास्त्रीय बाळंभट इ.

---

[३०१] खुपरेकर,१९४०: पृ.१४१

पंडितांचा त्यांच्यात्यांच्या घरी व सामुदायिकरीत्या महालक्ष्मीमंदिराच्या आवारात नित्य वेदघोष होत असे[३१०] धार्मिक कार्यासाठी व शिक्षणासाठी महालक्ष्मी देवालय हे केंद्रस्थान होते.

१८व्या शतकाच्या उत्तरार्धात व्याकरण, साहित्य व धर्मशास्त्राच्या दोन मोठ्या पाठशाळा चालविल्या जात होत्या. पहिली पाठशाळा धर्मसिंधूकार बाबा पाध्ये यांच्या वंशातील विद्वानांची व दुसरी पाठशाळा पंडितराव घराण्यातील बाळाकांताचार्य यांची होती. कांताचार्यांचे लवकरच निधन झाल्यावर त्यांची शाळा बंद पडली परंतू पाध्ये यांची शाळा सुरू राहून आत्माराम शास्त्री पित्रे यांनी ती पुढे चालू ठेवली व या शाळेमधूनच विद्यावाचस्पती राशिवडेकर पंडित दत्ताशास्त्री लेले यांच्यासारखी मोठी माणसे उदयास आली[३११]

संस्थानकाळातील न्यायमूर्ती कृष्णाचार्य पंडितराव यांच्या घरी धार्मिक वाङ्मयाचे स्वतःचे ग्रंथालय होते .त्याठिकाणी कोल्हापुरातील ज्येष्ठ मंडळी एकत्र जमून अनेक विषयावर चर्चा करीत. त्यातूनच पुढे ब्राह्मणसभेची निर्मिती झाली व ही संस्था कोल्हापुरात आजही कार्यरत आहे.

२०व्या शतकात राष्ट्रीय संस्कृत पंडित हा मान मिळविण्याऱ्या पंडित बाळशास्त्री खुपरेकर यांचा संस्कृत वाङ्मयाचा,नैतिक परंपरेचा व कर्मकांडाचा गाढा असा त्यांचा अभ्यास होता.

आदिनारायण परंपरा (मध्वाचार्य आद्यगुरू)व आदिनाथ परंपरा (आद्य शंकराचार्य) अशा दोन परंपरा कोल्हापुरात कार्यरत होत्या. या दोन विष्णू व शंकराला मानणाऱ्या परंपरेतील क्रियाकर्म करणारे अनेक विद्वान २०व्या शतकात कार्यरत होते. यांच्यापैकी काहीजण आजही कोल्हापुरात कार्यरत आहेत[३१२] .

१८-१९व्या शतकात महालक्ष्मी मंदिरातील गरूडमंडप धार्मिक विचारांचे व्यासपीठ बनले होते. या मंडपात ह.भ.प. नरहरबुवा फलटणकर यांच्या सारख्या दिग्गजांचे महाभारतावर अर्थनिरूपण होत

---

[३१०] खुपरेकर,१९४० ,पृ.१४८

[३११] पूर्वोक्त. पृ.१५१

[३१२] देगलूरकर.स्वणे.२०१० . पृ.२६०

असे. पंडित प्रवर वासुदेव शास्त्री यांचे विठ्ठल मंदिरातील सभा मंडपात नित्य श्रीमद् भागवतपुराण होत असे. याच सभा मंडपात तात्यासाहेब सांगलीकर हे नित्य भागवतावर प्रवचन करीत.

महालक्ष्मी मंदिरातील गायन

रोज सकाळी ८ ते साडेआठ महालक्ष्मी मंदिराच्या सभा मंडपातील एका कोपऱ्यात आजही गावयाचे गायन ऐकण्यास मिळते. महाराष्ट्रातील व कर्नाटकातील एकही असा गायक नसेल ज्याने महालक्ष्मी मंदिरात येवून देवीचे दर्शन घेवून देवीस आपल्या गायनाची कुसुमांजली अर्पित केली नसेल.१९-२०व्या शतकात भूर्जि खां (१८९०-१९५०) अल्लादियां खान (इ.स.१८५५-१९४६) देवीच्या दरबाराचे गवई होते.विश्वनाथबुवा (इ.स.१८९८-१९६४) हे देखील दरबारी गवई होते.

कोल्हापुर क्षेत्रातील अशा लौकिक परंपरा व धार्मिक इतिहासाचा मागोवा घेताना आजची कोल्हापुरची परिस्थिती डोळ्यासमोर येते. आता या परंपरेस एक प्रकारचे व्यावसायिक स्वरूप प्राप्त झाले आहे. चरितार्थाचे साधन म्हणून वरवर वैदिक अभ्यास करण्याच्या प्रवृत्तीत वाढ होत आहे .

प्रकरण ७

मार्कंडेय पुराणातील आगम संप्रदाय मूळ अस्तित्वात होता काय?

काळाच्या बदलत्या ओघात देवदेवतांची संकल्पना बदलत गेल्याचे दिसून येते. वैदिक, ओपनिषदिक, पुराणकाळांत जगताच्या आदितत्वाची कल्पना, देवदेवतांचे पूजन व आध्यात्मिक विचारधारणा ही वेगवेगळ्या स्वरूपात समोर आली. विश्वाच्या उत्पत्तीचे मूळ जाणून घेण्याच्या मागे अनेक संकल्पना रूढ झाल्या. वैदिककाळात निसर्गाला प्राधान्य देऊन उषस, द्यौः, पृथ्वी, इंद्र या देवतांची पूजा यज्ञात होमाद्वारे आहुती देऊन करीत असत. वेद, यज्ञयाग, यांना महत्व होते. आरण्यक, उपनिषदकाळात फक्त यज्ञयाग केल्याने संसारचक्रातून मोक्षाची प्राप्ती होत नसून देवऋण, ऋषिऋण व पितृऋणातून मुक्त होण्यासाठी चार पुरुषार्थांची कल्पना अस्तित्वात आली. कर्म, ज्ञान, ध्यान व भक्ती हा वेदांताचा सार म्हणता येईल. वैदिक पद्धतीने धर्माचार म्हणजे निगम. नंतरच्या काळात वैदिक पद्धती मागे पडून आगम संप्रदाय वाढीस लागला. आदितत्त्व ब्रह्माची सगुण वा निर्गुण रूपात पूजा करण्याची पद्धत सुरू झाली. ही उपासना साधकाने गुरुच्या सहाय्याने करावयाची. आगमात परमतत्त्वासच देव मानून त्याच्यापासून सर्व देवतांची निर्मिती झाली त्याचे त्यांच्याद्वारे तो विश्वाची निर्मिती, पालन पोषण व संहार करतो अशी कल्पना आहे व या लोकात ज्याज्यावेळी धर्माचा ऱ्हास होईल त्यात्यावेळी देव वेगवेगळ्या रूपात भूतलावर अवतरून दुष्ट शक्तींचा नाश करतो अशी अवतारवादाची नवीन संकल्पना आगमात विकसित झाली. आगमात शैव, वैष्णव व शाक्त असे संप्रदाय अस्तित्वात आले व अशारितीने वेदांतात सांगितलेल्या तत्वज्ञानापेक्षा वेगळा विचार प्रवाह रूढ झाला. एक मूळ देवता (शिव, विष्णू वा देवी) विश्वाच्या निर्मितीचे कारण असून त्या मुख्य देवतेतून सर्व देवतांची व विश्वाची निर्मिती, पालन व संहार होतो व ज्याज्यावेळी भूतलावर धर्मावर संकट येते त्यात्यावेळी ती देवता वेगवेगळ्या स्वरूपात मानवाचे रक्षण करते अशा प्रकारचे तत्वज्ञान महाकाव्ये व पुराणांतून सांगण्यात आले. शैव, वैष्णव वा शाक्त धर्मानुसार शैवागम, वैष्णवागम व शाक्त आगम यांचे ग्रंथ निर्माण होऊन त्यातून देवदेवतांचे पूजन, त्यांच्या स्तूतींमधून तत्वज्ञान यांचे विस्ताराने विवेचन करण्यात आले. शाक्त धर्मामध्ये महालक्ष्मीस मूळ प्रकृती मानून तिची व तिच्या रूपांची पूजा करण्यात आली.

मातृदेवता यांचे पूजन करण्याची परंपरा हरप्पा संस्कृतीपासून सुरू असलेली दिसून येते. स्त्रीमधील प्रजननशीलतेच्या तत्वावरून नवीन जीवाची निर्मिती करणारी अशा अर्थाने तिला हरप्पा संस्कृतीत एक वेगळ्या स्वरूपाचे स्थान मिळून ती घराघरात पूजिल्या जाऊ लागली. ऋग्वेदातील अदिती, उषस्,पृथ्वी या देवतांची वर्णने व देवीसूक्त यावरून स्त्रीदेवतेस जरी देवतारूपात स्थान असले तरी हे स्थान गौण स्वरूपात असलेले दिसते. शक्तिदेवतेच्या या संप्रदायाची सुरवात नक्की कधीपासून झाली याबद्दल निश्चित असा पुरावा आज उपलब्ध नाही. आभिलेखातील पुराव्यांवरून इ.स. ४ थ्या शतकाच्या पूर्वी शक्ती संप्रदाय अस्तित्वात नव्हता. गुप्तकाळापासून स्त्री देवतांच्या अंकनाची सुरवात झालेली दिसून येते. शक्ती संप्रदायात तंत्रांचा अवलंब इ.स.च्या ७ व्या शतकापासून सुरू झाला व याच वेळेपासून स्त्रीदेवतेस आद्यशक्ती मानून तिच्या निरनिराळ्या रूपांचे पूजन सुरू झाले.

मार्कंडेय पुराण या पुराणग्रंथात शक्तिसंप्रदायाचे मूळ दिसून येते.**मार्कंडेय पुराणातील देवीमाहात्म्य** या प्रकरणात एकूण ५७८ श्लोक असून हवनाच्या सोयीसाठी उत्तरकालीन तंत्रसाहित्यात या श्लोकांचे ७०० श्लोकांत विभाजन करण्यात आले .राजा सुरथ व समाधी वैश्य यांच्यावर आलेल्या आपत्तीचे निराकरण करण्यास मार्कंडेय ऋषींनी त्यांना देवीची पूजा अर्चा करण्यास सांगितले. देवीचे माहात्म्य त्यांना पटवून दिले. याच **देवीमाहात्म्यानंतरच्या** प्राधानिक रहस्यात या देवतांचे पूजन व वैकृतिक रहस्यात तिच्या व परिवार देवतांच्या रूपांचे वर्णन केले आहे.

मार्कंडेय पुराणातील ही आगम परंपरा शक्तिसंप्रदायाचे मूळ असून ज्या ज्या ठिकाणी या देवतांची स्थापना झाली त्या त्या ठिकाणी देवतांचे पूजन ग्रंथात सांगितल्याप्रमाणे होत असावे. काळाच्या ओघात या संप्रदायात येणाऱ्या तंत्राच्या जोडीने पूजेअर्चेस एक वेगळे वळण लागले. पुढे या पूजनात वामाचारातील पंचमकारांचा लौकिक अर्थाने लावलेल्या अन्वयामुळे या संप्रदायास कलाटणी मिळून जनमानसात या संप्रदायाबद्दल घृणा निर्माण झाली व ती हळूहळू ह्या संप्रदायाच्या ऱ्हासास कारणीभूत झाली.

मार्कंडेयपुराणातील वर्णनाप्रमाणे महालक्ष्मी हीस आद्यशक्ती मानून तिच्यापासून सर्व देवदेवतांची निर्मिती झाली. विश्वाची वा सृष्टीची निर्मिती , तिचे पालन पोषण व संहार करणारी तीच आद्यशक्ती आहे. गीतेतील तत्वाप्रमाणे ज्या ज्या वेळी भूतलावर असुरांचे साम्राज्य वाढेल त्या त्या वेळी ही देवता वेगवेगळी रूपे घेऊन पृथ्वीतलावर अवतरेल व विविध रूपात पूजिली जाईल अशी श्रद्धा व धारणाही निर्माण झाली.

देवीमाहात्म्य हा स्तोत्रपर ग्रंथ देवीच्या महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वती या तीन रूपांचे वर्णन करणारा आहे. या तीन रूपांच्या पराक्रमाचे व त्यांच्या माहात्म्याचे वर्णन प्रथम चरित्र (अध्याय १), द्वितीय चरित्र (अध्याय २-४) व तृतीय चरित्र (अध्याय ५-१३)अशा स्वरूपात आढळते. ११व्या अध्यायात नारायणीस्तुती व भविष्यकाळातील अवतारांचे वर्णन केले आहे. प्राधानिक रहस्यात (अध्याय-१४)महालक्ष्मीपासून महाकाली,महासरस्वती,विष्णू,ब्रह्मा व महेश आदि देवतांची निर्मिती,त्यांची विविध नावें व त्यांची विविध कार्ये यांचे वर्णन आले आहे. वैकृतिक रहस्यात (अध्याय-१५) महाकाली,महालक्ष्मी व महासरस्वती यांचे पूजन, चंडीपाठ,होमहवन,देवीचे नित्यपूजन यासंबंधी सविस्तर वर्णन आले आहे तर मूर्तिरहस्य प्रकरणात (अध्याय-१६) महालक्ष्मीच्या अवतारांची(नंदा,रक्तदंतिका, शताक्षी, भीमादेवी व भ्रामरी) वर्णने व मंत्रसिद्धी यांचे वर्णन आले .

देवीमाहात्म्यातील पहिल्या अध्यायात विष्णूच्या देहातून महाकाली अवतीर्ण होऊन तिने मधु कैटभ या असुरांचा वध विष्णूच्या हस्ते करविला.दुसऱ्या अध्यायात महालक्ष्मीचे महिषासुर राक्षसाचा वध करण्यासाठी घेतलेले रूप वर्णिले आहे. महिषासुराचा वध करण्यास ब्रह्मा,विष्णू व महेशाच्या तेजापासून महालक्ष्मीची निर्मिती झाली व सर्व देवतांनी तिला आपली आयुधे व अलंकार समर्पित केले. मध्यम चरितात महिषासुराचा वध करणारी महालक्ष्मी १८ हातांची असून तिने हातांत अक्षमाला,परशू,गदा,बाण,कुलिश,पद्म,धनुष,कुंडिका,दंड,शक्ती,खड्ग,चर्म,शंख,घंटा,मधुपात्र,शूल पाश व चक्र (अ.२ श्लोक)अशी आयुधे धारण केली आहेत. अष्टादशभुजा महालक्ष्मी हिने सिंहावर आरूढ होऊन महिषासुराचा वध केला.पाचव्या अध्यायात पार्वतीच्या देहापासून महासरस्वती निर्माण झाली व तिने शुंभ व निशुंभ राक्षसांचा वध केल्याची कथा आली आहे.

विश्वनिर्मिती संकल्पना :

महालक्ष्मी हीस आद्यशक्ती, त्रिगुणात्मकस्वरूपी मानून तिच्यापासून सर्व देवदेवता व विश्वाची निर्मिती झाली अशा प्रकारची संकल्पना या माहात्म्यात मांडली आहे.

त्वयैतत्पाल्यते देवि त्वमत्स्यन्ते च सर्वदा

विसृष्टौ सृष्टिरूपा त्वं स्थितिरूपाच्च पालने ।।अ.१-७६[३१३]

(तुझ्याकडूनच या जगाचे पालन होते आणि हे देवी तूच कल्पांती या जगाचा संहार करते. जगाच्या उत्पत्तीचेवेळी तूच सृष्टीरूप होतेस रक्षणकाळी तूच स्थितीरूप होते.

या विश्वाच्या निर्मितीसाठी महालक्ष्मीने आपल्या तमोगुणाने महाकालीची निर्मिती , सत्वगुणाने महासरस्वतीची व राजस गुणाने लक्ष्मीची निर्मिती केली. या दोघींना महालक्ष्मीने एक स्त्री व एका पुरूषाची निर्मिती करण्यास सांगितले. त्याप्रमाणे महाकालीने रूद्र व सरस्वती यांची निर्मिती ,लक्ष्मीने ब्रह्मा व लक्ष्मी व महासरस्वतीने विष्णू व गौरी यांची निर्मिती केली.

महालक्ष्मी

|

महाकाली		लक्ष्मी		महासरस्वती	
(तमस)		(राजस)		(सत्व)	
रूद्र	सरस्वती	ब्रह्मा	लक्ष्मी	विष्णू	गौरी

[३१३] वाडेकर,१९९७

महालक्ष्मीने ब्रह्यास सरस्वती, विष्णूस लक्ष्मी व रुद्रास गौरी देऊन विश्वाची निर्मिती पालन व संहार याची जबाबदारी दिली. **देवीमाहात्म्या**तील प्राधानिकरहस्यात महालक्ष्मीच्या रूपाचे वर्णन आले आहे.

सर्वस्याद्या महालक्ष्मीस्त्रिगुणा परमेश्वरी ।

लक्ष्यालक्ष्यस्वरूपा सा व्याप्य कृत्स्नं व्यवस्थिता ।।४।।

मातुलिङ्गं गदां खेटं पानपात्रं च बिभ्रती ।

नागं लिङ्गं च योनिं च बिभ्रती नृप मूर्द्धनि ।।५।।[३१४]

सत्व.रज व तमस् गुणांनीयुक्त सृष्टीची आदिकारण ,निष्कल व सकल रूप संपूर्ण विश्वाला व्यापून राहणारी अशी महालक्ष्मी आहे. तिच्या हातात महाळुंग,गदा,खेटक व पानपात्र आहे. नाग, लिंग व योनि तिने मस्तकावर धारण केले आहेत.

वैकृतिक रहस्यातील (श्लोक ७-१२) महालक्ष्मी १००० हातांची श्वेत आनन,श्वेत स्तन, लाल ओठ,काळ्या जंघा व पाय, लाल पावले असलेली अशी देवी आहे.

वैकृतिक रहस्यात महालक्ष्मीचे पूजन करताना तिच्या उजव्याबाजूस महाकाली व डाव्याबाजूस महासरस्वती असावी .राजा सुरथ व समाधी वैश्याने महालक्ष्मीची मातीची मूर्ती स्थापून तिची पूजा केली व देवीस आपल्या रक्ताची धार वाहिली. वैकृतिक रहस्यात देवीस बलि देण्याचे प्रयोजन आहे, परंतु हा बलि ब्राह्मणाने न देता क्षत्रियाने द्यावा असे सांगण्यात आले आहे.याचा अर्थ असा की देवीस बलि देण्याची प्रथा सुरवातीपासूनच अस्तित्वात होती. पण स्मार्त परंपरेत शक्तिपूजा सामावली गेली.नंतर पूजेला सौम्य रूप प्राप्त झाले.

महालक्ष्मी मंदिरातील पूजापद्धती :

मार्कंडेय पुराणतील **देवीमाहात्म्या**त सांगितलेली पूजा आज कोल्हापुरातील देवालयात सुरू आहे की नाही हे पडताळून पहाता मुख्यत्वे काही गोष्टींचा विचार करावयास हवा.

---

[३१४] चित्राव.१९८३ .पृ.२६०

महालक्ष्मी देवालयाचा निर्माण ९ व्या शतकात धरला तर त्याकाळातील त्या मंदिरातील तिच्या पूजाअर्चेचे पुरावे आज उपलब्ध नाहीत असेच म्हणावे लागते. आज कोल्हापुरातील मंदिरात होणारी पूजा ही लोकांच्या श्रद्धा व परंपरेतील बदलाने बदलत गेलेली दिसून येते. याचा उहापोह नंतर होईलच.राष्ट्रकूट राजा अमोघवर्षाच्या काळातील ताम्रपटात त्याने महालक्ष्मीस आपली करंगळी दान केल्याचा उल्लेख आहे. **देवीमाहात्म्यात** राजा सुरथ व वैश्य समाधी याने देवीचे पूजन केल्यावर तीस आपल्या रक्ताचा बलि दिला. वैकृतिक रहस्यात देवीस बलि देण्याचे प्रयोजन आहे परंतू हा बलि ब्राह्मणाने न देता क्षत्रियाने द्यावा असे सांगण्यात आले आहे.याचा अर्थ असा की देवीस बलि देण्याची प्रथा सुरवातीपासूनच अस्तित्वात होती. आज मात्र कोल्हापुरच्या महालक्ष्मीस पशुबलि दिल्या जात नाही. देवीस पुरणपोळी, खीर याचा नैवेद्य केला जातो. गरुडमंडपात होणाऱ्या देवीसमोरील गोंधळात(तुळजापूरच्या देवीला गोंधळानंतर बकऱ्याचा बळि दिल्या जातो) देखील पशुबलि देत नसून पुरणपोळीचा नैवेद्य दाखवला जातो.

मार्कंडेय पुराणातील **देवीमहात्म्यात** वर्णिलेली आद्याशक्ती हीच महालक्ष्मी,महाकाली व महासरस्वती रूपात कोल्हापुरातील मंदिरात नांदत आहेत.**देवीमाहात्म्यातील** प्राधानिकरहस्यात वर्णन केलेली महालक्ष्मी मूर्त स्वरूपात आपणास कोल्हापुरच्या महालक्ष्मी देवालयात दिसून येते. प्राधानिक रहस्यात वर्णन केलेली महालक्ष्मी ही चतुर्भुज असुन तिच्या हातांत दक्षिणाधःकरक्रमाने महाळुंग,गदा खेटक व पानपात्र आहे. तिच्या मस्तकावर सयोनि लिंग आहे. वर्णनातील मूर्तीच्या मस्तकावरील सयोनि लिंगावर नाग आहे तो मात्र महालक्ष्मी देवालयातील मूर्तीवर आज दिसत नाही. हेमाद्रीच्या **चतुर्वर्गचिंतामणि** या ग्रंथात अशाप्रकारची मूर्ती इतरत्र बसवू नये असे सांगितले आहे.

आज महालक्ष्मीच्या देवळात आपणास मध्यस्थानी महालक्ष्मी तर तिच्या उजव्याबाजूस महाकाली व डाव्याबाजूस महासरस्वती दिसते. महाकाली व महासरस्वतीची रूपे आज तरी प्राधानिक रहस्यात सांगितल्याप्रमाणे नाहीत. सुल्तानी आक्रमणाच्याकाळात मूर्तींना होणारी क्षति यांचा अंदाज घेऊन कदाचित त्या मूर्तींचे स्थलांतरण करण्यात आले वा काळाच्या ओघात त्या नष्ट झाल्या असाव्यात आज या दोन्ही मंदिरातील मूर्ती १८व्या शतकातील आहेत.

वैकृतिक रहस्यात नवचंडी,शतचंडी,सहस्त्रचंडी यासारखे होम घालण्याच्या पद्धतींचे वर्णन आले आहे .

महाराष्ट्रातील शाक्त संप्रदायाचा इतिहास कालौघात नष्ट झाला आहे. या संप्रदायाच्या पजापद्धती किंवा इतर माहिती आज उपलब्ध नाही. मध्यपूर्वकाळात महाराष्ट्रात शक्तिसंप्रदाय ,त्यातील मंत्र,तंत्र इ. अस्तित्वात असल्याचा पुरावा आपणास देता येतो. माटे[३१५]यांच्या शब्दात 'Literate of several marathi saints contain several references to *Śakti* worship. However, there is little evidence to believe that these orthodox practices are presently crrent at any *Śaktipītha* of Maharashtra".

आगम संप्रदायाप्रमाणे देवीच्या तीन तऱ्हेच्या पूजा आहेत. १) नित्य पूजा २) नैमित्तिक पूजा व ३) काम्य पूजा .

"*Tantra* advice to perform each act of worship with the spirit of devotion . *Nitya* is a compulsory duty.*Kāmya* is meant for the flfilment of perticular desire and *Naimittika* done on special occasions like rites on special months and *tithīs* and on days on eclipse etc."[३१६]

आगमांप्रमाणे ढोबळमानाने प्रचलित असलेल्या या पूजा आज आपणास महालक्ष्मी मंदिरात पहावयास मिळतात.

नित्य पूजा- उष:काल पूजा (सकाळी ६ वाजता) यास स्थानिक भाषेत काकडआरती म्हणतात. २) उपसंधी (सकाळी ८ वाजता) यास सकाळी साडेआठची पूजा म्हणतात. ३) माध्यान्ह पूजा (सकाळी ११.३० वाजता) व अलंकार पूजा (दुपारी २ वाजता) ४) प्रदोष (सायंकाळची पूजा)(रात्री ८ वाजता) ५)अर्धयाम वा शेजारती (रात्री १० वाजता).

---

[३१५]माटे . पृ.४७

[३१६]चक्रबोर्ती. १९९६.पृ.१७६

नैमित्तिक पूजा - आगम संप्रदायप्रमाणे नित्य पूजा वगळता जे वार्षिक सण वा उत्सव केले जातात त्यांना नैमित्तिक पूजा म्हणतात. त्यात रथोत्सव , शारदीय नवरात्र व दोलोत्सव हे उत्सव प्रमुख आहेत . हे तीनही उत्सव या मंदिरात साजरे केले जातात.आगम संप्रदायात सांगितलेल्या चालीरीतींबरोबर पारंपारिक व प्रादेशिक सण व उत्सवांना देखील पूजापद्धतीत स्थान देण्यात आले. यात महालक्ष्मी मंदिरात गणेश चतुर्थी, जन्माष्टमी, मकरसंक्राती,गुढीपाडवा व स्थानिक रूढींप्रमाणे कवळापंचमी व किरणोत्सव हे उत्सव साजरे केले जातात.

महालक्ष्मी मंदिरात शारदीय नवरात्रात अष्टमी दिवशी जागरपूजा असते. रात्री ११ वाजण्याच्या सुमारास देवीच्या गाभाऱ्यात ही पूजा केली जाते. यावेळी मंदिरात भक्ताना प्रवेश नसतो. गाभाऱ्यात फक्त मुनीश्वर घराण्यातील(वंशपरंपरागत पुजारी) पुजारी व त्यांचे कुलोपाध्याय लाटकर या दोन व्यक्ती गाभाऱ्यात असतात. या पूजेस शाक्त पूजा असे म्हणतात. एक प्रकारचे यंत्र काढून त्यामाध्यमाने शक्ती पूजा केली जाते.(या पूजेबद्दल विशेष माहिती देण्यास लाटकरांनी सहाजिकच नकार दिला.)या पूजेस संधिकाल पूजा असेही म्हणण्यात येते. काणे यांच्या मते "A short period of time viz.the last *ghatika* (अष्टमीनवमीसन्धौ तृतीया खलु कथ्यते।तत्र पूज्या त्वहं पुत्र योगिणीगण संयुत ।(कालिकापुराण ६२.५०-५१))of *mahāshtamī* and first *ghatika* of *navamī* was called *sandhī* .During that period of two *ghatikas* a *pujā* of *Devī* together with *yoginis* is to be performedwhich is deemed to be a holiest *pujā.* This *pujā* is to be performed like the *pujā* on *mahāshtamī* but the *balī* is to be offered at and after the *mahānavamī*[३१७] शाक्त परंपरेतील पूजेचे हे अवशेष असेही आपणास म्हणता येईल. त्यादृष्टीने ही पूजा महत्वाची ठरते.ही पूजा साधारण दीड ते दोन तास चालते.या पूजेनंतर मात्र बलि देण्याची प्रथा नाही.या पूजेनंतर महाकाली समोरील यज्ञकुंडात यज्ञाचा प्रारंभ होतो.यावेळी गणेशपूजन व पुण्याहवचन होते. रात्री दोनचे सुमारास यज्ञास प्रारंभ होतो. नवचंडी होमास प्रारंभ होतो. नंतर येथे कुष्मांड भेदन होते.नंतर पूर्णाहुती होऊन यज्ञ समाप्त होतो.पूर्णाहुतीसाठी तांदळाची खीर त्यात ऊसाचे गरे घातले जातात.बलि म्हणून कोहळ्याचा उपयोग केला जातो.

---

[३१७] काणे .१९७४.पृ.१७८

श्रद्धा व परंपरेतून झालेले बदल :

आभिलेखिक व ताम्रपटातील पुराव्यांवरून दिसून येणारे शिवक्षेत्र, पुराणांतील शक्तिपीठांच्या यादीत असलेले क्षेत्र नंतर काळाच्या ओघात आज दिसते आहे ते विष्णुपत्नी क्षेत्र असा कोल्हापुरच्या महालक्ष्मीचा प्रवास आहे. आज मंदिरात पूजिली जाणारी महालक्ष्मी ही विष्णुपत्नी आहे. महालक्ष्मी मंदिरात आज शारदीय नवरात्रात रोज लक्ष्मीनारायण हृदयस्तोत्र म्हणल्या जाते. तिरुपतीच्या बालाजीची पत्नी म्हणून आज तिची ख्याती आहे. तिरुपती बालाजीचा यात्राक्रम कोल्हापुरच्या महालक्ष्मीचे दर्शन घेतल्याशिवाय पूर्ण होत नाही. केंद्र सरकारने सुरू केलेली हरिप्रिया एक्सप्रेस ही गाडी शेकडो भक्ताचा थवा घेऊन कोल्हापुरास येते. हे भक्तगण महालक्ष्मीस विष्णुपत्नी रूपात वंदितात.शारदीय नवरात्रात दुसऱ्या दिवशी तिरुपती देवस्थानाकडून वाजतगाजत साडी येते व ही साडी महालक्ष्मीस विजयादशमीस नेसवल्या जाते. ही प्रथा ३० वर्षापूर्वी नव्हती. मागील १०-१२ वर्षात ही परंपरा सुरू झाल्याचे दिसून येते.

महालक्ष्मी मंदिरात कवळापंचमीस होणारा कूष्मांडभेदनाचा सोहळा पूर्वी महालक्ष्मी मंदिराच्या आवारात मुक्तीमंडपात होत असे. आता तो टेंबलाई येथे त्र्यंबुलीच्या मंदिरात होतो. कूष्मांडभेदन म्हणजेच बलि देण्याचा एक प्रकार आहे त्यामुळे हा प्रकार मंदिरात न करता दुसऱ्या ठिकाणी याची जागा बदलण्यात आली असावी.

शारदीय नवरात्रात अष्टमीच्या रात्री नवचंडी याग केला जातो. हा याग महाकाली मंडपात केला जातो व या यागात शेवटी कोहळ्याचा बलि दिला जातो. हाच परंपरेत झालेला बदल म्हणता येईल.

महालक्ष्मी मंदिरातील गरूड मंडपात देवीच्या नावाने गोंधळ घातल्या जातो. या गोंधळात देवीस मांसाहारी नैवेद्य नसून पुरणपोळीचा नैवेद्य दाखवला जातो. गोंधळ घातल्या नंतर बकऱ्याचा बळि देण्याची प्रथा आज संपूर्ण महाराष्ट्रात असलेली दिसून येते. तुळजापुरच्या देवीस मांसाहारी नैवेद्य असतो. कोल्हापुरच्या मंदिरात देवीसमोर गोंधळ घालण्याची प्रथा जरी चालू राहिली तरी तिचे सौम्य रूप करण्यात आले व तिला सात्विक नैवेद्य द्यायची प्रथा सुरू झाली.

महालक्ष्मीचे हे सात्विक रूप कदाचित तिच्या मूर्तिची पुन:स्थापना जेंव्हा मराठा काळात मंदिरात करण्यात आली त्यावेळी त्या ठिकाणी असलेला ब्राह्मण वर्ग व शंकराचार्य पीठाचे असलेले वास्तव्य यामुळे तिला सौम्य रूप प्राप्त झाले असावे. तेंव्हापासूनच तिची पूजा अर्चा विष्णुपत्नी स्वरूपात होऊ लागली असावी.

महालक्ष्मी मूर्तीच्या शिरावरील लिंग योनि, मंदिराच्या वरील मजल्यावरील शिवलिंग, कोल्हापुर क्षेत्राभोवतालची चतुर्लिंग,अष्टलिंगांची स्थान, नवदुर्गांची मंदिरे,व मुख्य म्हणजे मंदिराचे वंशपरंपरागत पुजारी शैव असल्याने जरी आज महालक्ष्मी विष्णुपत्नी रूपात पूजिली जात असली तरी तिचा इतिहास तिचे मूळ रूप विसरू देत नाही.

वरील सर्व वर्णनावरून निष्कर्ष असा निघतो की

मार्कंडेयपुराणाच्या देवीमाहात्म्यात सांगितलेली आद्यशक्ति महालक्ष्मी आपल्या दोन्ही रूपांसह कोल्हापुरात नांदत आहे. विश्वाच्या उत्पत्तीचे मूळ जाणून घेण्याच्या मागे अनेक संकल्पना रूढ झाल्या. वैदिककाळात निसर्गाला प्राधान्य देऊन उषस्,द्यौ:, पृथ्वी,इंद्र या देवतांची पूजा यज्ञात होमाद्वारे आहुती देऊन करीत असत. वेद,यज्ञयाग,यांना महत्व होते. आरण्यक उपनिषदकाळात फक्त यज्ञयाग केल्याने संसारचक्रातून मोक्षाची प्राप्ती होत नसून देवऋण,ऋषिऋण व पितृऋणातून मुक्त होण्यासाठी पहिल्या तील व स्वत:च्या निश्चयरूप प्राप्तीसाठी मोक्ष अशा चार पुरुषार्थांची कल्पना अस्तित्वात आली.

नंतरच्या काळात वैदिक यज्ञयाग मागे पडून आगम संप्रदाय वाढीस लागला. आदितत्त्व ब्रह्माची सगुण वा निर्गुण रूपात पूजा करण्याची पद्धत सुरू झाली. ही उपासना साधकाने गुरुच्या सहाय्याने करावयाची. आगमात परमतत्त्वासच देव मानून त्याच्यापासून सर्व देवतांची निर्मिती झाली . त्यांच्याद्वारे तो विश्वाची निर्मिती,पालन पोषण व संहार करतो अशी कल्पना आहे व या लोकात ज्या ज्या वेळी धर्माचा ऱ्हास होईल त्यात्यावेळी देव वेगवेगळ्या रूपात भूतलावर अवतरून दुष्ट शक्तींचा नाश करतो अशी अवतारवादाची नवीन संकल्पना आगमात विकसित झाली. . आगमात शैव,वैष्णव व शाक्त असे संप्रदाय अस्तित्वात आले व अशारितीने वेदांतात सांगितलेल्या तत्वज्ञानापेक्षा वेगळा विचार प्रवाह रूढ झाला. शैव,वैष्णव वा शाक्त धर्मानुसार शैवागम,वैष्णवागम व शाक्त आगम यांचे ग्रंथ निर्माण होऊन

त्यातून देवदेवतांचे पूजन, त्यांच्या स्तूतींमधून तत्वज्ञान यांचे विस्ताराने विवेचन करण्यात आले. शाक्त धर्मामध्ये महालक्ष्मीस मूळ प्रकृती मानून तिची व तिच्या रूपांची पूजा करण्यात आली.

मार्कंडेय पुराणातील ही आगम परंपरा शक्तिसंप्रदायाचे मूळ असून ज्या ज्या ठिकाणी या शक्तिदेवतांची स्थापना झाली त्या त्या ठिकाणी देवतांचे पूजन ग्रंथात सांगितल्याप्रमाणे होत असावे. काळाच्या ओघात या संप्रदायात येणाऱ्या तंत्राच्या जोडीने पूजेअर्चेस एक वेगळे वळण लागले. पुढे या पूजनात वामाचारातील पंचमकारांचा लौकिक अर्थाने लावलेल्या अन्वयामुळे या संप्रदायास कलाटणी मिळून जनमानसात या संप्रदायाबद्दल घृणा निर्माण झाली व ती हळूहळू ह्या संप्रदायाच्या ऱ्हासास कारणीभूत झाली.

कोल्हापुरचे महालक्ष्मीचे स्थान ताम्रपटीय व आभिलेखिक पुराव्यांधारे शिवक्षेत्र म्हणून प्रसिद्ध होते. पुराणांतील उल्लेखांवरून ते शक्तिपीठ म्हणून पुढे आले. आज मंदिरात पूजिली जाणारी महालक्ष्मी ही विष्णुपत्नी आहे. महालक्ष्मीचे हे सात्विक रूप कदाचित तिच्या मूर्तिची पुन:स्थापना जेंव्हा मराठा काळात मंदिरात करण्यात आली त्यावेळी त्या ठिकाणी असलेला ब्राह्मण वर्ग व शंकराचार्य पीठाचे असलेले वास्तव्य यामुळे तिला सौम्य रूप प्राप्त झाले असावे. तेंव्हापासूनच तिची पूजा अर्चा विष्णुपत्नी स्वरूपात होऊ लागली असावी.

उपसंहार

मातृदेवता किंवा शक्ति हिचे पूजन करण्याची परंपरा हरप्पा संस्कृतीपासून सुरु असलेली दिसून येते. ऋग्वेदातील देवीसूक्तात व अदिती या देवतेच्या वर्णनात शक्तिसंप्रदायाचे मूळ असलेले लक्षात येते. परंतु शक्तिदेवतेच्या या संप्रदायाची सुरवात नक्की कधीपासून झाली याबद्दल निश्चित असा पुरावा आज उपलब्ध नाही. आभिलेखिक पुरावा लक्षात घेता इ.स. ४थ्या शतकाच्या पूर्वी शक्तिसंप्रदाय अस्तित्वात नव्हता असे दिसते. अगदी मौर्यकालापासून किंवा त्यापूर्वीही स्त्री देवतांच्या अंकनाची सुरवात झालेली दिसून येते आणि शक्तिसंप्रदायात तंत्राचा अवलंब इ.स. च्या ७ व्या शतकापासून सुरु झाला. शाक्तसंप्रदाय शैवसंप्रदायाच्या जवळचा संप्रदाय असल्यामुळे शैवक्षेत्रांमध्ये शाक्त संप्रदायाची वाढ झालेली दिसून येते.

पुराणांतील दक्षयज्ञ कथेतून शक्तिपीठांची निर्मिती झालेली दिसून येते. सर्वात आधी चार त्यानंतर ५१ व त्यानंतर १०८ स्थाने शक्तिपीठांच्या यादीत समाविष्ट झालेली दिसून येतात.

देवीभागवत या ग्रंथांत आलेल्या शक्तिपीठांच्या यादीत महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांस महत्वाचे स्थान दिलेले आढळून येते.

कोलापुरं महास्थानं यत्र लक्ष्मीः सदा स्थिता ।

मातुःपुरं द्वितीयं च रेणुकाधिष्ठितं परम् ।।

तुलजापुरं तृतीय स्यात् सप्तश्रृंगं तथैव च ।

महाराष्ट्रातील ही साडेतीन शक्तिपीठे म्हणजे कोल्हापुरची महालक्ष्मी, मातापुर वा माहूर गडावरील रेणुका, तुळजापुरची भवानी व वणीच्या सप्तश्रृंगीगडावरील जगदंबा हे अर्धपीठ म्हणून प्रसिद्ध आहे. कोल्हापुरची महालक्ष्मी स्थानक स्वरूपात, चतुर्भुज, दक्षिणाधःकरक्रमाने महाळुंग, गदा, खेटक , पानपात्र व मस्तकावर लिंग व योनि धारण केलेली आहे. माहूरची रेणुका तांदळास्वरूपात, तुळजापुरची भवानी अष्टभुजा महिषमर्दिनी स्वरूपात तर सप्तश्रृंगीगडावरील जगदंबा अष्टादशभुजा स्वरूपात पूजिली जाते.

तिच्या दुर्गेच्या रूपातील पूजनाचे श्लोक नंतरच्या काळातील असल्यामुळे तिला त्यात दुर्गेचे अष्टभुजा रूप आल्याचे दिसून येते.इ.स. ४थ्या शतकापासून पीठ निर्मितीची कल्पना पुढे येऊन, आधी ४ नंतर ५१ व पुढे १०८ शक्तिपीठांची कल्पना करण्यात आली. **मार्कंडेयपुराण** मात्र देवीचे माहात्म्य वर्णन करणारा स्वतंत्र ग्रंथच आहे. या काळापासून मात्र देवीस स्वतंत्र अस्तित्व निर्माण होऊन शाक्तसंप्रदायाची बैठक तयार झालेली दिसून येते.नंतरच्या पुराणांच्या काळात शाक्तसंप्रदायाची पूर्णपणे वाढ झालेली दिसून येते. **मत्स्यपुराणात** आलेल्या १०८ शक्तिपीठांच्या यादीत करवीरच्या महालक्ष्मीचा उल्लेख असून **देवीभागवत** या ग्रंथात तर कोल्हापुरच्या महालक्ष्मीस अग्रस्थान प्राप्त झाले.पुराणांत आलेल्या वर्णना वरून कोल्हापुर हे एक शक्तिपीठ म्हणूनच समोर येते. पुराणांतील उल्लेखांत कोल्हापुरास करवीर व कोलापुर असे संबोधित केले आहे.**चतुर्वर्गचिन्तामणि,रूपावतार,रूपमंडन** यात आलेले महालक्ष्मीमूर्तीचे वर्णन आजच्या मूर्तीशी मिळते जुळते आहे.

इ.स. १५ व्या शतकापासून निरनिराळ्या कवींनी रचलेल्या काव्यांमधून कोल्हापुरच्या महालक्ष्मीची स्तुती दृग्गोचर होते. या निरनिराळ्या कवींच्या रचनांत तो कवि ज्या देवतेचा भक्त आहे ते रूप तो महालक्ष्मीत बघण्याचा प्रयत्न करताना दिसून येतो. कोल्हापुरच्या स्थलमाहात्म्यांत राजा गंड राजा श्रृंगण अशी नांवे आली आहेत.यांचा संबंध शिलाहार राजा गंडरादित्य व यादव राजा सिंघण यांच्याशी असण्याचा संभव आहे.

स्थल माहात्म्यात **करवीरमाहात्म्य, लक्ष्मीविजय, केदारविजय, व्यंकटाचलमाहात्म्य** या सारखे ग्रंथ कोल्हापुर या स्थानाचा महिमा सांगतात. या ग्रंथांमध्ये कोल्हापुरच्या महालक्ष्मीसंबंधी आलेल्या कथा, तिच्या भोवती असलेली तीर्थक्षेत्रे त्यांची उत्पत्ती व त्यांच्या दर्शनाने मिळणारी फळे यांचे वर्णन आहे. त्यात राजा इंद्रसेन,राजा गंड, राजा श्रृंगण यांच्या कथा आल्या आहेत.**व्यंकटाचलमाहात्म्यात** आलेल्या कथेच्या प्रभावामुळे तर आज तिरुपति संस्थानाकडून येणारी साडी दसऱ्याच्या दिवशी देवीस नेसवल्या जाते. . तिरुपतीच्या विष्णूचा तिच्याशी संबंध जोडताना आता तर तिरुपतितीर्थाचे दर्शन हे कोल्हापुर महालक्ष्मीचे दर्शन घेतल्याशिवाय पूर्ण होत नाही हा नवा विचार सुरू झाला आहे.

पुराणांत व ग्रंथांत जसे महालक्ष्मीचे उल्लेख आलेत तसेच ताम्रपट व शिलालेखांमधूनही कोल्हापुरच्या महालक्ष्मीचे उल्लेख सापडतात. या उल्लेखांवरून सुदूर कर्नाटक व गुजरात राज्यांतही या देवीची महती पोहोचल्याचे आढळून येते. इ.स. ११ व्या शतकात हे स्थान शिवक्षेत्र म्हणून प्रसिद्ध होते. पुराणकाळात हे स्थान शक्तिपीठ म्हणून प्रसिद्ध होते व आता हे स्थान विष्णुपत्नी लक्ष्मी हिचे स्थान म्हणून प्रसिद्ध आहे. हा महालक्ष्मीचा प्रवास आपणास ताम्रपटीय व अभिलेखिक पुरावा, पुराणांतील पुरावा व आज तिचे असलेले स्वरूप यावरून लक्षात येतो.

इ.स.८७१च्या राष्ट्रकूट राजा अमोघवर्ष (प्रथम)याच्या ताम्रपटात महालक्ष्मीचा उल्लेख असला तरी कोल्हापुर या स्थानाचा उल्लेख नाही परंतू गुहल्लदेवाच्या सवाईवेरेच्या इ.स.१०३६च्या ताम्रपटात मात्र षष्ठ (द्वितीय) कोल्हापुरास महालक्ष्मीच्या दर्शनाला येत असे असा स्पष्ट उल्लेख आहे. या नंतर इ.स.१११३च्या दोड्डगड्डवळ्ळी येथील शिलालेखात तर त्या स्थानास अभिनव कोल्लापुर म्हटल्याचे दिसून येते. तर या काळात महालक्ष्मीची कीर्ती महाराष्ट्राबाहेर झाल्याचे दिसून येते. इ.स.१०४९ ते १०६८ या काळातील कर्नाटकातील बागलकोट जिल्ह्यातील शिरूर गावामधील सिद्धेश्वर मंदिराच्या भिंतीवरील लेखांवरून कोल्हापुर हे शिवक्षेत्र, रूद्राच्या अर्धांगिनीचे चौसष्ठ योगिनीनी परिवेष्टित असे स्थान असल्याचा उल्लेख आहे. म्हणजे शिलाहार राजवंश आपणास महालक्ष्मीचा वरप्रसाद लाभला असल्याचे नमूद करतात. शिलाहार राजा गंडरादित्य याने अनेक मंदिरे बांधली. परंतु महालक्ष्मी संदर्भात कुठल्याही अभिलेखांत उल्लेख नाही.

काळाचा उल्लेख नसलेला परंतु महालक्ष्मी संदर्भातील एक वीरगळ उपलब्ध झाला आहे. त्या वीरगळावरील त्रोटक लेखावरून महालक्ष्मी मंदिरावर चोल व चालुक्य राजा सोमेश्वर यांच्यात कोप्पम् येथे झालेल्या युद्धावेळी(कोप्पम् लढाई इ.स.१०५१-१०५२) चोलांनी महालक्ष्मी मंदिर जाळण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी मुथ्थय्या नामक फूलविक्रेत्याने मंदिर वाचवताना आपले प्राण गमावले. मंदिर जाळण्याचा प्रयत्न केला असा उल्लेख लेखात आल्यामुळे मंदिराचा काही भाग लाकडी असावा. आजचा सभामंडप त्याकाळी लाकडाचा असावा.आभिलेखिक पुराव्यांवरून कल्याणी चालुक्यांच्या विक्रमादित्य सहावा याच्या कारकिर्दीत महालक्ष्मी मंदिरास दान (इ.स.११०६) दिल्याचे आढळून येते.त्यानंतर

शिलाहारवंशीय राजा भोज (इ.स.११९०)याच्यावेळी महालक्ष्मीस त्रिकाळ नैवेद्याची व्यवस्था केलेली दिसून येते.

यादव वंशातील सिंघण द्वितीयच्या कारकिर्दीत महालक्ष्मी मंदिरासमोर तोरण च महालक्ष्मीस अलंकार भेट दिल्याचा उल्लेख आहे. महालक्ष्मी शेजारी असलेले महाकाली मंदिर याचा उल्लेख मात्र फार उशिरा मिळतो. इ.स.१२३६ च्या यादव राजा सिंघण(द्वितीय)च्या लेखांत, पहिल्यांदा महालक्ष्मीबरोबर महाकालीचा उल्लेख आला आहे. यानंतर यादव राजा कान्हरदेव याच्या काळातील(इ.स. १२५७)लेखातही महालक्ष्मी बरोबर महाकालीचा उल्लेख आलेला आहे. महासरस्वतीचा उल्लेख मात्र कुठल्याही ताम्रपट वा शिलालेखात आढळून येत नाही.

ग्रॅहम ,जांभेकर व मांडलिक यांनी वर्णन केलेला चालुक्य राजा कर्ण याच्या अभिलेखाचा ठोस पुरावा आजही उपलब्ध नाही. त्यामुळे चालुक्यवंशावळीत कोणी कर्ण नावाचा राजा झाला नाही हे खरे यांनी मांडलेले मत आजही ग्राह्य धरण्यास हरकत नाही .

महालक्ष्मी मंदिराची ख्याती हळूहळू इतकी पसरली की इतर राज्यातही महालक्ष्मीची ठाणी अस्तित्वात आली.इ.स.१११३मध्ये दोड्डगड्डवळ्ळी येथे मंदिराची निर्मिती झाली व त्या स्थानास अभिनव कोल्लापुर असे म्हणण्यात आले.तेथील मूर्तीचे रूप जरी लक्ष्मीचे असले तरी शिलालेखात तीस महालक्ष्मी असे म्हटले आहे.या मंदिरातही महालक्ष्मीबरोबर महाकाली असलेली दिसून येते.**सरस्वतीपुराणात** (इ.स.११ वे शतक)आलेल्या माहितीनुसार गुजरातमधील सिद्धराज सरोवराकाठी सिद्धराज सोलंकी याने कोल्हापुरपीठाप्रमाणे मंदिराची निर्मिती केली.

महालक्ष्मी संबंधीच्या कागदपत्रांवरून सुल्तानी आक्रमणाच्यावेळी महालक्ष्मी मंदिरातून महालक्ष्मीची मूर्ती हलविण्यात आली. ती कपिलतीर्थानजिक असलेल्या तुळजाभवानीच्या मंदिरात ठेवण्यात आली. मराठाकाळात तिची पुन:स्थापना मूळ मंदिरात २६ सप्टेंबर इ.स.१७१५ विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर करण्यात आली.

कोल्हापुरातील महालक्ष्मी देवालय त्रिकूट,प्राकारयुक्त असून पश्चिमाभिमुख आहे. महालक्ष्मी मंदिर सप्तरथ,मेरुमंडोवर पद्धतीची रचना असलेले, बाह्यांगावर देवकोष्ठात सुरसुंदरी व त्या देवकोष्ठांवरील शिखरे नागर शैलीची ; महाकाली – पंचरथ, देवकोष्ठांत सुरसुंदरी व त्यावरील शिखरांची रचना वेसर पद्धतीची व महासरस्वती – साधे दगडी बांधकाम असलेले आहे. या देवालयास तीन स्वतंत्र गाभारे असून मध्यभागी पश्चिमाभिमुख महालक्ष्मी, उत्तरेस दक्षिणाभिमुख महाकाली व दक्षिणेस उत्तराभिमुख महासरस्वती आहे. तीनही गर्भगृहे सांधार आहेत. महालक्ष्मी मंदिराचे सभामंडप,अंतराळ व गाभारा हे दुमजली आहेत.वर नंदिमंडप व गाभाऱ्यात गणेशाची मूर्ति व शिवलिंग आहे. या गाभाऱ्यास खालील गाभाऱ्याप्रमाणेच तीन बाजूस तीन खोल्या आहेत. परंतु त्या खोल्यांत जाण्यास मार्ग प्रदक्षिणापथातून आहे.या मंदिराची रचना वैचित्र्यपूर्ण व वैविध्यपूर्ण आहे असे म्हणता येईल.

काळाच्या बदलानुरूप मंदिरात वेळोवेळी बदल करण्यात आले. मराठा काळात जेव्हा महालक्ष्मी मूर्तीची पुन:स्थापना झाली त्यावेळी महालक्ष्मीची मूर्तीच गाभाऱ्याच्या मध्यभागात बसविला गेली. स्वतंत्र कोष्ठाची सोय असताना, कुठल्याही मंदिरात मूर्ती बाहेर बसवलेली आढळत नाही.

महालक्ष्मी मंदिराचा अंतराळ व गाभारा हे मंदिराचे सर्वात प्रचीन अवशेष आहेत.गाभाऱ्यातही तीन स्वतंत्र खोल्या आहेत. या तीन खोल्यांत मध्ये महालक्ष्मी,उत्तरेस महाकाली व दक्षिणेस महासरस्वती या देवतांच्या मूर्तींची सोय असावी.

अंतराळात उत्तर व दक्षिणेस दोन खोल्या आहेत.आज जरी त्यातील एक खोली बंद व दुसरी खोली दागिने ठेवण्यास वापरत असले तरी या खोल्यांत पूर्वी देवतांच्या मूर्ती असाव्यात.महालक्ष्मी बरोबर हमखास असलेल्या सप्तमातृकांचे अंकन आपणास मंदिरात दिसून येत नाही त्यामुळे महालक्ष्मीच्या परिवारातील या देवतांची स्थापना कदाचित या खोल्यांमध्ये असावी.

शिलाहार राजा गोंक याच्या काळातील(इ.स. १०२०-इ.स.१०५०) एकही शिलालेख वा ताम्रपट आज उपलब्ध नाहीत. परंतु गोव्याचा कदंब राजा षष्ठ (इ.स.१००५ ते इ.स.१०५०)कोल्हापुरास

महालक्ष्मीच्या दर्शनास येत असे अशा उल्लेखावरून इ.स. १०३८च्या आधीपासून हे देवालय(विदान अंतराळ व गाभारा या स्वरूपात)अस्तित्वात होते असे म्हणण्यास जागा आहे. त्यामुळे कदाचित चालुक्यांचे मांडलिकत्व पत्करल्यानंतरच्या काळात गोंकाने या मंदिराची निर्मिती केली असावी.यास आणखी पुरावा म्हणजे इ.स.१०४९,इ.स.१०६३ व इ.स.१०६८ या काळातील कर्नाटकाच्या बागलकोट जिल्ह्यातील सिद्धेश्वर मंदिराच्या भिंतीवरील लेखांत कोल्हापुरच्या महालक्ष्मीचा उल्लेख आला आहे. त्यावरून या काळात कोल्हापुरात हे महालक्ष्मीचे देवालय होते, हे निश्चित, आणि ते मंदिर हेच असावे अ से मानण्यास हरकत नाही.

सभामंडपाच्या पूर्व भिंतीतील दोन महाकाय द्वारपाल हे आज म्हटले जाते त्याप्रमाणे जय विजय नसून काल-वेताल असावेत. सभामंडप आयाताकार, वामनस्तंभ व वामनभिंतीयुक्त अर्धखुला मंडप आहे.या मंडपाची रचना बघता लक्षात येते की या मंडपातील स्तंभ एकसारखे नाहीत.

यादवांच्या काळात शिलाहार राजा द्वितीय भोज याचा बिमोड करून या भागावर आधिपत्य स्थापन करणाऱ्या यादव राजा सिंघण द्वितीय(इ.स.१२००-इ.स.१२४७) याने महाकाली मंदिराची निर्मिती केली असावी.कारण याच्याच काळात आपणास महाकालीचा महालक्ष्मीबरोबर उल्लेख मिळतो(कोल्हापुर शिलालेख,१५ ऑगस्ट इ.स.१२३५).

महासरस्वती मंदिराचा शिलाहार वा यादवकालीन कुठल्याही लेखांत उल्लेख आढळत नाही.त्यामुळे जामखेडकर यांचे मत पटावयास हरकत नाही.त्यांच्यामते महासरस्वती असलेले उत्तराभिमुख गर्भगृह एकतर पुनर्बांधणी झालेले आहे कदाचित मध्ययुगीनकाळात मुळात द्विगर्भ मंदिर असे स्वरूप असलेल्या मूळ मंदिरात या गर्भगृहाची भर पडली असावी.

महालक्ष्मी मंदिर देव संकुल हे एकाच काळात बांधलेले नाही. वेगवेगळ्या काळात(थोड्या फार फरकाने) या मंदिराचा विस्तार करण्यात आला. त्यामुळे ही तीनही मंदिरे स्थापत्यदृष्ट्या भिन्न आहेत.

महालक्ष्मी मंदिराचे गाभारा व अंतराळ हे घटक सर्वात प्राचीन आहेत. या गाभाऱ्यातील तीन खोल्यांत महाकाली।महालक्ष्मी व महासरस्वती यांच्या मूर्ति असाव्यात.

मंदिराच्या अंतराळासमोर लाकडी मंडप असावा. मुथ्थय्याच्या (इ.स.१०५२- इ.स.१०५३) वीरगळाप्रमाणे चोल चालुक्यांच्या कोप्पम येथील लढाईत चोलांनी महालक्ष्मी मंदिर जाळण्याचा प्रयत्न केला असे लिहिले आहे. शिलाहार राजा भोज द्वितीय याने हा दगडी सभामंडप बांधला असावा.हा मंडप वामन भिंती व वामन स्तंभांनी युक्त अर्धखुला मंडप आहे.

शिलाहार राजा भोज द्वितीयचा पराभव केल्यानंतर यादव राजा सिंघण द्वितीयने या भागावर आपले राज्य स्थापिले. याच्या काळातील अभिलेखांवरून त्याने महालक्ष्मीस अलंकार व त्याच्या अधिकाऱ्याने महालक्ष्मीसमोर तोरण बांधल्याचा उल्लेख आहे. याच्याच काळात महाकालीसाठी स्वतंत्र मंदिर बांधण्यात आले. या मंदिराचा महालक्ष्मी मंदिराशी असलेला जोड तिरका आहे.एक तर या मंदिराच्या बाहेर प्रांगणात देवकुलिका असाव्यात किंवा महाकालीमूर्तीची स्थापना बरोबर उत्तरेस करण्यासाठी हे मंदिर तिरपे बसविले असावे.या महाकाली मंदिराचा उल्लेख इ.स.१२३६च्या यादव सिंघण याच्या लेखात सर्वात पहिल्यांदा उल्लेख येतो.आतापर्यंत मिळालेल्या ताम्रपट वा शिलालेखांतइ.स. १२३६ च्या आधी महाकालीचा महालक्ष्मीबरोबर उल्लेख आलेला नाही.सभामंडपाचे स्थापत्यही त्याआधीचे असावे असे दिसत नाही. महाकाली मंदिर बांधताना महालक्ष्मी मंदिराच्या सभामंडपाच्या पूर्वेकडील अर्धखुल्या भागावर, जंघाभागावर बाह्यांगातून देवकोष्ठे बसविण्यात आली. त्यामुळेच सभामंडपाच्या पूर्वेकडील बाह्यांगांवरील देवकोष्ठे महाकाली मंदिराच्या बाह्यांगावरील देवकोष्ठासारखी आहेत.महालक्ष्मी मंदिराचा हा भाग महाकाली मंदिर बांधताना बांधण्यात अला असावा. यादव राजा रामदेव(इ.स.१२७१- इ.स.१३१२) याच्या काळात गणेशमंडप बांधण्यात आला असावा.

महालक्ष्मी मंदिराच्या आवारील लहान देवकुलिकांची रचना आज बदलण्यात आली आहे. कुंदनगार,खरे धर्माधिकारी व दाजिबा जोशीराव यांनी वर्णन केल्याप्रमाणे आवारातील देवतांची स्थिती कशी होती व आज ती कशी आहे याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. महालक्ष्मीमूर्तीच्या बाह्य

प्रदक्षिणेवेळी अडथळा येऊ नये म्हणून काही लहान देवळे हलविण्यात येऊन त्यांची स्थापना ओवऱ्यांत करण्यात आली.

महालक्ष्मी व महाकाली मंदिराच्या बाह्यांगावरील सुरसुंदरीबद्दल आजपर्यंत फक्त उल्लेखच केला गेला आहे. या सुरसुंदरींना चौसष्ठ योगिनी म्हणले आहे.परंतु या योगिनी नसून सुरसुंदरी आहेत . ह्या सुरसुंदरींचे वर्णन करून त्यांची ओळख पटविण्याचा प्रयत्न केला आहे. यातील काही सुरसुंदरींच्या अधिष्ठानावर लेख कोरलेले आहेत. परंतू हे लेख सुरसुंदरीचे नाव वा मंदिरावर कुठल्याही तऱ्हेचा प्रकाश टाकीत नाहीत. परंतु दामोजय व रामोज या नावांवरुन कदाचित ती मूर्ति कोरणाऱ्यांची नावे असावीत.महालक्ष्मी मंदिराच्या बाह्यांगांवरील सुरसुंदरीतील नुपुरपादिका.स्त्री व माकड,शिव प्रतिमा.भैरवी यांच्या मूर्ति महाकाली मंदिराच्या बाह्यांगांवरही दिसून येतात.परंतु दोन्ही मंदिरावरील सुरसुंदरीची रचना वेगवेळी आहे.

महालक्ष्मी मंदिराप्रमाणेच इतर राज्यात असलेली मंदिरे म्हणजे कर्नाटकातील दोड्डगड्डवळळी व सरस्वती पुराणात उल्लेख असलेले अन्हिलवाड पाटण येथील सिद्धराज सरोवराच्या काठावर असलेले मंदिर(आज अस्तित्वात नाही) या दोन मंदिरांची महालक्ष्मी मंदिराशी तुलना केली आहे.

महालक्ष्मीदेवीच्या पूजे-अर्चेत झालेले बदल जाणून घेण्यास आज तरी आपल्याजवळ काही पुरावे नाहीत. ताम्रपट व अभिलेखीय पुराव्यांवरून कोल्हापुरची महालक्ष्मीचे हे पीठ शिवक्षेत्र म्हणून प्रसिद्ध असलेले दिसून येते. महालक्ष्मी ही रुद्राची अर्धांगिनी व चौसष्ठ योगिनींनी परिवेष्टित असा तिचा उल्लेख आलेला आहे. देवीभागवत व शाक्त तंत्रातील तिच्या या स्थानाला शक्तिपीठ वर्णिल्यामुळे, नंतरच्या काळात तिचा तिरुपतीच्या बालाजीबरोबर जोडलेला संबंध यावरून तिचे आजचे हे वैष्णव रूप म्हणजे काळाच्या ओघात झालेला बदलच म्हणावा लागेल. तिच्या आज दिसणाऱ्या पूजाक्रमात संधिकाल पूजा सोडली तर सगळे पूजाविधी सात्विक स्वरूपातलेच दिसून येतात. परंतु ही पूजा करणारे पुजारी मात्र शैव संप्रदायी आहेत. ३०-४० वर्षांपूर्वी देवीस नवरात्रात अष्टमीच्या दिवशी गुप्त (मांसाहारी) नैवेद्य दाखवण्यात येत असे असे काही स्थानिकांचे म्हणणे आहे, परंतु आताचे पुजारी ही देवी पूर्णत: सात्विकरूपात असल्याचे सांगतात.

विश्वाच्या उत्पत्तीचे मूळ जाणून घेण्याच्या मागे अनेक संकल्पना रूढ झाल्या. वैदिककाळात निसर्गाला प्राधान्य देऊन उषस्, द्यौः, पृथ्वी, इंद्र या देवतांची पूजा यज्ञात होमाद्वारे आहुती देऊन करीत असत. वेद, यज्ञयाग, यांना महत्व होते. आरण्यक उपनिषदकाळानंतर फक्त यज्ञयाग केल्याने संसारचक्रातून मोक्षाची प्राप्ती होत नसून देवऋण, ऋषिऋण व पितृऋणातून मुक्त होण्यासाठी पहिल्या तीन व स्वतःच्या निःश्रेयस मोक्ष अशा चार पुरुषार्थांची कल्पना अस्तित्वात आली.

नंतरच्या काळात वैदिक यज्ञयाग मागे पडून आगम संप्रदाय वाढीस लागला. आदितत्त्व ब्रह्माची सगुण वा निर्गुण रूपात पूजा करण्याची पद्धत सुरू झाली. ही उपासना साधकाने गुरुच्या सहाय्याने करावयाची. आगमामते परमतत्त्वासच देव मानून त्याच्यापासून सर्व देवतांची निर्मिती झाली, त्यांच्याद्वारे तो विश्वाची निर्मिती, पालन पोषण व संहार करतो अशी कल्पना आहे व या लोकात ज्या ज्या वेळी धर्माचा ऱ्हास होईल त्यात्यावेळी देव वेगवेगळ्या रूपात भूतलावर अवतरून दुष्ट शक्तींचा नाश करतो अशी अवतारवादाची नवीन संकल्पना आगमात विकसित झाली. शैव, वैष्णव वा शाक्त धर्मानुसार शैवागम, वैष्णवागम व शाक्त आगम यांचे ग्रंथ निर्माण होऊन त्यातून देवदेवतांचे पूजन, त्यांच्या स्तूतींमधून तत्वज्ञान यांचे विस्ताराने विवेचन करण्यात आले. शाक्त धर्मामध्ये महालक्ष्मीस मूळ प्रकृती मानून तिची व तिच्या रूपांची पूजा करण्यात आली.

मार्कंडेय पुराणातील ही आगम परंपरा शक्तिसंप्रदायाचे मूळ असून ज्या ज्या ठिकाणी या शक्तिदेवतांची स्थापना झाली त्या त्या ठिकाणी देवतांचे पूजन ग्रंथात सांगितल्याप्रमाणे होत असावे. काळाच्या ओघात या संप्रदायात येणाऱ्या तंत्राच्या जोडीने पूजेअर्चेस एक वेगळे वळण लागले. पुढे या पूजनात वामाचारातील पंचमकारांचा लौकिक अर्थाने लावलेल्या अन्वयामुळे या संप्रदायास कलाटणी मिळून जनमानसात या संप्रदायाबद्दल घृणा निर्माण झाली व ती हळूहळू ह्या संप्रदायाच्या ऱ्हासास कारणीभूत झाली.

कोल्हापुरचे महालक्ष्मीचे स्थान ताम्रपटीय व आभिलेखिक पुराव्यांधारे शिवक्षेत्र म्हणून प्रसिद्ध होते. पुराणांतील उल्लेखांवरून ते शक्तिपीठ म्हणून पुढे आले. आज मंदिरात पूजिली जाणारी महालक्ष्मी ही विष्णुपत्नी आहे. महालक्ष्मीचे हे सात्विक रूप कदाचित तिच्या मूर्तीची पुनःस्थापना जेव्हा मराठा

काळात मंदिरात करण्यात आली त्यावेळी त्या ठिकाणी असलेला ब्राह्मण वर्ग व शंकराचार्यपीठाचे असलेले वास्तव्य यामुळे तिला सौम्य रूप प्राप्त झाले असावे. तेव्हापासूनच तिची पूजा अर्चा विष्णुपत्नी स्वरूपात होऊ लागली असावी.

काळाच्या ओघात या संप्रदायात येणाऱ्या तंत्राच्या जोडीने पूजेअर्चेस एक वेगळे वळण लागले. पुढे या पूजनात वामाचारातील पंचमकारांचा लौकिक अर्थाने लावलेल्या अन्वयामुळे या संप्रदायास कलाटणी मिळून जनमानसात या संप्रदायाबद्दल घृणा निर्माण झाली व ती हळूहळू ह्या संप्रदायाच्या ऱ्हासास कारणीभूत झाली.

कोल्हापुरचे महालक्ष्मीचे स्थान ताम्रपटीय व आभिलेखिक पुराव्यांधारे शिवक्षेत्र म्हणून प्रसिद्ध होते. पुराणांतील उल्लेखांवरून ते शक्तिपीठ म्हणून पुढे आले. आज मंदिरात पूजिली जाणारी महालक्ष्मी ही विष्णुपत्नी आहे. महालक्ष्मीचे हे सात्विक रूप कदाचित तिच्या मूर्तिची पुन:स्थापना जेंव्हा मराठा काळात मंदिरात करण्यात आली त्यावेळी त्या ठिकाणी असलेला ब्राह्मण वर्ग व शंकराचार्य पीठाचे असलेले वास्तव्य यामुळे तिला सौम्य रूप प्राप्त झाले असावे. तेंव्हापासूनच तिची पूजा अर्चा विष्णुपत्नी स्वरूपात होऊ लागली असावी.

परिशिष्ट

महाराष्ट्रातील त्रैपुरुष देवालये व देवी मंदिरे

त्रैपुरुष देवालये

१) बलसाणे येथील मंदिर: (जिल्हा धुळे) ११वे शतक उत्तरार्ध,देवालय पश्चिमाभिमुख, तीन गर्भगृहे, तलविन्यास पंचरथ, मुख्य गर्भगृहात शिवलिंग, इतर दोहोत विष्णू व देवी असाव्यात. दक्षिण गर्भगृहाच्या ललाटबिंबावर गणेश, उत्तरेकडील गाभाऱ्याच्या द्वारशाखेवर द्वारपालिका आहेत. शिखर भूमिज[३१८]

२) होट्टल येथील सोमेश्वर देवालय: (ता.देगलूर ,जिल्हा नांदेड) ११वे शतक उत्तरार्ध,पुढे मुखमंडप आणि तीन बाजूंना तीन गर्भगृहे असलेला मंडप, शिव ,विष्णू व कदाचित ब्रह्मा, देवालय पूर्वाभिमुख, दक्षिणेकडे विष्णू व ललाटबिंबावर गजलक्ष्मी, उत्तरेकडील गाभारा रिकामा व ललाटबिंबावर सुखासनात लक्ष्मी[३१९] (अंकुश,पाश,फळ व अभयमुद्रा)

३) ताहाकारी येथील भवानी मंदिर: (तालुका अकोला,जिल्हा नांदेड) १२व्या शतकाची सुरवात, देवालय पश्चिमाभिमुख , सप्तरथ सप्तभूम भूमिज प्रासाद,गर्भगृहात महालक्ष्मी,महाकाली व महासरस्वती असाव्यात[३२०] .

४) अंभई येथील वाडेश्वर मंदिर: (तालुका सिल्लोड,जिल्हा अहमदनगर) १२व्या शतकाचा पूर्वार्ध, देवालय पूर्वाभिमुख, मुख्य गाभाऱ्यात शिव व लालाटबिंबावर गणेश व शिव, दक्षिण गाभाऱ्यात विष्णू व ललाटबिंबावर विष्णू आणि ब्रह्मा, उत्तरेकडील गाभाऱ्याच्या उत्तरांगावर सप्तमातृका त्यामुळे गाभारा देवीचा असाट[३२१]

---

[३१८] देगलूरकर.१९७४:पृ ४८:जामखेडकर. २००२:पृ१६२

[३१९] देगलूरकर.१९७४.पृ १२:जामखेडकर.२००२:पृ.१९४

[३२०] जामखेडकर.२००२.पृ १९१-९२:देगलूरकर.१९७४:पृ.९८

[३२१] जामखेडकर.२००२.पृ. १९५: देगलूरकर १९७४:पृ२१

५) बीड येथील कंकालेश्वर मंदिरः (तालुका बीड,जिल्हा औरंगाबाद) १२व्या शतकातील, देवालय पश्चिमाभिमुख,मुखमंडप,अर्धखुला मंडप व या मंडपाला जोडून तीनबाजूंना अंतरालयुक्त गर्भगृहे, मुख्य गाभाऱ्यात शिवलिंग, द्वारललाटावर गणेश आहे.[३२२]

६) झोडगे येथील महादेव मंदिरः (तालुका मालेगाव,जिल्हा नाशिक) १२व्या शतकाचा पूर्वार्ध, देवालय पश्चिमाभिमुख, तलविन्यास पंचरथ, सप्तभूम भूमिज प्रासाद, बाकी दोन गाभारे नंतरच्या काळात बांधलेले (५० वर्षानंतर) आहेत[३२३].

७) निलंगा येथील नीलकंठेश्वर मंदिरः (तालुका निलंगा,जिल्हा लातुर)१२वे शतक उत्तरार्ध, देवालय पूर्वाभिमुख, मुख्य गाभाऱ्यात शिवलिंग व ललाटबिंबावर गणेश, उत्तरेकडील गाभाऱ्यात विष्णू व दक्षिणेकडील गाभाऱ्यात हरगौरी आणि ललाटबिंबावर देवी आहे[३२४].

८) मेथी येथील मंदिरः(तालुका सिंदखेड,जिल्हा धुळे) १२व्या शतकातील, मुख्य गाभाऱ्यात शिवलिंग, बाकी दोन्ही गाभारे पार्वती व विष्णू यांचे असावेत[३२५].

९) उमरगा येथील शिवमंदिरः (जिल्हा उस्मानाबाद) १३व्या शतकाची सुरवात, देवालय पूर्वाभिमुख, मुख्य गाभाऱ्यात शिवलिंग, आणि ललाटबिंबावर लक्ष्मी, उत्तरेकडील गाभारा रिक्त व ललाटबिंबावर लक्ष्मी, दक्षिणेकडील गाभाऱ्याच्या ललाटबिंबावर गणेश आहे[३२६].

१०) कोथळी येथील विष्णू मंदिरः (जिल्हा बुलढाणा) १३व्या शतकाची सुरवात, देवालयपूर्वाभिमुख, मुख्य गाभाऱ्यात शिवलिंग, दक्षिणेकडील गाभाऱ्यात शिवलिंग, उत्तरेकडील गाभारा रिकामा आहे[३२७].

---

[३२२] जामखेडकर.२००२.पृ २११:देगलूरकर.१९७४:पृ५२

[३२३] जामखेडकर.२००२.पृ १६२-६३: देगलूरकर.१९७४:पृ५०

[३२४] देगलूरकर.१९७४.पृ५४:जामखेडकर.२००२:पृ११६

[३२५] जामखेडकर.२००२.पृ.२०८:देगलूरकर.१९७४:पृ.३१

[३२६] देगलूरकर.१९७४.पृ.८७:

[३२७] देगलूरकर.१९७४.पृ३१

११) देवळाणे येथील मंदिर: (जिल्हा नाशिक) सुमारे इ.स.११५० मधील, देवालय पूर्वाभिमुख, तलविन्यास पंचरथ, दुय्यम गर्भगृहे नंतरच्या काळात बांधलेली, मुख्य गाभाऱ्यात शिवलिंग आहे[३२८].

१२) घोटन येथील मंदिर: (जिल्हा अहमदनगर) १३व्या शतकाची सुरवात, मुख्य गाभाऱ्यात शिवलिंग, उत्तरेकडील गाभाऱ्यात हरपार्वती आहेत[३२९].

१३) नागणसुर व किकली येथील मंदिरे: १३व्या शतकाची सुरवात, मुख्य गाभाऱ्यात शिवलिंग आहे[३३०].

१४) पिंगळी येथील शिवमंदिर: (जिल्हा परभणी) १३व्या शतकाची सुरवात, मुख्य गाभाऱ्यात शिवलिंग, दक्षिणेकडील गाभाऱ्याच्या ललाटबिंबावर गणेश आहे[३३१].

१५) बोरी येथील शिव मंदिर: (जिल्हा परभणी) १३व्या शतकाची सुरवात, देवालय पुर्वाभिमुख, मुख्य गाभाऱ्यात शिवलिंग, दक्षिणेकडील गाभारा शिवाचा व उत्तरेकडील गाभारा रिकामा आहे[३३२].

१६) चारठाणे येथील नरसिंह मंदिर: (जिल्हा परभणी) १३व्या शतकाची सुरवात, तलविन्यास बोरी येथील शिवमंदिरासारखा, दोन स्वतंत्र गर्भगृहे नसून दोन देवकोष्ठे आहेत[३३३].

१७) मढ येथील महादेव (बाणेश्वर) मंदिर: (जिल्हा बुलढाणा) १३व्या शतकाची सुरवात, सध्या पुनर्निर्माण करून एका गाभाऱ्याचे केले आहे. मुळात त्रिदल देवालय होत[३३४].

१८) मढ येथील दवणेश्वर मंदिर: (जिल्हा बुलढाणा) १३व्या शतकाची सुरवात, मूलतः त्रैपुरुष देवालय, दोन गाभाऱ्यात शिवलिंग आहेत[३३५].

---

[३२८] जामखेडकर.२०००.पृ २१४-२१५: देगलुरकर.१९७४:पृ.९१

[३२९] देगलूरकर. १९७८:पृ १००

[३३०] देगलूरकर.१९७४:पृ.१००

[३३१] देगलूरकर.१९७८.पृ९५

[३३२] देगलूरकर.१९७८.पृ९६

[३३३] देगलूरकर.१९७८.पृ१०६

[३३४] देगलूरकर.१९७४:पृ ९८

[३३५] देगलूरकर.१९७८.पृ. ९८

१९) चांगदेव मंदिर १२व्या शतकाचा उत्तरार्ध, मंदिर भग्नावस्थेत, देवालय पूर्वाभिमुख आहे[३३६].

२०) कोप्पेश्वर मंदिर : (तालुका शिरोळ,जिल्हा कोल्हापुर) इ.स.१२वे शतक, हे देवालय त्रैपुरुष देवालय नाही. परंतु या मंदिराचा गाभारा कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदिराच्या गाभाऱ्या सारखा तीन खोल्या असलेला आहे. या तीनही खोल्यांत देवतांची स्थापना केलेली नाही व ललाटबिंबांवर कसलेही देवतांचे चित्रण नाही . गाभाऱ्याच्या मध्यभागी शिवलिंगाची स्थापना केलेली आहे.[३३७]

---

[३३६] देगलूरकर.१९७४.पृ.५९

[३३७] देगलूरकर.१९७४.पृ.२०; जामखेडकर .२०००.पृ.१६५-१६८

महाराष्ट्रातील देवी मंदिरे

१) बार्शी टाकळी येथील कालिका मंदिर: (जिल्हा अकोला) इ.स.११७६ मधील लेख मंदिरावर आहे. मंदिर तारकाकृती आहे, मुखमंडप, मंडप, अंतराल व गर्भगृह[३३८].

२) जोगाई मंदिर: इ.स.१२२८ मध्ये देवालयास दान दिल्याचा उल्लेख, गर्भगृहात जोगाईची मूर्ती शेंदरानेयुक्त आहे.

३) रामटेक येथील देवी मंदिर: केवळ गर्भस्वरूपात आहे. आयताकृती शालाशिखर असून वलभीप्रासाद प्रकारचे देवालय आहे.

४) भांदक येथील चंडिका मंदिर: ११व्या शतकातील, कलचुरी कलेचा नमुना आहे. मंदिरात इ.स.१०७६ चा लेख आहे. मूळ मंदिर लतिन नागर प्रकारचे आहे. देवालयात दुर्गेची प्राचीन मूर्ती आहे[३३९].

५) चंडिका माता मंदिर : (तालुका काटोल, जिल्हा नागपूर) १३वे शतक, तलविन्यास त्रिरथ असून मुखमंडप, मंडप, अंतराळ व गर्भगृह, लतिन प्रकारचे शिखर आहे[३४०].

६) ताहाकारी येथील भवानी मंदिर: (तालुका अकोला, जिल्हा अहमदनगर) १२व्या शतकाची सुरवात, देवालय पश्चिमाभिमुख , सप्तरथ सप्तभूम भूमिज प्रासाद, गर्भगृहात महालक्ष्मी, महाकाली व महासरस्वती असाव्यात[३४१] .

७) जागजी येथील लक्ष्मी मंदिर: (जिल्हा धाराशिव) १२वे शतक, सप्तरथ सप्तभूम भूमिज मंदिर आहे[३४२].

[३३८] जामखेडकर २००२.पृ.१८४

[३३९] जामखेडकर २००२.पृ.१४२

[३४०] जामखेडकर. २००२.पृ.१५४

[३४१] जामखेडकर.२००२.पृ १७१

[३४२] जामखेडकर.२००२.पृ १७५-७६

८) कोकणठाम येथील जगदंबा मंदिरः (तालुका कोरेगाव,जिल्हा अहमदनगर) इ,स,चे १३वे शतक, तलविन्यास तारकाकार, मंदिर उत्तराभिमुख, मंदिर द्विगर्भ, मुख्य गर्भगृहात शिवलिंग, दुय्यम गर्भगृहात देवीची मूर्ती आहे[३४३].

९) माहुली येथील कळ्ळम्मा देवी मंदिरः (तालुका खानापुर,जिल्हा सांगली)१३व्या शतकाची सुरवात, देवालय पूर्वाभिमुख, गर्भगृहात शिवलिंग आहे[३४४].

१०) वाघळी येथील मुधई देवी मंदिरः (तालुका चाळिसगाव,जिल्हा जळगाव) गर्भगृह तलविन्यास तारकाकृती आहे[३४५]

११) मेथी येथील लक्ष्मी मंदिर☹तालुका सिंदखेड,जिल्हा धुळे) इ.स.१२वे शतक, मुख्य गाभाऱ्यात देवीची मूर्ती , प्रभावळीवर नवदुर्गा, मूर्ती कोल्हापूरच्या महालक्ष्मी सारखी आहे[३४६].

[३४३] जामखेडकर.२००२.पृ१७६.
[३४४] जामखेडकर. २००२;पृ.१९०
[३४५] जामखेडकर.२००२.पृ.२०६
[३४६] जामखेडकर.२००२.पृ.२०८

श्रीयंत्र

महालक्ष्मी मंदिराच्या सभामंडपातून महाकाली देवालयाकडे जाताना उजव्या बाजूस श्रीयंत्र आहे. या श्रीयंत्राची स्थपना कधी व कोणी केली याचे ठोस पुरावे आज उपलब्ध नाहीत. लोक समजुतीप्रमाणे आद्य शंकराचार्य ज्यावेळी महालक्ष्मीच्या दर्शनासाठी आले त्यावेळी त्यांनी श्रीयंत्राची येथे स्थापना केली.आद्य शंकराचार्यांच्या चरित्र व यात्रा वर्णावरून ते कोल्हापुरात आल्याचा उल्लेख नाही आद्य शंकराचार्यांचा काळ इ.स.चे आठवे शतक धरले तर या काळात हे देऊळ अस्तित्वातच नव्हते.कदाचित संकेश्वर मठाची स्थापना झाल्यावर तेथील शंकराचार्यांनी श्रीयंत्राची स्थापना केली असावी. मंदिरावरील पाचही शिखरे ,नगारखाना व दीपमाळ त्यांनीच बांधली असे म्हणतात.

आद्य शंकराचार्य यांनी श्रीयंत्राच्या पूजेची सुरवात केली. शाक्त संप्रदायात शिवशक्तिची उपासना ही मुख्य आहे. उपासकांसाठी पहिली पायरी म्हणजे देवीच्या मूर्तीची पूजाअर्चा, स्तोत्रपठन होय.शंकराचार्य यांनी लिहिलेल्या **सौंदर्यलहरी** या स्तोत्रांत श्रीत्रिपुरसुंदरीच्या रूपाचे वर्णन केले आहे. श्री शंकराचार्य यांनी स्तोत्राच्या प्रारंभी श्रीत्रिपुरसुंदरीच्या मूर्तिस्वरूपाचे वर्णन केले आहे व श्रीत्रिपुरसुंदरीच्या बाह्य रूपाचे वर्णन श्रीचक्र रूपात केले आहे. श्रीचक्र म्हणजे शिवशक्तिचे ऐक्य . या श्रीचक्राच्या लेखनाचे दोन प्रकार आहेत. एकाला आरोहचक्र व दुसऱ्यास अवरोहचक्र म्हणतात. यास काही ठिकाणी सृष्टिक्रम व संहारक्रम म्हणतात. सृष्टिक्रमात चार शिवचक्रे ऊर्ध्वमुख असतात व संहारक्रमात पांच शक्तिचक्रे ऊर्ध्वमुख असतात. शाक्त संप्रदायाचे दोन मार्ग मानले आहेत. एकाला समयमत असें म्हणतात व दुसऱ्याला कौलमत असें म्हणतात. सृष्टिक्रमाने काढलेले चक्र समयमतानुसार व संहारक्रमाने काढलेले चक्र कौलमतानुसार असे मानतात.

चतुर्भि: श्रीकण्ठै: शिवयुवतिभि: पंचभिरपि
प्रभिन्नाभि: शंभोर्नवभिरपि मूलप्रकृतिभि: ।
त्रयश्चत्वारिंशद्वसुदलकलाश्रत्रिवलय -
त्रिरेखाभि: सार्धं तव शरणकोणा: परिणिता: ।।११।।[२६७]

[२६७] भिडे . १९६९.पृ.२२

चार श्रीकंठ (म्हणजे शिवचक्रें) आणि पांच शक्तिचक्रें अशा प्रकारे भिन्न झालेल्या शिवाच्या नऊही मूलप्रकृतींनी तुझे मंदिर त्रेचाळिस कोणांनी परिणत होते. एक अष्टदल, दुसरें षोडशदल कमल,(त्याच्याबाहेर) तीन वर्तुळे , तीन रेखांची भुपुरें ह्यासहित तुझ्या भवनांचे त्रेचाळिस कोण परिणत होतात.

षोडशदलास सर्वशापपरिपूरकचक्र असे म्हणतात. आपल्या शरिरातील मूलाधार चक्राशी याचे साम्य दाखवते. हे षोडशदल आपल्या शरिरातील दहा इंद्रिय पंचमहाभुत व मन यांचे द्योतक आहे. अष्टदलास सर्व संक्षोभक चक्र असे म्हणतात.यास बुद्धिभावाची स्थाने मानली आहेत. हे आपल्या शरीरातील मणिपुरचक्राचे द्योतक आहे. या चक्राची स्वामिनी त्रिपुरसुंदरी आहे. त्याच्या आतील चतुर्दशकोणांस सर्व सौभाग्यद चक्र म्हणतात. या स्थानाची देवता त्रिपुरवासिनी आहे. हे चक्र आपल्या शरीरातील अनाहुत चक्राशी साम्य दाखवते.त्यातील देवता चतुर्दश,मुख्य नाड्यांच्या देवता आहेत. याच्या आत दशकोण चक्र आहे. यास सर्वार्थ साधकचक्र असे म्हणतात.या चक्राच्या दहा अधिष्ठात्री देवता आहेत.त्यांचा दशप्राणांवर अधिकार चालतो. यात त्रिपुर श्री या देवतेचा निवास आहे. याच्या आत दशकोण आहेत. यात त्रिपुर मालिनी या देवतेचा वास आहे.याच्या आत अष्टकोण असून यास सर्व रोगहार चक्र म्हणतात . यात देवी त्रिपुर सिद्धी हिचे स्थान आहे.या अष्ट भावाच्या स्वामिनी आहेत. सर्वात आतील त्रिकोण हा त्रिपुरांबा देवतेचे स्थान असून यास सर्व सिद्धिप्रद चक्र असे म्हणतात.हा त्रिकोण देवतेचे शिर असून आपल्या शरिरातील सहस्त्र चक्राचे स्थान आहे. कामरूप,पूर्णगिरी व जालंधर येथील कामेश्वरी ,वज्रेश्वरी व भगमालिनी यांची ही स्थाने आहेत. सर्वात शेवटचा बिंदू हे सर्वानंद माया चक्र असून इथे त्रिपुरसुंदरीचे स्थान आहे.

महालक्ष्मी मूर्ति

स वज्रलेप होत असताना काही पुजाऱ्यांच्या मते पूजा व अभिषेक उत्सव मूर्तिवर होत असत. परंतू काही पुराव्यां आधारे[३४८] महालक्ष्मीच्या मूर्तिच्या वज्रलेपावेळी ४२ दिवस श्रीयंत्राची पूजा होत होती. ही पूजा ज्यांना

[३४८] धर्माधिकारी. २००३ पृ ४०: कुळकर्णी. १९९८:पृ १४:

दिक्षा रूपाने मिळाली होती त्या पूजकांकरून करविण्यात आली. या पूजेला दररोज १३ ते १४ रुपये खर्च येत असे.

श्रीमती सुधादेवी[३५९] यांच्यामते श्री करवीरनिवासिनी राजराजेश्वरी सौभाग्य विद्याम्बा आदिशक्ति श्री महात्रिपुरसुंदरी हीच या यंत्राची अधिष्ठित भुक्ती मुक्ती देणारी महाशक्ति विश्वसम्राज्ञी जगदंबा आहे. यांच्यामते आद्य शंकरांनी हयग्रीव संप्रदायी समयाचार पध्दतीने या श्रीयंत्राची पूजा केली. त्यापुढे म्हणतात परंतू कालौघात याच पीठावर अधिष्ठित झालेल्या द्वैतबुद्धीस्वार्थी आचाऱ्यांनी अजगर परंपरा सुरू ठेवली आहे. (याचा अर्थ कदाचित श्रीयंत्राची पुजा आता अस्तित्वात नसल्याची त्यांना चीढ आलेली दिसून येत).

श्री शंकराचार्यांनी वामाचार पध्दतीने होणारी पूजा थांबविण्यासाठी श्रीयंत्राची स्थापना केली परंतू इतर ठिकाणी चालू असलेल्या परंपरेप्रमाणे इथे ही पूजा टिकली नाही व आज फक्त गंध, फूल, अक्षता घालून हळद कुंकू वाहून श्रीयंत्राची पूजा केली जाते व गमतीची गोष्ट म्हणजे या यंत्राजवळ भितीवर श्रीमहालक्ष्मीयंत्र अशी पाटी लावण्यात आली आहे.

[३५९] श्रीयंत्र-श्रीविद्या-दिव्यत्व पृ ८५

संदर्भसूचि (मराठी)

मूळ संदर्भ ग्रंथ

- अंगापुरकर गोपाळ हरि , *केदारविजय* , रामतत्व प्रकाशन, बेळगाव (प्रकाशन काळ नाही)
- अंगापुरकर हरि गोपाळ देशमुख , *लक्ष्मीविजय* , संपादक. दा.वि.कुलकर्णी, श्रीमहालक्ष्मी प्रकाशन,कोल्हापुर,१९८८
- जोशिराव दाजिबा , *श्री करवीर माहात्म्य* , मीनल प्रकाशन ,कोल्हापुर ,२०००
- पान्डेय पं.रूपनारायण दत्त शास्त्री, *श्रीमन्महर्षी वेदव्यासप्रणीत् महाभारत*,(अनुवादक) (द्वितीय खंड).(वनपर्व और विराटपर्व).गीता प्रेस,गोरखपूर .सं.२०४४
- जोशीराव दाजिबा , *श्रीमहालक्ष्मीपरित:स्थितदेवकथनम्* ,आपटे ना.रा. (छंदोबद्ध अनुवाद),शंकर विनायक जोशीराव ,कोल्हापुर,१९८४
- *श्रीमद्देवीभागवत* (भाषाटीकासमेत) ,व्यंकटेश्वर प्रेस , १९१९
- ठवकरगोवर्धनदासलक्ष्मीदास ठवकर (संपादक) , *श्रीमदानन्दरामायण* ,जगदीश्वर प्रेस,मुंबई, १८४७
- श्रीमुनीश्वर यांच्या संग्रहातून ,*शारदीय नवरात्रपूजाविधी*
- दत्ताजीराय (संपादक) , *व्यंकटेशमाहात्म्य* ,बेळगाव,शक १८४७
- रामायण दत्त शास्त्री पाण्डेय,*श्रीमन्महर्षी वेदव्यास प्रणित महाभारत*,गीता प्रेस ,गोरखपुर,सं.२००४

दुय्यम संदर्भ साधने

- अभ्यंकर एस्.व्ही.,*भक्तिकोश* (भारतीय तीर्थक्षेत्र व मंदिर),आदित्य प्रतिष्ठान, पुणे ,२००६
- अहिरराव प्र.रा., *सरस्वतीपुराण* (भाषांतर),वरदा प्रकाशन,पुणे,२००२
- कुळकर्णी दा.वि.*वरदायिनी महालक्ष्मी* , श्रीमहालक्ष्मी प्रकाशन,कोल्हापुर,१९९२
- कोलते डॉ.वि.भि. (संपादक),*म्हाइंभट संकलित श्रीचक्रधरलीळाचरित्र*. महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक मंडळ.मुंबई १९८२

- कोलते डॉ.वि.भि. (संकलन), *स्थानपोथी*,अरूण प्रकाशन,(द्वितीय आवृत्ती),नागपुर,१९७६
- कोलते डॉ.वि.भि. (संकलन), *म्हाइंभट संकलित श्रीगोविंदप्रभुचरित्र*, अरूण प्रकाशन, मलकापुर १९६० (द्वितीय आवृत्ती)
- खरे, ग.ह., *महाराष्ट्राची चार दैवते*, ग.ह.खरे, पुणे ,१९५८
- खुपरेकर बाळाचार्य , *कोल्हापुरचा धार्मिक व सांस्कृतिक इतिहास*
- गर्गे स.मा. *करवीर रियासत* , गो.य.राणे प्रकाशन, पुणे, १९८० (द्वितियावृत्ती)
- गायतोंडे,गजानन, *श्री स्कंदपुराण सह्याद्री खंड*, श्री कात्यायनी पब्लिकेशन्स,मुंबई,१९७१
- गुब्बी प्र.व्यं. (संपादक), *मध्वमुनींची कविता*, प्र.व्यं.गुब्बी ,१९३३
- गुजर मा.वि., *करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने* (भाग १ व २) मा.वि.गुजर, पुणे. १९६२
- चित्राव सिद्धेश्वर शास्त्री (अनुवादक), *ऋग्वेदाचे मराठी भाषांतर*,भारतीय चरित्रकोशमंडळ,पुणे १९६९
- चित्राव डॉ.सिद्धेश्वर विष्णु, *देवीमाहात्म्य* (दुर्गासप्तशती),भारतीय चरित्रकोश मंडळ,पुणे ,१९८३
- चित्राव सिद्धेश्वर विष्णु, *प्राचीन भारतीय स्थलकोश* (प्रथम खंड), भारतीय चरित्रकोश मंडळ, पुणे, १९६९
- जोशी लक्ष्मणशास्त्री (संपादक), *मराठी विश्वकोश (खंड ४)*, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई ,१९७६
- जोशी महादेव शास्त्री (संपादक), *भारतीय संस्कृतीकोश*,भारतीय संस्कृतीकोश मंडळ,पुणे,१९७२
- जोशी प्र.न. , *पद्मपुराण* , प्रसाद प्रकाशन, पुणे ,१९८१
- ढेरे डॉ.रा.चिं. , *श्रीतुळजाभवानी*, पद्मगंधा प्रकाशन,पुणे,२००७
- ढेरे डॉ.रा.चि. *करवीरनिवासिनी श्रीमहालक्ष्मी* , पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००९

- तुळपुळे शं.गो.(संपादक), *लीळाचरित्र* पूर्वार्ध भाग १ व २, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, १९६६
- दिक्षित मो. गं., *महाराष्ट्रातील काही प्राचीन ताम्रपट व शिलालेख*, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९४७
- द्विवेदी प्रेमशंकर व द्विवेदी मनीषकुमार, *भारतीय संस्कृतीमें शक्तीका स्वरूप*, कलाप्रकाशन, दिल्ली, २००० (हिन्दी)
- देसाई प.स., *करवीरनिवासिनी महालक्ष्मी*, वसंतराव शं. सेवेकरी, कोल्हापुर (सहावी आवृत्ती), १९७८
- देगलूरकर गो.बं., राणे अ.पां., खणे बी.डी. (संपादक), *युगयुगीन करवीर इतिहास दर्शन* भारतीय इतिहास संकलन समिती, कोल्हापुर, २०१०
- देगलूरकर गो.बं., *सुरसुंदरी*, भारतीय विद्याभवन, पुणे, २००५
- धर्माधिकारी वा.रा., *करवीरनिवासिनी महालक्ष्मी*, वा.रा. धर्माधिकारी, कोल्हापुर, २००३
- पवार अप्पासाहेब (संपादक), *ताराबाईकालीन कागदपत्रे* खंड १,२ व ३, १९६९
- पत्की जी.डी., *करवीरमाहात्म्य व यात्राप्रकाश*, कमल लडकत, पश्यंती प्रकाशन, कोल्हापुर. १९८८
- प्रभुदेसाई प्र.कृ. *आदिशक्तिचे स्वरूप* (देवीकोश) भाग ४, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ संशोधन प्रकाशन मंडळ, पुणे, १९६७
- भट य.आ. (अनुवादक), *धर्मशास्त्राचा इतिहास* (सारांश रूप ग्रंथ), (पूर्वार्ध आणि उत्तरार्ध), महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ. पुणे, १९८०
- भिडे ग.रं. व देशपांडे पु.ल.(संपादक), *कोल्हापुर दर्शन*, (श्रीमान मदनमोहन लोहिया अभिनंदन ग्रंथ). इंटरनॅशनल पब्लीशिंग सर्व्हिस. पुणे .१९७१
- महाराज बा.बा., *करवीरनिवासिनी श्रीमहालक्ष्मी*, रश्मी आफळे, कोल्हापुर. २००२
- मिराशी वा.वि.. *शिलाहार राजवंशाचा इतिहास व कोरीव लेख*. विदर्भ संशोधन मंडळ. नागपुर १९७४

- मिराशी वा.वि., *भारतीय इतिहास संशोधन मंडळ, त्रैमासिक*, वर्ष१५, अंक ४, भारतीय इतिहास संशोधन मंडळ, १९५७
- मिराशी वा.वि. , *संशोधन मुक्तावली* (सर सातवा), विदर्भ संशोधन मंडळ, नागपुर, १९७६
- सुधा भेरवी, *श्रीयंत्र-श्रीविद्या-दिव्यत्व* श्रीराजराजेश्वरी विद्यानिकेतन, मुंबई, १९७२
- शिंदे खंडेराव, *कोल्हापुर राज्याचा इतिहास १८३८ ते १८९४*, निर्मिती विचारमंच, कोल्हापुर ,२००२
- शास्त्री पंडित मुकुंदलाल (संपादक), *त्रिपुरारहस्य* (माहात्म्य), काशी संस्कृत सिरीज नं.९२ (पुराण इतिहास भाग १), जयकृष्णदास हरिदास गुप्त ,१९३२
- श्रीवास्तव डॉ.बलराम, *श्री सूत्रधारमण्डनप्रणिते वास्तुशास्त्रेरूपमण्डनम्* , मोतीलाल बनारसीदास, वाराणसी, १९९६ (संपादन हिंदीत)
- सातवळेकर श्रीपाद दामोदर , *ऋग्वेद संहिता* , स्वाध्याय मंडळ, पुणे ,१९९७
- *कल्याण तीर्थांक* (खंड ३१, क्र.१) ,गीता प्रेस, गोरखपुर ,१९५७

गॅझेटियर

- चौधरी के.के (संपादक) , *कोल्हापुर जिल्हा* , महाराष्ट्र राज्य दार्शनिक विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई , १९८९
- जामखेडकर अ.प्र. , *स्थापत्य व कला* (महाराष्ट्र भाग २) ,महाराष्ट्र राज्य दार्शनिक विभाग, महाराष्ट्र राज्य , मुंबई ,२००२
- अ. पाठक , *इतिहास* (महाराष्ट्राचा प्राचीन काळ भाग १), महाराष्ट्र राज्य दार्शनिक विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई ,२००२

संदर्भसूचि (इंग्रजी)

Primary Sources

- Ishwar , (Editor) ,*Dnanavrnavtantra* , Anandashram Sanskrit Granthavali Granthank 69 ,Anandashram Mudranalaya, Pune ,1987
- Kathavate A.V.(Editor) ,*Dyvashryakavya by Hemchandra* , (With Commenery by Abhaytikagni) ,Bombay Sanskrit And Prakrut Series No.lxix ,Government Central Press ,1915
- Mishra Dr.S. , *Brihadsamhita (Part 1)* , Ranjan Publications , Delhi , 1997
- TagareG.V.(Editor),*ShreeKaraveerMahatmya,* ShivajiVidyapeethKolhapur, 1980
- MaxMullar,(Editor),*Rig-Veda Sanhita, Vol iv Mandalx,* Krishnadas Academy, Varanasi , 1983
- Satavlekar *The Mahabharat Text As Constituted In Its Critical Edition* (Volume 1), Bhandarkar Oriental Research,Pune,1971
- Sharma R.N.(Editor) , *HARIVAMSHAPURANAM* , Nag Publishers , Delhi,1985
- SharmaR.N.(Editor),SHREEMARKANDEYPURANAM,NagPublishers, Delhi,2008
- Nagsharan,Sinha,(Editor),*SHREEMADDEVIBHAGAVATA,* NagPublishres,Delhi, 1986
- NagsharanaSinha,(Editor),*SHREEMATSYAMAHAPURANA* Nag Publishers,1983
- Bulhar George,(Editor), *Vikramankadevacharita*, The dept.of Public Instructions,Bombay,1875

Secondary Sources

- Agrawal V.S., *Devimahatmya* ,All India Kashiraj Trust,1963
- Altekar A.S.,*Rashtrakutas AndTheirTimes,*OrientalBook Agency,Pune,1961
- Banarjea J.N.,*Development Of Hindu Iconography* ,Munshilal Manoharlal,New Delhi ,1974
- Bhandarkar R.G., *Vaishnavism,Shaivism And Minor Religious Systems,* Munshilal Manoharlal,Delhi ,2001
- Bhattacharya R.N. *History Of S'akta Religion,* Munshilal Manoharlal,Delhi 1974
- ChakrabortyHariprasad,*ShaktaTantric Cult In India,*Punthi Pustak,Calcutta,1996
- Chinmulgund & Mirashi V.V. ,*Review Of Indological Research In Last 25 Years,* Bhartiya Charitrakosh Mandal ,1967

- Deglurkar G.B.,*Temple Architecture And Sculptures Of Maharashtra*,Nagpur University ,1974
- D'souza Leela ,*Cultural History Of India-Diversity,Syncretism &Synthesis* ,Rawat Publications ,2007
- Fleet J.H. ,*The Dynasties Of The Kanarese Districts Of Bombay Presidency*, Central Government Press, Bombay , 1896
- Graham Major D.C., *Statistical Report On The Principality Of Kolhapur*, Government of Bombay Presidency, Bombay, 1854
- Gupte R.S.,*Iconography Of Hindus,Buddhist And Jain,* D.B.Taraporevala Sons & Company Pvt.Ltd., 1972
- Kane P.V.,*History Of Dharmashastra Vol.v.Part* ii,Government Oriental Series, Bhandarkar Oriental Research Institute, Pune ,1968
- Krishna Dev , *Bhumij Temple Studies (Indian Temple Architecture)* , 1975
- Kundangar K.G. , *Notes On Shri Mahalakshmi Temple*, Kundangar K.G. ,1929
- Kundangar K.G. ,*Inscriptions In Northern Karnataka And Kolhapur State* ,
- Lad R.D.& Bodhe G. ,*Goddess Mahalakshmi Temple At Kolhapur:Shaktipeeth*, Siddhashakti Publication,Mumbai ,2008
- Mc.Crindle John W,*Ancient India As Described by Ptolemy*,Munshiram Manoharlal ,2000
- Mate M.S. , *Temples And Legends Of Maharashtra,*
- Marshall John,*Mohenjo-da-ro And Indus Civilization* ,Indological Book House , Delhi ,1983
- Mirashi V.V. *Select Articles* ,Bharatiya Itihas Sanshodhan Mandal ,1976
- Mukulanand Shastri,(Editor) ,*Tripurarahasya* Kashi Sanskrit Series No.92 , Jayakrishnadas Haridas Gupt ,1932
- Mujumdar R.C. (Editor) ,Serirs Vol iv ,*The Age Of Imperial Kanauj* ,Bharatiya Vidya Bhavan, Bombay , 1993
- Nandi Ramendranath ,*Religious Institutions And Cults In The Deccan* ,Motilal Banarasidas, Delhi ,1973
- Narasinhachar R. ,*The Lakshmidevi Temple At Doddagaddavalli*, Mysore Government Press, Bangalore , 1919
- Rao Ramchandra , *Shrichakra*, Shree Sadguru Publications , 1979
- Rao T.A.G.,*Elements Of Hindu Iconography Vol I Part ii* ,Motilal Banarasidas Publishers, Delhi ,1997, 1971

- Ritti Shrinivas & Karavirkar A.B.,*Inscriptions From Kolhapur District* ,Prasaranga Kannad University , Hampi , 2000
- Sankalia H.D. & Dikshit M.G. ,*Excavations At Brahmapuri (Kolhapur)*, Deccan College Post Graduate Research Institute, Pune ,1952
- Sastry K.A Nilkanth ,*The Cholas* ,University Of Madras ,1984
- Saundar Rajan , *Indian Temple Style* , Munshilal Manoharlal, New Delhi ,
- Sharma R.C.,*Shakta Contribution To Varanasi*, Dnanpravah Centre For Cultural Studies And Research , Varanasi , 2006
- Shiromani Pt. Bharatchandra (Editor) , *Chaturvargachintamani Of Shree Hemadri Vol iii Part I* ,Chaukhamba Sanskrit Sansthan,Varanasi , 1985
- Shrivastava Balaram,*Iconography Of Shakti*,(A Study Based On Shritatvanidhi),Chaukhamba Oriental Research Studies No.9 ,1978
- Shukla Lalitkumar ,*A Study Of Hindu Art And Architecture* ,Chaukhamba Publication, Delhi ,1972
- Sircar D.C. , *The S'ktapithas* , Motilal Banarasidass, Delhi , 1973
- Soundar Rajan K.V.,*Early Temple Architecture In Karnataka And Its Ramifications*, Kannad Research Institute,Karnatak University,Dharwad ,1969
- Suresh K.M.(Dr) ,*Temples Of Karnataka* ,Bharatiya Kala Prakashan ,2003
- Suryakant(Editor),*The Kumarsambhavam Of Kalidas*, Sahitya Academ,y,New Delhi ,1962
- *The Struggle For Empire* ,Bharatiya Vidya Bhavan Serirs Vol v ,1989
- Thosar H.S. (Dr) ,*Historical Geography Of Maharashtra And Goa* ,The Epigraphical Society Of India, Mysore ,2004
- Wadekar M.L. ,*Devimahatmya* ,Oriental Institute, Baroda , 1997
- Yazdani G. , *The Early History Of The Deccan* , Oriental Books Reprint Corporation , New Delhi , 1982
- Verma O.P. ,*Yadavas And Their Times* ,
- Watters Thomas M.R.A.S. ,*On Yuan Chwang's Travels In India* ,Royal Asiatic Society ,1904

JOURNALS

- *Bombay Karnatak Inscriptions* ,*Vol I Part I*
- *Epigraphiya Indica Vol iii*
- *Epigraphia Indica* Vol xviii ,
- Epigraphia Indica Vol xxix


- *Epigraphiya Carnatica Vol v*
- Corpus Inscription Indecorum Vol vi, *Inscriptions Of The Shilaharas*, Archaeological Survey Of India ,1977
- Gopal B.R. (Dr),*Karnataka Inscriptions Series Vol v,*Kannad Research Institute,Karnatak University, Dharwad ,1969
- *Indian Antiquary* Vol ix, 1947 (Naik A.V., *Structural Architecture Of The Deccan)*
- *South Indian Inscriptions, Volume iii Part I, 1899*
- *South Indian Inscriptions, Vol I,Part ii*
- *South Indian Inscriptions* ,Volume xv , 1986 ,(Reprint)
- *South Indian Inscriptions, Vol xi Part ii*
- *Indian Culture* Volume viii
- Annegiri A.N.(Editor),*Karnataka Inscriptions Vol iv*,Kannad Research Institute, Dharwad,1961

THESIS


- Bhende Dr.U., *A Cultural Study Of The Temples Of Southern Maharashtra (Ph.D Thesis)*, Karnataka University, Dharwad, 1989
- Gharpure,*The Art and Architecture of Shilaharas*,(Thesis)Mumbai University,1998
- Morese G.M., *Kadamb Kul*,Bombay,1931
- Malse,Thesis (Ph.D.) ,*Kolhapur A Study Of Urban Geography*, University Of Pune
- Naik A.V. *Archaeology Of The Deccan*,Thesis (Ph.D) ,Vol iv, Bombay University ,1947
- Paranjape Binda,*Cultural History Of The Konkan Based On Shilahar Inscriptions*,Thesis (Ph.D) . Deccan College Post Graduate Research Institute, Pune ,1989
- Sawant G.T.,Thesis (Ph.D.) *History Of Shilaharas*, University Of Bombay ,1984

REPORT - Institute Of Research And Development In Oriental Studies Arms And Armour. (IRDOS) Pune (Report).Scientific Report Dtd .

छायाचित्रे




महालक्ष्मी मंदिराचा नकाशा



महालक्ष्मी मंदिर




महाद्वार (पश्चिम दरवाजा)



घाटी दरवाजा (उत्तरेकडील दरवाजा)



गणेशमंडप दक्षिण द्वार




गणेशमंडप दक्षिणेकडील कक्षासन




गणेशमंडप




गणेशमंडप कक्षासन




गणेश मंडपातून महालक्ष्मी (सभा मंडपातून बाहेर पडण्यास असलेल्या पायऱ्यांचे अंश)




सभामंडपातील स्तंभ




सभामंडप व वरील मजला




सभामंडपातील सभापद्म छत




सभामंडपातून अंतराळाचा दरवाजा




अंतराळातील दक्षिणेकडील खोली




गाभाऱ्याचे प्रवेशद्वार



गाभाऱ्यातील खोली




महालक्ष्मी मूर्तीवरील छत




प्रदक्षिणापथातून गाभाऱ्यात पाणी आणणारे मुख




प्रदक्षिणापथातून पाणी गाभाऱ्यात पोहोचविणारे लहान कुंड





प्रदक्षिणापथाचे छत



सालंकृत महालक्ष्मी



वज्रलेपानंतरची महालक्ष्मी




वज्रलेप निघाल्यानंतरची महालक्ष्मी




मस्तकावरील सलिंग योनि

(वरील सर्व छायाचित्रे श्री.पूजक श्री.मुनीश्वर यांच्या सौजन्याने)





महालक्ष्मी मंदिर अंतराळाचे बाह्यांग (दक्षिणेकडील)



महालक्ष्मी मंदिरउत्तरेकडील अंतराळाचे बाह्यांग

(भितीच्या आत वरच्या मजल्यावर जाताना दिसते)




वरच्या मजल्यावरील मातुलिंगास जाताना पायऱ्यांशेजारी दिसणारा महालक्ष्मी मंदिराच्या बाह्यांगाचा भाग




नंदिमंडप छत




नंदिमंडप




नंदिमंडप व सभामंडपाच्यामधील स्तंभ



मातुलिंगातून नंदिमंडप



सभामंडपाचे वरच्या मजल्यावर आलेले स्तंभशीर्ष






मातुलिंग गाभारा



महालक्ष्मी मंदिर उत्तरेकडून



महालक्ष्मी मंदिर पूर्वेकडून




महालक्ष्मी मंदिर दक्षिणेकडून




महालक्ष्मी मंदिर (महासरस्वती पश्चिम द्वार)(ब्रिटिश लायब्ररीतून मंदिराचा जुना फोटो)




देवकोष्ठ ते छाद्य




महालक्ष्मी मंदिर अधिष्ठान ते देवकोष्ठ






महालक्ष्मीमंदिराच्या दक्षिण भद्रावरील गौरीशंकराचा मूळ गाभारा व प्रवेशद्वार



महालक्ष्मीमंदिराच्या दक्षिण भद्रावरील गौरीशंकर गाभारा



चतुर्भुज शिवप्रतिमा (महालक्ष्मी मंदिर)




काली (महालक्ष्मी मंदिर)




नूपुरपादिका (महालक्ष्मी मंदिर)



दर्पणा (महालक्ष्मी मंदिर)




महालक्ष्मी सभामंडपाचा वायव्य कोपरा व बाह्यांगावरील देवकोष्ठे




महालक्ष्मी सभामंडपाचा नैऋत्य कोपरा वबाह्यांगावरील वेसर देवकोष्ठ




दक्षिण बाह्यांगावरील सुरसुंदरी शुकसारिका



महाकाली मंदिर पश्चिम दरवाजा (महालक्ष्मी मंदिरास जोड पश्चिमेकडून)




महाकाली मंदिर पूर्व दरवाजा (महालक्ष्मी मंदिराचा जोड पूर्वेकडून)



महाकाली गाभाऱ्याची चौकट व शेजारिल स्तंभ



महाकाली गाभारा दर्शनी भाग




महाकाली प्रदक्षिणा मार्ग



महाकाली मंडप पूर्वेकडील चार स्तंभ




सांप्रत मंदिरातील महाकाली प्रतिमा




महाकाली मंदिरातील सालंकृत महाकाली प्रतिमा

(हे छायाचित्र श्रीपूजक श्री.शरद मुनीश्वर यांच्या सौजन्याने)



ललाटबिंबावरील महाकाली



महाकाली मंदिर वायव्येचे बाह्यांग



महाकाली मंदिर थर



मुग्धा (महाकाली मंदिर)




पत्रलेखिका (महाकाली मंदिर)



भैरवी




भैरव




स्त्री प्रतिमा (अधिष्ठानावर लेख दामोजय)

(महालक्ष्मी मंदिर)



स्त्री प्रतिमा (अधिष्ठानावर लेख रामोज)


(महालक्ष्मी मंदिर)



देवकोष्ठावरील लेख (लेक्क कोडु)(महाकाली मंदिर)



सांप्रतची महासरस्वती मूर्ति



सालंकृत महासरस्वती


(हे छायाचित्र श्रीपूजक श्री. शरद मुनीश्वर यांच्या सौजन्याने)




महासरस्वती मंदिर (पश्चिमेकडील भाग)




श्रीयंत्र



नवग्रहमंडप स्तंभावरील लेख



शेषशायी मंदिर मंडपातील छत



लक्ष्मी मंदिर , दोड्डगड्डवळ्ळी , कर्नाटक

(नरसिंहाचार यांच्या पुस्तकातून)




वीरगळ सर्वात वरच्या पट्टिकेत महालक्ष्मी



वीरगळ शीर्ष पट्टिकेत महालक्ष्मी व महाकाली (मुध्थया वीरगळ)

№ 11



श्रीनमः शिवायश्री लाध्यासुमद्ग

लक्ष्मीसचतॉसवद्ग टिएी । छिस

तिशितसालिंगं माराषाप्यो प्य

द्गापिएी । ङ यानिभुदासु ट

वांद्याभुनिमानवपुडिनामुरा

यादव सिंघण (द्वितीय) याचा अभिलेख(इ.स.१२१८)(आवारातील गणपती मंदिराच्या स्तंभावर)

(पुराभिलेखागार,मुंबई,महाराष्ट्र शासन यांच्या सौजन्याने)

टा तिः॥ याम्रङ्गा ता विश्वंवि

कसयतित्यांका व मा याति॥

नटवृ ध्या प्रना पार्कथी मात्रिन्न

भ नूप तिः ऐसात ------------

पालापुत्राध र्मॐ ना प मः व

कृ वा र्ति सु नक्षय्य ऊ यी सिंधए

नू प तिः । एन्नट ब्राम्हटीचूटी

तुरिस्यः सूर्यात ऊसा । ता षि ता थी

मदालक्ष्मी। एना त क चि न्नूप णेः॥

सश्री सि घ णानूपाल ---------

तुर्थः। नम्राव्यं ना मावली। टायना

ट
न
व
ऊ
प
लि
लृ
ट
श्रे
भ
सा

टायणाशादशमदाटानस्यंतर्पि

नदिंडधुडसुवर्णगजुंदधडयादे

वकुलकमलविकाससाकुटलु

डद्घलसीमं - - - - - - - - - - - प्रजा

पालाकश्वटर्यांयं पं ध्रंदं - - - - - - -

लिखूक्षविवकाविद्याधेर्यडितम

न्ल मालाविश्वटमदनमादेश्व

टसटस्वतीकन्ठाभरणद्त्यादि।

श्राक्षेत्रद्रितिपालाम्नालीविलस

न्माणिक्याराविद्धय - - - - - - -

स्यातांतुदछ्रासिंद - - - - नित्यक्रि

k.3

m 502

श्री — — — — श्रीकोनुग्रहमध्यातें

न एशनिपध्यातीकिर्तिकालोशु

द्धुद्दिरकरातलदव्याःपुरस्ता

र णोशाकवर्ष ११६० बहुधान्यनामसंव

त्सरादव्यापुरतःलानपालिन


लिबद्दिमालयसुंकैननिवासव

वैवैकैश्मैणौ विरचितलाटप

— — — — उयनिःश्यः कालोसव

निलाः॥ श्री मंगलमाकश्रीा

२५



यादव सिंघण(द्वितीय)याचा अभिलेख (इ.स. १२३५)(लक्ष्मीविलास पॅलेस वस्तु संग्रहालय)

(पुराभिलेखागार,मुंबई,महाराष्ट्र शासन यांच्या सौजन्याने)

13504

दाल श्री।यीमिहाकालीार

ध्राबिंऊयतु ।वक्षिथ्रीापीटप

तापवक्रवर्तिथीसि यणादव

वि। यपाऊँ

मुंबई विद्यापीठाच्या पीएच्.डी. पदवीसाठी देण्यात येणाऱ्या प्रबंधाचा सारांश,

प्राचीन भारतीय संस्कृती या विषयांतर्गत

प्रस्तावित प्रबंधाचे नांव : महालक्ष्मी मंदिर कोल्हापुर ,एक सांस्कृतिक अध्ययन

विषय : प्राचीन भारतीय संस्कृती

विद्यार्थ्याचे नांव: सौ. ऋता अ.ठाकुर

मार्गदर्शक प्राध्यापकाचे नांव : डॉ. अरविंद प्र. जामखेडकर

संशोधनाचे ठिकाण : के.जे.सोमय्या सेंटर फॉर बुद्धिस्ट स्टडीज

संस्थेचा पत्ता: के.जे.सोमय्या सेंटर फॉर बुद्धिस्ट स्टडीज

सोमय्या विद्याविहार कॅम्पस,

तिसरा मजला,मॅनेजमेंट बिल्डिंग,

विद्यानगर,विद्याविहार(पू),मुंबई-४०० ०७७

विद्यापीठाचे नांव: मुंबई विद्यापीठ

नोंदणीचा दिनांक व क्रमांक : ०५.०३.२००८ / १५.२०

प्रस्ताव देण्याचा दिनांक : ०३.१२.२०१२

मार्गदर्शक प्राध्यापकाची सही:

संस्था प्रमुखाची सही:

विद्यार्थ्याची सही :

संस्थेचा शिक्का व दिनांक:

K. J. SOMAIYA CENTRE FOR BUDDHIST STUDIES
MUMBAI
400 077.

संचालक

डिपार्टमेंट ऑफ बुद्धिस्ट स्टडीज

सोमय्या कॅम्पस,विद्याविहार,मुंबई-४०० ०७७

प्रबंधाचा सारांश

कोलापुरं महास्थानं यत्र लक्ष्मीः सदा स्थिता ।

मातुःपुरं द्वितीयं च रेणुकाधिष्ठितं परम् ।।५।।

तुलजापुरं तृतीयं स्यात् सप्तश्रृंगं तथैव च ।

हिंगुलाया महास्थानं ज्वालामुख्यास्तथैवच।।६।।

(देवीभागवत, ७.३८.५-६)

देवीभागवतातील १०८ शक्तिपीठांच्या यादीत महाराष्ट्रातील चार (साडेतीन) शक्तिपीठांना सर्वात वरचे स्थान प्राप्त झाले आहे.

महाराष्ट्रातील ही साडेतीन शक्तिपीठे म्हणजे कोल्हापुरची महालक्ष्मी, सत्वगुणविशिष्ट पूर्णपीठ; मातापुर वा माहूर गडावरील रेणुका, तमोगुणविशिष्ट पूर्णपीठ;तुळजापुरची भवानी,रजोगुणविशिष्ट पूर्णपीठ; व वणीच्या सप्तश्रृंगीगडावरील जगदंबा हे अर्धपीठ म्हणून प्रसिद्ध आहे. सतीच्या ठिकठिकाणी पडलेल्या देहांच्या अवयवांठिकाणी शक्तीची उपासना कुठे तांदळास्वरूपात, कुठे मूर्तिस्वरूपात तर कुठे अग्निस्वरूपात होत आहे. कोल्हापुरची महालक्ष्मी स्थानक स्वरूपात,चतुर्भुज,दक्षिणाधःक्रमाने महाळुंग,गदा,खेटक , पानपात्र व मस्तकावर लिंग व शाळुंका धारण केलेली आहे. माहूरची रेणुका तांदळास्वरूपात,तुळजापुरची भवानी अष्टभुजा महिषमर्दिनी स्वरूपात तर सप्तश्रृंगगडावरील जगदंबा अष्टादशभुजा स्वरूपात पूजिली जाते.

मातृदेवता किंवा शक्ती हिचे पूजन करण्याची परंपरा हरप्पा संस्कृतीपासून सुरु असलेली दिसून येते. ऋग्वेदातील रात्रिसूक्त व अदिती या देवतेच्या वर्णनात शक्तिसंप्रदायाचे मूळ असलेले लक्षात येते. परंतु शक्तिदेवतेच्या या संप्रदायाची सुरवात नक्की कधीपासून झाली याबद्दल निश्चित असा पुरावा आज उपलब्ध नाही. आभिलेखिक पुराव्यांवरून इ.स. ४थ्या शतकाच्या पूर्वी शक्तिसंप्रदाय अस्तित्वात नव्हता. मौर्यकाळापासून किंवा त्याअगोदरही स्त्री देवतांच्या अंकनाची सुरवात झालेली दिसून येते. शक्तिसंप्रदायात तंत्राचा अवलंब इ.स. च्या ७ व्या शतकापासून सुरु झाला.

शाक्तसंप्रदाय शैव संप्रदायाच्या जवळचा संप्रदाय असल्यामुळे शैव क्षेत्रांमध्ये शाक्तसंप्रदायाची वाढ झालेली दिसून येते.

मार्कंडेयपुराणातील देवीमाहात्म्य या भागात शाक्तसंप्रदायाचे मूळ दिसून येते. सुरथ राजा व वैश्य समाधि यांच्यावर आलेल्या आपत्तीचे निराकरण करण्यास मार्कंडेय ऋषींनी त्यांना देवीची पूजा-अर्चा करण्यास सांगितली. देवीचे माहात्म्य पटवून दिल्यानंतर मत्स्यपुराण,देवीभागवत,देवीपुराण,कालिकापुराण, उत्तर शाक्त उपनिषदे या ग्रंथांमधून शक्तिसंप्रदायाविषयी चांगलीच माहिती मिळते.

महालक्ष्मी हीस आद्यशक्ती मानून तिच्यापासून सर्व देवदेवतांची निर्मिती झाली असे वर्णन येते. विश्वाची निर्मिती त्याचे पालनपोषण व संहार करणारी तीच आद्यशक्ती आहे. ती ,महाकाली व महासरस्वतीच्या रूपांच्या मदतीने वरील कार्य करते.गीतेतील सिद्धांताप्रमाणेच ज्या ज्या वेळी भूतलावर असुरांचे साम्राज्य वाढेल त्या त्या वेळी ही देवता वेगवेगळे रूप घेऊन पृथ्वीतलावर अवतरेल, विविध रूपात ती पूजिली जाईल अशा प्रकारची संकल्पना रूढ झाली.

आज संपूर्ण भारतात निरनिराळ्या शक्तिपीठांतून शक्तिदेवतांची पूजा होत आहे, मार्कंडेयपुराणाच्या निर्मितीपासून (इ.स.४थे ते ७वे शतक)[1]देवी उपासनेला प्राधान्य दिलेले दिसून येते. इ.स. च्या ४थ्या शतकापासून पीठ निर्मितीची कल्पना पुढे येऊन आधी ४, नंतर ५१ व पुढे १०८ शक्तिपीठांची कल्पना निर्माण झाली.

कोल्हापुर नाम :

कोल्हापुर नामाचा इतिहास बघता कोल्हापुर ह्या नावाने ओळखले जाणारे शहर प्राचीन काळात वेगवेगळ्या नावांनी ज्ञात होते. विख्यात परकीय प्रवासी टॉलेमी (इ.स.सु.१५०)हिप्पोकुराचा उल्लेख बॅलिओक्युरसची राजधानी असा करतो. भांडारकर यांच्यामते हिप्पोकुर म्हणजेच कोल्हापुर होय. महाभारतात (अश्व.८४-१९) कोल्लगिरि; बृहत्संहितेत (अ.१४,१३)कोल्लगिरि ;मत्स्यपुराणात (अ.१३) करवीर; स्कंदपुराणात(सह्याद्री खंड,अ.२,२४-२७) करवीर; बृहत्कथाकोशात(उपाध्ये,१९४३;पृ.३४७)कोल्लगिरिपट्टण ; देवीभागवतात (अ.७.३१.४-५;अ.७,३८.५-६) कोलापुर ; हरिवंशात (अ.२.३९.५०)करवीरपुर; पद्मपुराणात कोल्हापुर

[1] काणे ,१९६८,खंड५;पृ.९०३

करवीरमाहात्म्यात(अ.१.५१) कोल्लकक्षेत्र, (अ.३.५५) करवीरपट्टण (अ.७.९) कोल्लापुर अशा नावांनी कोल्हापुरचा उल्लेख येतो. ग्रंथांतर्गत व ताम्रपट आणि कोरीव लेखांतील कोल्हापुरचे उल्लेख बघता एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे ग्रंथात बरेच ठिकाणी या स्थानाचा उल्लेख करवीर असा आला आहे परंतू कुठल्याही ताम्रपट वा शिलालेखांत करवीर असा क्षेत्रनामाचा उल्लेख नाही.

कोल्हापुर राजकीय इतिहास :

कोल्हापुर नजिकच्या ब्रह्मपुरी टेकाडावरील उत्खननावरून या जागी निरनिराळ्या काळात वस्ती असल्याचे स्पष्ट झाले आहे. सातवाहन वंश (इ.स.पूर्व ३रे शतक ते इ.स.२१८),राष्ट्रकूट वंश (सु.इ.स.२१८ते इ.स.५००), वातापी चालुक्य वंश (सु.इ.स.५०० ते इ.स.७५०), राष्ट्रकूट वंश (सु.इ.स.७३५ ते इ.स.९७५), कल्याणीचे चालुक्य वंश (सु.इ.स.९७३ ते इ.स.११८९), शिलाहार वंश (सु.इ.स.९४० ते इ.स.१२१), यादव वंश (कोल्हापुर इ.स.१२१२ ते इ.स.१३१७),सुल्तानी काळ (इ.स.१३१८ ते इ.स.१६७५),मराठा (इ.स.१६७८ ते इ.स.१९४७)अशा राजवंशांनी राज्य केले.शिलाहार काळात बांधलेल्या महालक्ष्मी देवालयाची भरभराट यादवकाळात झालेली दिसून येते. सुल्तानी काळात तर काही काळ मंदिर ओस पडले व मराठाकाळात मूर्तिची पुन:स्थापना होऊन या मंदिराची महती दिवसेंदिवस वाढत गेली.आज कोल्हापुरची महालक्ष्मी लाखो भाविकांचे श्रद्धास्थान बनलेली आहे.

करवीरनिवासिनी श्री महालक्ष्मी हे देवालय महाराष्ट्रातील कोल्हापुर शहराच्या मध्यवर्ती स्थानावर आहे. अंबरनाथ येथील शिवमंदिर, खिद्रापुर येथील कोप्पेश्वर मंदिर या मंदिराप्रमाणेच ह्या मंदिरावर कलाकुसर असून या वरील दोन मंदिरांपेक्षाही ते आकाराने मोठे आहे. इ.स.११ व्या शतकातील या देवालयात आजही वंशपरंपरागत पुजारी देवीची पूजा अर्चा , सण, उत्सव साजरे करतात.

राष्ट्रकूट राजा अमोघवर्ष प्रथमपासून लौकिक पावलेल्या या स्थानाला शिलाहार वंशीयांनी आपले दैवत मानले. यादव वंशातील राजांनी या देवतेची मनोभावे सेवा केली. सुल्तानी सत्तेत मूर्ती कपिलतीर्थाजवळील तुळजाभवानी देवळात हलविण्यात आली. मंदिरालाही या आक्रमणाची झळ पोहोचली. परंतु संभाजी (द्वितीय)च्या कारकीर्दीत सर्व मूर्तींची पुन:स्थापना करण्यात आली व मंदिरास पुन: वैभव प्राप्त झाले.

महालक्ष्मीची तीनही रूपे आपणास कोल्हापुर येथील महालक्ष्मी देवालयात दिसून येतात. कोल्हापुरातील महालक्ष्मी देवालय त्रिकूट देवालय आहे. देवालय प्राकारयुक्त असून पश्चिमाभिमुख आहे. या देवालयात तीन स्वतंत्र गाभारे आहेत. मध्यभागी पश्चिमाभिमुख महालक्ष्मी, उत्तरेस दक्षिणाभिमुख महाकाली व दक्षिणेस उत्तराभिमुख महासरस्वती आहे. तीनही गर्भगृहे सांधार आहेत. या मंदिराची रचना वैचित्र्यपूर्ण व वैविध्यपूर्ण म्हणता येईल. त्यामुळे महाराष्ट्रातील हे अशा पद्धतीचे एकमेव देवालय आहे असे आपण म्हणू शकतो.

महालक्ष्मी मंदिराची वैशिष्टे :

स्थापत्यदृष्ट्या ही तीनही मंदिरे वेगवेगळी आहेत. महालक्ष्मी देवालय सप्तरथ, सांधार,मेरुमंडोवर पद्धतीची रचना असलेले असून बाह्यांगांवरील देवकोष्ठांवर नागर शैलीची शिखरे कोरली आहेत. महाकाली देवालय पंचरथ,सांधार व बाह्यांगावरील देवकोष्ठांवर वेसर पद्धतीची शिखरे कोरली आहे . महासरस्वती देवालय साधे दगडी बांधकाम असलेले व सांधार आहे .या देवालयाच्या बाह्यांगावर कसल्याही प्रकारचे अलंकरण नाही. महालक्ष्मी मंदिरातील गाभाऱ्याच्या प्रदक्षिणापथाचा आकार अनेक रथ असलेल्या वास्तूच्या बाह्यरेषेसारखा आहे. महाकाली मंदिराच्या गाभाऱ्याचा प्रदक्षिणामार्गही निर्गमहीन व प्रवेशहीन आहे. महासरस्वती मंदिराच्या गाभाऱ्याचा प्रदक्षिणामार्ग निर्गमहीन व प्रवेशहीन आहे. महाकाली मंदिर अपेक्षिल्याप्रमाणे काटकोनात नसून महालक्ष्मी मंदिराच्या सभामंडपास तिरके जोडलेले आहे. त्यामुळेच महालक्ष्मी मंदिराच्या सभामंडपातून महाकाली व महासरस्वती मंदिराचे गाभारे सरळ रेषेत दिसत नाहीत. महालक्ष्मी मंदिराचा सभामंडप,अंतराळ व गाभारा दुमजली असून या ठिकाणी नंदिमंडप व शिवलिंग असलेला गाभारा आहे. महालक्ष्मी मंदिराच्या गाभाऱ्यास जोडून उत्तर ,पूर्व व दक्षिणेस अशी तीन दालने आहेत. अशाप्रकारची दालने खिद्रापुरच्या कोप्पेश्वर मंदिराच्या गाभाऱ्यासही आहेत. मंदिराच्या वरच्या मजल्यावरील मातुलिंगासही (शिवलिंग असलेल्या गाभाऱ्यास)तीन दालने आहेत.परंतु त्यांचे प्रवेशमार्ग प्रदक्षिणापथातून आहेत. महालक्ष्मी मंदिराच्या अंतराळातही उत्तर व दक्षिणेस एक एक खोली आहे. वरील रचनेचा परिणाम म्हणून महालक्ष्मी व महाकाली मंदिराच्या बाह्यांगाच्या भद्रात तीन स्वतंत्र देवालये आहेत, महालक्ष्मी मंदिराची बांधणी करताना दिशासाधनाचा अवलंब केलेला असून ८ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबर आणि ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी याकाळात सूर्यास्ताच्यावेळी महालक्ष्मीच्या मूर्तीवर सूर्याची किरणे पडतात.

महालक्ष्मी मंदिराच्या प्राकारात शेषशायी मंदिर व नवग्रह मंडप यासारखे जैन मंदिराचे अवशेष सापडतात. या वास्तूसंकुलातील काही वास्तू अंश मुख्य देऊळ बांधल्यानंतरच्या काळातील आहेत. कोल्हापुर व आसपासच्या भागांवर इ.स. ११-१२ व्या शतकात शिलाहारवंशीयांनी राज्य केले. या वंशातील राजांनी जैनधर्मीयांशी नाते जोडले होते व जैन धर्माला राजाश्रय दिला होता. त्यामुळे कोल्हापुर परिसरातच नव्हे खुद्द महालक्ष्मी मंदिराच्या आवारात जैनांची देवालये दिसून येतात. थ्यामुळेच काही इतिहासकारांनी महालक्ष्मी ही जैनांची पद्मावती असल्याचा दावा केला आहे. पूर्वी हे जैन बसदी असून यादवांच्या काळात या बसदीचे महालक्ष्मी मंदिरात रूपांतर झाले असे त्यांचे म्हणणे आहे.

मंदिराविषयीची मते :

असे वैशिष्ट्यपूर्ण देवालय सहजच इतिहासकारांचाही कौतुकाचा विषय बनले. . अनेक विद्वानांनी या मंदिराविषयी आपापली मते मांडली. मेजर ग्रॅहम, के.जी. कुंदनगार,ग.ह. खरे,वा.वि.मिराशी,अ.प्र.जामखेडकर या इतिहासकारांनी महालक्ष्मी व तिचे मंदिर यासंबंधात आपली मते मांडली. मेजर ग्रॅहम यांनी जैन दृष्टिकोलातून देवळाचा अभ्यास केला.

इ.स. १८५४ मध्ये इंग्रजांचा पोलिटिकल एजंट ग्रॅहम याने आपल्या ग्रंथात[2] कोल्हापुरविषयीची माहिती प्रसिद्ध करताना कोल्हापुर व परिसरात सापडलेल्या शिलालेखांच्या प्रतिलिपी व त्यांचे भाषांतर प्रसिद्ध केले.त्यांच्यामते " little information can be obtained regarding the founder of the great temple, or of the period of its existence"[3]महालक्ष्मी मंदिराच्या गर्भगृहाच्या ललाटावर गणेशाचे अंकन नसल्यामुळे कदाचित हा गैरसमज झाला असावा.

"The Jain assert that not only the temple but the image itself, originally belonged to them and that the name of goddess was Padmāvatī.

के.जी.कुंदनगार यांच्यामते हे देवालय चालुक्य वंशीय राजा कर्णदेव याने इ.स. ६३४ नंतर बांधले. हे मंदिर स्थापत्यदृट्या चालुक्य पद्धतीचे आहे. राष्ट्रकूटांच्या काळात या मंदिराचे जैन बसदीत रूपांतर झाले असावे व पुढे यादवांच्याकाळात या मंदिराचे पुन: महालक्ष्मी मंदिरात रूपांतर झाले असे मत मांडले.

[2] मेजर ग्रॅहम,१८५४

[3] मेजर ग्रॅहम, १८५४; पृ.३१७

ग.ह. खरे[4] यांनी हे देवालय हिंदूंचेच देवालय असून महालक्ष्मी मंदिर शके ९०० च्या पूर्वीचे वाटत नाही असे सांगितले.यांनी अभिलेखीय ,ताम्रपटीय व लेखी कागदपत्रे यांच्या पुराव्यानिशी ग्रॅहम व कुंदनगार यांची मते खोडून काढली.प्राचीन व अर्वाचीन पुरावे देवून देवालय संबंधीच्या मतमतांतरावर प्रकाश टाकला.परंतु या विवेचनात त्यांनी मंदिराच्या स्थापत्याबाबत विशेष लिहिले नाही. फारतर गाभारा थोडा प्राचीन (शके ८००)असण्याचा संभव आहे असा त्यांचा समज झाला. राष्ट्रकूटकाळात तिचे एखादे देऊळ असण्याची शक्यता आहे पण आजचे देऊळ नाही असे मत त्यांनी मांडले. महालक्ष्मी निश्चयाने शैवपंथीय देवता आहे ,पण वैष्णवांना ती स्वपंथीय देवता आहे असे वाटून तीस विष्णुपत्नी लक्ष्मी वैष्णवांनी बनविण्याचा प्रयत्न केला. खरे यांनी मात्र देवालय कोणी बांधले याची चर्चा केली नाही.

वा.वि.मिराशी[5] यांनी कोल्हापुरच्या महालक्ष्मीचे देवालय कोणी व केंव्हा बांधले याविषयी लेख लिहून आपले मत मांडले. कोल्हापूर येथील महालक्ष्मीचे देवालय निदान इ.स.९व्या शतकाइतके प्राचीन असून ते बहुधा करहाट येथील कोणा सिंद राजाने बांधले असावे असे अनुमान केले.

गो.बं.देगलूरकर[6] यांच्यामते महालक्ष्मी मंदिर ९व्या १०व्या शतकातील राष्ट्रकूटांच्याकाळचे आहे. नंतर बांधले गेले ते महाकालीचे मंदिर सिंद(सेंद्रक) यांनी उभारले असावे. महासरस्वतीचे सध्याचे मंदिर काही शतकानंतरचे पुनर्निर्मित असावे.मुख्य गाभाऱ्यातील महालक्ष्मीची मूर्ति मूर्तिशास्त्र दृष्ट्या दुर्गा आहे .

अ.प्र.जामखेडकर[7] यांनी महाराष्ट्रातील मंदिरांचा अभ्यास करून मंदिरांचे वर्णन केले. त्यांच्या मते महाकाली व महालक्ष्मी ही दोन मंदिरे इ.स.११व्या शतकाच्या अखेरीस व इ.स.१२व्या शतकाच्या सुरवातीस बांधल्या गेली .सुरवातीला ही दोन मंदिरे एकाच मंदिराचे दोन भाग म्हणून बांधल्या गेली नव्हती.एका मंदिराला नंतर त्याच्या शेजारी नवे मंदिर बांधून जोडण्यात आले.हे बांधकाम एका पीढीतच झाले . प्रथम महाकालीचे मंदिर बांधण्यात आले नंतर त्यात महालक्ष्माची भर पडली. महालक्ष्मी

4 महाराष्ट्राची चार दैवते,१९५८

5 शिलाहारवंशीयांचा इतिहास व कोरीव लेख,१९७६

6 युगयुगीन करवीर-इतिहास दर्शन,२०१०

7 महाराष्ट्र शासन गॅझेटियर,स्थापत्य व कला,२००२

व महाकाली या दोनही मंदिरांची गर्भगृहे सांधार पद्धतीची असल्यामुळे दोन्ही गर्भगृहांवर नागरप्रकारची शिखरे असावीत. महालक्ष्मी मूर्ती इ.स.११व्या शतकातील आहे अशी मते मांडली.

श्रीकांत घारपुरे यांनी आपल्या प्रबंधात महालक्ष्मी मंदिराचा अभ्यास करून आपली मते मांडली. त्यांच्यामते महालक्ष्मी मूर्ती इ,स,१११०-११५० ची असावी .महालक्ष्मी मंदिर हे इ.स.१११० ते इ.स.११२० या दरम्यान शिलाहार राजा गंडरादित्य याने बांधले. महाकाली मंदिर हे इ.स.च्या ११व्या शतकात बांधले. महालक्ष्मी मंदिराच्या वरच्या मजल्यावरील नंदिमंडप व गणेश मंडप १३व्या १४व्या शतकात बांधला. महासरस्वती मंदिराचा काळ १५व्या शतकाचा उत्तरार्ध असावा असे अनुमान सांगितले परंतू यांत मंदिरात होणारे उत्सव महालक्ष्मी शावत का वैष्णव याचा उहापोह केला नाही.

ऊषा भेंडे[८] यांनी आपल्या प्रबंधात महालक्ष्मी मंदिराचा काळ इ.स.१०व्या शतकाच्या शेवटी व ११व्या शतकाच्या सुरवातीचा ठरवला आहे . सभामंडपातील स्तंभांवरून सभामंडप पुनर्बांधणी केलेला असावा असेही मत मांडले.

रा.चिं. ढेरे[९] यांनी महालक्ष्मीची इतर ठाणी,निरनिराळ्या कवीनीकेलेल्या रचना ,तिच्या संबंधीचे पौराणिक व ताम्रपटीय संदर्भ देऊन विवेचन केले आहे.

विषयाची निवड :

अशा या वैशिष्ट्यपूर्ण,वैविध्यपूर्ण जिवंत देवालयाचा (आजही वंशपरंपरागत पुजारी या मंदिरात पूजा- अर्चा करतात) इतिहास व त्यावरील अभ्यासाचा मागोवा घेताना आभिलेखिक पुराव्यांत शैव क्षेत्र, पुराणांत शक्तिपीठ व आज आढळणारे विष्णूपत्नी अथवा लक्ष्मीरूप बघून लक्षात घेतल्यावर या विषयावर अभ्यास करण्याची इच्छा जागृत झाली.

वरील सर्व इतिहासकारांनी महालक्ष्मी व तिची उपासना,तिचे देवालय यांचा एका विशिष्ट पैलूचा विचार केला.महालक्ष्मी देवालयावर एकाचठिकाणी सुसूत्रपणे व मुद्देसूद असा अभ्यास झालेला नाही. महालक्ष्मी मंदिराचा सर्वांगिण विचार करून मंदिराबद्दल सुसूत्र व मुद्देसूद माहिती गोळा करण्याचा प्रयत्न मी या प्रबंधाद्वारे केला आहे.

---

८ ए कल्चरल स्टडी ऑफ दि तेंपल्स ऑफ सदर्न महाराष्ट्र,१९८९

९ करवीरनिवासिनी श्रीमहालक्ष्मी,२००९

यासाठी मी पुराणे,विविध साहित्य, अभिलेख,ताम्रपट,लेखी कागदपत्रे यांचा उपयोग केला. मंदिराला वेळोवेळी भेटी देऊन मंदिरात चालणारे पूजाक्रम,वार्षिक उत्सव स्वत: बघितले. मंदिरातील पुजाऱ्यांकडून माहिती घेतली .यावरून आपल्या प्रबंधाची रचना केली.

प्रकरण १ : राजकीय इतिहास : इ.स. १९४५-४६ साली डेक्कन कॉलेज, पुणे या संस्थेने सांकलिया व दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली या भागातील सांस्कृतिक क्रम जाणून घेण्यासाठी उत्खनन केले. यामधील पुराव्यांवरून इ.स. पूर्व तिसऱ्या शतकापासून कोल्हापुर व त्याचा परिसर मानवी वसाहतीचे केंद्र असल्याचे आढळून आले. या उत्खननात पहिला कालखंड सातवाहन (काहींच्या मते उदय इ.स.पूर्व ३-२ शतक तर काहींच्या मते १ले शतक; व शेवट इ.स.३रे शतक), दुसरा कालखंड शिलाहार (इ.स.११-१२वे शतक), तिसरा कालखंड बहामनी(इ.स.१५-१६वे शतक)व चौथा कालखंड मोगल(इ.स.१६५८तेइ.स.१७०७)असा दिसून आला.

या भागावर सातवाहन वंश,राष्ट्रकूट वंश,वातापी चालुक्य,राष्ट्रकूट वंश,कल्याणीचे चालुक्य वंश , शिलाहार वंश, यादव वंश, बहामनी राज्यकाळ, आदिलशाही,मराठा या शासकांनी राज्य केले. या राजवंशांचा थोडक्यात इतिहास व मंदिरासंबंधीच्या राजघराण्यांच्या इतिहासाचा आढावा या प्रकरणात घेतला आहे.

इ.स.पूर्व दुसऱ्या तिसऱ्या शतकात बौद्ध धर्मीयांचे महत्त्वाचे क्षेत्र, इ.स. १०व्या- ११व्या शतकात बौद्ध, जैन व हिंदू या तीनही धर्मांचे श्रद्धेचे स्थान असलेले दिसून येते.शिलाहार व यादवांच्याकाळात या महालक्ष्मी मंदिराला मोठे वैभव प्राप्त झालेले दिसून येते.शिलाहारांनी तर स्वत:स "महालक्ष्मीलब्धवरप्रसादादिस" म्हणून गौरविले.यादवांच्या काळातही या मंदिरास दाने दिलेली आढळून येतात.सुल्तानी आक्रमणात या मंदिराची नासधूस झाली. या आक्रमणाची मूर्तीस झळ लागू नये म्हणून मूर्ती इतरत्र हलविण्यात आली. परंतु मराठाकाळात या मंदिरास पुन्हा आपले वैभव प्राप्त झाले.

प्रकरण २ : महालक्ष्मीचे पुराणातील उल्लेख : या प्रकरणात हरप्पा संस्कृतीतील मातृदेवता परंपरेपासून ऋग्वेद काळ, रामायण, महाभारत काळातील देवीचे स्वरूप, पुराणातून आढळणारी महालक्ष्मी एका शक्तिपीठ स्वरूपात, जैन ग्रंथांतील महालक्ष्मी, निरनिराळ्या ग्रंथांतील तिचे स्वरूप यांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. करवीरमाहात्म्य, लक्ष्मीविजय,केदारमाहात्म्य, व्यंकटाचलमाहात्म्य या स्थलमाहात्म्यांत आलेले तिचे स्वरूप यांचे वर्णन या प्रकरणात आहे.

वादिराजतीर्थ, मोरोपंत,मुक्तेश्वर आदि कवींनी रचलेल्या महालक्ष्मी संबंधीच्या स्तुतिपर रचना यांचा आढावा घेतला आहे. पौराणिक साहित्यातील **पद्मपुराण,करवीरमाहात्म्य, लक्ष्मीविजय, व्यंकटाचल माहात्म्य,** जैन साहित्यातील **पद्मपुराण,विविधतीर्थकल्प,प्रबंधकोश** या ग्रंथांत आलेल्या महालक्ष्मीसंबंधीच्या कथा,स्थलपुराणांपैकी **करवीरमाहात्म्य, लक्ष्मीविजय, व्यंकटाचल माहात्म्य** या ग्रंथांत आलेल्या महालक्ष्मी संबंधीच्या कथा या प्रकरणात यांचा आढावा घेतला आहेत. हरप्पा संस्कृतीतील मातृदेवता पुढे शक्तिसंप्रदायाची अधिष्ठात्री देवता बनली.ऋग्वेदकाळात हिला गौण स्थान प्राप्त झाले. **मार्कंडेयपुराणातील देवीमाहात्म्यातील** महालक्ष्मी आपल्या विविध अवतारांत पूजिली जाऊ लागली. **मत्स्यपुराण,देवीभागवत** या ग्रंथांतील १०८ शक्तिपीठांची यादी याची साक्ष देते.

प्रकरण ३ : ताम्रपट व शिलालेखांतून आलेले महालक्ष्मीचे उल्लेख : राष्ट्रकूट राजा अमोघवर्ष प्रथम याच्या संजान ताम्रपटापासून देवगिरी यादवांच्या राजा रामचंद्र याच्या शिलालेखापर्यंतचा कालानुक्रमाने आढावा या प्रकरणात घेतला आहे. इ.स. १०५० ५२ याकाळातील कोप्पम् (खिद्रापूर) येथे झालेल्या चोल व चालुक्य यांच्यामधील युद्धात चोलांनी केलेल्या आक्रमणावेळी महालक्ष्मी मंदिर जाळण्याचा प्रयत्न करीत असता मुत्थय्या नामक फूल विक्रेत्याने मंदिर वाचवताना आपले प्राण गमावले या आशयाचा वीरगळ प्राप्त झाला आहे. महालक्ष्मी मंदिराचा इतिहास जाणून घेण्याच्या दृष्टीने या वीरगळास फार महत्व आहे. त्याचप्रमाणे महालक्ष्मीसंबंधातील पुराभिलेखागारातील कागदपत्रे यांचाही आढावा घेतला आहे.

प्रकरण ४ : महालक्ष्मी मंदिर स्थापत्य : कोल्हापुरचे महालक्ष्मी देवालय हे त्रिकूट पद्धतीचे वैविध्यपूर्ण देवालय आहे.या प्रकरणात महालक्ष्मी या त्रिकूट देवालयाची स्थापत्यदृष्ट्या रचना, यात मंदिराच्या आतील स्थापत्य व बाह्यांगाची रचना, महालक्ष्मी मूर्तीच्या आयुधांसंबंधीची चर्चा,महालक्ष्मी मंदिराच्या आवारातील मंदिरांची पूर्वीची स्थिती व त्यात आता झालेले बदल, महालक्ष्मी व महाकाली मंदिराच्या बाह्यांगावरील सुरसुंदरी व त्यांची ओळख,या सर्व बाबींचा ऊहापोह केला आहे.

प्रकरण ५ : कालमानाप्रमाणे मंदिरात झालेली वाढ, या मंदिरांसारखी इतर राज्यांतील मंदिरे : या प्रकरणात ताम्रपट व शिलालेखांचा आधार घेऊन महालक्ष्मी मंदिरात कालानुक्रमाने झालेल्या वाढीचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. कर्नाटक राज्यातील दोड्डगड्डवळ्ळी या ठिकाणावरील अभिनव कोल्लापुर हे स्थान व गुजरातमधील अन्हिलवाडपाटण येथील आज अस्तित्वात नसलेले परंतू **सरस्वती पुराण** या ग्रंथात वर्णिलेले देवालय, ही दोन्ही देवालये करवीर येथील मंदिरा इतकीच महत्वाची समजली

जातात. वास्तु रचना,प्रतिमाविज्ञान इ. दृष्टीकोनातून या तिन्ही मंदिरांची तुलना करण्यात आली आहे. अशा या दोन्ही देवालयांची रचना व या देवालयांमधील कोल्हापुरच्या महालक्ष्मी देवालयातील साम्य व फरक दाखवण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला आहे.

प्रकरण ६ : महालक्ष्मी मंदिरातील नित्य होणारी पूजा , सण व उत्सव : या प्रकरणात महालक्ष्मी मंदिरात होणारी नित्य पूजा ,सण,उत्सव, यांची माहिती आहे. मंदिरातील धार्मिक परंपरेच्या अनुशंगाने कोल्हापुरात या मंदिराच्या आश्रयाने झालेली कलांची वाढ याचहीा आढावा या प्रकरणात घेतला आहे.

प्रकरण ७ : मार्कंडेयपुराणातील आगम परंपरा या ठिकाणच्या होणाऱ्या नित्य व नैमित्तिक पूजेत दिसून येते काय याचा विचार या प्रकरणात केला आहे.त्याचप्रमाणे देवीभागवतातील आगमनिष्ठ संप्रदाय येथे मुळात अस्तित्वात होता काय याचाही विचार येथे केला आहे.श्रद्धेतून व लोकपरंपरेतून निर्माण झालेला बदल आणि विकास याचा आढावा घेण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला आहे.त्याचबरोबर ही पूजिली जाणाऱ्या देवतेचे शैव, शावत व त्यानंतर वैष्णव रूप कसे बदलत गेले याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

परिशिष्ट

अ) महाराष्ट्रातील त्रैपुरूष देवालये व देवी मंदिरे

ब) श्रीयंत्र

अशाप्रकारे कोल्हापुरच्या महालक्ष्मी मंदिराचा सर्वांगाने विचार करून या प्रबंधात काही निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केला आहे.

या मंदिराचा अभ्यास केल्यानंतर मला असे दिसून आले की

कोल्हापुर हे नाम ताम्रशासनात कोल्लापुर असे नाव आले असले तरी करवीर या नावाने धार्मिक ग्रंथांतून जास्त प्रसिद्धच आहे. मात्र **देवीभागवत** या ग्रंथात दोन ठिकाणी आलेल्या नांवात एके ठिकाणी **करवीर** तर एके ठिकाणी कोलापुर असा उल्लेख आलेला आहे.ताम्रशासनाचा अभ्यास करताना असे दिसून आले की कर्नाटकातील बागलकोट तालुक्यातील सिद्धेश्वर मंदिराच्या भिंतीवरील शिलालेखांत(काळ इ.स.१०४९ ते इ.स.१०६८) कोल्हापुरच्या महालक्ष्मी मंदिराचा उल्लेख शिवक्षेत्र म्हणून आलेला आहे. महालक्ष्मीला रूद्राची अर्धांगिनी म्हटले आहे.तर पुराणांतर्गत (**मत्स्यपुराण,देवीभागवत**) उल्लेखात या ठिकाणास शक्तीपीठ म्हणण्यात आले आहे. महालक्ष्मीला

विष्णुभार्या म्हणण्यात येते. महालक्ष्मीचा हा शिवक्षेत्रापासून विष्णूभार्या पर्यंतचा इतिहास आपणास दिसून येतो.करवीरमाहात्म्य या ग्रंथावरून महालक्ष्मीचा शक्तिपीठाच्या अधिष्ठात्री पासून विष्णुपत्नी म्हणून बदल झालेला लक्षात येतो. कित्येक ठिकाणी तिला नवकोट कात्यायनींची सखी असे संबोधित केले आहे. निरनिराळ्या कवींनी रचलेल्या रचनांत (इ.स.१५ वे शतक ते इ.स.२० वे शतक) महालक्ष्मी ही पूर्णत: विष्णुपत्नी म्हणून ज्ञात असल्याचे दिसून आले.

ताम्रपट व शिलाशासनांत कोल्हापुरचे नाव कोलापुर व एकेठिकाणी क्षुल्लकपुर असे आले आहे. पुराणांत आलेले करवीर हे नामाभिधान ताम्रपट वा शिलालेखांत दिसून येत नाही. महालक्ष्मी मंदिराचा गाभारा व अंतराळ हे सर्वात प्राचीन घटक असून सभामंडप,महाकाली मंदिर, गणेश मंडप, महासरस्वती देवालय हे काही अवधीत मूळ मंदिरास जोडण्यात आले आहेत. णंदिराच्या नित्य पूजेत आज चालू असलेल्या पूजांबद्दलच माहिती मिळाली. पूर्वी प्रचलित असलेल्या पूजापद्धतीची जरी माहिती नसली तरी शारदीय नवरात्रातील अष्टमीच्या दिवशी मध्यरात्री होणारी शाक्तपूजा आजही प्रचलित आहे. मंदिराच्या बाह्यांगावरील सुरसुंदरींच्या मूर्तिंच्या आसनावर हळेकन्नड लिपीतील लेख आढळून आलेत.

ताम्रपट व शिलालेखांचा आधार घेऊन महालक्ष्मी मंदिरात कालानुक्रमाने झालेल्या वाढाचा आलेख दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. आगम संप्रदायानुसार प्रचलित असलेली पूजा या ठिकाणी चालते,परंतु कालौघात झालेल्या बदलामुळे आज तरी मांसाहाराचा नैवेद्य या देवीस दिला जात नाही. शाक्त परंपरेतील चक्रपूजेविषयी फारशी माहिती मिळू शकली नाही. परंतु शक्तिपीठांतील यादीत असलेल्या उल्लेखांवरून याठिकाणी शाक्तपंथीयांप्रमाणे पूजा होत असावी असे वाटते. परंतु काळाच्या ओघात शाक्त पंथाबद्दल समाजात वाढणारा तिटकारा ,१८ व्या शतकात महालक्ष्मीच्या मूर्तिच्या पुन:स्थापनेच्यावेळी मंदिरातील पूजेत बदल झाला असावा व आजचे विष्णुपत्नी हे स्वरूप या दरम्यानच प्रस्थापित झाले असावे असे दिसते.

मराठी संदर्भ सूचि

- अंगापुरकर हरि गोपाळ देशमुख, *लक्ष्मीविजय*,संपादक दा.वि.कुलकर्णी श्रीमहालक्ष्मी प्रकाशन,कोल्हापुर, १९८८
- अभ्यंकर एस्.व्ही, *भक्तिकोश* (भारतीय तीर्थक्षेत्र व मंदिर), आदित्य प्रतिष्ठान , पुणे २००६
- ईश्वर (संपादक), *ज्ञानार्णवतंत्र* ,आनंदाश्रम संस्कृत ग्रंथावली ग्रंथांक ६९, आनंदाश्रम मुद्रणालय, पुणे १९८७
- काठवटे अब्जि विष्णु, *द्व्याश्रयकाव्य* , बॉम्बे संस्कृत ॲण्ड प्राकृत सिरीज नं.६९, गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस,बॉम्बे १९१५
- कोलते डॉ.वि.भि. (संपादक),*म्हाइंभट संकलित श्रीचक्रधरलीळाचरित्र* ,महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक मंडळ,मुंबई १९८२
- कोलते डॉ.वि.भि. (संकलन),*स्थानपोथी* ,अरूण प्रकाशन,नागपुर
- कोलते डॉ.वि.भि. (संकलन),*म्हाइंभट संकलित श्रीगोविंदप्रभुचरित्र* अरूण प्रकाशन, मलकापुर १९६० (द्वितीय आवृत्ती)
- खरे, ग.ह, *महाराष्ट्राची चार दैवते* ,ग.ह.खरे, पुणे १९५८
- चित्राव सिद्धेश्वर विष्णु (अनुवादक), *ऋग्वेदाचे मराठी भाषांतर*,भारतीय चरित्रकोश मंडळ,पुणे १९६९
- चित्राव डॉ.सिद्धेश्वरशास्त्री, *देवीमाहात्म्य* (दुर्गासप्तशती) भारतीय चरित्रकोश मंडळ,पुणे१९८३
- चित्राव सिद्धेश्वर विष्णु,*प्राचीन भारतीय स्थलकोश* (प्रथम खंड),भारतीय चरित्रकोश मंडळ, पुणे १९६९
- जोशी लक्ष्मणशास्त्री (संपादक), *मराठी विश्वकोश* (खंड ४), महाराष्ट्र राज्य साहित्यसंस्कृती मंडळ, मुंबई १९७६
- जोशी महादेवशास्त्री(संपादक),*भारतीय संस्कृतीकोश*, भारतीय संस्कृतीकोश मंडळ,पुणे,१९७२
- जोशी प्र.न., *पद्मपुराण*, प्रसाद प्रकाशन, पुणे ,१९८१
- जोशिराव दाजिबा,*श्री करवीर माहात्म्य*, मीनल प्रकाशन,कोल्हापुर,२०००
- ढेरे रा.चि.,*करवीरनिवासिनी श्रीमहालक्ष्मी* , पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००९
- तुळपुळे शं.गो. (संपादक),*लीळाचरित्र* पूर्वार्ध भाग १ व २, सुविचार प्रकाशन मंडळ,पुणे, १९६६
- दिक्षित मो. ग., *महाराष्ट्रातील काही प्राचीन ताम्रपट व शिलालेख*, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे १९४७
- देगलूरकर गो.बं.,राणे अ.पां.,खरे बी.डी.(संपादक),*युगयुगीन करवीर इतिहास दर्शन* ,भारतीय इतिहास संकलन समिती कोल्हापुर,२०१०
- प्रभुदेसाई प्र.कृ., *आदिशक्तीचे स्वरूप* (देवीकोश) भाग ४,टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ संशोधन प्रकाशन मंडळ,पुणे१९६७
- मिराशी वा.वि, *शिलाहार राजवंशाचा इतिहास व कोरीव लेख* ,विदर्भ संशोधन मंडळ, नागपुर १९७४
- शर्मा .डॉ.राजेंद्र (संपादक),*श्रीमार्कंडेयपुराणम्*, नाग पब्लिशर्स ,तिसरी आवृत्ती, २००८

- श्रीवास्तव डॉ.बलराम, *श्री सूत्रधारमण्डनप्रणिते वास्तुशास्त्रेरूपमण्डनम्*, मोतीलाल बनारसीदास, दिल्ली १९९६
- सातवळेकर श्रीपाद दामोदर, *ऋग्वेद संहिता* ,स्वाध्याय मंडळ,पुणे,१९९७
- नागशरण सिंह(संपादक), *श्रीमद्देवीभागवतपुराणम्*,नाग पब्लिशर्स,दिल्ली १९८६

पोथी

- ठक्करगोवर्धनदासलक्ष्मीदास ठक्कर (संपादक), *श्रीमदानन्दरामायण* (पोथी) जगदीश्वर प्रेस,मुंबई १८४७
- श्रीमुनीश्वर यांच्या संग्रहातून , *शारदीय नवरात्रपूजाविधी*

गॅझेटियर

- चौधरी के.के (संपादक), *कोल्हापुर जिल्हा* ,महाराष्ट्र राज्य गॅझेटियर दार्शनिक विभाग,महाराष्ट्र शासन,मुंबई १९८९
- जामखेडकर अ.प्र., *स्थापत्य व कला* (महाराष्ट्र भाग २), मुंबई दार्शनिक विभाग सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई २००२
- पाठक अ.शं.(संपादक), महाराष्ट्र :*इतिहास -प्राचीन काळ (खं-१ भाग-२)*,दार्शनिक विभाग,महाराष्ट्र शासन,मुंबई २००२

इंग्रजी संदर्भ सूचि

- Agrawal V.S., *Devimahatmya,* All India Kashiraj Trust,Varanasi,1963
- Banarjea Rev.K.M (Editor),*The Markankey Purana* (OriginalSanskrit), Asiatic Society of Bengal, Calcutta, 1862
- Banerjea J.N., *Developmant Of Hindu Iconography,*Munshilal Manoharlal,New Delhi,1974
- Bhattacharya R.N., *History of S'akta Religion,*Munshilal Manoharlal, Delhi,1974
- Deglurkar G.B., *Temple Architecture And Sculptures Of Maharashtr,* Nagpur University,Nagpur, 1974
- Fleet J.H., *The Dynasties Of The Kenerese District Of Bombay Presidency,*Central Government Press, Bombay,1896
- Graham Major D.C., *Statistical Report On The Principality Of Kolhapur,* Government of Bombay Presidency, Bombay,1854
- Kane P.V., *History Of Dharmashastra Vol.v.Part ii* ,Government Oriental Series, BhandarkarOrientalResearchInstitute,Pune, 1968
- Kathavate A.V.(Editor), *Dyvashryakavya by Hemchandra,* (With Commenery by Abhaytikagni),Bombay Sanskrit And Prakrut Series No.lxix , Government Central Press,1915
- Kundangar K.G., *Notes On Shri Mahalakshmi Temple* ,Kundangar K.G.,Kolhapur,1929

- MaxMullar (Editor), *Rig-Veda Sanhita ,Vol iv Mandal x* ,Krishnadas Academy, Varanasi,1983
- Moraes G.M., *Kadamb Kul,*(A History Of Ancient And MedievalKarnataka),Bombay,1931
- Narasinha R., *The Lakshmidevi Temple At Doddagaddavalli* , Mysore Government Press, Bangalore, 1919
- Rao T.A.G., *Elements Of Hindu Iconography Vol I Part ii* , Motilal BanarasidasPublisher, Delhi1971,1997(Reprint)
- Ritti Shrinivas & Karavirkar A.B., *Inscriptions From Kolhapur District,*Prasaranga Kannad University ,Hampi, 2000
- Sankalia H.D. & Dikshit M.G., *Excavations At Brahmapuri (Kolhapur),*Deccan College Post Graduate Research Institute, Pune ,1952
- Shiromani Pandit Bharatchandra, *Chaturvargachintamani Of Shree Hemadri* ,Chaukhamba Sanskrit Sanstan , Varanasi, 1985
- Sircar D.C., *The s'ktapithas,* Motilal Banarasidass, Delhi,1973
- Soundar Rajan K.V., *Early Temple Architecture In Karnataka And Its Ramifications,* Kannad ResearchInstitute,KarnatakUniversity,Dharwad,1969
- Wadekar M.L., *Devimahatmya* ,(With The Commentary Of Nilambaracarya),Oriental Institute, Baroda,1997

THESIS

- Dr Usha Bhende , *A Cultural Study Of The temples Of Southern Maharashtra,* Karnatak University, Dharwad ,1989
- Dr.Pprabhakar Malshe , *Kolhapur A Study In Urban Geography* ,Poona University, Poona ,1968
- Dr. Binda Paranjape , *Cultural History Of The Konkan Based On Shilahar Inscriptions,* Deccan College Post Graduate Research Institute, Pune, 1989

JOURNALS

- *Indian Antiquary* , Volume ix 1947, Volume x 1884,
- *Epigraphia Indica , Vol xviii*
- *Corpus Inscription Indecorum , Vol vi , Inscriptions Of The Shilaharas* ,Archaeological Survey Of India,1977

REPORT

- Institute Of Research And Development In Oriental Studies Arms And Armour , (IRDOS) Pune (Report),Scientific Report Dtd .2-1-2008

8282